
# माणूस

एकोणिसावा
वर्षारंभ अंक

२ जून १९७९ । शनिवार । चार रुपये

## किसान-कामगार विशेषांक




हंसः श्वेतो बकः श्वेतः को भेदो बकहंसयोः ।
नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बकः ॥
हंस पांढरा आणि बगळाही पांढरा. मग बगळा आणि हंस यांत फरक तो काय ? पण दूध आणि पाणी निरनिराळे करण्याच्या वेळी मात्र हंस हा हंस ठरतो व बगळा बगळाच ठरतो.
वरील सुभाषित 'महाराष्ट्र टाइम्स'च्या बाबतीत तंतोतंत प्रत्ययास येते. वृत्तपत्रांच्या सध्याच्या गजबजाटात, सर्व थरांतील आपल्या सुजाण वाचकांना नेमके काय हवे ते आकर्षकरीत्या कसे द्यायचे ही किमया फक्त 'महाराष्ट्र टाइम्स'च करू शकतो.
उत्तरोत्तर वर्धिष्णू होत जाणारे दैनिक
महाराष्ट्र टाइम्स

## अनुक्रम


गरीब गरीब का राहतात ? ग्रामीण विरुद्ध नागरी विकास ५
शरद कुलकर्णी

न झालेल्या एका किसान मेळाव्याच्या निमित्ताने १७
विजय परुळकर

पाच एकर तीस गुंठे जिराईत, एक विहीर, एक सोमा २२
प्रा. वसंत देशपांडे, अध्यक्ष, ग्रामायन

मावळचा किसान, मुंबईचा कामगार, पुण्याचा ग्राहक २६
आबा करमरकर, कामशेत

पुनर्रचना : एका साम्यवादी देशाचा अनुभव ३३
प्रा. भगवान बापट

डावा पर्याय : पश्चिम बंगालमध्ये पंधरा दिवस ४१
छाया दातार

आणखी एक पर्याय : कृषी औद्योगिक समाज ७९
मुलाखती । माणूस प्रतिनिधी । बंडू ठाणेकर


हा विशेषांक अपेक्षेहून थोडा मोठा झाला.
साहित्य भरपूर दिलेले आहे.
तेव्हा आणखी एक आठवडा सुट्टी घेत आहोत,
ती वाचकांनी मंजूर करावी ही विनंती.
' माणूस ' चा यापुढील अंक शनिवार १६ जून १९७९
या तारखेचा असेल.
मधला ९ जूनचा अंक निघणार नाही.
विक्रेत्यांनी-वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## कृष्णकिसान

किसान हे 'कृष्ण' या संस्कृत शब्दाचे प्राकृत रूप. कृष्ण म्हणजे कसणारा. जमीन नांगरून पिके काढणारा. जमीन कसायची म्हणजे नांगर हवा. कृष्णाचा भाऊ बलराम याने तो दिला. त्याचे एक नाव 'हलधर'—नांगरधारी असेही होते. नांगराला जोडायला बैल हवा. म्हणजे गायही आलीच. म्हणून कृष्णाला गोपाळही व्हावे लागले. गोपालनाशिवाय त्या काळी शेती होऊच शकत नव्हती. म्हणून मूळचा वासुदेवकृष्ण गोपाळकृष्ण होऊन लोकमानसात स्थिरावला.

या गोपाळकृष्णाचे वृंदावन मथुरेपासून काही फार लांब नव्हते. वृंदावनाच्या गौळणी रोज दूधदुभते मथुरेला विक्रीसाठी घेऊन जाऊ शकत होत्या. या गौळणींची वाट श्रीकृष्ण अडवत असे. हा केवळ एका चहाटळ आणि आजच्या परिभाषेतील एका 'चालू' मुलाचा चावट खेळ नव्हता; हा काही कुंजवनातला एखादा करमणुकीचा कार्यक्रमही नव्हता. तेवढेच असते तर पिढ्यानुपिढ्या त्यावर लोकगीते गायली गेली नसती. वृंदावनातल्या गोपींपासून मारवाडातल्या मीरेपर्यंत त्या गवळ्याच्या पोरासाठी कुणी इतके वेडावून गेले नसते. गणगौळणीशिवाय आमच्या लोककला आजही, इतका काळ लोटला तरी रंगत नाहीत, हे कशाचे लक्षण ?

वृंदावनाच्या अस्तित्वावरच घाला आलेला होता. वृंदावन बहरलेले, फुललेले—फळलेले, गायीवासरांनी गजबजलेले, लतापल्लवांनी-कुंजवनांनी सुशोभित राहायचे तर मथुरेचे वर्चस्व त्यावर असता उपयोगी नव्हते. हे वर्चस्व कसे तोडायचे ? गौळणींना आणि गोपाळांनाच मथुरेचे भयंकर आकर्षण होते. ते कमी व्हावे म्हणून गावोगावचे कृष्ण त्यांच्या वाटा अडवीत होते. जे कुणी ऐकत नव्हते त्यांच्या घरातील दूधदहीताकावर, कृष्ण स्वत: अशा प्रसंगी उपस्थित असला तर मुख्यत: लोण्यावरच डल्ला घातला जाई आणि न ऐकणाऱ्या गौळणींसाठीही कृष्णाजवळ एक खासा उपाय होता. तो अशांची वस्त्रे पळवून त्यांची चारचौघात जाहीर फटफजिती करून सोडायचा.

मथुरेचे लोकही या वाटा अडवल्या गेल्यामुळे हैराण झाले. त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू त्यांना वेळेवर, योग्य भावात मिळेनात. गौळणींच्या आणि गोपाळांच्या कृष्णपुरस्कृत असहकार चळवळीमुळे त्यांची पुरती कोंडी होत आली. त्यांचा नेता कंस. त्याचा पाडाव केल्याशिवाय हे वाटा अडवण्याचे, रस्ता बंद करण्याचे आंदोलन पूर्णत्वाला पोचू शकत नव्हते. कृष्णाने योग्य वेळ येताच कंसवध करून ही राज्यक्रांती नंतर करून टाकली.

उगाच नाही गेली पाच हजार वर्षे कृष्णाचा हा पराक्रम गणगौळणींच्या आणि लोकगीतांच्या द्वारा आज आपल्यापर्यंतही वाहत येत राहिलेला आहे. ते एक युगपरिवर्तन होते.

हे कृष्ण-बलरामांचे युग ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत ढोबळमानाने आपल्याकडे चालू राहिले. नंतर पुन्हा मथुरेचा, मद्रास—कलकत्ता — मुंबईचा जमाना सुरू झाला. ब्रिटिश गेले तरी आजतागायत तो चालू आहे. हे शहरी विभागाचे ग्रामीण विभागांवरील वर्चस्व कमी कसे होईल ? ते होत नाही तोवर भारत आज आहे तसाच पश्चिमेची एक नक्कल म्हणून, दहावी—बारावी कार्बन-कॉपी म्हणून जगत राहील. या जगण्याला काही विशेष सांस्कृतिक, राष्ट्रीय आशय, काही वैशिष्ट्यपूर्ण अर्थ असणार नाही. तो असावा, राहावा असे वाटत असेल तर गौळणींना आणि गोपाळांना, ग्रामीण भागातील उत्पादक समूहांना कृष्णाप्रमाणेच कुणी तरी पुन्हा संघटित करायला हवे आहे.

अशा संघटकांसाठी हा विशेषांक ●


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : पहिला—दुसरा
२ जून — ९ जून १९७९
किंमत : चार रुपये

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९



# सत्यम्<br>शिवम्<br>सुंदरम्


असा हा निसर्गप्रेमी कारखाना!

निसर्गाच्या अमृतफळाचं – हिरड्याचं रूपांतर करून नवे औद्योगिक महाकाव्य– सत्यं-शिवं सुंदरम् निर्माण करणारा डोंगरदऱ्यांच्या परिसरात, शिवछत्रपतींच्या भव्य प्रतिमेच्या सान्निध्यात – परमेश्वराच्या अधिष्ठानावर आधारित – मानवी उद्योगाच्या महायज्ञाचे फलित - "वासब" टॅनिन एक्स्ट्रॅक्ट देशी आणि परदेशी बाजारपेठांतील चर्मोद्योगांची गरज भागविणारे. भुकटीरूप द्रव्य, अवघ्या समाजाचे भाग्य उजळीत आहे.

**पोल्सन लि., ( आंबा टॅनिन डिव्हिजन ) मुंबई**

कारखाना : (विशाळगड)

ऑफिस : रेल्वे स्टेशनसमोर कोल्हापूर, फोन : ४४०४



### आपण गरीब का? मागासलेले का?

**गरिबांची संख्या जेथे जास्त त्या ग्रामीण भागाच्या, शेती ग्रामोद्योगांच्या विकासाकडे आपण दुर्लक्ष केले म्हणून. गरिबीचे आपल्याला मुळापासून उच्चाटन करावयाचे तर यापुढे तरी शहरांपेक्षा ग्रामीण भागाला अधिक प्राधान्य दिले पाहिजे, भांडवलाचा ओघ खेड्यांकडे वळवला पाहिजे, जमीन-वाटप, जमीनसुधारणा, शेतमजूर संघटन—या कार्यक्रमांना उठाव दिला पाहिजे, ग्रामोद्योगांची जोड द्यायला हवी, असे आता नामवंत अर्थशास्त्रज्ञही सांगू लागलेले आहेत. अशा एका अर्थशास्त्रज्ञाच्या गाजलेल्या पुस्तकाचा परिचय प्रस्तुत लेखात करून दिलेला आहे.**

# गरीब गरीब का राहतात? ग्रामीण विरुद्ध नागरी विकास

**शरद कुलकर्णी**

गरिबीची मीमांसा हा सर्व अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा मूळ विषय आहे.

अर्थशास्त्र हे मानवी गरजापूर्तीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. मात्र अलीकडे दोन विषयांवर अर्थशास्त्रज्ञांनी जास्त लक्ष दिले आहे. एक म्हणजे जगात अतिशय झपाट्याने व मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर होत आहे व नजीकच्या काळात ती संपून जाऊन आर्थिक विकासाला पायबंद पडेल अशी भीती निर्माण झाली आहे. दुसरे म्हणजे मंदविकासगती असलेल्या देशातील गरिबी केवळ विकास होऊन नाहीशी होते हे तत्त्व बाद झाले आहे. 'आधी उत्पादन वाढवा व मग त्याच्या वाटपाचे पाहू' असे राजकर्ते व सुस्थितीत असणारे नेहमीच सांगतात. कशाचेही उत्पादन वाढवा, अगदी लिपस्टिकचे उत्पादन किंवा आयात वाढवूनही गरिबी कमी होईल हे म्हणणे अतिशय दीर्घ काळातच खरे आहे आणि अतिशय दीर्घ काळात आपण सारेच संपणार आहोत. अशा परिस्थितीत गरिबी लवकर नाहीशी करण्यासाठी विकासाचा ढाँचा कोणत्या प्रकारचा असावा, यावर अर्थशास्त्रज्ञ भर देत आहेत. या संदर्भात भारताच्या नियोजनाचा अभ्यास केला जात आहे.

नियोजन सुरू होऊन २७ च्या वर वर्षे झाली. राष्ट्रीय उत्पन्न खूप वाढले, दरडोई उत्पन्नही वाढले; पण भारतातील गरिबांची संख्या व त्यांचे दैन्य काही कमी होत नाही याविषयी मीमांसा चालू आहे. भारतीय नियोजनात शेतीपेक्षा उद्योगधंद्यांवर अधिक भर देण्यात आला आहे. ग्रामीण विकासापेक्षा नागरी विकास अधिक महत्त्वाचा मानला गेला आहे अशी एक विचारधारा आहे. प्रत्येक आर्थिक प्रश्नाला असतो तसा याही प्रश्नाला एक राजकीय रंग आहे. राजकीय नेते ग्रामीण विरुद्ध शहरी असा वाद आपल्या हितासाठी राबवून ठिकठिकाणी किसान-मेळावे आयोजित करीत आहेत. कोणताही पक्ष किसानांसाठी गेल्या तीस वर्षांत काहीही करू

शकला नाही, असे काही पक्षांचे दीर्घकाळ स्वत: राज्यसत्ता उपभोगणारे नेतेसुद्धा निर्लज्जपणे सांगत आहेत. मग आपण त्या पक्षात का राहिलो व सत्तेवर असताना काय केले हे मात्र सांगण्याची तयारी ते दाखवीत नाहीत. ग्रामीण भागाच्या विकासाच्या व शेतीविकासाला अग्रक्रम देण्याच्या प्रश्नांचा खेळातल्या पत्त्यांप्रमाणे वापर होत आहे. खरे-खोटे, सत्य व स्वार्थ इतक्या बेमालुमपणे मिसळले जात आहेत, की ते वेगळे करणे करणे अशक्य आहे. दुसऱ्या बाजूस संघटित विरुद्ध असंघटित घटक असा वाद पुढे येत आहे. बँका, एल. आय. सी. यातील अतिसंघटित नोकरवर्ग तुलनात्मकदृष्ट्या अधिक असलेल्या आपल्या पगारात आणखी वाढ व्हावी म्हणून लढयाला सज्ज होत आहे आणि सर्व समाजाचे दारिद्र्य घालविण्याची भाषा बोलणाऱ्या तथाकथित डाव्या पक्षाच्या नेतृत्वाखालील कामगारसंघटना त्यांना पाठिंबा देण्यास एका पायावर तयार आहेत. अशा सर्व गोंधळात ग्रामीण विकासाकडे खरोखरच दुर्लक्ष होते काय या प्रश्नाचा वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे. सुदैवाने राजकीय पक्षापासून अलिप्त आणि कोठल्याही प्रकारचे हितसंबंध नसलेल्या एका परदेशी अर्थशास्त्रज्ञाने या प्रश्नाचा सखोल विचार करणारा एक ग्रंथ नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यातील विचारांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे.

मायकेल लिप्टन हे भारताच्या आर्थिक प्रश्नाचे अनेक वर्षे संशोधन करणारे एक ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ आहेत.

ससेक्स युनिव्हर्सिटीत ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक असून 'जर्नल ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज' या अर्थशास्त्रीय नियतकालिकाचे ते कार्यकारी संपादक आहेत. भारताच्या आर्थिक समस्यांचा त्यांनी अभ्यास केला असून त्यांचे 'असेसिंग इकॉनॉमिक परफॉरमन्स' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. भारतातील आर्थिक समस्यांवर त्यांनी विपुल लेखन केले असून ते विविध नियतकालिकांत व ग्रंथांत लेखरूपाने प्रसिद्ध झाले आहे.

'व्हाय पुअर पिपल स्टे पुअर' हा ग्रंथ १९७७ मध्ये प्रसिद्ध झाला असून ४६७ पानांच्या या ग्रंथात आर्थिक विकासात शहरी विभागाला कसे प्राधान्य दिले जाते व ग्रामीण भागाच्या विकासाकडे कसे दुर्लक्ष होते याचे सविस्तर विवेचन भारतीय परिस्थितीचा संदर्भ देऊन करण्यात आले आहे. ग्रामीण विरुद्ध नागरी, असंघटित विरुद्ध संघटित गट या सध्या चालू असलेल्या वादाच्या वेगवेगळ्या छटा समजावून घेण्यासाठी हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे.

## ग्रामीण विकासाची समस्या

आज कमी विकसित देशात मुख्य वाद कामगार व भांडवलदार किंवा परकीय राष्ट्र विरुद्ध राष्ट्रहित असा नसून ग्रामीण भाग विरुद्ध शहरी भाग असा आहे. ग्रामीण भागात गरिबांची फार मोठी संख्या आहे आणि त्या भागात विकासाच्या साधनांचा तुटवडा आहे. देशातील विकासाच्या साधनांचा वापर संघटित व आरडाओरड करण्यात प्रवीण अशा शक्तिमान शहरी विभागांच्या विकासासाठी अधिक होत आहे. शहरात सिनेमागृहे किंवा स्टेडियम बांधण्यासाठी लोखंड व सिमेंट आहे; परंतु खेड्यांत विहिरी बांधण्यासाठी मात्र ते मिळत नाही. विकास साधनांचा ओघ शहरी विभाग आपल्याकडे खेचून घेत आहे. मात्र याचा अर्थ शेतीचा विकासच झाला नाही असा नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर गरीब राष्ट्रांचा बराच विकास झाला आहे. दरडोई उत्पन्न जवळजवळ दुप्पट झाले आहे, जलसिंचनाच्या सोई वाढल्या आहेत, शिक्षणाच्या व आरोग्याच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. सायकली, रेडिओ, विद्युत् उपकरणे व रस्ते यातही लक्षणीय वाढ झाली आहे; परंतु या सर्व विकासामुळे या देशातील गरीब जनतेच्या जीवनमानात फारशी वाढ झालेली दिसत नाही. आज विकसित असलेल्या देशातही सुरुवातीला अनेक वर्षे विकासाचे फायदे तेथील गरीब जनतेला मिळाले नाहीत हे खरे आहे; पण क्रमाक्रमाने कामगार संघटित होत गेले, राजकीय सत्तेतील त्यांचा वाटा वाढत गेला आणि आर्थिक विकासाचा फायदा त्यांना मिळाला. आज अविकसित देशात ही गोष्ट घडून येण्याचा संभव दिसत नाही. विकसित देशात विकासाबरोबर शहरीकरण वाढत गेले. शेतीतल्या कामगारांची संख्या कमी होऊन कारखान्यातील कामगार वाढले, त्यामुळे त्यांचे संघटन झाले व राजकीय सत्तेतील व आर्थिक विकासातील त्यांचा वाटा वाढत गेला. भारतासारख्या अविकसित देशात शेतीत काम करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर घटून उद्योगधंद्यांत काम करणाऱ्यांची संख्या वाढेल अशी शक्यता नाही. ग्रामीण कामगार संघटित होऊन राजकीय सत्तेत व आर्थिक विकासात हक्काने वाटा मिळवतील असा संभव नाही. म्हणून विकसित देशात झाले त्याचप्रमाणे आजच्या विकसनशील देशातही गरिबी हळूहळू कमी होत जाईल ही शक्यता दिसत नाही.

विकासाच्या लाभाची अतिशय असमान वाटणी हा अनेकांच्या चिंतेचा विषय झाला आहे. अविकसित देशांना मदत करणारे देश व आंतरराष्ट्रीय संस्था यांच्या लक्षातही ही गोष्ट आली आहे. अविकसित देशात ४० टक्के लोक अतिशय निकृष्ट दर्जाचे जीवनमान कंठीत आहेत व त्यातील बहुसंख्य ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर व अतिशय लहान शेतकरी आहेत. गेल्या ३० वर्षांत अनेक अविकसित देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात, दरडोई उत्पन्नात बरीच वाढ होऊनही या तळाच्या ४० टक्के लोकांचे जीवनमान सुधारले नाही हे विचारवंतांना एक कोडे वाटते. अविकसित देशांना मदत करावी किंवा नाही व करावयाची झाल्यास कशा प्रकारे करावी याविषयी या देशातील अर्थशास्त्रज्ञ व राजकारणी यांच्यात चर्चा होत आहे.

१९४५ नंतर आर्थिक विकास होत असताना गरिबांचे जीवनमान सुधारण्याचे काहीही खास प्रयत्न झाले नाहीत हे यामागील कारण आहे. आज विकसित असलेल्या देशात सुरुवातीच्या काळात विकासाचा फायदा गरिबांना मिळाला नाही तरी विकासाच्या प्रक्रियेत बहुसंख्य लोकांना लागणाऱ्या अन्नधान्ये, कापड व इतर वस्तूंच्या उत्पादनात व त्या उत्पादन करण्याच्या क्षमतेत सारखी वाढ होत होती. त्याचप्रमाणे या देशांच्या विकासाच्या प्रक्रियेत समाजाचे दोन वर्गांत स्पष्ट विभाजन होत गेले. या विभाजनामुळे कामगारवर्गाची संघटना वाढत गेली व त्यामुळेच आर्थिक विकासाचे फायदे व राजकीय सत्तेत वाटा मिळविण्यासाठी तो वर्ग झगडला. आजच्या गरीब देशात सर्वसामान्यांना लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन व त्यांचे उत्पादन करण्याची क्षमता यांची वाढ होताना दिसत नाही व त्यामुळे विकासाचे फायदे सर्वांना कालांतराने मिळतील ही शक्यता फारशी वाटत

नाही. या गोष्टीचे खापर परकीय आर्थिक हितसंबंधांचे वर्चस्व किंवा देशी भांडवलदार यांच्यावर फोडून चालणार नाही.

विकसित असलेल्या देशाच्या विकासाला सुरुवात झाली त्या काळात शहरी आणि ग्रामीण भागात जी आर्थिक तफावत होती त्यापेक्षा किती तरी अधिक तफावत आज विकसनशील देशात आहे. या तफावतीचे मुख्य कारण म्हणजे विकासासाठी झालेल्या भांडवल-गुंतवणुकीच्या फक्त २० टक्के भागच शेतीच्या वाट्याला आला आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण मात्र ६० टक्क्यांपेक्षा जास्त आहे व त्यापैकी बहुसंख्य अतिशय गरीब आहेत. शेतमालाच्या किमतींच्या मानाने औद्योगिक मालाच्या किमती जास्त आहेत आणि त्यामुळे औद्योगिक भांडवलगुंतवणूक अधिक फायदेशीर ठरून ग्रामीण भागातील बचत शहरी विभागाकडे वळविली जात आहे. शिक्षणाच्या सोयीची वाढ शहरात होत असल्यामुळे ग्रामीण भागातील हुशार व उद्योगी तरुणवर्ग शहरी विभागाकडे वळत आहे. या गोष्टीमुळे अर्थव्यवस्थेतील अकार्यक्षमता वाढत आहे. वास्तविक पाहता शेतीत गुंतवल्या जाणाऱ्या भांडवलाचा उत्पादनावर होणारा परिणाम उद्योगधंद्यात गुंतवल्या जाणाऱ्या भांडवलापेक्षा दुप्पट किंवा तिप्पट असतो, तरी देखील शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रांतील भांडवलगुंतवणूक वाढत आहे. शेतीतील भांडवलगुंतवणीमुळे विषमतेत जी वाढ होते त्यापेक्षा किती तरी अधिक वाढ इतर क्षेत्रांतील भांडवलगुंतवणीमुळे होते. त्यामुळे इतर क्षेत्रातील वाढत्या भांडवलगुंतवणुकीबरोबर आर्थिक विषमतेतही वाढ होत आहे. थोडक्यात विकसनशील देशात रोजगारी वाढविणाऱ्या व गरिबांना फायदेशीर अशा शेतीतील भांडवल-गुंतवणीपेक्षा जास्त भर विषमता वाढविणाऱ्या शहरी लोकांना फायदेशीर व कमी कार्यक्षम अशा भांडवलगुंतवणीवर देण्यात येत आहे. अशा रीतीने अकार्यक्षमता व विषमता वाढविणारी भांडवल-गुंतवण वाढत आहे, त्यामुळे आर्थिक विकास होत असतानाही बहुसंख्य ग्रामीण जनतेची गरिबी कमी होत नाही व कमी होत जाण्याचा संभव दिसत नाही. शहरी विभागात वाढत जाणाऱ्या भांडवल-गुंतवणुकीमुळे आर्थिक विषमता वाढणार आहे. एक तर त्यामुळे गरिबांकडील संपत्ती श्रीमंतांकडे जाणार आहे. तसेच कमी विषम भागाकडून जास्त विषम भागाकडे जाणार आहे. शहरी विभागाच्या विकासाचा फायदा त्यांना लागणारा शेतमाल पुरविणाऱ्या सधन शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील गरिबांपेक्षा जास्त मिळतो हेही महत्त्वाचे आहे.

या सर्व प्रक्रियेमागील सर्व कारणे केवळ आर्थिक नाहीत तर काही राजकीय आहेत आणि ती समजावून घेतल्याशिवाय ही कारणे व परिस्थिती बदलणे कठीण आहे.

गरिबी वाढविणारा शहरी विकास या सिद्धान्ताला तीन आक्षेप घेतले जातात, त्यांचाही विचार केला पाहिजे. ग्रामीण भागाच्या विकासावर भर देण्याने सर्व प्रश्न सुटतील का, असा प्रश्न विचारला जातो. शहरी विकासावर भर असा काही हितसंबंधी लोकांचा कट आहे काय, असा दुसरा प्रश्न विचारला जातो. तसेच ग्रामीण भागाच्या विकासावर भर दिला जावा म्हणजे नक्की काय व किती भर द्यावा, असेही विचारले जाते.

ग्रामीण भागाच्या विकासावर भर न देण्याच्या व शेतीविकासाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणाचे चार भाग आहेत. १ : काहींच्या मते शेतीविकासावर सरकारने भर देऊ नये व त्यावर जास्त कर लादून औद्योगिक विकासासाठी शेतमाल स्वस्त किमतीत मिळेल असे पाहावे. २ : काहींच्या मते उद्योगधंद्यांना लागणाऱ्या शेतमालासाठी व कामगारांना धान्यपुरवठा होण्यासाठी, तसेच औद्योगिक भांडवल-गुंतवणुकीसाठी लागणारी बचत होण्यासाठी शेतीविकास आवश्यक आहे. त्या दृष्टीने शेतीविकासावर भर दिला पाहिजे. मात्र हा भर शेतीत काम करणाऱ्यांसाठी नसून उद्योगधंद्यांच्या विकासाला पूरक म्हणून आहे. ३ : काहींच्या मते शेतीच्या विकासाशिवाय औद्योगीकरण अशक्य आहे आणि हा विकास केवळ शेतीतील वाढावा औद्योगिक क्षेत्राकडे वळवून होणार नाही, तर त्यासाठी शेतीचा व ग्रामीण विभागाचा मोठ्या प्रमाणावर विकास होणे आवश्यक आहे. खऱ्या व दीर्घकालीन औद्योगिक विकासासाठी शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तन झाले पाहिजे. मात्र याचा अर्थ अविकसित शेतीप्रधान देशांनी शेतीविकासावर सर्व लक्ष द्यावे असा नाही. अशा देशांनी शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रावर ध्यान दिल्याशिवाय लोकांचे जीवनमान वाढणे शक्य नाही.

४ : औद्योगीकरणाच्या बाबतीत काही जण अगदी टोकाची भूमिका घेतात. त्यांच्या मते विकसित देशात झाले तसे औद्योगीकरण अविकसित देशात झाल्यास त्यांचा तोटाच होईल. औद्योगीकरणामुळे वातावरण दूषित होते, समाजात वर्गकलह वाढून राष्ट्रीय संस्कृतीची हानी होते. त्यासाठी ग्रामीण विकासावर भर द्यावा व औद्योगीकरण विशेषत: मोठ्या उद्योगधंद्यांचा विकास टाळावा. गरीब राष्ट्रातील लोकांना हा दृष्टिकोन मान्य होणे कठीण आहे. काही देशांनी औद्योगीकरण करावे व इतर देशांनी शेतीप्रधान राहावे हे मान्य होण्यासारखे नाही. तसेच आजची किंवा यापूर्वीची ग्रामीण व्यवस्था आदर्श आहे वा होती हे खरे नाही. पारंपारिक व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर विषमता आणि शोषण आहे. त्यामुळे केवळ औद्योगीकरण टाळून विषमता व शोषण जाईल हे खरे नाही.

विकसनशील देशांचे औद्योगीकरण झाले पाहिजे, गरीब जनतेच्या जीवनमानात वाढ झाली पाहिजे आणि त्यासाठी शेतीचा विकास झाला पाहिजे. आर्थिक विकासाचे धोरण अशा रीतीने आखले गेले पाहिजे की, बहुसंख्य लोकांचे दारिद्र्य लवकरात लवकर कमी होईल. त्यासाठी छोटी शेती विकसित करण्यावर अधिक भर द्यावा लागेल. औद्योगीकरण करावयाचे असेल तर शेतीचा विकास करा. तो कसा करता येईल व त्याच्या आड आजची विकासनीती कशी येते हे या ग्रंथात पुढे सांगितले आहे.

## अकार्यक्षमता व विषमता वाढवणारी शहरी भांडवल गुंतवणूक

Fac : 2495, 2884

Offi : Resi : 2531

Gram : HORSEBRAND

# Modern Pottery Industries

**CHANDRAPUR**

**Mfg. : Roofing Tiles, S. W. pipes,**
**& Flooring Tiles Fire Bricks.**

Office : CHHOTA BAZAR

Factory : PADOLI

Partner
**A. SUBHANBHAI**

## विकास आणि गरिबी

आज जगात एका बाजूला अतिशय समृद्धी तर दुसऱ्या बाजूला अतिशय गरिबी असे दृश्य दिसते आणि या परिस्थितीचा विचार सधन राष्ट्रातील लोकदेखील करताना दिसतात. सधन राष्ट्रातील काही व्यक्ती व संस्था राजकीय, आर्थिक वा नैतिक कारणासाठी गरीब देशातील गरिबी दूर करण्याचा प्रयत्न करीत असताना दिसतात. याउलट गरीब देशातील गरिबांना मदत करण्यासाठी प्रामाणिकपणे आखलेल्या योजनादेखील गरिबांना मदत करताना दिसत नाहीत. स्पष्टच सांगायचे झाले, तर चीन, मलेशिया व तैवान हे अपवाद सोडता सुमारे १०० विकसनशील देशांत गेल्या ३० वर्षांत आर्थिक वाढ व विकास होऊनही किमान जीवनमानाखाली जीवनमान कंठणाऱ्या लोकांच्या संख्येत फारशी घट झालेली दिसत नाही. गरीब देशातील अर्थशास्त्रज्ञांनी सरकारला कर लादून, कर्ज उभारून व नोटा छापून भांडवलगुंतवण व शिक्षण वाढविण्यास प्रवृत्त केले आहे. सधन देशातील अर्थशास्त्रज्ञांनी गरीब देशांना जास्तीत जास्त मदत करावी म्हणून सरकारला उद्युक्त केले आहे. तरीदेखील गरीब लोक गरीबच राहिले आहेत आणि याचे कारण म्हणजे या अर्थशास्त्रज्ञांना गरीब गरीब राहण्याची कारणे काय याचे ज्ञान झाले नाही असे म्हणता येईल.

गरीब देशात अपूर्व अशी आर्थिक प्रगती झाली आहे, दरडोई उत्पन्न व उत्पादन वाढले आहे. गेल्या २७ वर्षांत ही दोन्ही जवळजवळ दुप्पट झाली आहेत. आर्थिक वाढीबरोबर आर्थिक विकासही मोठ्या प्रमाणावर झाला आहे. आर्थिक वाढ म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ, तर आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पादनव्यवस्थेत होणारे बदल. उदा. धरणे व कालवे यांच्यामुळे जलसिंचन सुविधेत झालेली वाढ, रस्ते व रेल्वे यांच्यामुळे वाहतुकीत झालेली वाढ, अवजड व मूलभूत उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे इतर उद्योगधंद्यांत झालेली वाढ. आर्थिक वाढ, चांगला पाऊस व हवामान यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होऊनही होऊ शकते. एखाद्या महत्त्वाच्या निर्यात होणाऱ्या वस्तूची परदेशी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर किंमत वाढली तरी राष्ट्रीय उत्पन्न वाढेल व आर्थिक वाढ होईल; पण अशा वेळी आर्थिक विकास होईलच असे नाही. आर्थिक विकास होताना राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होतेच; पण त्याचबरोबर देशातील उत्पादनसाधनांचे आधुनिकीकरण होऊन, देशातील भांडवलसंचय वाढून राष्ट्रीय उत्पन्न वाढत जाईल अशा सुविधा निर्माण होतात. गेल्या २७ वर्षांत विकसनशील देशांत आर्थिक वाढ व विकास ही दोन्हीही मोठ्या प्रमाणावर झाली आहेत; परंतु त्याचबरोबर आरोग्य व शिक्षण वगळता इतर बाबतीत मात्र बहुसंख्य गरिबांच्या जीवनमानात फारशी सुधारणा झालेली नाही. भूमिहीन शेतमजूर, लहान शेतकरी हे खेड्यातील गरीब व त्यापैकीच शहरात स्थलांतर झालेले बेकार किंवा तात्पुरता व्यवसाय करणारे लोक अतिशय गरीब अवस्थेत आहेत. आर्थिक वाढीचा व विकासाचा फायदा या लोकांना झालेला नाही. या घटनेमागील प्रमुख कारण गरीब देशांच्या नियोजनात शहरी विभागाला देण्यात आलेला भर हे आहे. विकासाच्या योजनांत शहरी विभागावर देण्यात आलेल्या महत्त्वामुळे बहुसंख्य गरिबांना रोजगारी मिळण्यात व त्यांच्या उपयोगाच्या वस्तूंच्या उत्पादनात वाढ होण्यास अडचण आली आहे. म्हणूनच या देशाचा विकास दैन्य वाढविणारा, निदान ते नाहीसे न करणारा विकास ठरला आहे. त्यामुळेच दरडोई उत्पन्नात बरीच वाढ होऊनही अन्नधान्याच्या वापरात फारशी वाढ झाली नाही. उत्पन्नात झालेल्या वाढीचे अधिक समप्रमाणात वाटप झाले असते तर अन्नधान्याच्या वापरात बरीच वाढ झाली असती. भारताच्या दरडोई उत्पन्नात १९४९–५० ते १९६८–६९ या २० वर्षांच्या काळात सुमारे ४० टक्के वाढ झाली; परंतु या काळात सुमारे दरडोई उष्णांक (कॅलरी) वापरात १४ टक्केच वाढ झाली. उत्पन्नात झालेली वाढ जर समान रीतीने वाटली गेली असती तर ही वाढ सुमारे ३२ टक्के झाली असती. अशीच परिस्थिती इतर गरीब देशांतही आढळून येते.

गरिबी आणि विकास यांचे साहचर्य तात्पुरते आहे का? विकसित राष्ट्रातील सुरुवातीच्या अवस्थेत असेच साहचर्य होते व ते विकासाच्या ओघात दूर झाले. मग ते याही देशाच्या बाबतीत होईल का, असा प्रश्न अनेकजण उपस्थित करतात. आधी उत्पादनवाढ व मग दारिद्र्याच्या उच्चाटनाची भाषा हा युक्तिवाद नेहमीच चालतो. याही प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. आज विकसित देशात कमी मजुरी देणे म्हणजे एकूण मागणीत घट घडवून आणणे होय, हे भांडवलदार देखील मान्य करतात. उत्पादनसाधनांत होणाऱ्या प्रगतीमुळे होणारी उत्पादनवाढ विकली जाण्यासाठी बहुसंख्य लोकांच्या उत्पन्नात म्हणजेच वस्तू विकत घेण्याच्या खरेदीशक्तीत वाढ झाली पाहिजे हे मान्य केले आहे.

परंतु अशा प्रकारचा युक्तिवाद विकसनशील देशात लागू पडत नाही. आज विकसित असलेल्या देशात कामगारवर्ग संघटित होत गेला व राजकीय सत्तेवर त्याने ताबा मिळविला व या संघटनेमुळेच कालान्तराने विषमता कमी झाली. कामगारवर्गाचे संघटन विषमता कमी होण्याचे मुख्य कारण होते. हे संघटन होऊ शकले, कारण कामगारवर्ग बिगरशेतकी व शहरात राहणारा आणि साक्षर होता. आज विकसनशील देशात ही परिस्थिती नाही. बिगर–शेतकी कामगारांचे प्रमाण १० ते ३५ टक्क्यांइतकेच आहे. या संघटित क्षेत्रातील कामगारांचे वेतन ग्रामीण क्षेत्रातील कामगारांच्या वेतनापेक्षा किती तरी अधिक आहे. शहरीकरण वाढण्याच्या आतच विकसनशील देशातील कामगारसंघटना वाढल्या आहेत आणि कामगारवर्गातही प्रस्थापित गट तयार झाले आहेत. औद्योगीकरणाचे फायदे ग्रामीण भागातील कामगारांबरोबर वाटून घेण्यात त्यांचा तोटाच आहे. त्यामुळे ग्रामीण व शहरी विभागात विषमता कमी करण्याला शहरी संघटित कामगारांचा विरोध होण्याची शक्यता आहे. विषमतेविरुद्धच्या लढ्याचे नेतृत्व हे कामगार करण्याची शक्यता नाही. याउलट आज विकसित झालेल्या देशात विषमतेविरुद्ध लढ्याचे नेतृत्व संघटित उद्योगधंद्यांतील कामगारांनी केले.

विकसित देशातील सुरुवातीच्या काळात कामगारांची भूमिका आज विकसनशील अवस्थेत असलेल्या देशातील कामगारांच्या भूमिकेपेक्षा वेगळी होती. तशीच परिस्थिती कारखानदारांच्या बाबतीतही आहे. विकसित देशात विकासाबरोबर स्पर्धा कमी होत गेली आणि स्पर्धकांवर कुरघोडी करण्यासाठी कमी वेतन देण्याची आवश्यकताही कमी होत गेली. त्याचबरोबर कमी वेतन देणे म्हणजे

एकंदर मागणी कमी करणे हे कारखानदारांच्या लक्षात आले. १९४५ सालानंतर तर आर्थिक अरिष्ट टाळण्यासाठी वेतनात कपात न करणे आवश्यक आहे हे सर्वमान्य झाले. यंत्राच्या वाढत्या वापरामुळे उत्पादनात झालेली वाढ टिकवायची असेल तर बहुसंख्य लोकांच्या खरेदीशक्तीत वाढ झाली पाहिजे, हे धोरण सर्वमान्य झाले. विकसनशील देशातील परिस्थिती बरीच वेगळी आहे. या देशातील गरिबीचे कारण मागणीची कमतरता नसून उत्पादन-साधनांचा अभाव हे आहे. त्यामुळे मागणीच्या वाढीसाठी वेतन वाढले पाहिजे अशी भूमिका येथील भांडवलदार घेणे शक्य नाही.

आज विकसित असलेल्या देशात मागणीचा समतोल राखण्यात व इतरही आर्थिक व्यवहारात सरकार महत्त्वाची कामगिरी बजावीत आहे. हळूहळू कल्याणकारी राज्यात सधन लोकांवर कर वाढवून गरिबांना काही किमान जीवनमान मिळवून देण्यात ही राष्ट्रे यशस्वी झाली आहेत. सरकारांची हे करण्याची शक्ती, कामगार-संघटनांचे सामर्थ्य, एकंदर लोकमत, वर्तमानपत्रे व अतिगरीब आपले उत्पादन ' खरेदी करू शकत नाही व त्यामुळे गरिबी कमी झाली पाहिजे, हे आढेवेढे घेत का होईना; पण मान्य करणारा भांडवलदारवर्ग, यामधून निर्माण झाला आहे. या सर्व गोष्टींची आज विकसनशील देशात उणीव आहे.

त्यामुळे आर्थिक विकासासाठी व स्थैर्यासाठी समानता हवी, हे धोरण विकसनशील देशापुरते तरी खरे नाही. मग या देशातील सरकारे समतेवर निदान बोलताना तरी एवढा भर का देतात? प्रत्यक्षात संपन्न देशांच्या मानाने गरीब देशात विषमता जास्त आहे व त्याची प्रमुख कारणे मोठ्या प्रमाणावर बेकारी व कामगारांतील गतिमानतेचा अभाव ही आहेत. या देशात सारे गरीब छोटे शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि शहरात नव्यानेच आलेले व रोजगारी नसलेले लोक आहेत. त्यांपैकी बहुतेकजण निरक्षर, असंघटित व विखुरलेले आहेत. कोणत्याही प्रकारची संघटित शक्ती नसल्यामुळे व अज्ञानामुळे ते आपला आवाज प्रभावीपणे उठवू शकत नाहीत. याउलट संघटित क्षेत्रातील कामगारसंघटना आपल्या बळावर मोठा आवाज करून मागण्या मान्य करून घेतात. असंघटित गटाकडे बुद्धिजीवी पाठ फिरवतात तर राजकीय गट त्यांना प्रतिगामी मानतात आणि त्यामुळे या गटांच्या मागण्यांकडे विकसनशील देशातील सरकारे लक्ष देत नाहीत.

आज विकसित असलेल्या देशात विकासाच्या सुरुवातीच्या काळात उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर रोजगार देत. याउलट विकसनशील देशातील आजचे उद्योगधंदे यंत्रप्रधान व थोड्या कुशल कामगारांना रोजगार देणारे आहेत. अशा उद्योगधंद्यांच्या वाढीतून कामगारांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळण्याची शक्यता नाही. हे संख्येने थोडे असलेले कामगार अधिक वेतनासाठी भांडत आहेत आणि असंघटित गटातील बहुसंख्य गरिबांसाठी ते लढतील अशी मुळीच शक्यता नाही. उलट हे बहुसंख्य गरीब आपल्या मार्गातील धोंडच आहेत असे ते मानतात.

गरीब देशातील ही विषमता शेवटी विकासाला हानिकारक ठरणार आहे. औद्योगिक कामगारांच्या मागण्या मान्य करून शांतता टिकवली तरी त्यामुळे उद्योगधंदे अधिक भांडवलप्रधान व कमी श्रमप्रधान होत जाणार आहेत.

## शहरी विभागाला प्राधान्य

विकसनशील देशात नागरी विभागाच्या विकासाला प्राधान्य दिले जात आहे म्हणजे काय, हे समजावून घेतले पाहिजे. नागरी भागातील लोकसंख्येच्या मानाने त्यांच्यासाठी खर्ची पडणाऱ्या साधनसामुग्रीचे प्रमाण जास्त आहे. उदाहरणार्थ नागरी विभागाच्या वाट्याला लोकसंख्येच्या मानाने अधिक डॉक्टर्स, नर्सेस व इस्पितळे येतात. हीच गोष्ट शैक्षणिक सोयी, रस्ते, वीज, वाहतूक व दळण-वळण यांच्या बाबतीतही खरी आहे. त्यामुळे विषमतेत तर वाढ होतेच; पण साधनसामुग्रीचा कमी कार्यक्षम उपयोग होतो. राजधानी (केन्द्राची व राज्यांची) असलेल्या शहरांना तर खूपच प्राधान्य मिळते. उद्योगधंदे व शेती यात उद्योगधंद्यांच्या विकासाला जास्त प्राधान्य मिळते. उद्योगधंदे हे अर्थव्यवस्थेचे आधुनिक क्षेत्र तर शेती हे जुने क्षेत्र मानले जाते व अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणासाठी औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर भर दिला जातो. सरकार या क्षेत्राच्या वाढीसाठी पाणी, रस्ते, टेलिफोन, वीज अशा सुविधा कमी खर्चात पुरविते.

## अन्नधान्याच्या किमती

नागरी क्षेत्राच्या प्राधान्याचा विचार करताना सरकारचे अन्न-धान्याच्या किमतीबाबतचे धोरण पाहणे आवश्यक आहे. विकसनशील देशांतील सरकारे अन्नधान्याच्या किमती कमी राहाव्यात म्हणून विशेष प्रयत्न करतात. शहरातील कारखानदार यंत्रप्रधान उत्पादन-पद्धतीचा वापर करून कामगारांची संख्या कमीत कमी ठेवण्याचा प्रयत्न करतात. परिणामी खेड्याकडून शहराकडे धाव घेणाऱ्या अनेकांना रोजगार मिळत नाही, शेतकऱ्यांना उत्पादनाला योग्य किमत मिळत नाही. उद्योगधंद्यात रोजगार मिळालेल्या कामगारांचे वेतन मात्र वाढत जाते व एक प्रस्थापित कामगारवर्ग निर्माण होतो.

सर्व विकसनशील देशांतील सरकारे अन्नधान्याच्या किंमती कमी ठेवण्याचा खास प्रयत्न करतात, त्यामुळे शहरातील मध्यमवर्ग व कामगार यांचा फायदा होतो. तसेच भांडवलदारांचाही फायदा होतो. **ग्रामीण भागाचे हित अन्नधान्याच्या किंमती कमी असण्यात नाही. लहान शेतकऱ्यांचे हितसुद्धा अन्नधान्याच्या किंमती जास्त असण्यात आहे, कारण त्यांनासुद्धा कापडचोपड, तेलमिरची वगैरेसाठी काही शेतमाल विकावाच लागतो.** अन्नधान्याच्या किंमती जास्त असल्यास मोठ्या शेतकऱ्यांना जास्त पैसा मिळतो व ग्रामीण भागातील शेत-मजूर, सुतार व सोनार वगैरे कारागिरांचा रोजगार वाढतो. अन्न-धान्याच्या किंमती या प्रश्नावर ग्रामीण व नागरी हितसंबंध यामधील विरोध स्पष्ट दिसतो. अन्नधान्याच्या किंमती वाढू लागल्यास सरकार अन्नधान्य आयात करते, तसाच उद्योगधंद्यांना लागणारा कापसासारखा कच्चा मालही आयात करते; पण उद्योगधंद्यांत निर्माण होणाऱ्या उपभोग्य वस्तूंच्या आयातीवर मात्र कडक निर्बंध असतात. या आयात-धोरणाचा फायदा शहरी भागाला जास्त मिळतो.

अशा रीतीने विकास होत असतानाही दारिद्र्य वाढत राहते याचे मुख्य कारण नागरी विभागातील लोक सरकारवर दडपण आणून ग्रामीण भागातील लोकांना विकासापासून वंचित करू

शकतात. ही परिस्थिती तात्पुरती नाही. लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत अ. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणावर शहरी भागात रोजगार मिळून खेड्यांत मजुरांचा तुटवडा पडण्याची शक्यता नाही.

या सर्व गोष्टींकडे सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष होते. कारण राजकारणी, सरकारी नोकर, प्राध्यापक, कारखानदार, व्यापारी व कामगार संघटनेचे नेते यापैकी बहुतेक शहरी विभागातून आलेले असतात. त्यांची निवडही शहरी विभागात होते व त्यांचा जास्तीत जास्त वेळ शहरी विभागातच जातो. यापैकी काहींचा जन्म जरी ग्रामीण भागात झाला असला तरी ते आपली ग्रामीण पार्श्वभूमी विसरण्याचा प्रयत्न करतात. गरीब देशांना भेटी देणारे संपन्न देशातील पाहुणे प्रामुख्याने शहरी विभागांनाच भेटी देतात व त्यातील दारिद्र्य हाच त्यांना मुख्य प्रश्न वाटतो. ग्रामीण भागातील प्रचंड दारिद्र्याचे त्यांना दर्शनच होत नाही.

या शहरीविभागाला देण्यात आलेल्या प्राधान्यामुळे अर्थव्यवस्थेत विकासाबरोबर दारिद्र्यही कायम राहिले आहे. शहरी विभागात वापरली जाणारी साधनसंपत्ती ग्रामीण विभागाकडे वळवता आली तर अल्पावधीतच देशातील दारिद्र्य कमी करता येईल व त्याबरोबर आर्थिक विषमताही काही प्रमाणात कमी होईल. कारण शहरांच्या मानाने खेड्यात विषमता कमी आहे आणि खेड्यात गरिबांची संख्या मोठी असल्यामुळे खेड्यांचा विकास सुरू होताच ही गरिबी कमी होणे शक्य आहे.

## शहरप्राधान्याची काही कारणे

शहरांच्या विकासाला प्राधान्य मिळण्याचे एक कारण म्हणजे खाजगी भांडवलगुंतवण होय असे म्हटले जाते; पण हे खरे नाही. कारण भांडवलगुंतवण कोठे करावयाची हे खाजगी भांडवलदार नफ्याच्या दृष्टिकोनातून ठरवितात व सरकार जेथे जास्त सवलती देते तेथे कारखाने उभारतात. खरे तर सरकार, बँका व खाजगी उद्योगपती हे सर्व शहरी विभागात होणाऱ्या भांडवलगुंतवणीला प्रोत्साहन देतात.

उद्योगधंद्यांचा विकास म्हणजेच आधुनिकीकरण ही कल्पनादेखील उद्योगधंद्यांच्या व शहरी भागाच्या विकासाला प्राधान्य मिळण्याला एक कारण आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी उद्योगधंद्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष केले व शेतीच्या विकासाला महत्त्व दिले. वसाहती स्वरूपाची पिळवणूक थांबविण्यासाठी शेतीपेक्षा उद्योगधंद्यांच्या विकासाला प्राधान्य दिले पाहिजे, ही कल्पना स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या राज्यकर्त्यांमध्ये व सनदी नोकरांमध्ये आढळून येते.

गरीब गरीब का राहतात याचे कारण त्यांची वृत्ती, असाही एक युक्तिवाद केला जातो. एक तर गरिबांना मुले अधिक होतात आणि दुसरे म्हणजे ते आळशी व कामचुकार असतात व त्यामुळे त्यांची गरिबी कायम राहते असे म्हटले जाते.

## गरीब आणि मुलांचे प्रमाण

गरिबात मुलांचे प्रमाण जास्त असते असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही. सधनांच्या मानाने गरीब संततिनियमनसाधनांचा वापर करीत नाहीत व गरीब कुटुंबांना होणाऱ्या मुलांचे प्रमाण. अधिक असते हे सर्वसाधारणपणे खरे; पण त्यापैकी युवावस्थेपर्यंत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण गरीब व श्रीमंत कुटुंबात जवळजवळ सारखेच असते. गरिबांच्या मुलांचे मृत्युप्रमाण जास्त असल्यामुळे जन्मणाऱ्या मुलांची संख्या जास्त असूनही युवावस्था प्राप्त होणाऱ्या मुलांची संख्या कमी होते. त्याशिवाय म्हातारपणासाठी पैशाची तरतूद करणे शक्य नसल्यामुळे म्हातारपणी काळजी घेण्यासाठी मुले असावीत असे गरिबांना वाटते. गरिबी हे जास्त मुले असण्याचे कारण आहे, परिणाम नाही. लोकसंख्येच्या वाढीचे प्रमाण कमी करावयाचे असेल तर गरिबी कमी झाली पाहिजे आणि त्यासाठी ग्रामीण भागाच्या विकासावर अधिक भर दिला पाहिजे. बालमृत्यूंचे प्रमाण कमी झाल्यावरच ग्रामीण विभागातील लोक कुटुंब लहान करण्यास तयार होतील.

गरीब लोक आळशी व कामचुकार असतात हे म्हणणे देखील फारसे खरे नाही. गरिबांचा तथाकथित कामचुकारपणा कुपोषणातून निर्माण झालेला आहे. दारिद्र्यामुळे कुपोषण व कुपोषणामुळे कमी कार्यक्षमता असे दुष्ट वर्तुळ गरिबांना छळते आहे. भरपेट जेवणारी माणसे यालाच आळस म्हणत असतील तर ते त्यांचे अज्ञान आहे.

ग्रामीण भागातील दारिद्र्याचा एक परिणाम म्हणजे त्या भागातून तरुणांचे, शिक्षितांचे नागरी विभागात होणारे स्थलांतर होय. त्यामुळे कष्टाळू व कार्यक्षम तरुणवर्ग शहरात जातो आणि ग्रामीण विभागाच्या प्रगतीला पायबंद बसतो. खेड्यांकडे चला असा उपदेश करून हे स्थलांतर कमी होणार नाही. ग्रामीण भागात तरुणांना योग्य तो वाव मिळाला नाही तर हे स्थलांतर असेच चालू राहील आणि ग्रामीण विभागाची स्थिती खालावत जाईल.

## वाद आणि नागरी विकास

नागरी विकासाला प्राधान्य मिळण्याला काही वाद म्हणजे विचारप्रणालीही कारणीभूत आहेत. सनातनवादी अर्थशास्त्रात उद्योगधंद्यांच्या विकासाला महत्त्व देण्यात आले आणि नागरी भागाच्या विकासाला प्राधान्य हा त्याचा एक परिणाम आहे. मार्क्सवादात तर ग्रामीण सरंजामशाही अर्थव्यवस्थेचा नाश होऊन भांडवलशाही विकसित होणे हा विकासाचा एक अटळ टप्पा मानण्यात आला आहे. सरंजामशाही अर्थव्यवस्थेत गरजेपेक्षा फारसे जास्त उत्पादन होत नाही. म्हणजेच वाढावा निर्माण होत नाही. आर्थिक व्यवहारात वस्तूंचे प्राधान्य असते व त्या मानाने पैशाला दुय्यम स्थान असते. अशी सरंजामशाही शेतीप्रधान व स्वावलंबी अर्थव्यवस्था नष्ट झाल्याखेरीज आर्थिक विकास होणे शक्य नाही. त्यासाठी उद्योगधंद्यांचा विकास झाला पाहिजे. यंत्राचा वापर वाढून उत्पादनाचे आधुनिकीकरण झाले पाहिजे, म्हणजे अर्थव्यवस्थेतील वाढावा वाढून भांडवलगुंतवण वाढेल. वस्तुसंबंध कमी होऊन पैशाचे संबंध वाढतील. भांडवलशाहीत शोषण वाढल हे खरे; पण आर्थिक प्रगतीसाठी हे अपरिहार्य आहे. जुनाट ग्रामीण शेतीप्रधान अर्थव्यवस्था मोडली पाहिजे व यंत्रप्रधान, पैसाप्रधान नवी अर्थव्यवस्था निर्माण झाली पाहिजे हा इतिहासाचा क्रम आहे. समाजवादी क्रांतीसाठी सुद्धा हे सर्व आवश्यक आहे. संघटित कामगारवर्गच भांडवलशाही

# दि कोल्हापूर स्टील लिमिटेड, शिरोली (पुलाची)

## ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

फोन : — तार : स्टीलकास्ट, कोल्हापूर

६२६८, ६२६०, ६२६९ — टेलेक्स : ०१९५–२११–केएस्एल–इन्–

**स्टील कास्टिंग्जचा दक्षिण महाराष्ट्रातील अग्रेसर कारखाना**

**प्लेन आयर्न स्टील कास्टिंग्ज :** स्पेसिफिकेशनप्रमाणे आय्.एस्. १०३० ग्रेड १, २ व ३

**मॅंगेनीज स्टील कास्टिंग्ज :** स्पेसिफिकेशनप्रमाणे आय्.एस्. २७६ ग्रेड १, २ व ३

**लो अॅलॉय स्टील कास्टिंग्ज :** कार्ब्यूरायझिंग ग्रेडची कास्टिंग्ज

**सिंगल पीस :** १० किलो वजनापासून २५०० किलो वजनापर्यंतच्या कास्टिंग्जची निर्मिती.

**या उद्योगांना आम्ही कास्टिंग्ज पुरवितो :** साखर, सिमेंट, रबर, अॅग्रिकल्चर, पेपर मशिनरी, मशीन टूल्स, जनरल इंजिनियरिंग, मटेरियल हॅंडलिंग इक्विपमेंटस्, संरक्षण खाते, रेल्वे इ...

**आमचे काही प्रमुख ग्राहक :**
टेल्को, पुणे,
वालचंदनगर इंडस्ट्रीज, वालचंदनगर,
बकाउल्फ न्यू इंडिया इंजिनियरिंग वर्क्स लि., पुणे,
व्होल्टाज लिमिटेड, ठाणा,
लार्सन अँड टूब्रो लि., मुंबई
तुंगभद्रा स्टील प्रॉडक्टस् लि., तुंगभद्रा,
मद्रास रबर फॅक्टरी लिमिटेड, मद्रास,
बिन्नी लिमिटेड, मद्रास,
एसीसी व्हीकर्स बॅबकॉक लि., शहाबाद.

**चंदन मेनन**
व्हाइस चेअरमन

**व्ही. बी. उटकूर**
चेअरमन

नष्ट करून समाजवाद आणू शकतो. असा संघटित कामगारवर्ग शहरी विभागातच व कारखान्यातच असतो. अशा प्रकारचा कामगारवर्ग ग्रामीण शेतीविभागात असू शकत नाही. म्हणून अखेरीस समाजवादी क्रांतीसाठीसुद्धा शेतीप्रधान ग्रामीण अर्थव्यवस्थेचा नाश झाला पाहिजे, अशी साधारण समाजवादी विचारसरणी आहे.

या प्रकारच्या विचारसरणीमुळे शेती मागासलेली असताना उपासमार सहन करूनसुद्धा सुरुवातीच्या काळात रशियन नियोजनात उद्योगधंद्यांच्या विकासावर भर देण्यात आला. शेतीचे सामुदायीकरण व यांत्रिकीकरण करण्याचा प्रयत्न झाला आणि त्याला विरोध करणाऱ्यांची कत्तल करण्यात आली. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी शेतीत निर्माण होणारा वाढावा कामी आणण्याचे कठोर प्रयत्न झाले. या विचारप्रणालीचा पगडा अद्यापही अनेक डाव्या नेत्यांवर व पक्षांवर आहे.

ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देणारे काहीजण आर्थिक कारणांपेक्षा इतर गोष्टींवर अधिक भर देतात. अनेक कविमनांना ग्रामीण भागातील निसर्गसौंदर्य व लोकांचा साधेभोळेपणा यांचे आकर्षण वाटते व ग्रामीण भाग आहे तसेच राहावेत असे विचार ते मांडतात. या प्रतिपादनात चिकित्सक विचारांपेक्षा काव्याचा व भोळेपणाचा भाग अधिक आहे.

गांधीजींच्या विचारात स्वावलंबी ग्रामव्यवस्थेवर खूप भर होता. त्यांच्या विचारांचे मूळ काही प्रमाणात त्यांच्यावर रस्किनच्या 'अनटू धिस लास्ट' या पुस्तकाच्या प्रभावात आहे. त्यांच्या सर्वच विचारांवर साधी राहणी या आदर्शाचा पगडा आहे. साधी राहणी असलेली स्वावलंबी व समानतेवर आधारलेली ग्रामरचना ते प्रतिपादन करतात. मात्र हे ध्येय केवळ ग्रामीण भागाला आहे तसेच ठेवून साध्य होणार नाही याची त्यांना जाणीव होती. गांधीजींच्या या विचारांचा सरकारी धोरणावरही काही परिणाम झालेला दिसतो. गटविकास योजना, पंचायत राज्य, ग्रामोद्योग व कुटीरोद्योग यांवर भर या गोष्टी सरकारने अमलात आणण्याचा प्रयत्न केला; पण शहरी भागाच्या विकासावरील भर कमी करण्यात ही धोरणे अयशस्वी झाली आहेत. ग्रामीण क्षेत्र हे औद्योगीकरणाच्या विकासाचे एक साधन आहे, अशीच पंडित नेहरू यांची धारणा होती व तेच धोरण त्यांच्यानंतर चालू राहिले.

## ग्रामीण व शहरी भागातील असमतोल

ग्रामीण व शहरी विभाग, शेती व इतर अर्थव्यवहार अशा दोन प्रकारचे असमतोल गरीब देशात दिसून येतात. मात्र हे दोन्ही असमतोल एकमेकांशी निगडित आहेत. शेतीच्या विकासावर फारसा भर न दिल्यामुळे शेतीतील उत्पादकता कमी राहते व शेतमजुरांचे वेतनप्रमाण कमी राहते. यातून ग्रामीण विभागातील गरिबी वाढत जाते. शहरी प्राधान्यामुळे सरकार अन्नधान्याच्या किंमती कमी ठेवण्याचा प्रयत्न करते व त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढत नाही, तसेच शेतीचा किफायतशीरपणा कमी होतो. या गोष्टीमुळे ग्रामीण व शहरी विभागातील कामगारांच्या उत्पादनक्षमतेत सारखा फरक पडत आहे आणि ग्रामीण व शहरी भागातील अंतर वाढत आहे.

कल्याणकारी योजनांचे फायदे ग्रामीण भागातील लोकांपेक्षा शहरी भागातील लोकांना जास्त मिळतात. शुद्ध पाणीपुरवठा, वैद्यकीय सोयी सर्वसाधारणपणे शहरात जास्त असतात. शहरात राहणीखर्च ग्रामीण भागापेक्षा काहीसा जास्त असतो हे खरे; पण ग्रामीण भागात मुळीच न मिळणाऱ्या अनेक सुविधा शहरी भागात मिळतात व त्यांपैकी काही प्रत्यक्षापेक्षा सवलतीच्या दरात मिळतात हेही खरे आहे.

ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढविण्याचा एक प्रभावी मार्ग अन्नधान्याच्या व इतर शेतमालाच्या किंमती वाढविणे हा आहे; पण त्याचा फायदा ग्रामीण भागातील मोठ्या शेतकऱ्यांना जास्त मिळेल व ग्रामीण भागातील विषमता वाढेल हे खरे आहे. ग्रामीण व शहरी विभागातील विषमता कमी करताना ग्रामीण भागातील विषमता वाढण्याचा संभव आहे. जमीनविषयक सुधारणा अमलात आणून ग्रामीण विभागातील विषमता काहीशी कमी करता येईल; परंतु या गोष्टीला सधन शेतकरी विरोध करतात. शहरी भागातील विषमता कमी करण्याचे काहीही प्रयत्न न करता सरकार ग्रामीण विभागातील विषमता कमी करण्यावरच का भर देते, असा त्यांचा सवाल असतो.

ग्रामीण व शहरी विभागातील अंगर्गत विषमता दूर करावयाची असेल तर शहरी विभागातील श्रीमंतांना त्याचा फटका बसणे अपरिहार्य आहे. शहरी भागातील गरीब लोकांजवळ काढून घेण्यासारखे काहीच नाही. उलट अन्नधान्याचे भाव वाढल्यास त्यांचा तोटाच होईल. अर्थात हे नुकसान तात्पुरते राहील. कारण धान्याच्या किंमतीत वाढ झाल्यास उत्पादनवाढ होऊन कालांतराने किंमती पुन्हा उतरतील. ग्रामीण भागाचा विकास जोरात सुरू झाल्यास शहरात नव्यानेच आलेले गरीब पुन्हा ग्रामीण भागात परतण्याची शक्यता आहे. असे झाल्यास शहरातील गरिबांची संख्या कमी होऊन शहरातील विषमतादेखील काहीशी कमी होईल.

एका अर्थी ग्रामीण व शहरी विभागातील विषमता ही ग्रामीण व शहरी विभागांतर्गत विषमतेला पूरक आहे. शहरांना अन्नपुरवठा व्हावा म्हणून सरकार मोठ्या शेतकऱ्यांना सवलती देते. स्वस्त धान्यपुरवठ्याचा फायदा संघटित कामगारांना व कारखानदारांना मिळतो. ग्रामीण भागातील आत्यंतिक गरिबीमुळे शहरात स्थलांतर केलेले शेकडो गरीब कारखान्यात वाटेल त्या वेतनावर काम करावयास तयार असतात. ग्रामीण भागातून शहरात येणारे भांडवलदेखील कारखानदारांना मिळू शकते.

या सर्व विषमतेला विरोध केला पाहिजे. विषमतेमुळे समाजातील अशांतता वाढते व स्थैर्य धोक्यात येते. श्रीमंत बेगुमान बनत जातात आणि समाजात तट पडवात हे खरे; पण या विषमतेचा खरा तोटा म्हणजे त्यामुळे देशातील दुर्मिळ साधनसंपत्तीचा अपव्यय होतो, ग्रामीण भागात दारिद्र्य, रोगराई आणि अपमृत्यू यात वाढ होते. हा अपव्यय ग्रामीण भागातील भांडवलगुंतवण, विशेषत: सरकारी गुंतवण वाढवून व शेतमालाच्या किंमती वाढवून रोखता येईल. महाग धान्य देशाच्या दृष्टीने स्वस्त पडेल. **विषमतेमुळे दुर्मिळ साधनसामुग्रीचा अपव्यय होतो हेच खरे दुर्दैव आहे.** मानसिकदृष्टचा विषमता उदयोन्मुख राष्ट्रात असंतोष व कलह निर्माण करते.

आर्थिकदृष्ट्या ती साधनसामुग्रीच्या अपव्ययाला कारणीभूत होते. सामाजिकदृष्ट्या ती अकार्यक्षमतेला उत्तेजन देते. गरीब ग्रामीण भागातील मुले विकासाच्या संधीला मुकतात आणि त्यामुळे समाजाचे नुकसान होते. या विषमतेमुळे शेवटी एकूण आर्थिक वाढीलाच प्रतिबंध होतो आणि विषमता कार्यक्षमतेवर आघात करते. ग्रामीण व शहरी विभागातील विषमतेमुळे जास्त कार्यक्षम अशा ग्रामीण विभागातील भांडवलगुंतवणीला प्रतिबंध पडतो आणि आर्थिक वाढीला मर्यादा पडते.

### शहरीकरणाचा भ्रम

जर ग्रामीण विभागापेक्षा शहरी विभागाला प्राधान्य देण्याचे धोरण असेच चालू राहिले तर ग्रामीण भागातील अनेक लोक शहरात स्थलांतर करतील; पण यातूनही शहरी प्राधान्याचा प्रश्न सुटल असे वाटत नाही. लोकसंख्येत होणारी नैसर्गिक वाढच खूप आहे. त्यात ग्रामीण विभागातून येणाऱ्या स्थलांतरितांची भर पडली तर गरिबी कमी होण्याऐवजी तिच्यात वाढच होईल. या स्थलांतरितांच्या वाट्याला शहरीकरणाच्या फायद्यांऐवजी तोटेच जास्त येतील. याउलट ग्रामीण भागातील तरुण व तुलनात्मकदृष्ट्या अधिक कर्तबगार लोक कमी होऊन ग्रामीण विभागाचा तोटाच जास्त होईल. स्थलांतराने ग्रामीण व शहरी विकासातील तफावत दूर होणार नाही. आज ग्रामीण भागातून नागरी भागात जे स्थलांतर होत आहे ते शहरी भागाच्या आकर्षणामुळे होत नसून ग्रामीण भागातील अनाकर्षणामुळे होत आहे. शहरी भाग ग्रामीण भागातून लोक खेचतो आहे असे नसून ग्रामीण भाग या लोकांना बाहेर फेकतो आहे, हेच जास्त खरे आहे. याचा परिणाम शेवटी ग्रामीण भाग आणखी गरीब होण्यात होणार आहे. राष्ट्रहिताच्या दृष्टीने ग्रामीण भागातून जाणारा हा कर्तबगार बुद्धिमान तरुणाचा ओघ थांबवणे जरूर आहे. आज खेडेगावात शिक्षणाच्या सोई वाढल्या आहेत; पण त्यातून शिकणारी बहुसंख्य मुले शहरी भागात मिळेल तो कामधंदा करण्यासाठी जातात. कारण ग्रामीण भागात त्यांना पुरेशी संधी मिळत नाही. ग्रामीण भागात दिले जाणारे शिक्षणही काही प्रमाणात याला जबाबदार आहे. या शिक्षणाचा ग्रामीण भागात काही उपयोग नसतो. ग्रामीण भागातून पुढील शिक्षणासाठी शहरात आलेले तरुण ग्रामीण भागात कधीच परत जात नाहीत. सर्व शिक्षण नागरी मूल्ये जोपासणारे असते. ग्रामीण प्रश्नावर संशोधनही फारसे होत नाही. विश्वविद्यालयीन संशोधनाचा वास्तव जीवनाशी फारसा संबंध राहिला नाही आणि ग्रामीण प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने काहीच संशोधन होत नाही असे म्हटले तरी चालेल.

### करयोजना व ग्रामीण विभाग

सरकारी करधोरणही ग्रामीण विभागाच्या विकासाला पोषक नाही. गरीब देशात शेतीक्षेत्रात, सुमारे १० ते १५ टक्के उत्पन्न काढून घेऊन ते इतर क्षेत्रांकडे वळवले जात आहे असे दिसून येते. याचे मुख्य कारण इतर मालाच्या मानाने शेतमालाच्या व विशेषतः अन्नधान्याच्या किमती कमी ठेवण्याचे सरकारी धोरण हे आहे. सरकारचे शेतमालाच्या निर्यातीवर व औद्योगिक मालाच्या आयातीवर कर बसविण्याचे धोरणही ग्रामीण विकासाच्या आड येते. त्यामुळे परदेशी बाजारपेठेत असलेल्या चढ्या किमतीचा फायदा शेतकऱ्यांना मिळत नाही. औद्योगिक माल उत्पादन करणारांचे मात्र परदेशी स्पर्धेपासून संरक्षण होते व त्यांना देशात सुरक्षित बाजारपेठ मिळून जास्त किमतीस माल विकता येतो. शेतकऱ्यांना हा माल जास्त किमतीस खरेदी करावा लागतो.

शेतीवर फार कमी कर आहेत असा सूर अर्थशास्त्रज्ञ, वर्तमानपत्रे व मध्यमवर्गीय संघटना काढताना दिसतात. मात्र याची शास्त्रशुद्ध चिकित्सा क्वचितच केली जाते. करांचा विचार करताना सरकारचे शेतमालाच्या किमती कमी ठेवण्याचे धोरण, निर्यात शेतमालावर कर आणि औद्योगिक आयातीवर कर यांच्या परिणामांचा विचार केला जात नाही. शेतीला स्वस्त दराने कर्जपुरवठा, सिंचनाच्या व विजेच्या सुविधा यांचा वारंवार उल्लेख होतो; पण उद्योगधंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा मात्र उल्लेख होत नाही. या सर्व गोष्टींचा विचार केला तर शेतीवरील करांचे ओझे फार हलके आहे असे म्हणता येणार नाही.

ग्रामीण भागातील लोक बचत कमी करतात म्हणून देशातील बचत वाढविण्यासाठी त्यांच्यावर जास्त कर लादले जावेत असा एक विचार आहे; पण ग्रामीण भागात बचत कमी होण्याची दोन कारणे, कमी उत्पन्न व लाभदायक भांडवलगुंतवणसंधीचा अभाव ही आहेत. केवळ जास्त कर लादूनही ही कारणे दूर होणार नाहीत. काही प्रमाणात सधन शेतकऱ्यावरील कर विशेषतः प्राप्तीकर वाढविता येईल हे खरे; पण हा कर गोळा करण्याचा खर्च फार येतो हे लक्षात घेतले पाहिजे.

### किंमत धोरण

सरकार औद्योगिक मालाच्या किमतीच्या मानाने शेतमालाच्या किमती कमी ठेवण्याचा सतत प्रयत्न करते याचा उल्लेख याअगोदर झाला आहे. या धोरणामुळे देशाच्या औद्योगीकरणाला चालना मिळेल, एक प्रकारची सक्तीची बचत होईल आणि उद्योगधंदे वाढून देशाचा विकास होईल अशी कल्पना आहे. शेतीतील वाढावा इतर क्षेत्राकडे वळवावा यासाठी हे धोरण अमलात आणले जाते; पण अन्नधान्य कमी किमतीत मिळाल्यामुळे औद्योगिक कामगाराची बचत वाढतेच असे नाही. उलट या धोरणामुळे ग्रामीण विभागाच्या विकासाला अडथळा येतो असे दिसून येते.

### ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देण्याच्या धोरणाची दिशा

सर्वसाधारणपणे विकसनशील देशात नागरी विभागाला प्राधान्य मिळते व त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होत नाही व आर्थिक वाढ होत असतानाही बहुसंख्य लोकांची गरिबी कमी होत नाही.

केवळ विकासाची गती वाढवून हा प्रश्न सुटणार नाही तर त्यासाठी काही खास उपाय योजावे लागतील, हा आतापर्यंतच्या विवेचनचा स्थूल आशय आहे. ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी व गरिबांची संख्या व त्यांची गरिबी नष्ट करण्यासाठी कोणते खास उपाय योजावे लागतील याचे स्थूल विवेचन केल्याशिवाय या

प्रश्नाचा विचार पूर्ण होणार नाही.

काही देशांत ही परिस्थिती क्रमशः व क्रांती न होता बदलू शकेल. भारतातील विचार, उच्चार व प्रचारस्वातंत्र्य आणि ग्रामीण गरिबांतील वाढती जागृती लक्षात घेता शहरी प्राधान्याचा प्रश्न आमूलाग्र क्रान्ती न होताही सुटू शकेल असे वाटते. हरितक्रांतीमुळे शेतीतील उत्पादनशक्ती व लाभक्षमता वाढली आहे व इंधन-तेलाच्या वाढत्या किंमतीमुळे उद्योगधंद्यांची लाभक्षमता काहीशी कमी झाली आहे. त्यामुळे शेतीतील भांडवल गुंतवणं वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा वेळी ग्रामीण जनतेतील जागृती वाढवून राज्यकर्त्यांवर दडपण आणून शहरी प्राधान्य कमी करणे शक्य आहे. श्रमप्राधान्य छोट्या शेतीवर अधिक भर देऊन आमूलाग्र क्रांतीशिवाय बहुसंख्य लोकांची गरिबी कमी करता येईल असे वाटते. त्यासाठी काही गोष्टी कराव्या लागतील.

**शेतकऱ्यांच्या चळवळी :** आतापर्यंत सर्व शेतकरी–शेतमजूर चळवळींचा रोख मोठ्या शेतकऱ्यांविरुद्ध राहिला आहे. किमान वेतन, खंडकपात या मागण्यांमुळे ग्रामीण क्षेत्रात विभाजन झाले आहे. जमीन सुधारणा कायदे व्यवस्थित अंमलात आणून जमीन सुधारणा अमलात आणून, जमीनधारणेतील विषमता कमी करता येईल आणि त्यानंतर शेतकरी चळवळीचा रोख शहरी प्राधान्याविरुद्ध वळविता येईल. येथील शेतमालाच्या किंमती योग्य असाव्यात, ग्रामीण क्षेत्रातील सार्वजनिक भांडवलगुंतवण वाढवावी आणि ग्रामीण भागात आरोग्य व शिक्षणाच्या जास्त सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी छोट्या–मोठ्या शेतकऱ्यांना एकत्र येऊन चळवळ करता येईल या दृष्टीने ग्रामीण विकासाविषयी आस्था असणाऱ्या विद्यार्थ्यांनी, शिक्षक–प्राध्यापकांनी व राजकीय कार्यकर्त्यांनी अशा चळवळी संघटित करण्यास मदत केली पाहिजे. लोकांना त्यांच्या गरिबीचे मूळ कारण समजावून दिले पाहिजे.

ग्रामीण कामगारांच्या संघटना अगदी कमी आहेत व आहेत त्यातही फूट व निश्चित विचारसरणीचा अभाव आहे. त्या दृष्टीने औद्योगिक कामगारांच्या संघटना बळकट आहेत. यापैकी काही संघटनांना तरी ग्रामीण कामगारांच्या संघटना वाढविण्यासाठी व बळकट करण्यासाठी प्रयत्न करता येतील. अनेक कामगारसंघटना देशातील गरिबी नाहीशी करणे हे आपले अंतिम उद्दिष्ट मानतात. हे उद्दिष्ट ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय साध्य होणार नाही हे समजावून घेऊन काही शहरी कामगारसंघटना तरी ग्रामीण कामगार संघटनांना मदत करू शकतील.

शहरातील कारखानदार व व्यापारीवर्गदेखील ग्रामीण विकासाला अनेक प्रकारे मदत करू शकेल. अखेरीस देशातील गरिबी नष्ट होण्यानेच उत्पादनात व व्यापारात खरी वाढ होईल. बहुसंख्य गरीब असलेल्या देशात राजकीय व आर्थिक स्थैर्य नांदणे अशक्य आहे, याची जाणीव कारखानदार व व्यापाऱ्यांनी ठेवणे जरूर आहे. ग्रामीण विकासाचे विविध प्रकारचे प्रकल्प कारखानदार व व्यापारी चालवू शकतील.

ग्रामीण भागाच्या विकासाची जबाबदारी असणारी ग्रामीण विकास कार्पोरेशन सुरू करावी व तिने ग्रामीण भागातील समस्यांवर संशोधन करावे आणि ग्रामीण भागाला अर्थपुरवठा करण्याची जबाबदारी घ्यावी.

नियोजनकार तर ग्रामीण विकासासाठी नियोजनाचे स्वरूप बदलू शकतील. सर्व गरीब राष्ट्रात ग्रामीण गरीब व शहरातील राजकारणी व बुद्धिजीवी यांच्या जीवनपद्धतीत फार तफावत निर्माण झाली आहे. सनदी नोकर व राजकारणी यांच्या वाट्याला येणाऱ्या सरकारी खुशालीच्या सोयीमुळे त्यांच्यात व गरिबात खूप अंतर पडत चालले आहे. हे अंतर काही प्रमाणात कमी करण्याचे काम नियोजनाने केले पाहिजे.

शासनव्यवस्थेत ग्रामीण विकासाला क्षमता यावी म्हणूनही काही उपाय सुचविता येतील. ग्रामीण विभागात, विशेषतः शहरांपासून दूर असलेल्या विभागात काम करणाऱ्या नोकरांना खास भत्ता देण्यात यावा. शहरी विभागात देण्यात येणारे भरपाईभत्ते (काँपेनसेटरी अलाउन्स) बंद करण्यात यावेत. कारण शहरातील जीवनमान थोडेफार खर्चिक असले तरी शहरात राहण्याचे अनेक फायदे नोकरवर्गाला मिळतात. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात झालेल्या चांगल्या कामाचे मूल्यमापन झाले पाहिजे व शेतीसिंचन व ग्रामीण विकास यांसारख्या सरकारी खात्यांचे एकत्र संयोजन झाले पाहिजे.

**धोरणात्मक बदल :** ग्रामीण भागाचा विकास व्हावयाचा असेल तर सर्वप्रथम आजचे शहरी प्राधान्याचे धोरण बदलले पाहिजे. त्यासाठी एकूण उत्पादनाचाच फेरविचार झाला पाहिजे ग्रामीण जनतेच्या वापरातील वस्तूंच्या उत्पादनात वाढ झाली पाहिजे. शहरी श्रीमंतांना लागणाऱ्या फळांसारख्या शेतमालाच्या उत्पादनाला मदत न करता ग्रामीण गरीब वापरत असलेल्या भरड धान्याच्या उत्पादनाला सरकारने मदत केली पाहिजे. शेतमालाच्या किंमती फार रोखून धरण्याचे धोरण सरकारने सोडून दिल्यास ग्रामीण भागाचे उत्पन्न वाढू शकेल. ग्रामीण भागाच्या विकासाला उपयोगी पडेल अशा तऱ्हेच्या शिक्षणाच्या सोयी वाढल्या पाहिजेत शेतीतील भांडवलगुंतवण, विशेषतः सरकारी भांडवलगुंतवण वाढली पाहिजे. छोट्या शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या योजनांत वाढ झाली पाहिजे. एकंदरीत सरकारी धोरणच ग्रामीण विकासाला गती देणारे असले पाहिजे.

## मूल्यमापन

लिप्टन यांनी व्यक्त केलेले सर्व विचार सर्वांनाच पटतील असे नाही; परंतु आज सर्व सरकारी धोरणात ग्रामीण विभागाच्या गरजांकडे सर्वसाधारण दुर्लक्ष होते हे अगदी खरे आहे. कारखानदार, व्यापारी, सरकारी व निमसरकारी नोकरवर्ग, औद्योगिक कामगार, प्राध्यापक व इतर बुद्धिजीवी हे सर्वजण आपल्या वाट्याला अधिक सुविधा कशा येतील हे पहाण्यात गर्क आहेत. देशातील गरिबीविषयी फक्त शाब्दिक खंतच व्यक्त केली जात आहे. गॅसची किंमत वाढली की आकाशपाताळ एक करणारा वर्ग कांद्याची व धान्याची किंमत उतरून शेतकरी संकटात आला की त्याबद्दल काहीही करावयास तयार नाही. याला वर्तमानपत्रे व राजकीय नेते बऱ्याच प्रमाणात जबाबदार आहेत. ग्रामीण भागात काय घडते याचा ठसा वर्तमानपत्रांत उमटत नाही. जास्त शिकलेले लोक पाश्चात्य देशातील जनतेचे अंधानुकरण करण्यात मग्न आहेत. ग्रामीण विभागातील परिस्थिती स्फोटक होत आहे आणि काही नक्षलवाद्यांना पकडून वा मारून ही दाहकता कमी होणार नाही. या देशातील गरिबी अशीच कायम राहील तर एक दिवस यादवी अपरिहार्य आहे. दैन्य वाढविणारा आर्थिक विकासाचा मार्ग सोडून दैन्य लवकरात लवकर कमी करणारा आर्थिक विकास घडवून आणला पाहिजे ही काळाची निकडीची गरज आहे. ही मुख्य गोष्ट या ग्रंथाने स्पष्ट केली आहे आणि ही गोष्ट लवकरात लवकर सर्वांना उमजण्यातच खरे देशहित आहे. ☐




INTERCOMMUNICATIONS

**★ आदिवासी व मागासवर्गीय:**

★ आदिवासींना ७५० रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज.
★ खावटी कर्जासाठी ३० कोटी रुपये.
★ ३६०० रुपयांपर्यंत उत्पन्नाच्या सर्वांना मोफत कायदेविषयक सल्ला.
★ मागासवर्गीय सुशिक्षित बेकारांना अधिक बीजभांडवल.

**★ छोटे भूधारक व शेतमजूर:**

★ बंडिंगची १२७ कोटी रुपयांची कर्जे माफ.
★ शेतीसाठी स्वस्त वीज.
★ शेतमालाला वाजवी दाम.
★ शेतमजुरांच्या दैनिक वेतनात वाढ.
★ अवर्षणग्रस्त भागात कायम स्वरुपाची टंचाई कामे.

**महाराष्ट्र शासन**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई द्वारा प्रकाशित.

**ग्रामीण भागाला प्राधान्य हवे हे आजवर मूठभर सर्वोदयवादी-गांधीवादी फक्त सांगत होते.**
**पण दिल्लीत एक भव्य किसान मेळावा संघटित करून चरणसिगांनी या मूठभरांच्या विचारामागे एक राजकीय ताकद उभी केली.**
**देशभर या मेळाव्याचे साद-पडसाद उमटले.**
**महाराष्ट्रातही कोल्हापूरला एक किसान मेळावा योजण्यात आलेला होता.**
**चरणसिग स्वतः या मेळाव्याला उपस्थित राहणार होते;**
**पण सगळेच ओम्फस झाले. मेळावा बारगळला. राजकारण आडवे आले.**
**तरीही मेळाव्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांचे महत्त्व कमी होत नाही.**
**कोणते प्रश्न ?**
**हे प्रश्न श्रीमंत शेतकऱ्यांचे आहेत की मध्यमांचे, गरिबांचे ?**

# न झालेल्या एका किसान मेळाव्याच्या निमित्ताने....

## विजय परुळकर

उपपंतप्रधान आणि अर्थमंत्री होण्याअगोदर चरणसिगांनी दिल्लीमध्ये जो भव्य किसान-मेळावा भरवला त्याचे साद-पडसाद देशभर उमटले. दक्षिण भारत सोडून इतर भागात छोटेमोठे किसान मेळावे भरू लागले. महाराष्ट्रातही अर्थातच लागण झाली. कोल्हापुरात किसान मेळावा भरणार अशी बातमी वर्तमानपत्रात छापून आली. मेळाव्याला दस्तुरखुद्द चरणसिग हजर राहणार असे देखील समजले. 'माणूस'ने किसान विशेषांक काढायचा निश्चय जाहीर केला. मी आणि श्री. ग. माजगावकर किसान मेळाव्याची तयारी पहाण्यासाठी कोल्हापुरात गेलो.

चरणसिग तेव्हा मोरारजीभाईंवर 'रुसलेले' असले आणि मंत्रिमंडळात नसले तरी जनता पार्टीचेच. कोल्हापुरात इतर बारीकसारीक गाठीभेटी पार पाडून आम्ही जनता पार्टीचे ऑफिस गाठले. तिथं सारं कसं वरकरणी शांत शांत असं वातावरण— किसान मेळाव्याबद्दल कुणीच काही निश्चित बोलायला तयार नाही. उत्तरं दिलीच तर उडवाउडवीची. तशात दुसऱ्या दिवशी भाई वैद्य कोल्हापूरला भेट देणार असल्यामुळे सर्व कार्यकर्ते त्यांच्या कार्यक्रमाची जुळवाजुळव करण्यात अडकलेले. एखाद्या मोठ्या लग्न-समारंभाअगोदर जशी धावपळ चालू असते तसे वातावरण. किसान मेळाव्यात कुणाला फारसा रस दिसत नव्हता. तरी शिकस्तीनं एका कार्यकर्त्याला आम्ही गाठलाच आणि 'अगदी पाचच मिनिटे— जास्त नाही' असं आश्वासन देत त्याची मुलाखत घेण्याचा प्रयत्न केला— त्याने प्रश्नांना उत्तर देताना जी कुरबुर केली ती थोडक्यात अशी—

'कोल्हापूर जिल्ह्याचे जनता पक्षाचे उपाध्यक्ष शकरराव शिगणापूरकर ह्यांच्या

नेतृत्वाखाली हा मेळावा होणार. हा शेतकरी मेळावा भरवताना आमच्यासमोर एक प्रश्न निर्माण होतो. चरणसिंग जनता पक्षाचे– त्यांच्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना व्यापक स्वरूप प्राप्त झालं आहे, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत अशी जाणीव झाली आहे हे मान्य केलेच पाहिजे.

'कोल्हापुरात आता जो चरणसिंगांचा मेळावा होणार आहे हा जर शेतकऱ्यांसाठी असेल तर आमची भूमिका अशी आहे की– चरणसिंग जर जनता पक्षाचे– तर जनता पक्षाच्या जिल्हापातळीवरील शाखांना विश्वासात घेतलं गेलं का? घेणार आहेत की नाही? केव्हा?

'चरणसिंगांचे लोक कोल्हापूरमध्ये शेतकऱ्यांचा प्रचंड मेळावा भरवताना शे. का. पक्षाशी बोलणी करतात, शरद पवारांशी संपर्क साधतात, ह्या ठिकाणचे राज्यमंत्री श्रीपादराव बोंद्रे ह्यांच्याशी बोलणी करतात; पण कोल्हापुरातील जनता पक्षाचे जे प्रमुख कार्यकर्ते आहेत, जिल्हा अध्यक्ष आहेत, त्यांच्याशी मात्र अजिबात संपर्क साधत नाहीत.'

'आमच्याकडे गोपाळराव मान्यांसारखे कार्यकर्ते आहेत, ज्यांनी ग्रामीण भागात काम केलं आहे– गरिबांच्या वेगवेगळ्या संघटना बांधल्या आहेत; पण त्यांच्यासारख्यांना कुणी विचारतच नाही आहे.'

'त्यावरून असं वाटतं की, महाराष्ट्रातदेखील 'आपल्याला' स्थान आहे असा राजकीय दबाव निर्माण करण्यासाठीच ही सर्व धडपड दिसते. निदान तसा संशय घेण्यास जागा आहे.'

'दुसरा भाग असा– 'त्यांना' एक चित्र निर्माण करायचं आहे, की जनता पक्षामध्ये चरणसिंग-गट हाच फक्त शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन उभा राहिला आहे. पूर्वाश्रमीचा समाजवादी हा कामगारांच्या बाजूने भांडतोय, त्याला शेतकऱ्यांचं सुखदुःख नाही असं देखील त्यांना सुचवायचं आहे. जनसंघ हा जनतामधील प्रभावी गट आहे– तर तो फक्त व्यापाऱ्यांचा, मध्यमवर्गीयांचा, शहरी लोकांचा असं देखील 'ह्यांना' दाखवायचं आहे. 'आपणच' फक्त ग्रामीण भागाची तळमळ जाणणारे आहोत असं वातावरण निर्माण करायचं आहे आणि त्यातून काही राजकीय हेतू साध्य करायचे आहेत.'

'आता मेळाव्यासाठी ह्यांनी महाराष्ट्रामध्ये कोल्हापूरच का निवडावं? इतर ठिकाणी साखरेचे दर कमी आलेत, गुळाचे दर कमी आलेत, त्या ठिकाणी चळवळी झाल्या नाहीत. उत्तर सोपं आहे. तिकडचा शेतकरी इतका भरडला गेला नाही. इथं ऊसउत्पादनाचा खर्च जास्त आहे– लिफ्ट इरिगेशनमुळे.'

'कोल्हापुरात मेळावा घेण्याचं दुसरंही एक महत्त्वाचं कारण आहे इकडचा शेतकरी बराचसा संघटित आहे. कुठल्याही आंदोलनाला कोल्हापुरात फार लवकर सुरुवात होते. कोणतीही चळवळ कोल्हापुरात फार काळ तग धरून राहात नाही; पण सुरुवात मात्र प्रचंड धडाक्यानं होते. नुकतंच रस्ता बंद आंदोलन झालं आहे, एक स्थानिक स्वरूपाचा शेतकरी मेळावा देखील पार पडला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कोल्हापूर आज तापलं आहे आणि कोल्हापूरमधील बागायत शेतकरी आपल्या सर्व साधनांसहित उभा आहे– म्हणून चरणसिंगांचा महाराष्ट्रातील मेळावा कोल्हापुरात होण्याचं ठरलं आहे–'

सुरुवातीला कुरबुर करणारा हा जनता पक्षाचा कार्यकर्ता बोलताना भलताच रंगात आला. आधी महामुष्किलीनं 'पाचच मिनिटं' देणारा तब्बल अर्धा तास अंतर्गत राजकारणाबद्दल भडाभडा पोटातील मळमळ ओकत राहिला. शेतकरी मेळाव्याबद्दल त्याला कुणीच विचारीत नाही हे दुःख त्याच्या बोलण्यातून स्पष्टपणे दिसत होते.

मला स्वतःला राजकारणाचा वीट आहे. त्याची बडबड सुरू झाली तेव्हा पाच मिनिटांनंतर– टेपरेकॉर्डरचा आणि माझ्या मेंदूचा स्विच एकाच वेळी बंद केला. पाच वर्षं जर्मन टी.व्ही.साठी आंतरराष्ट्रीय राजकारणावरील 'पोलिटिकल रिपोर्टाज्' फिल्मस् बनवून, वैतागून मी १९६६ साली 'राजकारण' ह्या विषयाचा संपूर्ण त्याग केला आणि विकासयोजनांच्या कार्यक्षेत्रात उतरलो.

किसान मेळाव्याद्वारा शेतकऱ्यांच्या प्रश्नांना खरोखर वाचा फुटेल अशा विश्वासानं श्री. माजगावकरांबरोबर कोल्हापुरात आलो; पण इथं तर पहिल्या सलामीलाच गलिच्छ स्थानिक राजकारणाचं दर्शन घडलं.

पण बाबासाहेब भुयेकर पाटलांशी गप्पा मारताना फार मजा आला. बुलंद माणूस. रोखठोक बोलणं. सर्व काही खुल्लमखुल्ला. कोल्हापुरातील राजकारणी मंडळींच्यात बाबासाहेब भुयेकर पाटलांबद्दल काय मतं आहेत ह्याच्याशी मला कर्तव्य नाही. त्यांची मुलाखत रंगदार झाली हे मात्र खरे. बाबासाहेब भुयेकर पाटील मळ्यावर ऊसतोडीच्या कामाची देखरेख करत असताना विहिरीच्या काठावर घोंगडी पसरून त्यांची मुलाखत घेतली. माजगावकरांनी त्यांना किसान विशेषांकाची कल्पना समजावून सांगितली. भुयेकर पाटील म्हणाले –

'२५ ऑक्टोबर १९७८ साली मुंबईला धान्याच्या संदर्भात सरकारकडे मोर्चा गेला. तिथं उसाच्या किंवा गुळाच्या प्रश्नाची चर्चा झाली नाही. म्हणून शासनाचं त्याकडे लक्ष वेधण्यासाठी काही कृतिशील कार्यक्रम हातात घेणं आवश्यक आहे ह्याची आम्हाला जाणीव झाली. सरकारला ह्या प्रश्नाची किमान जाण व्हावी म्हणून १९ नोव्हेंबरला आम्ही रस्ताबंद आंदोलन केलं. हा कार्यक्रम शेतकरी कामगार पक्षामार्फत झाला. उसाचे आणि गुळाचे 'किफायतशीर' भाव बांधून द्या अशी आमची मुख्य मागणी होती.'

: आता 'किफायतशीर' ह्या शब्दाची शहरी मंडळींनी गल्लत करू नये एवढी मात्र आमची रास्त अपेक्षा आहे. बऱ्याच वेळा 'ग्रामीण विरुद्ध शहरी' असा संघर्ष लागणार की काय अशी जी शंका येते. त्यामध्ये आमची भूमिका स्पष्ट आहे – शहरातल्या मध्यमवर्गीयांना आमचा गूळ, आमची साखर कडू लागण्याइतपत महाग नसावी; पण त्याचा अर्थ उत्पादकाला – ऊस पिकविणाऱ्याला किमान किफायतशीर भाव मिळू नये असा मात्र नव्हे.

: शेतीमालाला बाजारभाव बांधून द्यावेत ही कल्पनाच पूर्वी अनेकजण खुळचात काढत; पण ते देखील आज ह्या विचाराला पाठिंबा देत आहेत.

: आमच्या पिढ्यान्‌पिढ्या आम्ही शेती केली आहे. आता माझ्या अंगावर पॅन्ट आणि मॅनिला दिसेल. आता मी स्वतः शेतात जाऊन काम करतो का? उसाला पाणी पाजतो का? तर नाही. मी स्वतः काहीही काम करीत नाही. आमचं एकत्र कुटुंब

आहे. मला सात चुलते आहेत. पंचाऐंशी माणसांचं आमचं कुटुंब आहे. माझ्या वाटणीला फक्त तीन-साडेतीन एकर ऊस येतोय. फिरायला मी जीप घेऊन फिरतोय—पण म्हणून तुम्ही त्याचा अर्थ मी बडा बागायतदार असा लावलात तर तो चुकीचा आहे.

: मला साडेतीन एकरच ऊस आहे; पण युनिटीनं रहातो म्हणून जीपमधून फिरू शकतो. युनिटीनं रहाण्यात आम्ही पाप करतोय का? ज्याच्या एकटयाच्या वाटयाला शंभर, पाचशे एकर ऊस असेल तर त्याला तुम्ही बडा बागायतदार म्हणा.

: आता शे. का. पक्षातर्फे १९ डिसेंबरला आम्ही पुन्हा जिल्हाबंदचा आदेश दिला. आपले पंतप्रधान मोरारजीभाई देसाई हे तर उसाचा आणि गुळाचा काही प्रश्न आहे हे मानायलाच तयार नाहीत. सुदैवानं बर्नालांसारखे मंत्री आहेत की ज्यांना ह्या प्रश्नाची जाणीव आहे. जनता पक्षाच्या सर्वच नेत्यांना अशी जाणीव आहे का? – तर नाही – असे आमचे प्रामाणिक मत आहे

: काही जण आम्हाला म्हणतात की, तुम्ही नेहमी गूळ आणि उसाचाच का प्रश्न घेता? अहो, आमच्या भागात ह्याच महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्या भागात जो प्रश्न महत्त्वाचा तोच घेतला पाहिजे. विदर्भ-मराठवाडयात उसाचं बोलून काय उपयोग? तिथं आम्ही कापसाचा प्रश्न घेणार. एक गोष्ट लक्षात घ्या. आम्ही गुळाची एकाधिकार खरेदीची मागणी करीत नाही. कारण गूळ ही काही टिकाऊ वस्तू नाही, कापसासारखी.

: हे फक्त ऊसवाल्यांचेच आंदोलन आहे असा देखील गैरसमज करून घेऊ नका. गावोगावच्या शेतमजुरांना देखील आम्ही आवाहन केलं आहे. उद्या ऊसवाल्याला रानातल्या रानात ऊस पेटवायची वेळ आली आणि कर्जात बुडायची पाळी आली तर शेतमजुरांना भांगलायला काही मिळणार नाही – मजुरी मिळणार नाही. ऊसकरी शेतकऱ्याला दोन पैसे जास्त मिळाले तर शेतमजुरांनी देखील हक्कानं मजुरीत त्याचा जादा-वाटा मागून घ्यावा असं आमचं म्हणणं आहे.

: आता मी आणि माझ्यासारखे बरेच मध्यम शेतकरी, आम्ही थोडेफार सुशिक्षित आहोत; पण आमची शेती खऱ्या अर्थानं सुधारित पद्धतीची नाही. दहा-पंधरा वर्षांपूर्वी शेतकऱ्यांची जी मुलं शिकली ती सगळी नोकऱ्या करायला लागली. नोकऱ्या करताना त्यांनी ग्रामीण भागातील आईबापांची फारशी दखल घेतल्याची उदाहरणं कमीच. आता ह्या वेळेला मात्र ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणाला आम्ही आवाहन करतोय की, बाबा रे, तुझी बेलबॉटम् पॅन्ट, तुझ्या डोक्याला ब्रिलक्रीम वगैरे मिळावं आणि ते तुझ्या बापानं पुरवावं अशी तुझी अपेक्षा असेल तर तूदेखील आता ह्या आंदोलनात सामील हो! आहे ह्या शेतीत बापापेक्षा वेगळं काही करता येतंय का ह्याचा प्रयत्न कर – नुसतं नोकरी करत फिरू नको. दुर्दैवानं सगळे सुशिक्षित तरुण ह्याची अजून दखल घेत नाहीत.'

प्रश्न : ऊस शेती जर परवडत नाही तर तुम्ही ऊस लावताच कशाला? दुसरं एखादं पीक का काढीत नाही?

भुयेकर : अगदी चांगला मुद्दा तुम्ही उप-


ग्रामोद्योग

शेतीप्रधान । शेतीला पूरक ग्रामोद्योग....

शहरातून अविकसित । अर्धविकसित ग्रामीण प्रदेशाकडे....

नव्या युगाची ही नवी निकड....

तिला आमचाही थोडा हातभार....

**कपाशी व इतर खाद्यतेले व पेंड यांच्या दर्जेदार उत्पादनासाठी आमचा नवा अद्यावत कारखाना.**

एमआयडीसी, अहमदनगर येथे नुकताच सुरू झाला.

अधिक चौकशीसाठी–

**अरुण फॅटस् अँड ऑईल केक्स्**

हरेश चेम्बर्स,

३१३।३१९ सॅम्युएल स्ट्रीट, मुंबई ४०० ००३.

स्थित केलात. उसाऐवजी एक एकरात मी भात केला तर किती होणार– २५/३० मण. त्याचा आज मार्केटमध्ये रेट किती? १३००/१४०० रुपये विक्री. आता त्याला लागणारं पाणी, खतं, मजुरी हे वजा जाता हातात काहीच उरत नाही. उसाचं कमीत कमी २५/३० टन उत्पन्न असतंय. तीस टनांवर आम्ही बँकेकडे कर्ज मागितलं तर आम्हाला किमान दोन हजार रुपये मिळतात. भातावर किती कर्ज मिळणार? हे शेतीमधील व्यापारी तंत्र आहे. दुसरं म्हणजे इतर पिकांचं रोगानं नुकसान होण्याची खूप शक्यता असते. जोंधळा केला मीजमाशीनं जातोय. हायब्रीड केला– ऐन टायमाला रोग पडतोय. भात केला करपा पडतोय. गहू लावला तांबेरा पडतोय– तसं उसाचं नाही. हे कणखर पीक आहे. रोग पडतोय पण नव्वद टक्के पीक हमखास हाताला लागतंय; पण सर्वांत मुख्य म्हणजे उसावर बँकेकडून कर्ज घेऊन ते पैसे इतर व्यापारात फिरवायला मिळतात.

**प्रश्न :** आमच्यासारख्या पुस्तकी ज्ञान असलेल्या शहरी लोकांचा एक समज आहे. शेतकरी अडाणी असल्यामुळे त्याची आर्थिक स्थिती सुधारत नाही. आज आपल्या देशातील कृषि महाविद्यालयातून, शेतीसंशोधनकेंद्रातून रोज नवनवीन शोध लावले जातात; पण शेतकरी त्याचा उपयोग करून घेत नाही. सुधारित शेतीच्या पद्धतीचे मार्ग अवलंबीत नाही आणि म्हणून तो सदैव अडचणीत असतो असं आम्हा शहरी लोकांना वाटतं, ते कितपत खरं आहे? त्याचबरोबर दुसरा सवाल– शेतीसंशोधनकेंद्रे आणि शेतकरी ह्यांचा एकमेकांशी काही खराखुरा संबंध आहे का?

**भुयेकर :** आता माझ्यासारख्याचं अडाणी मत आणि उदाहरणच तुम्हाला सांगतो आता पूर्वीच्या आमच्या भाताच्या जाती– आंबेमोहर घ्या– ह्या रोगाला फारशा बळी पडत नसत; पण जेव्हा संकरित जाती आल्या– पाच-पन्नास नव्या जाती आल्या– मी स्वत: पाच–सहा प्रकारच्या केल्या– अजूनही करतो; पण काही खरं नाही. मला स्वत:ला अजूनही आपली जुनी बसुमती तांदळाची जातच आवडते. कमीत कमी रोग पडणारी जात आणि जनावरांना खायला पिंजार भरपूर. वाऱ्यानं पीक जरी आडवं झालं तरी झडत नाही. ह्या संकरित जातींचं तसं नाही. काढणीत जरी एक–दोन दिवस मागेपुढे झालं तरी उभं पीक झडतं– वाऱ्यानं आडवं पडल्यावर तर त्याची दशा विचारायलाच नको. पीक भरपूर निघतं; पण सगळं जर वेळच्या वेळी केलं तर! आता यंदा ज्यांनी हायब्रीड ज्वारी केली त्या सर्वांना उत्तम पीक आलं; पण ह्या हायब्रीडमुळं मीजमाशीचं प्रमाण प्रचंड वाढलं. त्यामुळं साधी ज्वारी कुणी करू शकत नाही. पूर्वी मीजमाशीचं प्रमाण किती होतं ते आपल्याला माहीत नाही; पण हायब्रीडमुळं ते वाढलं असं सर्वांचंच मत आहे म्हणजेच जशी प्रगती आली त्याचबरोबर तोटेदेखील आले.

शहरात जसा कारखाना आला आणि त्यामुळे दूषित हवा पसरली तसंच इथं झालंय. रासायनिक खतांचं उदाहरण घ्या. भरमसाठ वापर करून आपल्या जमिनींचं पार वाटोळं करून घेतलंय अनेक शेतकऱ्यांनी! संशोधन आणि शेतकरी ह्यांचा मेळ घातलाच पाहिजे, नाही तर प्रगतीबरोबर फार मोठे दुष्परिणाम पण पदरी पडतील.

आता नवीन जाती, नवीन बियाणं– त्या पेरून दाखविल्या पाहिजेत. इथं निगवेला बटाट्यांचा प्लॉट केला होता. फसक्लास उत्पन्न निघालं. म्हणून आम्ही पण केला. साफ फसलो. बियाणं बरोबर नव्हतं. सरकारनं बियाणाची गॅरंटी दिली पाहिजे. बाद निघालं तर नुकसानभरपाई करून दिली पाहिजे, तरच शेतकरी नवीन संशोधन स्वीकारील.

अहो, एकदा जर शेतकऱ्याची आणि शेतीची घडी विस्कटली ना तर महाकठीण परिस्थिती निर्माण होईल. पीककर्जाला आत्ताच हप्ते बांधून दिले पाहिजेत. दिले नाहीत तर शेतकऱ्याला खतं मिळणार नाहीत. खतं मिळाली नाहीत तर त्याचा परिणाम पुढील वर्षीच्या उत्पादनावर होईल. हे राष्ट्रीय नुकसान असेल. नंतर पुन्हा कोटचवधी रुपये खर्चून 'अधिक उत्पादन वाढवा' अशा मोहिमा हाती घेण्याऐवजी आताच जागं झालेलं काय वाईट?

**प्रश्न :** नेहरूंच्या वेळेपासून सर्वजणच शेतकऱ्याच्या भल्यासाठी काही तरी करण्याबद्दल विचार व्यक्त करताना आढळतात. असं असूनही शेतकऱ्यांची मात्र वणवण चालच आहे. भाषणे ठोकताना सर्व पक्षांचे नेते म्हणतात की, ग्रामीण सुधारणा झाली पाहिजे; पण प्रत्यक्षात मात्र खेडी न सुधारता शहरेच वाढताना आणि सुधारताना दिसतात. ह्याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

**भुयेकर :** शहरात सुधारणा लवकर हाताशी येतात. खेड्यात अजून वीज मिळायला अडचणी आहेत. शहरात तसं नाही. त्यामुळे शहरात कामं वाढतात. ग्रामीण भागात दोन रुपये मजुरी मिळत असेल तर शहरात चार रुपये मिळते. त्यामुळे शहरे भरत जातात. शेतीपेक्षा उद्योगधंद्यांना जास्त सवलती आहेत.

टाटा–बिर्लांची १९४७ मध्ये जी प्रॉपर्टी होती तिच्यात आणि आजच्या त्यांच्या प्रॉपर्टीत किती तरी मोठा फरक आहे. हा फरक कशामुळे? त्यांना तेव्हा तीन आणि चार टक्के व्याजानं कर्ज दिली. शेतकऱ्याला मात्र तेव्हा १४ टक्के. आत्ता ११ टक्के झालंय; पण आम्हाला तर अनेक वेळा दलालाकडून पैसे घ्यावे लागतात. तेव्हा तर तीस टक्के व्याज भरावं लागतं.

दुसरी गोष्ट पाण्याच्या सोयीची. पुढाऱ्यांच्या राजकीय वादात जलसिंचन योजना फार काळ लांबवल्या गेल्या. जी धरणे तेव्हा पाच कोटीत पूर्ण झाली असती तीच आज पन्नास कोटी खर्चूनदेखील पुरी होत नाहीत.

**प्रश्न :** बँकेचे लोक म्हणतात, शेतीपेक्षा उद्योगधंद्याला कर्ज देणं सोयीचं असतं.कारण दिलेली कर्जं परत मिळतात. शेतीला दिलेली कर्जं फिरतात, वाढतात किंवा बुडतात.

**भुयेकर :** माझं मत ह्याउलट आहे. बँकांचे उद्योगधंद्यातले पैसेच फार बुडाले आहेत. शेतकऱ्यांकडून बुडाले नाहीत. 'थकणे' आणि 'बुडण' ह्यामधील फरक लक्षात घ्या. सगळेच गोरगरीब बँकांचे पैसे बुडवितात असं म्हणणं अयोग्य आहे. अहो, बँकावाले मोठ्या मंडळींनाच कर्जं देतात. कारण ह्यांच्या बँका वरच्यावरच चालतात. देशाचा संपूर्ण अभ्यास करून शेतीत बुडालेले पैसे आणि उद्योगधंद्यांत बुडालेले पैसे ह्यांचा आढावा घेतला तर खरी तफावत लक्षात येईल.

**प्रश्न :** तुम्ही जो मेळावा भरवणार त्याला चरणसिंग येणार असल्यामुळे राजकीय

स्वरूप येणारच. सध्या कोल्हापुरात शे. का. पक्षाबद्दल एक टीका कानावर पडते. वाहत्या वाऱ्यावर स्वार होऊन मंगल कलश पकडण्यासाठी धडपडणारा पक्ष असं शेतकरी-कामगार पक्षाबद्दल बोललं जातं...

भुयेकर : वाहत्या वाऱ्याचं वगैरे आपल्याला माहीत नाही. आम्ही शेतकरी आहोत. नैसर्गिक हवामान विचारात न घेता आम्ही पिकं घ्यायला लागलो तर काहीच उगवणार नाही, हे आम्हाला माहीत आहे. मंगल कलश वगैरे लोकांना काय म्हणायचं ते म्हणू दे–

–आता तुम्ही म्हणता तसं राजकीय स्वरूप ह्या मेळाव्याला असणार नाही. कारण सर्व पक्ष ह्यात सामील झालेले तुम्हाला दिसतील. कुणा एकाचं नेतृत्व बळकट करावं म्हणून ही चळवळ नाही. निदान आम्ही तरी तसं मानतो. शेतकऱ्यांचे मूळ प्रश्न सोडवले जावेत म्हणून ही चळवळ आहे. ह्या चळवळीतून केवळ राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न केला तर शेतकरी त्याला जुमानणार नाही–कुठल्याही पक्षाच्या झेंड्याची पर्वा मग शेतकरी ठेवणार नाही.

टेपरेकॉर्डरमधील कॅसेटची एक बाजू संपली होती. एव्हाना नेसकॅफेचे कप आमच्या समोर आले होते. चर्चा कोल्हापूरमधील अंतर्गत राजकारणावर घसरली. मी कॅसेट न पलटता कॉफीचे घुटके घेत चारमिनार फुंकत बसलो.

बाबासाहेब भुयेकर पाटलांना रामराम करून कोल्हापूरचा रस्ता गाठला. दुतर्फा ऊसच ऊस! कोल्हापूरचा ऊसकरी शेतकरी सरकारनं उसाला दिललं 'प्रोटेक्शन' काढून घताच संकटात आला होता. चरणसिंगांना आमंत्रण देऊन, भव्य किसान मेळावा भरविण्याचा त्याचा मानस होता. त्या मेळाव्यातून आपल्या प्रश्नांकडे सरकारची नजर खेचली जाईल असा त्याला विश्वास होता.

शेती हा मूलभूत उद्योग म्हणून त्याला मान्यता मिळाली पाहिजे. त्यासाठी शेतीधंद्याला आवश्यक ते सरक्षण मिळालं पाहिजे. देशाच्या पंचवार्षिक योजनेत शेतीला महत्त्वपूर्ण स्थान देण्याचं सरकारन खंबीरपणे ठरवलं पाहिजे. नेहरूंच्या कारकीर्दीत केवळ उद्योगधंदे पुढे आले आणि शेती मागे पडली हा चरणसिंगांचा आरोप लक्षात घेऊन योग्य ती उपाययोजना केली पाहिजे असं कोल्हापूरच्या ऊसकरी शेतकऱ्यांचं म्हणणं होतं. मेळाव्याद्वारे ह्या सर्व मागण्या सरकारपुढे मांडण्याची त्यानं तयारी चालवली होती.

यशवंतराव चव्हाणांनंतर महाराष्ट्रातील काँग्रेस स्थिर झाली ती ग्रामीण भागातील सधन शेतकऱ्यांच्या जिवावर. आजदेखील कोणत्याही खेड्यात सधन शेतकरी सोडून शेतमजुरांची संघटना बांधण्यासाठी कुठलाच पक्ष पुढाकार घेत नाही. तशी संघटना बांधणं कोणत्याही पक्षाला आज अडचणीचं वाटतंय ही वस्तुस्थिती आहे.

कारण उघड आहे–ग्रामीण पातळीवर काम करायचं झाल्यास राजकीय पक्षाला सधन शेतकऱ्यावरच अवलंबून रहावं लागतं.

कोल्हापुरातील चळवळ ही सधन शेतकऱ्यांची चळवळ आहे हे निश्चित. हा सधन शेतकरी अडचणीत आला आहे आणि दिवसेंदिवस त्याची परिस्थिती बिकट होत चालली आहे हेदेखील निश्चित. कोल्हापूरच्या परिसरातील सधन शेतकरी 'मोठा जमीनदार' नाही हे मात्र लक्षात घेणं आवश्यक आहे. तो मध्यम शेतकरी आहे. साखर कारखान्याचे सगळे शेअरहोल्डर्स पाच एकरांखालचे आहेत. पाच एकरांवरचे शेतकरी शंभरात पाचदेखील सापडणार नाहीत.

ज्याला 'मोठा जमीनदार' म्हणता येईल तो विदर्भात आहे, उत्तर प्रदेशात आहे, बिहारमध्ये आहे–काही प्रमाणात हरियाणा-पंजाबमध्ये आहे. चरणसिंग ह्या शेतकऱ्यांचे नेते. नांगरधारी शेतकऱ्याला ते आपले नेते वाटतील की नाही ह्याची शंका आहे.

कोल्हापुरात, पन्हाळ्याच्या पायथ्याचा जो शेतकरी आहे तो ऊसकरी नाही. तो धान्य पिकवतो. तो अल्पभूधारक आहे. स्वतःची शेती करतो आणि मध्यम शेतकऱ्याच्या मळ्यात कामाला जातो. धड शेतकरी नाही–धड शेतमजूर नाही अशी त्याची विचित्र अवस्था आहे. त्याला तर चरणसिंगांचं नावदेखील माहीत नाही. त्याला फक्त माहीत आहे गांधीजी, नेहरू आणि इंदिरा गांधी!

१९७२–७३ साली जेव्हा दुष्काळ पडला, धान्याचे भाव पडले तेव्हा ऊसकरी शेतकऱ्यांनी त्याच्यासाठी आंदोलन केलेलं त्याला आठवत नाही. 'आम्ही त्यांच्या मळ्यात कामाला जातो तेव्हा हे आम्हाला धड मजुरी देत नाहीत–त्यांच्या आंदोलनात आम्ही कशापायी भाग घ्यायचा?' असा त्यांचा साधा सरळ सवाल आहे.

ग्रामीण भागातील जो भूमिहीन, शेतमजूर आणि अल्पभूधारक आहे तो आज खूष आहे. त्याला कधी नव्हे ते साखर–चिमूटभर का होईना–घेणं परवडतंय. तो म्हणतोय, 'सणासुदीला आम्ही पोरांना आज गुळाच्या पोळ्या घालू शकतो–हे आम्हाला एरवी शक्य होतं का?' □


*With Best Compliments From :*

**SPAN INDUSTRIES**

**2094, E, Vikramnagar, Kolhapur - 416 005**
**(Maharashtra) India**

Phone : 4134 Gram : SPAN Telex : 0195 - 231

**Manufacturers of Sugar, Paper & Chemical Machinery.**
**Structural Engineers & Erectors.**

**Our Major Products :**

- Complete Boiling House of Sugar Factory
- Magma & Molasses Pumps of Rotory & Gear Type.
- Khandsary & Mini Sugar Plant.
- Paper Plant.
- Revitting & Dynamic Balancing for I. D., F. D. Fan and Centrifugal Baskets
- Facility for Ultrosonic Testing.
- Mill Spares for all Existing Mills.

कोल्हापूरच्या भुयेकर पाटलांनी बागायतदार शेतकऱ्यांचे मांडलेले प्रश्न आपण समजावून घेतले त्यांच्या शेतीवाडीवर जाऊन. आता जरा नायगावला चला. सासवडजवळचे साळुंख्यांचे नायगाव. तिथला हा सोमा काय सांगतो आहे ? तो जे सांगतो आहे ते आजवर कुणाला ऐकूही कसे आले नाही ? हाच तर खरा आपला ग्रामीण भारताचा प्रतिनिधी, परिवर्तनाचा केंद्रबिंदू वगैरे....

# पाच एकर तीस गुंठे जिराईत, एक विहीर, एक सोमा

प्रा. वसंत देशपांडे, अध्यक्ष, ग्रामायन

सासवड–सुपा या मार्गावर नायगाव नावाचे एक छोटे खेडे आहे. या गावचा परिसर दुष्काळी छायेत आहे. पाऊस पडला तर पडतो. पडला तरी जेमतेम जमीन ओलसर होण्यापुरता. केव्हा पडेल याचा नेम नाही. शेकडा ९० टक्क्यांपेक्षा अधिक जमीन या अनिश्चित बिनभरवंशाच्या पावसावर अवलंबून आहे.

या परिसरात हिंडताना शहरातील राजकीय पुढारी, उद्योगपती आणि विचारवंतांच्या व्याख्यानांची आठवण होते. ग्रामीण भागाचा विकास, लहान शेतकऱ्यांची उन्नती, अन्त्योदय आणि असेच विषय, पुन्हा पुन्हा घोळून घोळून पार पाडल्या जाणाऱ्या सभा, परिसंवाद, कार्यकर्त्यांचे मेळावे यांची आठवण होणे अपरिहार्य होते. अगदी अलीकडे पुण्यात वीस नामवंत अर्थशास्त्रज्ञांनी दोन दिवस आर्थिक धोरणावर तोंडसुख घेतले, त्याची आठवण या खेड्यातून हिंडताना मनोरंजक वाटते.

हे सर्व ऐकताना-वाचताना माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो तो नायगावचा सोमा. त्याचे पूर्ण नाव सोमा अंकुश कड. वय सुमारे ४०, पूर्णपणे निरक्षर. घरात बायको आणि पाच मुली. त्याच्याकडे ५ एकर ३० गुंठे एवढी शेती आहे. पूर्णपणे जिराईत. त्यात जेमतेम बाजरी-ज्वारी निघू शकते. साधारणपणे वर्षातील ४ ते ६ महिने पुरेल एवढे धान्य या जमिनीतून त्याला मिळते. खरा तो मजूरच. मिळेल तिथे मजुरी करून तो आपल्या कुटुंबाचे पोट भरतो.

मला त्याची आठवण येते ती एकाच कारणासाठी. त्याचा दुर्दम्य आशावाद आणि एका विहिरीसाठी त्याने केलेले जिवाचे रान!

तीन महिन्यांचा असताना त्याचे आई-वडील वारले. सोमा घरात एकटाच. मामाने मूल उचलले आणि आपल्या जवळच असलेल्या गावात नेऊन त्याचा सांभाळ केला. अगदी लहानपणापासून सोमा मामाचे शेतात राबू लागला. शाळेत नाव घालण्याचा प्रश्न कधी निघालाच नाही. सुमारे १७-१८ वर्षांचा झाल्यावर मामाने त्याचे लग्न करून दिले आणि एके दिवशी एस्. टी. तून त्या दोघांना नायगावला आणून टाकले, 'ही तुझी जमीन, आता तुझं तू पहा!' असे म्हणून मामा निघून गेला!

सोमाने शेत एकदा पायाखाली घातले. ममतेने हाताने कुरवाळले. त्याला खूप आनंद झाला. 'आपण शेतकरी आहोत. जवळपास सहा एकर जमिनीचे मालक आहोत. कष्ट करू आणि श्रीमंत होऊ. मी लवकरच नांगर घेईन, बैल घेईन...' सोमा मनोरथ बांधू लागला.

आज या गोष्टीला बावीस वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. त्याचा मनोरथ ह्या बावीस वर्षांच्या दीर्घ कालावधीत दैनंदिन जीवनाच्या संघर्षातच विरून गेला. सोमाजवळ बैल नाही, नांगर नाही. सर्व साधने भाड्याने आणावी लागतात. वर्षातील आठ महिने दुसऱ्याच्या शेतावर राबावे लागते. स्वतःच्या शेतीसाठी भाडे रु. १००० रोखीने मोजावे लागते. खावटीसाठी नियमितपणे कर्ज काढतो आणि प्रामाणिकपणे वेळचे वेळी फेडतो. त्यासाठी द. म. द. शे. रु. ६ व्याज भरतो!

प्रथमपासून सोमाला एकच वेड आहे. आपल्या शेतात विहीर खणण्याचे. कोणत्याही योजनेप्रमाणे कर्ज मिळण्यास तो 'पात्र' नाही. त्याची जिद्द, त्याचे कष्ट यांना गांधीजींच्या देशात किंमत नाही. शेवटी त्याने निश्चय केला, आपण एकट्याने विहीर खणावयाची! दहा वर्षांपूर्वी त्याने पहिली कुदळ मारली. प्रथम दोन मोठे बांध घालून शेतातून जाणारा ओढा थोपवून ठेवला. नंतर विहीर खणायला सुरुवात केली. मजूर नेमण्याचा प्रश्न नव्हताच. फक्त एकट्यानेच खणीत रहायचे आणि तेसुद्धा भल्या पहाटे दोन तास आणि संध्याकाळी मजुरीहून परत आल्यानंतर दीड दोन तास बांध घालण्या-

मुळे शेतजमीन सुधारली. ज्वारीचे उत्पादन वाढले. त्याच्या या भगीरथ प्रयत्नांना साथ देत विहीर वरीच खाली गेली; पण अजून पुरी झालेली नाही.

एकटयाने विहीर खणणारा खुळा सोमा आता सर्वांच्या परिचयाचा झाला आहे. त्याच्याकडे पाहिले म्हणजे 'एवढा उत्साह माणसास कोठून मिळतो' हा एकच प्रश्न माझ्या मनात येतो. त्याच्या कष्टांना फळ येणार का? सोमासारख्या असंख्य आशावादी शेतकऱ्यांना भविष्य आहे का?

## आशेची लाट

नायगावातील सोमासारख्या शेतकऱ्यांच्या नशिबाने एक चांगली घटना अलीकडे घडून आली. 'ग्रामगौरव प्रतिष्ठान' नावाच्या एका स्वयंसेवी संस्थेने एक कल्पना सोमासारख्या शेतकऱ्यांपुढे मांडली. गावच्या ओढ्याला सरकारने १९६६ मध्ये बांध घातला. त्यामुळे ओढ्याच्या पात्रात पाणी पाझरू लागले. काठाने शेती असणाऱ्या शेतकऱ्यांची चंगळ झाली. इंजिने बसवून, खड्डे खणून त्यांनी पाणी घेतले आणि उसासारखी पिके घेण्यास सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानचे श्री. विलासराव साळुंखे यांनी एक नवीन विचार मांडला. 'पाणी सर्वांच्या मालकीचे. सरकारी खर्चाने बांधलेल्या धरणामुळे पाणी आले. हे जास्तीत जास्त लोकांत समान पद्धतीने वाटता येणे शक्य आहे. ओढ्यात बंधाऱ्यानजीकडेच विहीर खणून त्यातील पाणी दूरवरच्या शेतकऱ्यांनाही देता येईल. माणशी अर्धा एकर आणि तेही आठमाही, फक्त अन्नधान्य, कांदा, कापूस यांसारख्या पिकांसाठी या तत्त्वाप्रमाणे अनेक शेतकऱ्यांना सामावून घेता येईल; पण आज ज्या थोड्यांना अमाप पाणी मिळते आहे त्यांना थोडी कदाचित झळ सोसावी लागेल. त्यांनाही उसासारखी पिके सोडून आठमाही पिके घ्यावी लागतील.'

झाले, गावामध्ये आशेची एकच लाट उसळली. पाणी सर्वांचे, सर्वांना हवे!

या योजनेबाबत सांगण्यासारखे बरेच आहे. सखोल अभ्यास करून ही कल्पना मांडावयास हवी. 'ग्रामायन'ने हे काम हाती घेतले आहे. थोडक्यात योजना सांगायची झाल्यास ती अशी. दुर्मिळ पावसावर अवलंबून असणारी शेतीदेखील लहान शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करू शकते. प्रमुख योजना हवी पडणाऱ्या पावसासंबंधी. सुमारे १०० एकरांचे पाणलोणक्षेत्र मानले तर त्यावर पडणारा पाऊस–जो काही थोडा असेल तो– साठवून त्याच्या जोरावर २५ एकरांवरील शेती ८ माही पद्धतीने बागायत करता येते. हे २५ एकर कोणा एकाचे न ठेवता परिसरातील लहान शेतकऱ्यांच्या जमिनीत माणशी ½ एकर (किंवा कुटुंबामागे २½ एकर) याप्रमाणे योजलेले असावे तसे शक्य दिसते. अशा रीतीने साठवण आणि वाटपव्यवस्था आखली तर गावातील प्रत्येक जिरायत शेतकऱ्याला आपली किमान २½ एकर जमीन भिजवणे शक्य होईल. दुष्काळी भागात या योजनेने आमूलाग्र फरक घडवून आणता येईल. अल्पभूधारकाची शेती आर्थिकदृष्ट्या किफायतशीर करता येईल.

पण प्रथमपासून या योजनेस मोडता घालण्यात आला ओढ्याकाठच्या लोकांनी, आपला आजचा फायदा अमाप कमी होणार म्हणून उचल खाल्ली. त्यांनी विरोध केला. प्रकरण कोर्टात नेले. नेहमीप्रमाणे कोर्टाने स्टे दिला आणि घोंगडे भिजत पडले. ज्या ३५ शेतकऱ्यांनी एकत्र येऊन योजना तयार केली, ते बहुतेक निरक्षर आहेत. शेअरभांडवल गोळा करण्यासाठी घरातले किडूकमिडुक विकून त्यांनी पैसे उभे केले होते. सोमाने चार बोकड विकले. आठ-दहा दिवसांच्या आत सर्वांनी आपले शेअर्स घेतले. त्याची एकूण रक्कम रु. २०,०००. बँकेने रु. १ लाख कर्ज दिले. सोमावर आज रु. २२०० चा बोजा आहे. रामदास बोरावके हा असाच एक सोमाचा भाऊ. त्याची १६ एकर जमीन आहे. पूर्णपणे जिरायत म्हणून गेले दहा वर्षे तो गाव सोडून गेला होता. पाणी मिळणार अशी कुणकुण कानावर आल्यावर धावतच हा परत गावी आला. असे ३५–४० शेतकरी मोठ्या आशेने चातकासारखी पाण्याची वाट पहात बसले आहेत. कोर्टखटले मधेच उपटले. त्यामुळे धास्तावले आहेत. एवढा खर्च करून समजा पाणी नाहीच मिळाले तर? पाणी नाहीच; पण मोठा बोजा मात्र डोक्यावर!

सोमा म्हणतो, 'सरकार गरिबांचे आहे. पुढारी नाही का तसं बोलत? मग हे आता असं कसं झालं? कोर्ट आमच्याविरुद्ध जाईलच कसं? सरकार कोर्टाला दटावत का नाही?' सोमाला सरकार, न्यायालय, विधिमंडळे इत्यादीतील फरक कळत नाही. सांगावया गेलो तर साशंक नजरेने पाहू लागतो. आपल्याला बनवताहेत असे त्याच्या मनात कुठे तरी वाटत असणार. सगळे ऐकून घेतल्यावर तो म्हणतो, 'ते काय मला समजत नाही. मला दिसते ते अगदी सोपे आहे. पाणी सार्वजनिक मालकीचे. आम्ही कोणाचेही पाणी न तोडता आमच्या कष्टाने आम्ही आमच्या शेताला थोडं पाणी देऊ इच्छितो. त्यात मोठाले न्यायाधीश, त्याच्यावरचे न्यायाधीश, पोलिसअधिकारी हे सगळे येतातच कोठे? काही तरी घोटाळा करता तुम्ही लोक!'

मला या त्याच्या प्रश्नांना उत्तरे देता येत नाहीत. कारण सत्य परिस्थितीने त्या प्रश्नांच्या उत्तरातील समाधान हिरावून घेतलेले असते.

सोमाच्या भाबड्या मनात ज्या शंका येतात त्या माझ्याही मनात येतात. भारतीय अर्थव्यवस्थेत लहान उत्पादकांचा भरणा फार मोठा आहे. शेतीव्यवसायात तर सुमारे ५२% शेतकरी लहान शेतकरीच आहेत. उद्योगधंद्याच्या क्षेत्रातही हीच परिस्थिती आहे. आर्थिक नियोजनात या लहान उत्पादकास महत्त्वाचे स्थान देण्याचे तत्त्वतः तरी मान्य झाले आहे. किंबहुना हा लहान माणूस केन्द्रस्थानी ठेवून त्याची उत्पादनक्षमता वाढवणे आणि त्याच्या सर्व तऱ्हेच्या गरजा भागवण्यासाठी अर्थव्यवस्था निर्माण करणे हे तर आपल्या धोरणाचे वैशिष्टचपूर्ण अंग सांगितले जाते; पण प्रत्यक्षात तसे दिसत नाही. लहान शेतकरी आणि इतर क्षेत्रातील लहान उत्पादक उपेक्षितच दिसून येतो. सोमासारख्या शेतकऱ्यांना पाणी ही अनन्यसाधारण महत्त्वाची गोष्ट ती मिळण्याची जरा कोठे शक्यता निर्माण झाल्याबरोबर वादळ उठले आणि या वादळात सोमा आणि त्याची योजना कोठे हरवून जाईल कोण जाणे. संबंधित हितसंबंध, शासनाधिकारी, न्यायालये, राजकारणी एक तर पूर्णपणे अलिप्त; जणू ते त्या गावचे नाहीत किंवा प्रस्थापितांचे हितसंबंध अबाधित राखण्यासाठी कमरा सरसावून एकजुटीने पुढे. असे का व्हावे? पुन्हा पुन्हा हे का घडावे?

## चरणसिंग कुणाचे ?

भारतातील ५२ टक्के शेतकऱ्यांची जमीन ५ एकरांपेक्षा कमी आहे. तिसरी पंचवार्षिक योजना पार पडेपर्यंत या शेतकऱ्यांसाठी खास योजना अशी नव्हती. शेतीविकासासंबंधीच्या सर्वसाधारण योजना यशस्वी झाल्या तर लहान शेतकऱ्यांनादेखील आपोआप त्याचे फायदे मिळतील अशी अटकळ होती. हरितक्रांतीचे पर्व उजाडले. तेव्हाही असा समज तयार करण्यात आला की, हरितक्रांतीची लाट सर्व शेतकऱ्यांपर्यंत आपोआप पोहोचेल; पण हे समज चुकीचे होते हे १९६५ नंतरच्या काळात हळूहळू लक्षात येऊ लागले आणि नंतरच चवथ्या पंचवार्षिक योजनेत लहान आणि अतिलहान शेतकऱ्यांचे प्रश्न निराळ्या स्वरूपाचे असतात हे गृहीत धरून योजना आखण्याच्या विचारास सुरुवात झाली; पण हे प्रश्न अजूनही मामुली स्वरूपाचे आहेत. मुख्य समस्यांना हात घालण्याचा प्रश्न अजून झालेलाच नाही.

आज पुन्हा नव्याने या प्रश्नाकडे पाहण्याचे नवीन सरकारने ठरवले आहे. चरणसिंगांनी प्रचंड किसान मेळावा घेऊन आपला नवीन पवित्रा स्पष्ट केला. शेतकरीवर्ग आजपर्यंत उपेक्षित राहिला. मोठ्या उद्योगांकडे सर्व लक्ष दिले अशी त्यांची तक्रार आहे. ही आजपर्यंतची वाटचाल बदलून, शेतकरी व ग्रामीण उद्योग यांकडे लक्ष आणि साधनसंपत्ती खेचण्याचे त्यांनी आवाहन केले आहे. या गोष्टीचे स्वागत करताना मन साशंक आहे. शेतीकडे लक्ष द्यावयाचे म्हणजे निश्चित काय करावयाचे ? केवळ अधिक गुंतवणूक ? की असेच काही ? शेतकरी हा वर्ग एकजिनसी नाही. त्यात लहानमोठे आहेत. बागायतदार-जिरायतदार आहेत. मोठी यंत्रसामग्री असणारे आहेत. तसेच लाकडी नांगरवाले आहेत. पैशाची पिके घेऊन प्रचंड पैसे मिळविणारे आहेत. तसेच केवळ स्वतःस लागणारे धान्य पिकविणारे आहेत आणि सोमासारखे शेतकरी ज्यांना बैल, नांगर नाही आणि भूमिसिंचनाची सोय नाही—असे शेतकरी तर बहुसंख्य आहेत. यातल्या कोणत्या वर्गाकडे लक्ष पुरविले पाहिजे असे चरणसिंग म्हणतात ? किसान मेळाव्यांचे स्वागत करताना ठामपणे हा प्रश्न विचारला पाहिजे : आपण कोणत्या किसानांचे प्रतिनिधित्व करीत आहात ? तुमच्या मागण्यांमध्ये आणि अभिप्रेत योजनेत सोमासारख्या शेतकऱ्यांसाठी खास योजना आहेत का ? की केवळ आजपर्यंत चालत आलेल्या, मोठ्या शेतकऱ्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांसाठी अधिक पैसा, सत्ता आणि बळ मिळावे म्हणून हा खटाटोप आहे ? मक्तेदार, मोठे उद्योगपती आणि अनावश्यक चैनीच्या वस्तूंचे उत्पादन करणारे कारखानदार याविरुद्ध चरणसिंग दंड थोपटून उभे आहेत. याचे स्वागत करीत असतानाच त्यांना निक्षून विचारावयास हवे की, शेतीव्यवसायातील पाणी आणि इतर वस्तूंचा पुरवठा यावर मक्तेदारी प्रस्थापित करणारे बडे शेतकरी आणि अनावश्यक पिकांचे उत्पादन करणारे शेतकरी याविरुद्धही तुम्ही तितक्याच पोटतिडिकेने उभे राहणार आहात काय ?

## सहकारी शेती पुनर्विचार

बहुसंख्य शेतकरी (लहान शेतकरी) यांचा प्रश्न सोडवताना आपणापुढे कोणते पर्याय आहेत ? एक नेहमीचा पर्याय सांगितला जातो तो सामुदायिक किंवा सहकारी शेतीचा. लहान शेतकऱ्यांची जमीन एकत्र आणून ती सहकारी तत्त्वावर कसणे किंवा सामुदायिकरीत्या कसायला लावणे. हा विचार नवीन नाही. जगातील अनेक देशांनी हा प्रयोग करून अनुभव घेतलेला आहे. आपल्या देशातही, आर्थिक नियोजनास प्रारंभ करताना असा विचार मांडला होता. काही लहान शेतकऱ्यांची शेती व्यक्तिगत पातळीवर किफायतशीर नसल्याने, सहकारीपद्धतीने करावी. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांसारखे अर्थशास्त्रज्ञ वारंवार सांगत असत की, या देशातील प्रमुख प्रश्न जमीनदारी नसून असंख्य लहान शेतकऱ्यांची शेती अधिक उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कशी करावयाची हा आहे. यासाठी त्यांनी सुचवले की, काही किमान प्रमाणात तरी सहकारीपद्धतीचा अवलंब अटळ आहे. या दृष्टीने पहिली पायरी म्हणून स्वतंत्र मालकीचे लहान लहान तुकडे विखुरलेले असतील तर ते सलगपट्टीत आणणे; पण हा सल्ला आजतागायत कोणी मानलेला नाही. उलट सहकारी शेतीचे प्रयोग अगदी साचेबंद आणि कल्पकताशून्यपद्धतीने राबवून हसे करून घेतले गेले, त्यामुळे आज सहकारी शेतीचे नाव काढणे देखील मुष्किल होऊन बसले आहे; परंतु ज्यांना प्रश्न सोडवायचा आहे त्यांना ही वाट कायमची बुजवून चालणार नाही. लहान शेतकऱ्याची जमीन ही त्याची बेडी ठरते, त्याचा लहान तुकडा त्याच्याच शोषणाचे साधन बनतो असाही विचार आपण ऐकतो. उदाहरणार्थ सोमा आज वर्षाकाठी रु. १००० भाडे म्हणून दुसऱ्यास देतो. हा दुसरा मोठा शेतकरी असतो. त्याची शेती मोठी असल्याने, त्याला बैल, नांगर आणि इतर आयुधे ठेवणे परवडते. त्याच्या जोरावर तो स्वतःची शेती तर करतोच; परंतु सोमासारख्या शेतकऱ्याच्या लहान शेतातूनही बराचसा उत्पादनाचा वाटा सहजपणे उचलून नेतो, ही वस्तुस्थिती आहे. यावर उपाय काय ? हे शोषण कसे थांबवावयाचे ? याला एक मार्ग म्हणजे सोमासारख्या लोकांनी एकत्र येऊन सर्वांनी मिळून बैलजोडी ठेवणे, नांगर घेणे, एकमेकांच्या शेतावरची कामे करणे. जे एकट्याला शक्य नाही ते सर्वांनी मिळून करणे. एकत्रित आल्यानेच हे शोषण थांबेल आणि अशा शेतकऱ्यांची भरभराट होऊ शकेल. म्हणून सहकारी पद्धतीचा नव्याने, सर्व परिस्थिती लक्षात घेऊन विचार करणे आवश्यक आहे.

## नवी चौकट हवी

लहान शेती आर्थिकदृष्ट्या सक्षम नसते म्हणून अशा शेतकऱ्यांना संरक्षण-प्रोत्साहन देण्यात फार शक्ती आणि पैसा खर्च न करता, त्यांची जमीन मोठे अगर मध्यम आकाराचे शेतकरी विकत घेत असतील तर ते इष्ट मानून, अशा रीतीने विकत घेतलेल्या शेतकऱ्यांना इतरत्र रोजगार देण्याची योजना आखावी, असा एक पर्याय मांडला जातो. या विचारात दोन दोष दिसतात. पहिला दोष असा की, एका ठराविक आर्थिक चौकटीतून या प्रश्नांकडे हे विचारवंत पाहतात. ही चौकट बदलू शकते किंवा बदलावयास हवी हे त्यांच्या लक्षात येत नाही. आजचे संशोधन, संस्थात्मक आणि शासकीय संदर्भ, शेतीस लागणाऱ्या हरतऱ्हेच्या वस्तूंच्या उत्पादनाची व्यवस्था या

सर्व गोष्टी मोठी शेती, मोठे उद्योग यांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीतूनच आकार घेत आल्या आहेत. त्यांच्यासाठी निर्माण केलेल्या सोयी, वस्तू आणि संस्थांचा पसारा लहान उत्पादकास त्याच्या आवाक्याबाहेरचा वाटल्यास नवल नाही. संदर्भ बदलून लहान उत्पादक हा केंद्रस्थानी ठेवला म्हणजे मग त्याच्या समस्या कोणत्या, याकडे लक्ष जाईल. त्यास आवश्यक असणारे साहित्य त्यानंतर उपलब्ध होऊ शकेल. लहान शेती फायद्याची करायची असे उद्दिष्ट ठेवले तरच ते साध्य होऊ शकेल.

दुसरा दोष असा की, लहान शेतकऱ्यांची संख्या एवढी प्रचंड आहे की, यांना शेतीबाहेर कायम स्वरूपाचा, किमान जीवनमान राखता येईल असे वेतन मिळवून देणारा रोजगार कसा निर्माण करावयाचा हे सांगता येत नाही. काही ढोबळ मार्गदर्शन कोणी करतात; परंतु तपशीलवार योजना तयार करणे आजच्या घटकेला तरी दुरापास्त दिसते. आज बेकार असलेल्या तरुणांना रोजगार देता देता सरकारची दमछाक झालेली दिसते. त्यात या असंख्य लहान शेतकऱ्यांची भर पडली तर काय होईल याची कल्पनाही करता येत नाही. फार मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणे शक्य असते तर मग प्रथमपासून लघुउद्योगांना संरक्षण, ग्रामीण उद्योगास प्रोत्साहन, कॉमन प्रॉडक्शन प्रोग्रॅम यासाठी अर्थधुरीणांनी आग्रह का धरला असता ? कॉमन प्रॉडक्शन प्रोग्रॅमसारख्या योजना प्रथमपासून अमलात आणण्याचा अट्टाहास सरकारने केला तो याच जाणिवेतून की, लहान उत्पादकाचे अर्थशास्त्र किफायतशीर करण्याखेरीज गत्यंतर नाही.

प्रामाणिक प्रयत्न केला तर अशी व्यवस्था होऊ शकेल.

शेतीव्यवसायापुरते बोलावयाचे झाल्यास, महाराष्ट्रात सुमारे ५७ टक्के शेतकऱ्यांची शेतजमीन ५ एकरांपेक्षा कमी आहे. महाराष्ट्रातील सुमारे एकतृतीयांश भाग दुष्काळी भाग म्हणून गणला जातो. त्यात सुमारे एक कोट लोक राहतात. या शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य आणि किमान उत्पादन आणावयाचे झाल्यास सर्वांत प्रथम पाणी आज कसे कोण वापरतो हे पहावयास हवे. सर्व पाणी सामाजिक मालकीचे आहे हे तत्वत: मानले तर पुढील नियोजन शक्य होईल. निदान नद्या, नाले, तळी यातील पाणी तरी सार्वजनिक मालकीचे आहे असे मानावयास हरकत नाही.

## पाण्याचे नियोजन


सर्व उपलब्ध पाणी समाजाच्या मालकीचे हे तत्त्व मानल्यानंतर त्याचा उपयोग कसा करावयाचा हे ओघाने आलेच. सर्व शेतकरी किंवा जास्तीत जास्त शेतकरी व जास्तीत जास्त जमीन, किमान प्रमाणात तरी पाण्याखाली येईल. अशा तऱ्हेचे नियोजन करणे, ही दुसरी पायरी. उद्दिष्ट एकदा स्पष्ट झाले म्हणजे योजना तयार करणे शक्य होते. आधुनिक यंत्रसामग्री आणि शास्त्र यांचा अवलंब करून हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. इस्त्राइल या छोट्या राष्ट्राने प्रतिकूल परिस्थितीत देखील उपलब्ध पाणी योग्य प्रकारे साठवून त्याचा वरील उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून वापर केला. त्यामुळे त्यांना नैसर्गिक अडचणींवर मात करता आली.

महाराष्ट्रातही हे शक्य आहे. आजपर्यंत या प्रश्नाची उपेक्षा झाली. एखाद्या प्रदेशात किती विहिरी निघू शकतील, त्या कोठे असव्यात आणि त्यातील पाण्याचा वापर जास्तीत जास्त क्षेत्रास कसा करता येईल, याचा विचार झालेला नाही. सोमासारख्या शेतकऱ्यांची शेते केवळ त्यांच्या दुर्दैवाने एका विशिष्ट भागात आहेत म्हणून त्यांना पाणी मिळू नये ही परिस्थिती मान्य करणे म्हणजे मानवाच्या कर्तृत्वावर, बुद्धीवर विश्वास न ठेवण्यासारखे आहे. जोपर्यंत याबाबतीतील आपले ज्ञान मर्यादित होते, तोपर्यंत इलाज नव्हता; पण आजच्या घटकेलाही सोमास आपली पत्रिका पाहून नशीब कधी उजळेल हे पहावे लागणार असेल तर या ज्ञानाची ही उपेक्षाच म्हणावी लागेल.

सर्वच पाण्यावर सामाजिक मालकी प्रस्थापित करणे आज व्यवहार्य नसेल आणि राजकीयदृष्ट्या अवघड असेल तर निदान नद्या, नाले, तळी इत्यादींतील पाणी तरी तातडीने सार्वजनिक मालकीचे समजून त्याच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यास हरकत नाही. या एका कल्पनेचा स्वीकार केला तरी मोठ्या प्रमाणावर लहान शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

'जिथे नाला तिथे बंधारा' या तत्त्वाचा पुरस्कार श्री. बापूसाहेब उपाध्ये आज बरीच वर्षे करीत आहेत. त्याला प्रत्यक्ष रूप देऊन अंमलबजावणी करण्याचे काम विलास साळुंखे नायगावला करीत आहेत. त्यांच्या योजनेप्रमाणे १५०।२०० एकरांवर पडणारा पाऊस साठवता येतो आणि त्याचा फायदा २५ टक्के एकरांना आठमाही पद्धतीने देता येतो. हे सूत्र स्वीकारले आणि त्यानुसार गावागावाचे नियोजन केले तर बहुतेक सर्व शेतकऱ्यांना घरटी २½ एकरास पाणी देत येईल. या पाण्याचा वापर अन्नधान्याची पिके, तसेच भुईमूग, कापूस यांसारखी पिके घेण्यास केला तर हा २½ एकरवाला शेतकरी दारिद्र्यरेषेच्या नक्की वरती येऊ शकतो. या कल्पनेप्रमाणे परिसराची विकासयोजना आखली तर उत्पादक कामे मोठ्या प्रमाणावर काढणे शक्य होईल. बेकारांना केवळ खडी फोडण्याचे काम देण्याची गरज नाही. या कामातून जमिनीची उत्पादनक्षमता वाढेल. त्यातूनच कायम स्वरूपाचा रोजगार उपलब्ध होऊ शकेल.

या कल्पनेचा आणि प्रयोगाचा बोलबाला पुष्कळच झाला आहे; परंतु कौतुक निराळे आणि स्वीकार निराळा. एका मुख्यमंत्र्यांनी तर या कल्पनेचा स्वीकार करताना म्हटले, 'या कन्येचा आम्ही स्वीकार केला आहे. आता तुम्ही निष्काळजी रहा!' प्रश्न एवढाच की ही स्वीकारलेली कन्या–सचिवालयाच्या कोंडवाड्यात राहणार की महाराष्ट्रभर मोकळ्या वातावरणात हुंदडणार ?



नायगावच्या सोमाची विहीर समजा पूर्ण झाली. शेताला पाणी मिळू लागले. पुढचा सवाल विक्रीचा. तो सोडविल्याशिवाय सोमा पूर्णपणे स्वतंत्र, मोकळा होऊ शकत नाही. सोमासारख्या बहुसंख्य लहान शेतकऱ्यांसाठी पर्यायी विक्रीयंत्रणाच हवी. ती कशी तयार करायची ?

# मावळचा किसान, मुंबईचा कामगार, पुण्याचा ग्राहक

### आबा करमरकर, कामशेत

तारीख २४–३–७९ ला आम्ही २२५ किलो वांगी काढून विक्रीसाठी पुण्याला मंडईत पाठविली. वांग्यांचे ढिगारे न विकताच पडलेले होते मंडईमध्ये. दलालाने आमच्या एकनाथला ते सर्व दाखविले. ' विक्री होणे कठीण आहे, तू थांब येथे. आपण दिवसभर विक्रीला गिऱ्हाईक मिळते का ते पाहू या. ' म्हणाला. भाव काय येतो हा प्रश्नच उरला नव्हता. वांगी विकली जातील किंवा नाही हा एकनाथसमोर प्रश्न निर्माण झाला होता. एकनाथ दिवसभर थांबला. एकही वांगे विकले गेले नाही. ' तू आता जा. मी उद्या पहातो, ' असे दलालाने एकनाथला सांगितले. दोन दिवसांनी काय झाले म्हणून पहायला एकनाथ गेला. वांगी तशीच होती. एकही वांगे विकले गेले नव्हते. उगीच संशय नको म्हणून दलालाने सांगितले की, ' हवे तर मी तुला वांगी वजन करून दाखवितो.' एक नवा पैसाही आम्हाला २२५ किलो वांग्यांचा मिळाला नाही. उलट कर्जहून बैलगाडीत वांगी कामशेतला आणली. रेल्वेने खर्च करून पुण्याला नेली. हमाली, वाहतूक, रेल्वेभाडे वगैरे खर्च धरून ता. २५–३ ला ४३·८० रु. आमच्या कीर्दीला ' वांगी विक्रीसाठी पुण्याला नेली ' म्हणून खर्ची पडलेले आहेत. आहे की नाही विश्वास बसू नये असा अनुभव ? चक्रावून टाकणारा ? गिऱ्हाइकाला रुपया सव्वारुपयापेक्षा कधीही कमी भावात वांगी मिळत नाहीत आणि उत्पादकाला केव्हा केव्हा वरीलप्रमाणे अनुभव येतो. अगदी नव्यानेच आलेला हा अनुभव म्हणून लिहिला; पण असे बरेच अनुभव वेगवेगळ्या भाज्यांचे बाबतीत, मी शेतकऱ्यांत फिरत असतो तेव्हा ऐकायला मिळत असतात. उत्पादन व विक्रीव्यवस्थेवर बराच प्रकाश ह्या अनुभवातून पडतो. वांगी-विक्रीच्या ह्या भानगडीत आम्ही कसे अडकलो ?

त्याचे असे झाले की, मावळ तालुक्यात भूमी विकास दलाचे काम आम्ही गेली दोन–अडीच वर्षे करीत आहोत. दलित, भूमिहीन, लहान शेतकरी, ह्यांचे जे असंख्य प्रश्न आहेत ते सोडविण्याचे कामी त्यांना मार्गदर्शन करीत असतो. त्यांचे प्रश्न, प्रश्नांचे स्वरूप, त्यांनीच विचार करून समजून घ्यावे, ते सोडविण्यासाठी उद्युक्त होऊन कृती करावी, अशी आमच्या कामाची दिशा असते. ह्याच कामाबरोबर एकूण समाजासमोरील समस्या, त्यांचे स्वरूप व त्या सोडविण्यासाठी लागणारे प्रयत्न, यांचे आकलन कार्यकर्त्यांना व्हावे म्हणून त्यांचे शिक्षण करण्याचाही आमचा प्रयत्न असतो. त्याच विभागातील सामान्य स्तरावरील कार्यकर्ते तयार होऊन हे कार्य करू लागले तर समाजपरिवर्तनाचे ते प्रभावी माध्यम बनू शकतील. ह्यासाठी शेती पिकांचे, उत्पादनाचे प्रयोग प्रत्यक्ष शिक्षणासाठी व शेतीच्या प्रश्नांची वस्तुनिष्ठ माहिती मिळावी म्हणून आम्ही करीत आहोत. त्याच प्रयोगातील कोबी, मिरची, टॉमेटो, कांदा, लसूण, ज्वारी, भात, गहू ह्या वेगवेगळ्या पिकांबरोबर वांगी-लागवड आम्ही केली आणि ह्या विक्रीच्या भानगडीत अडकून पडलो. इतर मालाच्या विक्रीची व्यवस्था काय

व कशी करावी या चिंतेत आम्ही आहोतच; परंतु वांगी दर ३–४ दिवसांनी काढावी लागतात जेव्हा वांगी काढतो तेव्हा ढीगच्या ढीग पडतात. कोवळी, तजेलदार, चमकणारी वांगी व त्यांची पडलेली रास पहाण्यात एक आगळाच आनंद असतो. त्यांचा टवटवीतपणा, चमदारपणा, रसीलेपणा, ताजेपणा काही क्षण तरी मन उत्तेजित करून जातो भाताच्या लोंब्यांनी लगडलेले शेत किंवा मोत्याच्या दाण्यांचे दर्शन घडविणारा ज्वारीच्या कणसांचा महासागर, खळ्यातील गव्हाची रास, रोज सकाळी निघणाऱ्या ताज्या काकड्यांचे ढिगारे वगैरे गोष्टी मला नेहमीच एक वेगळा आनंद देऊन जातात. मी तो आनंद मनमुराद लुटीत असतो. त्या आनंदात भोवतालची मंडळीही सहभागी होतात. वांगी काढली, हिरवीगार मिरची निघाली की आजुबाजूचे शेतकरी जमा होतात. ते शेतातील वैभव पाहून हरखून जातात. आपण पण पुढच्या वर्षी मिरची लावायची म्हणू लागतात, त्यांच्यात आपापसात चर्चा सुरू होते. ज्या वेळी मी लागवड केली तेव्हा हा कोण वेडा भलताच खर्च करून राहिला आहे, असे ही मंडळीच बोलत होती. प्रत्येक रोप दोन फूट अंतरावर यायला हवे, सऱ्यापाट काटकोनात हवेत, सुपर फॉस्फेट, शेणखत, सुफला खत प्रत्येक रोपाला मिळायला हवे. आडव्या–उभ्या दोऱ्या लावून ओळी समान्तर यायला हव्यात. दोन फुटांचे चौरस कोठूनही पाहिले तरी दिसायला हवेत. हा माझा सर्व त्या वेळचा आग्रह, नियोजन, कष्ट आणि मेहनत यांचा अर्थ न कळलेली मंडळी, मिरचीचे, कोबीचे, वांग्याचे ढिगारे पाहून त्या वेळच्या माझ्या वेडेपणाचा अर्थ लावू लागतात. मी ही संधी फुकट दवडीत नाही. त्यांच्याजवळ चर्चा सुरू करतो. शेतीचे एक शास्त्र आहे हे त्यांच्यापर्यंत पोहचवितो. त्यांनाही हे सर्व करता येण्यासारखे आहे, मात्र ठरवून वेळच्या वेळी कामे करावी लागतात, करायची असतात हे सुचवतो. आमचा संवाद सुरू होतो. उत्पादन, विक्री, दलाल, सरकार, गिऱ्हाईक याबद्दल बोलणे सुरू होते. परिवर्तनाच्या दिशेने, थोडेसेच का होईना; पण पाऊल पुढे पडते आहे, हा विचार वांगीविक्रीच्या डोकेदुखीचा थोडा तरी विसर पाडतो.

## नांगरधारी दुबळा आहे

वांगी–विक्रीचा संबंध लहान शेतकऱ्याशी जाऊन भिडतो. अलीकडे भारतीय राजकारणात सत्तेचे विकेंद्रीकरण, कारखानदारीचे विकेंद्रीकरण, मोठी शहरे व खेडी यांचे संबंध, गेल्या तीस वर्षांत पाच पंचवार्षिक योजनांचा लाभ फक्त बड्यांना झाला तो दुर्बल घटकांपर्यंत पोहलाच नाही, अशा स्वरूपाचे बरेच काही बोलले जात आहे. चौधरी चरणसिंग वित्तमंत्री झाले आणि त्यांनी नवे अंदाजपत्रक मांडले. खेड्यातील लहान शेतकऱ्यांच्या हिताचे अंदाजपत्रक आहे असा दावा चौधरी चरणसिंग करीत आहेत तर ते बड्या शेतकऱ्यांच्या हिताचे जपणूक करणारे आहेत असा विरोधक दावा मांडीत आहेत. चौधरी चरणसिंग वित्तमंत्री होण्यापूर्वी त्यांनी एक प्रचंड किसान मेळावा दिल्ली येथे भरविला आणि किसानांच्या मागण्या सादर केल्या. त्यात अन्नधान्याच्या किमती वाढवून मिळायला हव्यात अशी एक मागणी आहे. महाराष्ट्रात शेतकरी कामकरी पक्षही अन्नधान्याच्या किमती वाढवून मिळाव्या म्हणून अधूनमधून आंदोलनाच्या घोषणा करीत असतो. ग्रामीण विकासाचा अनुभव असलेले व त्याला अर्थशास्त्राच्या अभ्यासाची जोड देणारे आमचे मित्र डॉ. भगवान बापट यांनीही अधिक उत्पादन म्हणजे अधिक उत्पन्न नव्हे हे मत अलीकडेच मांडले आहे. 'इम्मिझरायझिंग ग्रोथ' असे ते त्या विकासाचे वर्णन करतात. डॉ. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली 'सांगली जिल्हा पीक कर्ज अभ्यास समिती'च्या अहवालाचा ते आधार दाखवतात. त्यातही शेतमालाचे भाव किफायतशीर नाहीत अशी तक्रार आहे आणि या पार्श्वभूमीवर 'माणूस'च्या संपादकांनी 'किसान-कामगार' विशेषांक काढण्याचे जाहीर करून चरणसिंगांचे बंड हे नांगरधारी किसानांचे, लहान-लहान घटकांचे बंड की श्रीमंत मालकांची, कुलकवर्गाची ही चढाई याचा शोध घेण्याचे जाहीर करून टाकले.

मला वाटते आता सध्या जे चालले आहे ते लहान लहान नांगरधारी किसानांचे बंड वगैरे काही नाही. हा लहान शेतकरी बंड करण्याइतपत संघटितच नाही आणि स्वतंत्रही नाही. मात्र बड्या शेतकऱ्यांची ही चढाई ठरण्याची शक्यताच अधिक आहे, असे वाटते. त्याचे कारण उघड आहे. अन्नधान्याच्या किंमती वाढल्या की; लहान शेतकऱ्यांचे फायद्यापेक्षा नुकसानच अधिक होणार आहे. कारण तो धान्यविक्रेता फारसा नसतोच. तो खरेदीदारच असतो. त्याच्या लहान तुकड्यात उत्पन्न होणारे अन्नधान्य त्याला खायला वर्षभर पुरतच नाही. चार-सहा महिने जेमतेम जातात आणि उरलेल्या महिन्यांकरिता त्याला ते विकतच घ्यावे लागते. अन्नधान्याच्या किंमती वाढविल्या की, लहान शेतकऱ्याला त्याचा फारसा फायदा नाही, उलट नुकसानच आहे. कारण त्याच्या खर्चापैकी ७०% खर्च हा अन्नधान्यावरचा असतो. धान्य तयार झाल्याबरोबर गरजेच्या वस्तू खरेदी करण्याकरिता धान्य विकावे लागते तेव्हा कमी किंमतीमुळे त्याचा तोटा होतो; पण विक्रीच्या मानाने त्याची खरेदीच जास्त असते.

याचा अर्थ अन्नधान्याच्या किंमती नक्की करूच नयेत किंवा आज ज्या पद्धतीने करतात त्याबरोबर आहेत असे नव्हे. उत्पादनाचा खर्च विचारात घेऊन किमान बाजारभाव ठरवून त्याची हमी शासनाने देणे जरुरीचे आहे; पण त्याचे कारण वेगळे आहे. व्यावसायिक व्यवहाराला अर्थशास्त्रीय अधिष्ठान हवे म्हणून. लहान शेतकऱ्यांचे हितसंबंधांची जपणूक करायची ह्या बहाण्यासाठी नव्हे. लहान शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याचे मार्ग वेगळे आहेत आणि ते मार्ग खरे म्हणजे लहान शेतकरी, शेतमजूर यांनीच समजून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न करायचा आहे. अन्यथा तो शेतीवरून हुसकला तरी जाईल किंवा आज जसे कर्जबाजारी, उपाशीपोटी भकास, भविष्यकाळ हरवलेले जीवन तो जगतो आहे तसेच दिवस कंठावे लागतील.

## मावळातला नांगरधारी

मावळमधील लहान शेतकरी व शेतमजूर यांचा विचार जेव्हा आम्ही करतो तेव्हा तीन विभाग नजरेसमोर येतात. नाणे मावळ, आंदर मावळ व पवन मावळ. येथील बहुसंख्य शेतकरी लहान लहान आहेत. पावसाळी भाताचे एक पीक हेच प्रमुख उत्पन्न. ह्या तीनही

विभागांची वेगवेगळी वैशिष्टये आहेत. सध्या आम्ही पवन मावळात काम करीत आहोत. तेथे पवना धरणाचे बारमाही पाणी उपलब्ध आहे; पण पाण्याचा फारसा उपयोग करण्याच्या अवस्थेत तेथील शेतकरी नाही. तो स्थितिप्रिय तर आहेच; पण रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांनी जखडलेला आहे. ढोल व लेझीम, उरूस आणि हगामे ही येथील करमणुकीची प्रमुख साधने आहेत. परंपरागत शेती करून येईल ते उत्पन्न लग्नाकरिता, कर्ज काढून खर्च, पीक कर्ज काढून येणारे उत्पन्न घर बांधायला किंवा बैलजोडी घ्यायला वापरून सोसायटीचा थकबाकीदार होणे ही अगदी अंगवळणी पडलेली बाब आहे. त्यामुळे येथील बहुतेक सर्व वित्तपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था डबघाईला आलेल्या असून त्यांचा वित्तपुरवठा बंद झालेला आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक अभिसरण बंद झालेले आहे. एक प्रकारे कोंडी झालेली आहे आणि ही फोडायची तर नुसता आर्थिक विकासाचा विचार करून भागत नाही, तर त्याचबरोबर सामाजिक विचाराची गरज आहे आणि त्यापेक्षाही जास्त गरज राजकीय जागृतीची आहे. येथे राजकीय जागृती म्हणजे पक्षामार्फत निवडणुकांचे किंवा वेगवेगळया समित्यांवर जाण्याचे जे राजकारण चालते ते अभिप्रेत नाही, तर जनशक्ती हे राजकीय सत्तेला वठणीवर आणण्याचे व ठेवण्याचे प्रभावी साधन आहे या अर्थाने राजकीय जागृती अभिप्रेत आहे. हे सर्व करायचे कसे ? त्यातच जातीप्रथेचा प्रचंड पगडा आहे. कुटुंबसंस्था प्रबळ आहे. कुटुंबातील ७० वर्षांचा जख्खड म्हातारा त्याच्या ५० वर्षांच्या मोठ्या मुलाला कोणतेच स्वातंत्र्य द्यायला तयार नाही आणि तोही स्वातंत्र्य मागत नाही. स्त्रियांची अवस्था तर निर्जीव वस्तूपेक्षाही कमी किंमतीची आहे आणि आहे ही अवस्था टिकवून धरण्यात ती स्त्रीच हातभार लावीत असते. 'दे दान सुटे गिराण' जोरात आहे. कोणताही शास्त्रीय विचार तर करायचाच नसतो. उलट त्याला कळत-नकळत प्रतिरोधच आहे. रोगराई भयंकर आहे; पण प्राथमिक आरोग्य असंख्य योजने दूर आहे. पिण्याचे पाणी, संडासाची सोय ह्या गोष्टी अनावश्यक वाटतात. जादूटोणा, मूठ मारणे, करणी करणे, भगत, अंगारे-धुपारे यांची चलती आहे. कॉलऱ्याने एखादा तरणा-ताठा पोरगा मेला तर मरीआईची अवकृपा झाली असा निर्णय होतो आणि ती उन्हात असते तिला सावलीत आणण्याच्या खटाटोपात सारा गाव मग्न होऊ शकतो. हे सर्व बदलायचे कसे ?


## आपणास ठाऊक असेलच

**महावित्त उद्योजकांना अनेकविध योजनाद्वारे मदत करू शकते.**

**या पाहा काही आकर्षक योजना :**

१) **सुशिक्षित बेकारांसाठी योजना :**
या योजनेन्वये किमान मॅट्रिक् असणाऱ्या सुशिक्षित बेकारास रु. ५०,००० पर्यंत कर्ज मिळू शकते. ऑटोरिक्षासाठी मॅट्रिकचीही अट नाही.

२) **तंत्रज्ञ सहाय्य योजना :**
पदवी किंवा पदविकाधारक तंत्रज्ञांना केवळ १५ टक्के निजधनावर ५ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य मिळते. तीन वर्षांचा कार्यानुभव आवश्यक असतो. पदवी किंवा पदवीधर नसल्यास ५ वर्षांचा कार्यानुभव असावा लागतो.

३) **तरुण तंत्रज्ञांना अर्थसहाय्य :**
पदवी किंवा पदवीधारक तंत्रज्ञांना किंवा आय. टी. आय. प्रशिक्षित तीन वर्षांचा कार्यानुभव असलेल्या तंत्रज्ञांना २ लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते.

४) **अत्यल्प कर्ज (मिनी लोन्स) :**
या योजनेनुसार छोटी म्हणजे ५ ते १० हजार रुपयांपर्यंतची कर्जे ५ ते १० टक्के निजधनावर बलुतेदार, कारागीर इत्यादींना मिळू शकतात.

**—० इतरही अनेक आकर्षक योजना ०—**

अधिक माहितीसाठी नजीकच्या विभागीय कार्यालयात चौकशी करा.

# महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

मुख्य कार्यालय : **न्यू एक्सेलसिअर बिल्डिंग, अमृत केशव नायक मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.**

विभागीय कार्यालये : १. मुंबई, २. नाशिक, ३. पुणे, ४. कोल्हापूर, ५. औरंगाबाद, ६. नागपूर, ७. पणजी (गोवा).

व्हीजीटी/१७/

पवन मावळात पवना धरण आहे. ह्या धरणाखाली १७ गावे बुडाली आहेत. क्षेत्र ५९२० एकर आहे. खर्च ६,३१,०००,०० रुपये झालेला आहे. ४४२२० घनफूट पाणी दर सेकंदाला सोडण्याची क्षमता आहे. ह्या धरणाखाली १९ उपसा जलसिंचन योजना आहेत आणि १०,००० एकरांना पाणीपुरवठा करता येईल एवढी जमीन व पाणी उपलब्ध आहे; पण यांपैकी यंदाच्या वर्षी जेमतेम ५०० ते ६०० एकरांना शेतकऱ्यांनी पाणी घेतले आहे. पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था कमांड एरिआ डेव्हलपमेंट ॲथॉरिटीकडे सोपवलेली आहे. त्याकरिता पुरेसा नोकरवर्ग सरकारने ठेवलेला आहे.

पाण्याचा वापर करून कोणती पिके घ्यावी, कशी घ्यावी ह्याबद्दल शेतकऱ्यांना पुरेशी माहिती नाही. त्याकरिता लागणारे शास्त्रीय ज्ञान मिळण्याची सोय नाही आणि शेतकऱ्याला अजून तरी त्याची गरज वाटत नाही. पिकवलेल्या मालाला पुरेसा दाम मिळत नाही आणि पुणे, मुंबई ह्या मंडईमध्ये माल पोहोचविण्याची काहीच व्यवस्था नाही. शिवाय आर्थिक अभिसरण नाही म्हणून शेताच्या बांधाशी आलेले बारमहा पाणी पवनानदीतून वाहून जाते आणि पवनेच्या काठावर असलेल्या असंख्य शेतकऱ्यांच्या घरात अमाप दारिद्र्याचा महापूर आलेला असतो. हे सर्व चित्र बदलायचे कसे ?

आमचा प्रयत्न चालू आहे. शेतकऱ्याला पाणी वापरायला उद्युक्त करून किंवा शेतमजुराला रोजगार हमी योजनेवर काम उपलब्ध करून देऊन, त्याला चार पैसे मिळवून देऊन हा प्रश्न सुटू शकत नाही, तर त्याच्या एकूण विकासाचा विचार करणे जरुरीचे आहे. पवन मावळचा विकास म्हणजे तेथील माणसाचा विकास. ' माणूस ' हा आम्ही विकासाचा केंद्रबिंदू मानतो. त्याच्या प्राथमिक गरजा तर पूर्ण व्हायला हव्यातच; पण त्याचबरोबर असा माणूस समाजाचा आणि समाजव्यवस्थेचा विचार कसा करतो ह्यालाही महत्त्व आहे. आजची व्यवस्था ही शोषणावर आधारलेली, विषमता पोसणारी आणि शास्त्रीय विचाराला प्रतिरोध करून ' जैसे थे ' स्थिती चिरंतन करणारी आहे. ह्या व्यवस्थेचे भान, विकास होणाऱ्या व्यक्तीला मिळणे आवश्यक आहे. तेव्हाच त्याला ती बदलण्यासाठी कृती करण्याची प्रेरणा मिळू शकेल. मानव केंद्रबिंदू असलेल्या विकासाचा सर्व खटाटोप मानवी जीवन जगण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यासाठी आहे आणि मानवी जीवन जगणे म्हणजे मानवी मूल्ये जगणे. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, श्रम, न्याय ही मूल्ये जगता येतात, त्यांची जीवनात क्षणी प्रतिक्षणी अनुभूती मिळते ही प्रचिती आणून देणे आहे. न्यायाची प्रस्थापना आणि अन्यायाचा प्रतिकार करायला तयार होणे ही आम्ही विकासाची कसोटी मानतो.

हे सर्व तत्त्वज्ञान लहान शेतकऱ्याला अगदी समजले आणि त्याच्या जाणिवा वाढल्या असे अगदी गृहीत धरले तरी एक-दोन एकर जमीन असलेला शेतकरी कसा तग धरू शकेल असा आक्षेप घेतला जाईल; पण काले गावात दोन एकरवाला शेतकरी त्याच्या त्या दोन एकरांत वर्षभर मेहनत करून तीन पिके घेतो. पवनेच्या पाण्याचा वापर करतो पवना कृषकसेवा सहकारी संस्थेचे कर्ज घेतो आणि ते वेळच्या वेळी फेडतो आणि वर्षाकाठी तीन पिकांतून दोन हजार रु नफा मिळवतो असा पवना कृषकाचा अनुभव आमचे मित्र श्री दिलीप जोशी सांगत होते. पहिले पीक भाताचे. त्यात एकरी ४०० रु. खर्च व ८०० रु. उत्पन्न म्हणजे एकरी ४०० रु. नफा. दुसरे पीक गव्हाचे. त्यात एकरी ४०० रु. नफा आणि तिसरे वैशाखी मुगाचे उत्पन्न. त्यात एकरी २०० रु. नफा. मिळून एकरी १०००/– रु. नफा मिळतो. हा सर्व नफा आजचे जे धान्याचे भाव आहेत तेच धरून आहे. आहे ह्याच व्यवस्थेत लहान शेतकरी जर ह्या शेतकऱ्याचे अनुकरण करील तर साधारणतः तग धरता येईल असा अनुभव आहे. आमचाही अनुभव दोन-तीन एकर शेती असलेला शेतकरी एकरी हजार रुपये मिळवू शकतो असा आहे.

## विक्रीयंत्रणा

तर मग आम्ही ज्या वांगी विक्रीच्या डोकेदुखीने सुरुवात केली त्याचे काय ? तो एक आलेला अनुभव आहे आणि अशा परिस्थितीला तोंड देत शेतकऱ्याला झगडले पाहिजे हे तो अनुभव शिकवितो. नेहमीच काही आमची वांगी अशी फुकट जात नाहीत. बाबा आढावांची हमालपंचायत, त्यांचे उपाध्यक्ष श्री. मानकर व व्यवस्थापक श्री. सुरेश खाडे यांनी आम्हाला प्रोत्साहन मिळावे इतके सहकार्य दिले. ' कष्टाची भाकर ' म्हणून त्यांचा एक उपक्रम हमालपंचायत चालविते. रोज तीन-साडेतीन हजारांना १ रुपयात भाकर, भाजी किंवा पोळी हमालपंचायत देते. त्यांना भाज्या व बरेच पदार्थ लागतात. बाजारभावाने आम्हाला ते वांग्याचे, कोबीचे पैसे देतात. आमची काही डोकेदुखी वाचते.


# कृष्णा सहकारी बँक लिमिटेड

रेठरे बुद्रुक (जीवनगर) ता. कराड, जि. सातारा

कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील शेतकऱ्यांचे आशास्थान व मानबिंदू असलेली शेतकऱ्यांच्या विकासासाठी आर्थिक गरजा पुरवून त्यांची आर्थिक स्थिती उंचावणारी शेतकऱ्यांची आदर्श बँक

**प्रगतिपथावरील सातव्या वर्षातील वाटचाल**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) शेअर भांडवल | रुपये | ३,३७,८०० | (४) दिलेली कर्जे | रुपये | १,२०,७९,८६८ |
| (२) रिझर्व व इतर फंडस् | ,, | २८,६३,३७४ | (५) खेळते भांडवल | ,, | २,८८,४८,०३६ |
| (३) ठेवी | ,, | २,३२,२९,७०८ | (६) १९७७–७८ निव्वळ नफा | ,, | ११,१९,६०१ |

**सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार : कराड व इस्लामपूर शाखांतून सेवेची संधी : ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर**

मा. श्री. पी. आर. महाजन — मॅनेजर
मा. श्री. लक्ष्मणराव नारायणराव कुलकर्णी — व्हा. चेअरमन
मा. श्री. संपतराव बहिरू मोरे — चेअरमन

आमचे कार्यकर्ते विक्रीच्या शोधात कामशेत, कान्हे, लोणावळा, तळेगाव, घोरवाडी, चिंचवड, पिंपरी येथे फिरू लागले. काले कॉलनीतील बँकमॅनेजरची पत्नी मेधा जोशी, आमची कार्यकर्ती चक्क तराजू–वजने घेऊन वांगीविक्रीसाठी कॉलनीत हिंडत होती. ताजी वांगी आहेत, भरीत कसे छान होते, काप करून पहा, फार चविष्ट, कोरड्यास लई नामी असा प्रचार करीत विक्री करायला फिरत होती. तेथे बरेच सुखवस्तु सरकारी अधिकारी आहेत. ते अवाक् होऊन या इन्व्हॉलमेंटकडे पहात होते. मेधाला नवनवे अनुभव मिळत होते, तर आमची एक कार्यकर्ती नयना कुलकर्णी व कार्यकर्ता गौतम कामशेत–रस्त्यावर लॉरी अडवून त्यात वांग्यांच्या गोणी टाकून लोणावळचाला कोणाच्या तरी हॉटेलच्या कट्टयावर वांग्याच्या गोणी उतरवून घेऊन तेथल्या तेथेच कोणी हॉटेलवाले, कोणी एस्. टी. डेपोवाले, कोणी खाणावळवाले वगैरेंच्या ऑर्डरी मिळवून वजन करून देऊन मालविक्री करून येत होते.

ह्या निमित्ताने आमच्या कार्यकर्त्यांना विक्रीव्यवस्था कशी आहे, त्यात कसे शोषण सुरू असते हे अनुभव येऊ लागले. ह्या व्यवस्थेतच शोषण कोणती भूमिका बजावते हे हळूहळू ध्यानात येऊ लागले उत्पादक व गिऱ्हाईक यांचे हितसंबंध खरोखरच विरोधी आहेत काय, जोवर आजची ही समाजव्यवस्था, शासनव्यवस्था आहे तोवर मधल्या दलालाची शोषणशक्ती समजून घेऊन त्यांनीच दोघांनी एकत्र येणे कसे जरुरीचे आहे हे आमच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात येऊ लागले. ठिकठिकाणी आमच्या कामाबद्दल आस्था बाळगणारी असंख्य माणसे विखुरलेली आहेत. त्यांना ह्या विषयावर एकत्रित करून आमची भाजीविक्री, धान्यविक्री किंवा लहान शेतकऱ्यांचे उत्पादन खरेदी करण्याची काही नवी व्यवस्था ह्या जामच्या कामाशी जोडता येते का हा विचार आमचे कार्यकर्ते करू लागले आहेत. आज आमचे वांगी–उत्पादन तोटयात नाही. उद्या पवन मावळातील सर्व वांगी, सर्व भाजीपाला, दूध–दुभते, तांदूळ, गहू, ज्वारी हे अशा नव्या व्यवस्थेत गुंफून आजच्या बाजारव्यवस्थेला शह देता येईल हे स्वप्न आम्ही पहात आहोत.

मुंबईची बेस्ट वर्कर्स युनियन आमच्या कामात खूप रस घेत असते. त्या युनियनचे सेक्रेटरी श्री. नारायण फेणाणी हे बेस्ट युनियन चालवीत असताना शहरी कामगार आणि ग्रामीण पददलित यांचे नाते जोडता येईल काय ह्याचा शोध घेत असतात. त्यांचे तीस–चाळीस कार्यकर्ते काही दिवसांपूर्वी कान्हे येथे त्यांच्या विश्रामधामात आले असताना 'आमची भाजी विकत घ्या' आणि हे नाते जोडा असे मी विनोदाने त्या कार्यकर्त्यांना सांगितले.

आदिवासी विभागात काम करीत होतो तेव्हा तांदूळविक्रीचा असाच प्रश्न होता. पुण्यातील बिंदुमाधव जोशी यांच्या ग्राहक पंचायतीने आमचा तांदूळ खरेदी करून सहकार्य दिले; परंतु आज तरी आमचे ह्या 'बाजार व विक्री' बद्दल चाचपडणे, काही हाताला लागते काय, तात्कालिक निर्माण होणारे प्रश्न सुटू शकतात काय हे पहाणे सुरू आहे आणि ह्यातूनच लहान शेतकऱ्यांची उत्पादनव्यवस्था व लहान शेतकरी, शेतमजूर, दलित ह्यांना जीवनमूल्ये जगण्याची


## घरासाठी चांगला विकसित प्लॉट हवाय ?

## नव्या मुंबईतील नवीन पनवेल

या संकल्पित सुनियोजित टाऊनशिपमधे घरांसाठी प्लॉट्स उपलब्ध आहेत.

८०० ग्राहकांनी या पूर्वीच प्लॉट्स घेतलेत.


सेक्टर १, ११, १२, १९ मधील प्लॉट्सची वैशिष्ट्ये

- मुंबई-पुणे रस्त्यावर, पनवेल रेल्वे स्टेशन आणि पनवेल एस्. टी. स्टँड पासून अगदी नजीक
- रु. ६० चौ. मी. हा ग्राहकांना परवडेल असा भाव
- १०० चौ.मी. ते ६०० चौ.मी. पर्यंतच्या विविध आकारांचे प्लॉट्स उपलब्ध— निवडीला भरपूर वाव
- गरजूंना २०% किंमत अर्जाबरोबर व ८०% किंमत १२ मासिक हप्त्यांत भरण्याची सोय
- रस्ते, पाणीपुरवठा, वीज या बांधकामास आवश्यक सोयी उपलब्ध.
- सर्व किंमत भरतांच त्वरित ताबा...ताबा घेतल्या पासून तीन वर्षात बांधकाम करण्याची मुभा
- प्लॉट्स बँकेकडे तारण म्हणून ठेवण्यास परवानगी.

संपर्क साधा●

जनसंपर्क अधिकारी
'सिडको'
निर्मल, २रा मजला
नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१
दूरध्वनी/२३ २४ २०

मार्केटिंग मॅनेजर
'सिडको' कार्यालय, वाशी
नवी मुंबई
दूरध्वनी/
STD ९२२-२४१



परिस्थिती निर्माण करण्यासाठी, ह्या मूल्यांबद्दल कदर असणारे शहरातील गिऱ्हाईक, यांची शेती–मालाची गरज पूर्ण करणारी व्यवस्था, यांचा संवादी सांधा जोडता येतो किंवा काय हे आम्ही तपासून पहात आहोत.

गिऱ्हाइकाची उत्पादकाचा माल खरेदी करण्यात, आपण काही त्याग करीत आहोत, त्या लहान शेतकऱ्यावर उपकार करीत आहोत अशी भावना असता नये. तसेच आपल्याला आता गिऱ्हाईक मिळाले आहे, उत्पादनाची किंमत शक्य तेवढी कमी करण्याची 'मला काय गरज आहे' असेही समजून चालणार नाही. दोघांच्या हितसंबंधांना एकामेकांनी जपायची गरज आहे. त्यात एक प्रकारची मानवी मूल्ये जगणारा समाज निर्माण करण्याची बांधिलकी निर्माण होण्याची गरज आहे. आजची समाजव्यवस्था तोडण्याची शक्ती ह्या एकत्र येण्यात आहे. अशा वैचारिक पातळीवर बांधिलकी निर्माण होण्याची गरज आहे. ह्या बांधिलकीचा दृश्य आविष्कार ह्या खरेदी–विक्री-व्यवस्थेत होणार आहे.

## आमनेसामने समाज

ही नवी मार्केटिंगची व्यवस्था आज असलेल्या व्यवस्थेच्या पोटात राहूनच करायची आहे. ही नवी व्यवस्था तिला लागणारी शक्ती आजच्या समाजव्यवस्थेतूनच घेणार आहे. जीवनमूल्ये जगण्याचा आग्रह धरणारी मंडळी आजच्या समाजव्यवस्थेतच जगत असतात. ह्या व्यवस्थेपासून कुठे तरी सुरक्षित जागी राहून नवी व्यवस्था निर्माण होणार नाही. करायची नाहीये, हे लक्षात घ्यायला हवे. ही वास्तविकता लक्षात घेऊन आहे त्या व्यवस्थेच्या विरोधात उभे रहायचे आहे. कॅन्सरच्या पेशी मानवी शरीरात त्या शरीराच्याच रक्तमांसावर पोसल्या जातात. शेवटी सर्व शरीरव्यवस्था कोलमडवून टाकतात. त्याचप्रमाणे नव्या व्यवस्थेने, जुन्या व्यवस्थेच्या शरीरातून तिच्या वाढीकरिता जरूर लागणारी शक्ती घ्यायला हवी असे मला वाटते. ही शक्ती भौतिक स्वरूपाची असेल आणि त्यामागचा जीवन-मूल्ये जगण्याचा आग्रह ही तात्त्विक भूमिका बांधिलकी निर्माण करणारी, कृतीला मोटिव्हेट करणारी असेल.

शहरे आणि खेडी यांचा संबंध प्रस्थापित करण्याचा असा मार्ग मला दिसतो. ग्राहक हा राजा नाही आणि उत्पादक हा रंकही नाही. दोघेही आपापल्या जागेवर जीवनमूल्ये जगण्यासाठी धडपडणारे, नवी व्यवस्था निर्माण करण्यासाठी बद्धपरिकर असे ज्याचे त्याचे जे महत्त्व आहे ते सांभाळणारे असले पाहिजेत. आज तरी हा लहान उत्पादक आजच्या समाजव्यवस्थेचा प्रमुख शिकार बनलेला आहे. त्याला गावच्या किंवा तालुक्याच्या राजकीय पुढाऱ्यांवर विसंबून रहावे लागते. हा राजकीय पुढारी प्रचलित भ्रष्ट समाजव्यवस्थेचा प्रतिनिधी आहे. ह्या अशा लहान मंडळींना कुबड्या देऊन जीवन जगवण्यात ह्या पुढाऱ्यांचे हितसंबंध आहेत. परिणामतः कणा नसलेला उत्पादक ग्रामीण भागात वावरत असतो आणि आपल्या अर्थव्यवस्थेत ४७–४८ टक्के राष्ट्रीय उत्पन्नाचा भार आधीच खचलेल्या खांद्यावर पडत असतो.

'संपूर्ण क्रांती' ह्या पुस्तकात दादा धर्माधिकारी ह्यांनी 'आमने सामने समाज' ह्या शीर्षकाखाली जे विवेचन केले आहे त्यात 'आपण किंमतीकडून मूल्याकडे गेले पाहिजे. नव्या समाजात सर्वांचा परस्परांशी नातेसंबंध असावा. सदस्यत्व नसावे. कारण सदस्यत्व बदलता येते, नातेसंबंध बदलता येत नाहीत.' हे जे मांडले आहे ते आमच्या वरील विचारांच्या संदर्भात खूप अर्थपूर्ण ठरते.

स्वातंत्र्य ह्या मूल्याची कदर असणाऱ्या व बाळगणाऱ्या बऱ्याच मंडळींना आणीबाणीने खूपसे हादरे दिले. ती मंडळी वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली आहेत. पाल्या-पाचोळ्यासारखे आपण ह्या आणीबाणीच्या वावटळीत कसे चक्रावून भरकटत गेलो, पायाखालची जमीनच मुळी कशी नाहीशी झाली, ह्या विचाराने विषण्ण झालेली मंडळी आणीबाणीचा पहिला जोश ओसरल्यावर पुनः ठिकाणावर येण्याच्या प्रयत्नात आहेत. काही तरी वेगळे विचारमंथन करायला हवे आहे, वेगळी कृती करायला हवी आहे असे बऱ्याच जणांना जाणवू लागले आहे. त्या मंडळींना आम्ही अशा नव्या संबंधाचे काही संघटन करता येण्यासारखे आहे काय, काही निश्चित अशी योजना तयार करता येईल काय ह्याचा विचार करावा असे खास आवाहन करीत आहोत.

ह्या सर्व व्यवहारात शासनाची भूमिका नजरेआड करून चालणार नाही. जनता पक्ष अधिकारावर आला तेव्हा नवे स्वातंत्र्य मिळाले आहे. ही घोषणा नवी व्यवस्था निर्माण करण्याचा आधार म्हणून समजायला हरकत नाही. मोरारजी देसाई ज्या दिवशी पंतप्रधान झाले त्या पहिल्या सभेत लोकनायक जयप्रकाशांनी सांगितले, 'राज-सत्ता आणि लोकसत्ता परस्पर सहकार्याने कार्य करतील याची जनता पक्ष सरकारने हमी द्यावी.'

नेतेपदी निवड झालेले श्री. मोरारजी देसाई बाजूलाच बसले होते. त्यांनी लगेच राज्यसत्ता आणि लोकसत्ता निकट सहकार्याने कार्य करतील असे आश्वासन दिले.

राज्यसत्ता आज तयार आहे. लोकसत्ता निर्माण करायची आहे आणि ही सर्व जीवनमूल्ये जगता येणारी व्यवस्था निर्माण करणारांची जबाबदारी आहे आणि त्याचबरोबर जनता सरकार अधिकारावर आल्यानंतर पाच-सहा महिन्यांच्या अनुभवानंतर जो इषारा जय-प्रकाशांनी दिला तोही लक्षात ठेवायला हवा.

'लोकशाहीत शासनाला जनतेच्या इच्छेपुढे मान तुकवावी लागते यावर आपण खूपच विश्वास ठेवला. हा आपला खुळचटपणा होता, भ्रम होता. लोकशाही शासनाविषयी आमची ही धारणा चुकीची होती. कारण शासनावर परस्परविरोधी संबंधियांच्या सामाजिक व आर्थिक शक्ती आरूढ झालेल्या असतात आणि ह्या शक्ती मूलगामी परिवर्तनाच्या आड येतात हे आम्ही लक्षात घेतले पाहिजे.'

हा इषारा जरी पूर्वीच्या कांग्रेस शासनाला लागू होता, तसाच तो जनता शासनालाही लागू पडणारा आहे हेही लक्षात ठेवायला हवे.

□

GRAM : NATLEATHER TELEX : NLCY 011 - 5025

PHONES : 695236 (3 LINES)

# National Leathercloth Mfg. Co.

Akurli Road, Kandivli (East)
Bombay - 400 067

*Manufacturers of :*

**PVC Leathercloth**

**H. L. AHOOJA**
Administrative Manager

*With best complements from :*

# M/s. Fuel Instruments & Engineers Pvt. Ltd.,

**Ichalkaranji, (Maharashtra) India**

*Manufacturers of :*

Hardness Testing Machines, Dynamic Balancing Machine, Universal Testing Machine, Impact Testing Machines, Erichsen Testing Machines, Special Purpose Machines, and Diamond Tools.

मुंबईतील कामगार, मावळातील किसान, पुण्यातील ग्राहक यांचे 'आमने-सामने' संबंध जुळवून लहान शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवता येईल असे आबा करमरकर म्हणतात; पण हा प्रश्न शेतीव्यवस्थेच्या संपूर्ण पुनर्रचनेशिवाय सुटणे अशक्य आहे असे या लेखाचे प्रतिपादन आहे. यासाठी लेखकाने रशियन अनुभवाची सविस्तर चिकित्सा येथे केली आहे.

# पुनर्रचना : एका साम्यवादी देशाचा अनुभव

**प्रा. भगवान बापट**

१९१७ सालच्या ऑक्टोबरमध्ये रशियामध्ये साम्यवाद्यांच्या हातात सत्ता आली. देशाच्या आर्थिक विकासाच्या कामाला, औद्योगीकरणाच्या कामाला लागलीच हात घालण्याइतकी उसंत नव्या सरकाराला मिळू शकली नाही. अगोदरच पहिल्या महायुद्धात देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली होती. त्यातच आता क्रांतीनंतर थोड्याच अवधीत यादवीयुद्ध सुरू झाले, परकीय सत्ता ही हस्तक्षेप करणार की काय असा संशय बळावत चालला. देशातील उत्पादनव्यवस्था कमकुवत झाली होती. शहरातील नोकर, कामगार, सैनिक यांना नियमितपणे धान्यपुरवठा करणे अवघड झाले होते. क्रांतीनंतर सरकारने बऱ्याच मोठ्या खाजगी कारखान्यांचे राष्ट्रीयीकरण केले होते. कामगारांना व्यवस्थापनाचा अनुभव नसल्याने कारखाने राष्ट्राच्या मालकीचे झाल्यावर उत्पादनवाढीऐवजी उत्पादनात घट होऊ लागली. कारखान्यांत बेशिस्तीचे वातावरण फैलावू लागले.

क्रांतीपूर्वी सुरू झालेली जमीनवाटपाची प्रक्रिया क्रांतीनंतर जोरात पुढे नेली गेली. मोठ्या शेतकऱ्यांची जमीन काढून घेऊन ती लहान शेतकऱ्यांना, भूमिहीनांना वाटून देण्यात आली. अगोदरच लहान शेतकऱ्यांचे रशियात प्रमाण मोठे होते ते या विभाजनाच्या प्रक्रियेत अधिकच वाढले. खालील आकडेवारीवरून हे दिसून येईल.

शेतजमिनीची विभागणी (टक्केवारी)

| | १९१७ | १९१९ | १९२० |
|---|---|---|---|
| ● जमीन नसलेले | ११·३ | ६·६ | ५·८ |
| ● ४ हेक्टरपर्यंत जमीन असलेले | ५८·० | ७२·१ | ८६·० |
| ● ४ ते ८ हेक्टरपर्यंत " " | २१·७ | १७·५ | ६·५ |
| ● ८ हेक्टरचेवर " " | ९·० | ३·८ | १·७ |

शेतीव्यवसायात लहान शेतकऱ्यांचे, छोट्या जमीनधारकांचे प्रमाण वाढले की अनेक समस्या निर्माण होतात.

एक म्हणजे लहान शेतकऱ्याचे उत्पादन हे मुख्यत: त्याच्या पोटापुरतेच असते. त्याचे सारे श्रम पोटापुरते पिकवण्यातच खर्च होतात. याचा परिणाम म्हणून बाजारात विक्रीसाठी नेण्यास त्याचेजवळ अतिरिक्त धान्य असत नाही. म्हणजेच अल्प भूधारकांची संख्या वाढली की बाजारात येणारा धान्यपुरवठा कमी होतो. धारणक्षेत्र आणि बाजारात विक्रीसाठी येणारा धान्यपुरवठा यांचा असा सरळ संबंध असतो. हा अनुभव सर्वच ठिकाणी आहे. भारतात देखील बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या पुरवठ्यावरून हेच दिसून येते की, एकूण पुरवठ्यापैकी मोठ्या शेतकऱ्यांकडून येणाऱ्या पुरवठ्याचे प्रमाण मोठे असते.

दुसरी गोष्ट अशी दिसून येते की, अल्पभूधारक हा सर्वसाधारणपणे विशेष महत्त्वाची पिके न घेता केवळ कुटुंबाच्या जीवनोपयोगी पिके काढण्यास प्राधान्य देतो. याचाच अर्थ असा की, जमीन-वाटपातून ज्या वेळी अल्पभूधारकांची संख्या वाढते त्या वेळी विशेष पिकांचे उत्पादन कमी होते. पशुपैदास करणारा व्यवसायही संकोच पावतो. रशियामध्ये हा अनुभव प्रकर्षाने आला. गळिताची धान्ये, कपास वगैरेचे उत्पादन कमी झाले.

अल्पभूधारकांच्या संख्येतील वाढीमुळे अतिरिक्त धान्य गोळा करणेही जिकिरीचे होते. अगोदर लहान शेतकऱ्याकडे वाढावा पुरेसा नसतो व जो असतो तो असंख्य कुटुंबांकडे विखुरलेला असल्याने तो जमा करण्याचे काम अवघड होते.

वरीलसारख्या अडचणींची कल्पना रशियातील नव्या राज्यकर्त्यांना पदोपदी येत होती असंख्य अल्पधारकांकडून धान्य वसूल करून शहरी भागाला पुरवणे कठीण होत आहे, कामगारक्रांती यशस्वी होण्यात हा फार मोठा अडसर उभा आहे याचा प्रत्यय त्यांना येत होता. मूलतः हा प्रश्न लहान शेतकऱ्यांचे प्राधान्य असलेल्या मागास अर्थव्यवस्थेच्या विकासाचा होता. समाजवादी अर्थव्यवस्था उभी करण्यात लहान लहान शेतकऱ्यांच्या संख्याबाहुल्यामुळे मोठी अडचण येत होती.

## शेतकरी दुखावला गेला

क्रांतीनंतरच्या राजकीय, आर्थिक अनागोंदीच्या काळात राज्यकर्त्यांना शांतपणे विचार करण्यास सवड मिळाली नाही. परिस्थितीचा रेटा आणि काही प्रमाणात सैद्धांतिक दुराग्रहामुळे शेतकऱ्यांकडून ठराविक दराने सक्तीने धान्य वसूल करून शहरातील कामगारांना पुरवण्याचा सरकारने निर्णय घेतला. ग्रामीण भागातून धान्यवसुली करण्यासाठी वसुली-पथके निर्माण केली गेली. वसुलीच्या प्रक्रियेत येणारे अडथळे, होणारा विरोध कडवेपणाने मोडून काढण्यासाठी सर्व शक्ती वापरली गेली. धान्यपुरवठ्याचा प्रश्न म्हणजे धान्य-उत्पादन वाढवण्याचा प्रश्न न मानता तो धान्यवसुलीचा प्रश्न आहे असा गैरसमज करून घेतल्याने सरकारची पावले अपरिहार्यपणे अशी पडत गेली की, त्यातून शेतकरीवर्ग दुखावला गेला, त्याचा विरोध वाढत गेला. वाढत्या वसुलीच्या सक्तीला तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांनी धान्यसाठे लपवून ठेवण्यास सुरुवात केली. एवढ्यानेही भागेना तेव्हा शेतकऱ्यांनी पिकाखालील जमिनीचे क्षेत्र कमी करून उत्पादनच कमी करून टाकले. सरकारला अकिफायतशीर भावाने सक्तीने धान्य देण्यापेक्षा धान्योत्पादनच कमी करून शेतकऱ्यांनी प्रतिकाराला सुरुवात केली. अल्पसंख्य मोठ्या शेतकऱ्यांकडून सक्तीने धान्यवसुली करणे सोपे होते; पण असंख्य अल्पभूधारकांकडून वसुली करणे धोक्याचे ठरले. याचा परिणाम म्हणून शहरांना होणारा धान्यपुरवठा कमी होऊ लागला आणि शहरी भागात, कामगारात, सैनिकात असंतोष पसरू लागला. अशा तऱ्हेने कामगारक्रांतीच धोक्यात येत असल्याची जाणीव राज्यकर्त्यांना तीव्रतेने होऊ लागली.

परिस्थितीचे निरीक्षण करून, समस्या समजून घेऊन, धोरण बदलण्याची कुवत यशस्वी नेतृत्वाचे गमक समजले जाते. लेनिन असा प्रभावी, प्रतिभावान, यशस्वी नेता रशियाला सत्तांतरानंतर मिळाला होता. त्यामुळे मोठ्या धाडसाने त्याने नवे आर्थिक धोरण जाहीर करून १९१७ ते १९२१ पर्यंत रशियामध्ये अर्थव्यवस्थेची झालेली कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. झालेली चूक त्याच्या लक्षात आली. शेतकऱ्यांची परिस्थिती त्याने अचूक हेरली. शहरी भागाला वाढता धान्यपुरवठा करण्यासाठी वाढते धान्योत्पादन पाहिजे याची जाणीव त्याला झाली. घटत्या उत्पादनातून सक्तीने जास्तीत जास्त वसुली करण्याचे निष्फळ, सबंध अर्थव्यवस्था, सगळी क्रांतीच धोक्यात आणणारे धोरण सोडून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

अधिक धान्योत्पादनासाठी शेतकऱ्याला प्रोत्साहन म्हणून त्याच्या मालाला किफायतशीर किंमती दिल्या पाहिजेत, सरकारने सक्तीने धान्यवसुली करून वाटप करण्याची आपली योजना सोडली पाहिजे, खाजगी व्यापाराला वाव देऊन अतिरिक्त धान्योत्पादन शहरी भागात आणण्याची व्यवस्था पुन्हा प्रस्थापित केली पाहिजे, कामगार-शेतकरी-संबंध सुधारले पाहिजेत, क्रांतीच्या यशस्वितेसाठी कामगार-शेतकरी एकजूट जशी आवश्यक होती तशी समाजवादाच्या उभारणीसाठीही ती टिकवून धरली पाहिजे याची नव्या आर्थिक धोरणात जाणीव होती. नव्या आर्थिक धोरणाच्या संदर्भात सैद्धांतिक वादंग, व्यक्तिगत वैरभाव, पक्षांतर्गत बेदिली वगैरे गोष्टी उफाळून आल्या. नव्या आर्थिक धोरणामुळे जे सैद्धांतिक वादंग माजले त्याचा आपल्याला या ठिकाणी ऊहापोह करावयाचा आहे. **आपल्याकडील परिस्थितीतही वरील प्रकारचा सैद्धांतिक प्रश्न अनुस्यूत आहे.**

## नवे आर्थिक धोरण

**१ : लेनिनची भूमिका :** कामगार-शेतकरी-युती अखंड राखली पाहिजे. औद्योगीकरणाच्या प्रक्रियेत शहरी विभागांना लागणारा वाढता धान्यपुरवठा चालू ठेवण्याची काही व्यवस्था पाहिजे. शेतकऱ्याला किफायतशीर भाव देऊन त्याला उत्पादनवाढीस प्रोत्साहन द्यावे. खाजगी व्यापारालाही वाव देऊन अतिरिक्त उत्पादन शहरी भागात आणण्याची 'बाजार-व्यवस्था' पुनः प्रस्थापित करणे जरूर आहे.

असंख्य लहान लहान जमिनींच्या तुकड्यांमुळे शहरी विभागाला लागणारा धान्यपुरवठा व उद्योगधंद्याला लागणारा कच्चा माल पुरेशा प्रमाणात येण्यात मूलतः बऱ्याच अडचणी आहेत. केवळ किंमत वाढवून हे साधेलच असे नाही. म्हणून लहान लहान शेतकऱ्यांना सहकारी उत्पादन वाढवण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. कसणुकीचे क्षेत्र सहकारी पद्धतीने वाढविले पाहिजे. यातून उत्पादन वाढेल त्याचप्रमाणे अतिरिक्त उत्पादन गोळा करणे सोपे होईल. एका बाजूला समाजवादी पद्धतीचे उद्योगधंद्यांतील बदल होत असताना शेतीव्यवसायातही सहकारी शेतीच्या दिशेने पुनर्रचना होत गेली पाहिजे. सरकारी क्षेत्रातही सामुदायिक शेतीपद्धतीवर चालणाऱ्या सोसायट्या वाढवल्या पाहिजेत. अशा तऱ्हेने समाजवादाच्या उभारणीस उद्योगक्षेत्रात राष्ट्रीयीकरण व शेतीक्षेत्रात शक्य तेथे सामुदायिक शेती व इतर ठिकाणी सहकारी शेती असे धोरणच यशस्वी होऊ शकेल. लहान शेतकऱ्यांचे प्राधान्य असलेल्या मागास देशाला समाजवादी पद्धतीचे औद्योगीकरण पाहिजे

असल्यास वरील धोरणाला पर्याय नाही अशी लेनिनची धारणा होती. नवे आर्थिक धोरण म्हणजे पुनः नव्या दमाने, आत्मविश्वासाने उद्योग व शेतीक्षेत्रात समाजवादी पुनर्रचना करण्याचे धोरण होय. नवे आर्थिक धोरण म्हणजे समाजवादाचा त्याग किंवा भांडवलशाहीची पुनःस्थापना किंवा भांडवलशाहीला शरणागती नव्हे. १९१७ ते १९२१ मधील तथाकथित युद्धकालीन समाजवादी आर्थिक धोरण हे परिस्थितिजन्य होते सरकारपुढे दुसरा पर्यायच नव्हता. एप्रिल १९२१ मधील 'वस्तुरूप कर' या शीर्षकाच्या एका लेखात लेनिनने स्पष्टच म्हटले आहे की, "युद्ध आणि विनाशाने युद्धजन्य साम्यवाद आमच्यावर लादला. कामगारवर्गाच्या आर्थिक उद्दिष्टांशी तो सुसंगत नव्हता आणि असणेही शक्य नव्हते.... तो एक तात्पुरता उपाय होता." १९२१ मधील दहाव्या साम्यवादी परिषदेत लेनिनने स्पष्टच केले की, "आज आपण दारिद्र्य आणि विनाश यांच्या इतक्या भयंकर कचाटयात सापडलो आहोत आणि शेतकरी व कामगारवर्गाची उत्पादकशक्ती इतकी क्षीण झाली आहे की, **काही काल तरी वाटेल ते करून उत्पादन वाढविण्याच्या मूलभूत विचारापुढे बाकी सर्व गौण मानले पाहिजे.** साम्यवादाकडे जाण्याच्या आपल्या प्रयत्नात आर्थिक आघाडीवर आपल्याला गंभीर पराभव सोसावा लागला आहे. खेडयातील सक्तीची वसुली आणि शहरातील पुनर्रचनेबाबतचा साम्यवादी दृष्टिकोण यामुळेच आपल्या देशाच्या उत्पादकशक्तीची वाढ होण्यात अडथळा आला आणि १९२१ च्या उन्हाळयातली राजकीय आणि आर्थिक संकटपरंपरा कोसळली. नवे आर्थिक धोरण म्हणजे सक्तीच्या वसुलीऐवजी वस्तूरूप कर, भांडवलशाहीच्या पुनरुज्जीवनाकडे वाटचाल..... धोरणाच्या दृष्टीने मूलभूत प्रश्न हा आहे की, या नव्या परिस्थितीचा कोण आधी फायदा उठवणार ? कोणाचा जय होणार ? ज्या भांडवलदारांना आपण आज आत घेत आहोत त्यांचा की दडपलेल्यांच्या सार्वभौम सत्तेचा ?"

शेतकऱ्याला वाढीव किमतीचे आश्वासन, खाजगी व्यापाराला मुक्त वाव, पैशामधली देवघेव ('युद्धकालीन साम्यवादी' कालात म्हणजे १९१८ ते १९२१ मधील कालात 'पैशा'च्या माध्यमाचा वापर सैद्धांतिक दृष्टीच्या आहारी जाऊन कमी करण्यात आला होता. त्यामुळे चलनव्यवस्था कोलमडली होती. अंतिमतः साम्यवादी व्यवस्थेत पैशाला स्थानच नाही या कल्पनेतून वरील धोरण निघाले होते. अर्थव्यवस्थेतील गोंधळात यामुळे अधिकच भर पडली होती.) म्हणजे भांडवलशाहीकडे पुनः वाटचालच होय; पण लेनिनने नवे आर्थिक धोरण म्हणजे "पुढील दोन पावले जाण्याकरिता मागे घेतलेले एक पाऊल" असे वर्णन केलेले आहे.

नव्या आर्थिक धोरणातील शेतीसंबंधीचे धोरण खालीलप्रमाणे होते :

१ : शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्याला प्रोत्साहन म्हणून त्याच्याकडून सक्तीची वसुली बंद करण्यात आली.

२ : शेतमालाचा खुला व्यापार सुरू करण्यात आला.

३ : सक्तीच्या वसुलीच्या काळातील ठरवलेले अवाजवी धान्य-भाव रद्द करण्यात आले.

४ : शेतकऱ्याला उत्पादनवाढीसाठी प्रलोभन म्हणून औद्योगिक मालाच्या किंमती रास्त पातळीवर ठेवणे.

५ : लहान लहान शेतकऱ्यांना सहकारी शेती करण्यास उत्तेजन व त्यासाठी सक्रीय प्रयत्न.

६ : सरकारी जमिनीवर सामुदायिक व राज्यनियंत्रित पद्धतीने शेती.

७ : मजूर लावून शेती करण्यास जमीनमालकांना परवानगी.

नव्या आर्थिक धोरणातील शेतीसंबंधीच्या वरील तजविजीमुळे परिस्थितीत खूपच चांगला बदल घडून आला. १९२५ पर्यंत लागवडीखालील क्षेत्र वाढले. धान्योत्पादन वाढले. खालील आकडयांवरून हे दिसून येईल.

| | १९१३ | १९२२ | १९२५ |
|---|---|---|---|
| लागवडीखालील क्षेत्र (दशदक्ष हेक्टर) | १०५ | ७७·७ | १०४·३ |
| धान्यपीक (दशलक्ष टन) | ८० | ५०·३ | ७२·५ |

१९२५ पर्यंत परिस्थिती युद्धपूर्वपातळीवर आली; पण या प्रक्रियेत सधन शेतकऱ्याचे चांगलेच फावले. व्यापार खुला झाला, सक्तीची वसुली थांबली. यामुळे त्यातल्या त्यात सधन शेतकऱ्यांनी सरकारी किंवा सहकारी खरेदी संस्थांशी स्पर्धा चालू केली. चढया भावाने खरेदी करून साठा करावयाचा व साठेबाजीतून नफा मिळवायचा, यामुळे धान्याच्या किंमती वाढू लागल्या. शहरभागा-


## दि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह इंजिनिअरिंग सोसायटी लि. कोल्हापूर

प्लॉट नं. १, औद्योगिक वसाहत, शिरोली
पुणे–बेंगलोर मार्ग
तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर

**टेलेक्स : ०१९५–२१६** **टेलिफोन : ४३७४, ४३७५**
**तार : कृषियंत्र**

"शेतीविकासासाठी मानांबदू म्हणून ओळखली जाणारी या सहकारी संस्थेमार्फत बनविण्यात आलेली 'मयूर' ब्रँडची उत्पादने आय. एस. आय. मार्क असलेली ५ व ६·५ अश्वशक्तीची डिझेल इंजिन्स/पंपिंग सेटस्, मयूर यानमार पॉवर टिलर, (१०–१३ अश्वशक्ती, इलेक्ट्रिक मोटर्स, १ ते ६ टनी दोन व चार चाकी ट्रेलर्स, ३ टनी रबरी चाकी बैलगाडया व इतर शेती औजारे वापरून शेती उत्पादन वाढवा व आपले जीवन सुखी व समृद्ध करा.

अधिक माहितीसाठी कृपया वरील पत्त्यावर संपर्क साधावा.

**एस. आर. नलवडे** — उपाध्यक्ष
**के. जी. पवार** — अध्यक्ष

तील कामगारांना वाढत्या अन्नधान्य-किंमतीची झळ पोचु लागली. सरकारच्या सर्व धोरणांचे मुख्य सूत्रे म्हणजे कामगारवर्गाला स्वस्त दरात धान्य पुरवणे हे होते. पूर्वी शेतकऱ्याकडून सक्तीची वसुली करून धान्यपुरवठा केला गेला; पण त्यामुळे शेतकऱ्याने चिडून, संतापून धान्योत्पादनच घटवले. म्हणून सरकारने सक्तीची वसुली रद्द केली. नव्या आर्थिक धोरणाकडून अशी अपेक्षा होती की, शेतकरी उत्पादन वाढवील व मग आपोआपच बाजारात धान्य विक्रीला येईल व किंमतीवर स्पर्धेमुळे व वाढाव उत्पादनामुळे अंकुश राहील. अनुभवांती हेही खोटे ठरले. कारण वाढीव किंमतीमुळे बाजारात धान्य विकणाऱ्यांची बरकत झाली; पण या वाढत्या उत्पन्नाचा उपयोग त्यांनी साठेबाजी करून नफाखोरीसाठी केला. शेवटी शहरातील वस्तीला स्वस्त धान्यपुरवठा करण्याचा प्रश्न पूर्वीइतकाच बिकट झाला. शेतकऱ्यावर सक्ती करावी तर उत्पादन घटते. याउलट सक्ती काढून विक्रीचे स्वातंत्र्य दिले तर नफेखोरीसाठी साठेबाजी होते. यावर उपाय काय ?

### दोन विचारप्रवाह

बुखारिनप्रभृती पुढाऱ्यांचे मत असे होते की, शेतकऱ्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. शेतकरी म्हटला की, मग त्यात छोटा-बडा असे मानू नये. शेतकऱ्याला विक्रीस्वातंत्र्य, मजूर लावून शेती करण्याचे स्वातंत्र्य, दुसऱ्या शेतकऱ्यांची शेती खंडाने घेऊन कसण्याचे स्वातंत्र्य दिले की, शेतकरी अधिक उत्पादन करील. बाजारात अधिक धान्य येईल. शिवाय औद्योगिक मालाच्या किंमती उत्पादनवाढीबरोबर जसजशा कमी होतील तसतसे शेतकरी औद्योगिक माल खरीदण्यासाठी शेतीउत्पादन वाढवतील. या प्रक्रियेत अन्नधान्याच्या किंमती खालच्या पातळीवर राहतील. औद्योगीकरणाला त्यामुळे वेग देता येईल. रोजगार वाढेल, भांडवली मालाचे उत्पादन वाढेल, औद्योगीकरण होईल आणि हे सर्व सक्ती न करता. फक्त अट एवढीच की, शेतकऱ्याला उत्पादनातून उत्पन्न वाढवण्यास स्वातंत्र्य देणे, हमी देणे. बुखारिनच्या मताने लेनिनने आखून दिलेल्या नव्या आर्थिक धोरणाचे हे रहस्य होते.


卐 卐

**दर्जेदार मीहनाइट मेटल कास्टिंग**

तसेच

**साखर कारखान्यांना लागणारे**
**मॅग्मा व मोलॅसिस पंप, ट्रॅश प्लेट व स्क्रेपर प्लेट**
**मिल स्क्वेअर कपलिंग व फ्लॅंजिस इत्यादीसाठी**
**सर्व जाणते लोक प्रथम आमच्याकडे चौकशी करतात.**

**यशवंत आयर्न अँड स्टील वर्क्स लि.**

शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर

तार " IRONSTEEL " : फोन ३८५५


ट्रॉटस्की, प्रिओब्रॅझेन्स्कीप्रभृतींचे म्हणणे असे होते की, औद्योगीकरणासाठी भांडवलसंचय करावा लागतो. भांडवलशाहीत भांडवलसंचयाचा एक विशिष्ट मार्ग होता. मार्क्सने भांडवलशाहीतील भांडवलसंचयाच्या या प्रक्रियेला 'प्रारंभिक भांडवल संचय' ( Primitiv Capital Accumulation ) असे नाव दिले आहे. भूदास पद्धती नष्ट झाल्यानंतर भूमीपासून फारकत झालेला 'मुक्त' शेतकरी आपले श्रम विकून जगण्यास स्वतंत्र झाला होता. ज्यांना श्रम विकूनच जगणे हा एक पर्याय होता असा वर्ग तयार झाला. ज्याचेजवळ भांडवल होते ते या श्रमावर जगणाऱ्यांना रोजगार देऊ लागले व त्यांच्या श्रमातून, 'वरकडमूल्य' Surplus value निर्माण करू लागले, या वरकडमूल्यापासूनच भांडवलशाही अर्थव्यवस्थेत विकासासाठी लागणारा भांडवलसंचय होत होता.

प्रिओब्रॅझेन्स्कीच्या मताने समाजवादी व्यवस्थेला विकासासाठी ही भांडवलसंचयाची प्रक्रिया जरूर असते. त्याने त्या प्रक्रियेला 'प्रारंभिक समाजवादी संचय' ( Primitiv Socialist Accumulation) हे नाव दिले. या ठिकाणी प्रिओब्रॅझेन्स्कीच्या वरील सिद्धान्ताची संपूर्ण व तपशीलवार चर्चा करण्याचा हेतु नाही; पण त्याचा मुख्य निष्कर्ष असा होता की, रशियातील प्राप्त परिस्थितीत समाजवादी औद्योगिक विकासासाठी लागणारे भांडवल किंवा साधनसामग्री शेतीविभागातून उभी करावयाची. ही दोन तऱ्हेने करता येईल. एक म्हणजे शेतीवर जबरदस्त कर बसवायचे; पण त्यामुळे कर चुकवण्यासाठी शेतकरी नाना क्लृप्त्या काढील, त्यातून असंतोष पसरेल व राजकीय तणाव निर्माण होईल. म्हणून भांडवलउभारणीसाठी शेतीवरील कराची कल्पना फारशी उपयोगी नाही. दुसरा मार्ग म्हणजे समाजवादी सरकारी उद्योगाचे क्षेत्र व खाजगी क्षेत्र यातील संबंधांचा उपयोग करून घ्यायचा. औद्योगिक क्षेत्रातील सरकारच्या मक्तेदारीच्या माध्यमातून खाजगी क्षेत्राचे ( यालाच प्रिओब्रॅझेन्स्की 'वसाहत' म्हणतो.) शोषण करून त्यातून भांडवलसंचय उभारायचा. थोडक्यात म्हणजे औद्योगिक माल व शेतीमाल यातील विनिमयशर्ती ( Terms of Trade ) किंवा किंमती अशा ठेवायच्या की, ज्यामुळे सरकारी मक्तेदारी क्षेत्राकडे अधिक वाढावा येईल. **याचाच अर्थ समाजवादी सरकारने उद्योगक्षेत्रातील आपली मक्तेदारी-सत्ता वापरून शेतीक्षेत्राची पिळवणूक करावयाची.** औद्योगिक मालाच्या किंमती उच्च पातळीवर ठेवल्या की, शेतकऱ्याला औद्योगिक माल खरेदी करण्यासाठी आपल्या मालाचे अधिक उत्पादन करावेच लागेल. जोपर्यंत समाजवादी औद्योगीकरणासाठी देशांतर्गत खाजगी भांडवलसंचयाची जरूरी आहे तोपर्यंत औद्योगिक शेतीक्षेत्रातील असमान विनिमयदराची पद्धत चालूच ठेवली पाहिजे.

शेतीक्षेत्राची पिळवणूक हा एकच समाजवादी भांडवलसंचयाचा रस्ता रशियातील प्राप्त परिस्थितीत उपलब्ध असल्याचे प्रिओब्रॅझेन्स्की प्रभृतींचे मत होते.

थोडक्यात म्हणजे समाजवादाची उभारणी करण्यासाठी शेतीक्षेत्राची म्हणजेच शेतकऱ्यांची पिळवणूक करून भांडवलसंचय करायचा की शेतकऱ्याला स्वातंत्र्य, प्रलोभने, प्रोत्साहन देऊन बाजारव्यवस्थेच्या द्वारे भांडवलसंचय घडवून आणायचा हा प्रश्न १९२५ च्या सुमारास तीव्र बनला. एका बाजूस प्रिओब्रॅझेन्स्की व त्याचे सहकारी तर दुसऱ्या बाजूस बुखारिन व त्याचे सहकारी अशी सैद्धान्तिक पातळीवर व म्हणून व्यावहारिक धोरणावर दुफळी माजली.

स्टॅलिन या वेळी कम्युनिस्ट पक्षाचा जनरल सेक्रेटरी होता. त्याने सुरुवातीला बुखारिनची बाजू घेतली. त्याने प्रिओब्रॅझेन्स्कीच्या शेतीक्षेत्राच्या पिळवणुकीच्या सिद्धान्ताला कडाडून विरोध केला. प्रिओब्रॅझेन्स्कीची बाजू अतिजहाल, ' डावी ' मानली गेली. स्टॅलिनने कामगार–शेतकरीवर्गाची दोस्ती असणे जरूर आहे या लेनिनच्या मताचा आधार घेतला. ट्रॉटस्की, प्रिओब्रॅझेन्स्की व ' जहाल डावे ' यांना स्टॅलिनने बुखारिन प्रभृती ' उजव्यां 'च्या साहाय्याने नामोहरम केले.

## पुन्हा कोंडी झाली

मध्यंतरी नव्या आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून उत्पादनवाढ झाली, सधन शेतकरी अधिक सधन झाला. सधन शेतकऱ्यांचा एक गटच, एक नवी शक्तीच जन्माला आल्यासारखे दिसत होते. नव्या आर्थिक धोरणातील स्वातंत्र्य व सवलती घेऊन त्यांनी किंमतवाढ करण्यासाठी साठेबाजी करायला सुरुवात केली. नवीन प्राप्त झालेल्या सवलती व त्यातून वाढलेली आर्थिक ताकद त्यांनी साठेबाजी करण्यासाठी वापरण्यास सुरुवात केली. १९२७–१९२८ या वर्षी ह्याचे प्रत्यंतर येऊन चुकले. सधन शेतकऱ्यांची वाढती ताकद म्हणजे सरकारच्या समाजवादी धोरणाला एक आव्हानच होते. औद्योगीकरणात गुंतलेल्या शहरी कामगारांना स्वस्त दरात अन्नधान्य पुरवणे तर अगत्याचे होते; पण सधन शेतकऱ्यांच्या साठेबाजीच्या धोरणामुळे शहराला आवश्यक असणारा धान्यपुरवठा कमी होऊ लागला. यातून अन्नधान्याची किंमतवाढ व कामगारांतील असंतोष पसरण्याचा धोका निर्माण झाला.

सरकारी जमिनीवरील राज्यशेती व सामुदायिक शेतीची चळवळ फारशी वाढली नव्हती. लहान शेतकऱ्यांच्या सहकारी उत्पादनाच्या संस्थाही फारशा वाढल्या नाहीत. त्यामुळे शेतीक्षेत्रात समाजवाद रुजण्याची शक्यता कमी झाली. औद्योगिक क्षेत्रात सरकारी मालकी व शेतीक्षेत्रात सहकारी शेती असा लेनिनच्या नव्या धोरणातील समाजवादी कार्यक्रम होता. शेतीक्षेत्रात सधन शेतकऱ्यांच्या वाढत्या प्रस्थामुळे बाजारव्यवस्थेतून समाजवादी औद्योगीकरणाला लागणारी साधनसामग्री मिळवणे कठीण झाले. पूर्वी सक्तीच्या धान्यवसुलीच्या धोरणातून निर्माण झालेली कोंडी फोडण्यासाठी लेनिनने नवे आर्थिक धोरण आखले होते. आता १९२८ साली सधन शेतकऱ्यांना, खाजगी व्यापाराला उत्तेजन देण्याच्या धोरणातून पुन: एकदा कोंडी निर्माण झाली. ती फोडण्यासाठी स्टॅलिनने जो मार्ग चोखाळला त्याचा आता निर्देश करणे जरुरीचे आहे.

## स्टॅलिनचा मार्ग

स्टॅलिनच्या मताप्रमाणे लेनिनचे नवे आर्थिक धोरण मूलत: बरोबर होते. शेतकरीवर्गाला बरोबर घेऊनच कामगारक्रांती यशस्वी होईल यात शंका नाही. बुखारीन वगैरेंचे शेतकऱ्यास स्वातंत्र्य व सवलती देण्याचे धोरण म्हणूनच स्टॅलिनने मान्य केले होते; पण सधन शेतकऱ्यांचे वाढते प्रस्थ लक्षात घेता त्याचे धोरण बदलू लागले. बुखारिनच्या धोरणाला त्याने मग विरोध करण्यास सुरुवात केली. स्टॅलिनचे मत असे की,

१ : शेतकरीवर्गाला उत्पादनवाढीसाठी उत्तेजन दिले पाहिजे हे बरोबर; पण शेतकरीवर्ग काही एकसंध नाही. त्यात बडे शेतकरी, मध्यम शेतकरी व छोटे शेतकरी असे वर्ग आहेत. छोटा शेतकरी आपले उत्पादन मूलत: स्वत:च्या कुटुंबाच्या उपभोगासाठीच करतो. बऱ्याच वेळा त्याला अन्नधान्य स्वत:साठी विकतच घ्यावे लागते. कापणीचा हंगाम झाल्याबरोबर रोकड रकमेच्या गरजेसाठी त्याला आपल्या अगोदरच अपुऱ्या असलेल्या उत्पादनातील काही भाग विकावा लागतो व पुन्हा काही महिन्यांनंतर विकत घ्यावा लागतो. विकताना त्याला कमी भाव मिळतो व पुढे विकत घेताना त्याला चढा भाव द्यावा लागतो. साहजिकच वाढत्या किंमतीची झळ कामगारवर्गाप्रमाणे छोट्या शेतकऱ्यालाही लागते. म्हणून कामगार व छोटा शेतकरी यांची युती सहज होईल. एवंच शेतकरीवर्गापैकी बहुसंख्य असणारा छोटा शेतकरी व कामगार यांची युती केली पाहिजे. यानंतर मध्यम शेतकरी. याचे धारणाक्षेत्र तसे फारसे मोठे

卐 卐

कोल्हापूर जिल्ह्यातील जनतेच्या
जीवनाशी समरस झालेली

**शेतकरी सहकारी संघ लिमिटेड,**
**कोल्हापूर**

समासद
व्यक्ति ४१,००० चे वर : संस्था १,००० चे वर

भागभांडवल खेळते भांडवल व्यवहार
रु. ३२ लाखाचेवर : रु. ४.८ कोटीचेवर : रु. ३९ कोटीचेवर

वि. श. शिंदे, नेसरीकर
कार्यकारी संचालक

बी. एस्. पाटील, टाकवडेकर
अध्यक्ष

*With Best Compliments From*

# CENTRAL IRON WORKS

**Vikramnagar Kolhapur - 416 005 ( Maharashtra )**

Telephones : 5057 and 4344 Gram : CENTRLIRON Telex : 0195 218

Manufacturers of grey iron and meehanite metal castings.
Suppliers of special jobs to sugar and general engineering industries.

*Developed following import substitute items* :

1. Sulphuric Acid Cooler suitable for National Radiator and Crane Coolers of USA.
2. Lapping plates.
3. Diffusers for double action chemical pumps.

Proprietor : **Anil Otkur**

*With Best Compliments From*

# ICHALKARANJI ENGINEERING CENTRE PRIVATE LIMITED

**ICHALKARANJI ( Dist. KOLHAPUR ) MAHARASHTRA**

**Manufacturers of :**
ED Padma Brand
5 HP and 6.5 HP DIESEL ENGINE SPARES

नसते. त्याच्या उत्पादनातील थोडा भाग तो बाजारात विक्रीसाठी आणतो. कामगारवर्गाशी त्याची मैत्री होणे शक्य असते. आता उरला वडा शेतकरी. हा आपली शेती मजूर लावून करवून घेतो. अशा शेतकऱ्याला रशियामध्ये 'कुलक' म्हणतात. त्याच्याकडे उत्पादनास लागणारी अवजारे असतात. तो आपले उत्पादन बाजारभावाकडे लक्ष ठेवून करतो. कारण त्याच्या उत्पन्नाचा मोठा भाग बाजारात विक्रीसाठी येत असतो. साहजिकच शेतमालाच्या किमतीवरून त्याचे धोरण ठरते. किंमत वरच्या पातळीवर असली की, तो उत्पादन वाढवतो व बाजारातील चढत्या किंमतीला विकून नफा मिळवतो. या नफ्यातूनच त्याची आर्थिक शक्ती वाढते व बाजारावर आपले नियंत्रण ठेवण्यासाठी तो साठेबाजी करू शकतो. शहरभागाला लागणारा धान्यपुरवठा त्याच्या सट्टेबाजीवर अवलंबून राहतो. साहजिकच सरकारी धोरणाला बडा शेतकरी आव्हान देण्याचा पवित्रा घेऊ शकतो. म्हणून स्टॅलिनच्या मते कामगारवर्गाने लहान शेतकऱ्यांशी युती, मध्यम शेतकऱ्यांशी मैत्री केली पाहिजे बडा शेतकरी म्हणजे कुलक मात्र कामगारवर्गाचा वर्गशत्रू आहे. त्याचा पाडाव करणे जरुरीचे आहे.

म्हणून स्टॅलिनच्या मते बुखारीनसारखे 'उजव्या' मताचे लोक शेतकरीवर्ग म्हणजे एकसंध, एक हितसंबंध असलेला, एकजिनसी वर्ग आहे असे समजतात ते चुकीचे आहे. उदाहरणार्थ 'शेतमालाचे भाव वाढवून द्या' ही मागणी सकृद्दर्शनी योग्य वाटते; पण खोलात शिरल्यावर असे लक्षात येते की, वाढत्या भावाचा फायदा बड्या शेतकऱ्यांनाच होतो. बाजारात विकावयास येणाऱ्या मालापैकी फार मोठे प्रमाण मोठ्या शेतकऱ्याच्या मालाचे असते. कारण त्याचे उत्पादनच मुळी बाजारासाठी असते. बाजारातील फारच थोडा माल मध्यम व लहान शेतकऱ्यांकडून येत असतो.

स्टॅलिनच्या मते कुलक शेतकरी हा समाजवादी औद्योगीकरणातील एक मोठा अडसर आहे. शेतकऱ्याला सवलती म्हणजे वस्तुतः बड्या शेतकऱ्याला सवलती असाच अर्थ होत आहे. म्हणूनच बड्या शेतकऱ्यांचे महत्त्व कमी केले पाहिजे. बाजारावरील, शहरात येणाऱ्या विक्री-मालाच्या साठ्यावरील व किंमतीवरील त्यांची पकड उठवली पाहिजे, त्यांचा अडसर दूर केला पाहिजे. बुखारीनच्या धोरणातील कच्चेपणावर स्टॅलिनने नेमके बोट ठेवले होते.

१९२८–२९ पर्यंत स्टॅलिनने बुखारीनच्या मदतीने म्हणजे 'उजव्यां'च्या मदतीने ट्रॉटस्की, प्रिओब्रॅझेन्स्की इत्यादी 'डाव्यां'चा पराभव केला. डाव्यांचे धोरण लेनिनच्या कामगार-शेतकरी-दोस्ती विरुद्ध आहे असा त्याचा दावा होता. शिवाय शेतकऱ्यावर दडपण आणून अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो याचा १९१७–१९२१ या कालात अनुभव आलाच होता. डाव्यांचा पराभव त्यामुळे स्टॅलिन तात्त्विक आणि व्यावहारिक पातळीवर करू शकला.

लेनिनप्रणीत नव्या आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीतून बड्या शेतकऱ्यांची म्हणजे 'कुलक' वर्गाची आर्थिक ताकद वाढली होती. स्टॅलिनला पहिली महत्त्वाकांक्षी आर्थिक योजना पुढे रेटायची होती. सरकारी, सामुदायिक किंवा सहकारी शेतीक्षेत्राची वाढ लक्षणीय अशी नव्हती. त्यामुळे त्या माध्यमातून भांडवलसंचय करणे, वाढावा जमा करणे शक्य नव्हते. साहजिकच भांडवलसंचयासाठी शेती-व्यवसायाची वाढावा गोळा करण्यासाठी पुनर्रचना करण्याची गरज निर्माण झाली. असंख्य लहान शेतकरी आपल्या लहान जमिनीच्या तुकड्यावर अधिक उत्पादन करण्यास अक्षम होते. त्यांना सरकारी, सामुदायिक किंवा सहकारी शेतीत आणण्याशिवाय आता गत्यंतर नव्हते. बड्या शेतकऱ्यांची जमीन हिसकावून घेणे त्या मानाने सोपे होते; पण असंख्य अशा लहान लहान, मालकी हक्क जोपासणाऱ्या शेतकऱ्यांकडून शेतीच्या पुनर्रचनेशिवाय उत्पादन वाढणे कठीण होते. साहजिकच शेतीतून भांडवलसंचयासाठी वाढावानिर्मितीसाठी प्रथम सामोपचाराने; पण नंतर अपरिहार्यपणे सक्तीने सहकारी व सामुदायिक शेतीकडे वळणे स्टॅलिनला क्रमप्राप्त झाले. शेतकऱ्याला स्वातंत्र्य व सवलती द्याव्या हे बुखारिनचे धोरण आता अनुभवाने फलद्रूप होत नाही हे दिसू लागल्यावर स्टॅलिनला बुखारिनच्या विचारसरणीशी सामना करावा लागला आणि मग शेतीक्षेत्रातून औद्योगीकरणासाठी वाढावा निर्माण करण्याची प्रिओब्रॅझेन्स्कीची कल्पना सक्तीच्या सामुदायिक शेतीस्वरूपात स्टालिनला अंमलात आणावी लागली.

रशियाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनाकालात स्टालिनने करडेपणाने, बऱ्याच वेळा निर्घृणपणाने खाजगी शेतीचे सामुदायिक शेतीत रूपांतर केले. एका अर्थाने ट्रॉटस्की– प्रिओब्रॅझेन्स्की यांनी दाखविलेल्या दिशेने स्टॅलिनने पंचवार्षिक योजनांची घोडदौड चालू ठेवली आणि मागास रशियाचे अद्ययावत औद्योगिक राष्ट्रात अवस्थांतर घडवून आणले.

### पुनर्रचना अटळ

रशियात १९२१–२८ या काळात शेतीक्षेत्रात जे घडले, त्यावरून आपल्याला खूपच शिकण्यासारखे आहे. स्टॅलिनने जे केले ते व तसेच केले पाहिजे असा निष्कर्ष यातून निघत नाही; पण शेतीच्या पुनर्रचनेला पर्याय नाही एवढे सूचित होते. असंख्य लहान शेतकऱ्यांच्या देशात अंतर्गत साधनसामुग्रीतूनच औद्योगीकरण घडवून आणायचे असेल तर शेतीची पुनर्रचना अटळ आहे. पूर्वजर्मनी इत्यादी साम्यवादी देशांनी स्टॅलिनप्रणीत सामुदायिक शेतीचा मार्ग स्वीकारलेला नाही; पण त्याचबरोबर जमीनवाटप करून, शेतीचे लहान लहान


राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय
टेनिस-स्पर्धामधून मान्यताप्राप्त
दर्जेदार टेनिस बॉल्ससाठी

**रवींद्र नाईक आणि कंपनी**

पनवेल ( जि. कुलाबा )

आता बर्फाचे उत्पादनही सुरू

तुकडे पाडून, असंख्य लहान लहान धारणाक्षेत्रेही निर्माण केली नाहीत. सहकारी शेतीवर भर दिला. मुख्य मुद्दा असा की, खाजगी शेतीची पुनर्रचना केली गेली.

शेतकऱ्यांच्या हितासाठी म्हणून जी धोरणे आखली जातात, त्याचा वस्तुतः फायदा कोण घेतो, कुणाला होतो याचा विचार करावा लागतो. **शेतमालाच्या वाढीव किंमती मान्य केल्या की, फायदा साऱ्या शेतकरीवर्गाचा होत नाही, तर मोठ्या शेतकऱ्यांचा होतो.** याचे कारण मोठा शेतकरी बाजारासाठी किमतीवर लक्ष ठेवून उत्पादन करतो. आपल्या उत्पादनाचा फार मोठा भाग बाजारात विक्रीसाठी आणतो. वाढीव किमतीचा सारा लाभ त्याच्या पदरात पडतो. लहान शेतकरी जमिनीचा लहानसा तुकडा कसत असल्यामुळे बाजारासाठी उत्पादन काढूच शकत नाही. त्याचे उत्पादन मुख्यतः स्वतःच्या कुटुंबासाठीच असते. म्हणजे धान्यभाव वाढवून दिले म्हणून लहान शेतकऱ्याचा काहीही फायदा होत नाही. सारा नफा मोठ्या शेतकऱ्यांच्या खिशात जातो. साहजिकच त्याची ताकद वाढते. वाढत्या आर्थिक शक्तीचा प्रभाव मग सरकारी धोरणांवर पडणे अपरिहार्य होते.

खते, बी-बियाणे, रसायने, कर्जे ही सवलतीने द्यायचे धोरण ठेवले की, त्याचा फायदाही मुख्यतः मोठ्यांकडेच जातो. अगदी फारच थोड्या छोट्यांचा फायदा त्यामुळे होतो.

छोट्या शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी मग काही तरी नवीन मार्ग पाहिजे. तो म्हणजे सहकारी पद्धतीची शेती. यातूनच रोजगारवाढ, उत्पन्नवाढ, भांडवलसंचय होऊ शकेल. रशियाने अवलंबलेलाच मार्ग इतरांनी अवलंबावा असे नाही; पण शेतीची पुनर्रचना टाळता यणार नाही. छोट्या शेतकऱ्याचा प्रश्न हा शेतीच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेतच सुटू शकेल. औद्योगीकरणाची प्रक्रिया शेतीची पुनर्रचना होईपर्यंत मंदच राहणार. पुनर्रचना टाळण्याने प्रश्न सुटणार नाही. अन्नधान्याच्या किमती वाढवून देण्यासारख्या ढोबळ प्रकाराची आर्थिक धोरणे अमलात आणून श्रीमंत शेतकऱ्यांना अधिक श्रीमंत मात्र केले जाते व पुढील समाजवादी विकासाला गबर व समर्थ शेतकऱ्यांचा विरोध होतो.

मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी भांडवलसंचयाला उत्तेजन देण्यासाठी जी आर्थिक धोरणे स्वीकारावी लागतात त्यामुळे खाजगी उद्योगसमूहांची ताकद वाढते. लहान शेतकऱ्यांच्या हितासाठी म्हणून आखलेल्या धोरणांमुळे श्रीमंत शेतकरी अधिक श्रीमंत होतात. एका विशिष्ट परिस्थितीत मग अर्थव्यवस्थेची कोंडी होते. खाजगी उद्योगांच्या हितसंबंधांच्या दडपणामुळे प्रभावी आर्थिक धोरण आखता येत नाही आणि श्रीमंत शेतकरी–व्यापारी यांच्या दडपणामुळे खाजगी शेतीक्षेत्रात मूलभूत स्वरूपाची पुनर्रचना करणे' अशक्य होते. शासनसंस्थेवर या दोन्ही हितसंबंधाचा पगडा वाढत जातो. त्यांचे हितसंबंध सांभाळणारे शासनसंस्थेमध्ये मोक्याच्या जागी ठाण मांडून बसतात. मग त्यांची भाषा राष्ट्रीयीकरणाची असो, शेतकरीप्रेमाची असो किंवा समाजवादाची असो.

तिसऱ्या जगातील लहान देशांना औद्योगीकरणाच्या प्रक्रियेत वरील प्रश्नांना तोंड द्यावे लागते. कोटचवधी सामान्य जनतेला खराखुरा दिलासा मिळण्यासाठी वरील अटळपणे येणारा प्रश्न सोडवावाच लागतो. स्वनिर्मित परिस्थितीतील अटळपणे येणारे प्रश्न सोडवताना मग सत्तेचा वापर निरंकुशपणे करण्याकडे साहजिकच प्रवृत्ती बनते. जगाच्या अलीकडील इतिहासात याची कित्येक उदाहरणे पाहण्यास मिळतात. □


# Vishwas Trading Corporation


767 'E' Shahupuri, KOLHAPUR 416 001
( Maharashtra )

Phones : Off. 7493, Resi. 6882 Grams : 'VITICORP'

**Dealers :**

Cutler Hammer Motor Starter ❊ "Falcon 150" Scooter
Kelvinator Refrigerator

# विशेष पुरवणी



**साम्यवादी रशियाचा अनुभव विचारात घ्यायला हरकत नाही. पण आपल्याकडे, एका राज्यात, साम्यवादी राजवट आल्यावर, थोडीफार स्थिरावल्यावर, शेतीव्यवस्थेची, किसान-कामगार संबंधांची पुनर्रचना होते का ? निदान पुनर्रचनेची प्रक्रिया तरी सुरू होते का ? जुना वारसा, नवीन कार्यक्रम यांचा मेळ कसा घातला जातो ?**

# डावा पर्याय : पश्चिम बंगालमध्ये पंधरा दिवस

**छाया दातार**

## शहर कलकत्ता : सिंदवादच्या मानगुटीवर बसलेला म्हातारा

'क्या मार्क्सवादी शेर आराम फर्मा रहा है?' 'रविवार' साप्ताहिकातील एका लेखाचे शीर्षक अजूनही माझ्या मनात घोळते आहे. प. बंगालच्या डाव्या आघाडीच्या सरकारचे वर्णन होते ते. हे वाक्य डोक्यात घेऊनच मी 'गीतांजली'मध्ये बसले. बंगालविषयी, बंगाली माणसाविषयी, साहित्याविषयी अगदी काहीच नाही तरी बंगाली विशेषनामांबद्दल मराठी माणसाला कुतूहल वाटत आलेले आहे. आपण आपल्या मुलांना कौतुकाने शोधून शोधून जी नवी नावे ठेवतो, ते नाव बंगालमध्ये एखाद्या सत्तरीच्या म्हाताऱ्याला चिकटलेले असल्याचे पाहून गंमत वाटते. तीच गोष्ट गावांच्या नावांविषयी. दिल्लीत कॉटेज इंडस्ट्रीजसमोर एक छोटेसे रेस्टॉरंट नुकतेच उघडले होते, ६५ साली. त्याचे नाव होते 'बांकुरा.' मला आठवतेय ते नावच इतके आकर्षक आणि अद्‌भुत वाटत होते त्या वेळी. या वेळी बंगालला गेल्यावर लक्षात आले ते एक जिल्ह्याचे गाव आहे आणि नक्षलवाद्यांपैकी विनोद मिश्रा गटाच्या हालचालींचे केंद्र आहे. माझ्या डोक्यात आले, आपल्याकडच्या कोणत्या गावाच्या नावाला अशी सुंदर ढब आहे! ही बंगाली भाषेचीच करामत. बंगालच्या गावांची नावे परिचित करून देण्याचे श्रेय आजकालच्या काळात नक्षलवाद्यांना द्यावे लागेल. नक्षलवाद्यांच्या कारवायांचे व त्यांच्या धरपकडीचे वृत्तान्त आणीबाणीपूर्वकाळापर्यंत सतत वृत्तपत्रातून येत होते आणि पोटात भीतीचा गोळा, साहसाबद्दल किंचितसा आदर अशा संमिश्र मन:स्थितीत आपण मराठी माणसे त्या बातम्या वाचत असू. आज नक्षलवादी चळवळीचा तो आवेग ओसरला आहे. चळवळीचे तुकडे तुकडे होऊन बरेचसे लयास गेले. सरकारी वरवंटा फार मोठ्या प्रमाणात त्यांच्यावरून फिरला. अजूनही हजारांवर राजकीय कैदी तुरुंगात आहेत. जवळजवळ सगळेच नक्षलवादी चळवळीच्या आवर्तात सापडलेले. असा हा बंगाल–ज्या एकाच राज्यात आज कम्युनिस्टांच्या डाव्या आघाडीचे सरकार अस्तित्वात आहे आणि आश्चर्य म्हणजे मध्यमवर्गीयांचा त्याला मोठ्या प्रमाणात पाठिंबा आहे. महाराष्ट्रातील पांढरपेशा वर्गातील उपजत कम्युनिस्ट-

विरोधी भावनांच्या पार्श्वभूमीवर ही घटना खरोखरीच कुतूहल निर्माण करणारी आहे. अशा या बंगालला मला जायचे होते. बंगालमधील सध्याच्या राजकीय वातावरणाची नाडी तपासायची होती. जमले तर बंगाली माणसाच्या मनाचा शोध घ्यायचा होता. माजगावकरांनी प्रश्न टाकला होता, 'बंगाली माणूस, बंगाली राजकारण हे आत्यंतिक टोकाला कसे जाऊ शकते ? येथे गांधीवाद, सर्वोदय यासारख्या रचनात्मक कार्य करणाऱ्या चळवळींची मुळे कशी रुजू शकली नाहीत ?'

## पोचता पोचता

कलकत्ता येण्यापूर्वीच तासभर गाडीची गती मंद झाली होती आणि बंगाली चित्रपटांतून चिरपरिचित झालेली बंगालची निसर्गचित्रे डोळ्यांसमोरून सरकू लागली होती. नुकत्याच येऊन गेलेल्या जगबुडीसारख्या महाभयंकर पुराचा परिणाम म्हणून रेल्वेचे रूळ कमकुवत झाले होते आणि गाडी हळू चालविण्याचे आदेश होते. दृश्य-परिणाम काहीच दिसत नव्हते. नवी बांधलेली घरे दिसत नव्हती किंवा कोसळलेली घरेही गाडीतून दिसत नव्हती. पूरपरिस्थितीचा अभ्यास करताना नंतर लक्षात आले की, मिदनापूर जिल्हा हा दक्षिणेकडचा जिल्हा असल्याने उत्तरेकडून वाहात येणाऱ्या सर्व नद्यांचे पाणी या भागात जास्तीत जास्त पसरण्याची शक्यता आहे. तसेच दामोदर व्हॅली कॅनॉलसुद्धा याच भागातून जातो. एरवी पाण्याचा वरदहस्त असलेला हा जिल्हा या वेळच्या पुरामध्ये जलमय होऊन गेला होता आणि एकूण ६५ लाख लोकसंख्येपैकी ३३ लाख लोकांचे जीवन पाण्याच्या लहरीवर अवलंबून होते. मुंबईहून कलकत्त्याला येणारा महामार्ग याच जिल्ह्यातून जातो आणि या महामार्गाचा फार मोठा आसरा पूरग्रस्त लोकांना मिळालेला होता. गाडीत बसून मात्र त्या नुकत्याच घडलेल्या निसर्गकोपाचा दृश्यपरिणाम नजरेस पडलेला नाही.

## वासाहतिक वारसा

हावडा स्टेशनावर गाडी पोचली आणि कलकत्त्याचा अवाढव्यपणा व ओंगळपणा यांचे दर्शन एकदमच झाले. स्टेशनास्टेशनांमध्येही फरक असतो. मुंबईलाच घ्या ना, बॉम्बे सेंट्रल स्टेशनची एक वेगळीच नजाकत आहे. गुजरातला जाणाऱ्या गाड्या, दिल्लीला जाणाऱ्या गाड्या येथून सुटतात आणि गर्दीचा सुवास दरवळत रहातो. झुळझुळीत कपडे आणि सुखवस्तु ओशट चेहरे पहिल्यांदाच मुंबईला उतरणाऱ्या पाहुण्याला मुंबईच्या संपन्नतेची चाहूल देतात. मग स्टेशनच्या बाहेर पडल्यावर कर्करोगासारख्या पसरलेल्या झोपडपट्ट्यांचे दर्शन झाले तरी दुसरीकडे जागोजागी संपन्नतेच्या खुणाही दृष्टीस पडत रहातात. याच्या उलट बोरीबंदराचे. बोरीबंदराला बॉम्बे सेंट्रलचा सुवास क्वचित येतो. बोरीबंदरची इमारत बाहेरून तिच्या ऐतिहासिकतेची साक्ष देतेच; पण स्टेशनात उतरल्यावरसुद्धा या औद्योगिक शहराची स्पंदने तेथे जाणवायला लागतात. येथे अस्वच्छता आहे, भव्यता आहे आणि सुसंघटित, वेगवान जीवन आहे. हावडा स्टेशनावर-उतरल्या उतरल्याच एक भव्य गौरवशाली काळ ओसरून गेल्याचे लक्षात येते आणि आपल्याच जडभाराखाली वाकलेल्या, मृत्युशय्येवर पडलेल्या, जुनाट वठलेल्या वडाच्या झाडाची आठवण होते. कलकत्ता हे ब्रिटिश वासाहतिक काळातील पहिले वासाहतिक शहर. अजूनही या शहराच्या वासाहतिक खुणा संपलेल्या नाहीत. तशा तर वासाहतिक खुणा, विशेषतः वास्तुशिल्पे सर्वच मोठ्या शहरात आढळतात; पण दिल्लीला, मुंबईला गेल्या तीस वर्षांत इतरही नव्या इमारतींची भर पडलेली आहे. दोन्ही शहरे ही वाढणारी शहरे आहेत. मुंबईची अवकाशरेषा तर गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलली. बाहेरगावांहून मुंबईत येताना तर मुंबईच्या औद्योगीकरणाची घरघर कानात गोळा करतच यावे लागते. मुंबई हे भारतीय भांडवलशाहीच्या कुशीत वाढलेले, वाढवलेले खरेखुरे आधुनिक औद्योगिक शहर आहे. दिल्ली शहराला साम्राज्यशाही शहराचा बांडगुळी नूर आहे, तर कलकत्ता बिचारे वासाहतिकेच्या वारशातून बाहेरच पडलेले नाही, याची चीड अर्थातच सर्वांच्या मनात घर करून बसलेली पदोपदी जाणवतेच.

कंपनी सरकारचे राज्य जाऊन भारतावर राणीचे राज्य आले आणि ब्रिटिशांची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीला गेली. उद्योगधंद्यांचा पाया कलकत्त्यालाच घातला गेला. मुंबईच्या कापडगिरण्यांपेक्षाही कलकत्त्याच्या तागाच्या गिरण्या अधिक पुरातन आहेत. भारतातील आधुनिक कर्मयोगींनी (भांडवलदार) मुळात याच भागात उद्योगधंद्यांना सुरुवात केली. कारण येथूनच अफूचा व्यापार चीनशी चालवून त्यांनी मूळ भांडवल गोळा केले. ब्रिटिश कंपन्यांची व्यापारी ऑफिसे आणि नंतरचे कारखानेही प्रथम याच कलकत्त्यात सुरू झालेत. समाजसुधारणांनाही सुरुवात भारतात प्रथम कलकत्त्यातच झाली. साम्राज्यशहांनी दत्तक घेतल्यामुळे भराभरा वाढणारे हे शहर एक दिवस त्यांनी दत्तकवारसा काढून घेतल्यामुळे अनाथ, बेवारशासारखे पडलेले आज दिसते आहे.

Calcutta looks like a decadent city ! ज्याची वाढ खुरटली गेली आहे, ज्या शहराचे रस्ते वर्षानुवर्षे तेच आहेत, ज्या शहरात गेल्या कित्येक वर्षांत अतिशय तुरळक नवी बांधकामे झालेली दिसतात, जेथे रंगाचा खप बहुधा थांबलेला असतो, जिथली वाहतूकव्यवस्था वर्षानुवर्षे त्याच पूर्वीच्या अवस्थेत काम करत असते, बसेसची संख्या कमी झालेली असते, ट्रॅम्सच्या संख्येत भर पडणे तर शक्यच नसते, कळकट-मळकट रंगाच्या टॅक्स्यांची धुडे तुरळक रस्त्यावर वावरत असतात. असे महाकाय शरीराचे हे शहर. कोटीच्या आसपास लोकसंख्येला अंगाखांद्यावर खेळविणारे.

फार पूर्वी १९७० साली दार्जिलिंगला जाताना कलकत्त्याहून पुढे गेल्याचे आठवत होते. त्याही वेळी कलकत्त्याचे चित्र मनावर नोंदले गेले ते असेच अस्वच्छतेचे, गोंधळाचे, उखडलेल्या रस्त्यांचे, बकालपणाचे. त्या वेळी राजकारणात अजिबात रस नसल्याने ह्या सगळ्या अवस्थेला जबाबदार कोण, असे का, असे प्रश्नही मनात उद्भवले नव्हते. या वेळी मात्र कलकत्त्यामध्ये शिरतानाच प्रत्येक गोष्टीचा छडा लावायचाच हा वार्ताहरी गुण बरोबर होताच. त्यामुळे कलकत्ता अधिक निरखून पाहिले गेले. अधिक खोलवर जाऊन तेथील प्रवृत्तींचा शोध घ्यायचा प्रयत्न झाला.

## प्रचंड गोंधळ

हावडा स्टेशनाच्या बाहेर आल्याआल्याच कलकत्त्याच्या मूडची

कल्पना यायला लागली. टॅक्सीसाठी भलीमोठी रांग लागलेली होती आणि मला घ्यायला आलेली तारा पंडित, अनिल दत्तगुप्ता वगैरे मंडळी सावकाश गप्पा करत त्या रांगेकडे चालली होती. मुंबईची आठवण झाली. दादर स्टेशनावर टॅक्सीसाठी रांगेत पुढे नंबर लागावा म्हणून पळापळी करावी लागते. पोलीस, टॅक्सीवाला, गिऱ्हाईक यांची थोडीशी बाचाबाची होऊन पण बऱ्याच शीघ्र गतीने रांग पुढे सरकत रहाते. टॅक्स्या गिऱ्हाइकांना घेऊन सुळकन् पुढे धावू लागतात. कलकत्त्याला मुळी टॅक्सी मिळायची शाश्वतीच नसते आणि गंमत म्हणजे लोकही त्यामुळे चिडलेले, त्रस्त झालेले नसतात. कारण मुंबईच्या जीवनाची गती त्यांच्या अंगात भिनलेलीच नसते. त्यांच्या कार्यक्रमाचे प्लॅनिंगही त्यामुळेच भरगच्च केलेले नसते. उदा० कोणा पाहुण्याला हावड्यावर आणायला जायचे किंवा पोचवायला जायचे म्हणजे दिवसभर जायचाच असे धरूनच तो दिवस बाजूला काढला जातो. स्टेशनवर जायला कितीही जवळून निघायचे असो, किमान २–३ तास आधी निघावे लागते. कारणे दोन. वाहतुकीसाठी कोणत्याही प्रकारचे वाहन मिळण्याची शाश्वती नाही. दुसरे कारण जगप्रसिद्ध हावडा ब्रिज. कलकत्त्यासारख्या महत्त्वाच्या शहराला सबंध देशाशी जोडू शकणारा हा एकच एक झुलता पूल गंगेवर बांधलेला आहे आणि सामान लादून जिवापाड ओढत जाणाऱ्या हातगाडीवाल्यापासून ते ट्रॅम, बस, ट्रक्स वगैरे विविध गतीची वाहने चोवीस तास या पुलावरून जात असतात. एखादा अपघात, एखादी गाडी बंद पडणे असा प्रसंग घडणे सहज शक्य असते आणि मग हावडा ब्रिजवर ट्रॅफिक जॅम होतो. दोन्ही अंगांनी प्रचंड रांगा लागतात दोन-तीन तासांची सहज निश्चिती. तारा पंडित सांगत होत्या, मोठाल्या टोपल्या घेऊन हमाल तयारच असतात आणि अडलेल्या प्रवाशांची सुटका करणे केवळ त्यांच्या हातात असते. पायपीट करूनच स्टेशनवर जावे लागते आणि हे प्रसंग कलकत्तावासियांच्या जीवनात बरेच वेळा येत असतात. कलकत्त्याची वाहतूकव्यवस्था इतकी वाईट का याच्या कारणांमध्ये मी नंतर जाणार आहे. सध्या तर ट्यूबरेल्वेचे काम चालू आहे. त्यामुळे बरेच रस्ते एकतर्फी केले आहेत. काही बंदच आहेत. हेही एक महत्त्वाचे कारण आहे; पण कलकत्त्याच्या जीवनातील जो मंदपणा, अघळपघळपणा, अकार्यक्षमता जाणवते त्याची सुरुवात ह्या वाहतूकव्यवस्थेपासून होते. या विस्कळितपणामुळे घरापासून कामाचे ठिकाण ते परत घर या दोन वेळच्या प्रवासासाठीच इतका वेळ जातोय् की, १४ तास माणूस घराच्या बाहेरच. गंमत म्हणजे तशा बसेस बऱ्याच आहेत. सारख्या येत असतात आणि येतात त्या मधमाशांच्या पोळ्यांसारख्या माणसांनी लगडलेल्या. जेथे जेथे हात धरायला सापडेल आणि पायाचे बोट टेकू शकेल त्या त्या ठिकाणी माणसे उभी असतात. अगदी बसच्या मागे स्टिपनीवर पाय ठेवून छताला पकडून माणसे बसचा वापर करतात. डबलडेकर बस एखादीच. तिचा मागचा भाग इतका कलंडलेला की, जमिनीपासून फक्त दोन अंगळे वर. कंडक्टर कसा काय तिकिटे देऊ शकतो याबद्दल आश्चर्यच वाटते आणि माणसे इतक्या भयंकर परिस्थितीत रोज प्रवास करूनसुद्धा कशी काय समाधानी वृत्ती ठेवू शकताहेत याचेही कौतुक वाटते. कंडक्टरची व उतारूंची भांडणेही फारशी ऐकली नाहीत. बायकाही धीटपणे अशा भयानक गर्दीत चढत-उतरत असतात. त्या सर्वांच्या सोशिकतेचे कौतुक करतच रोज मी त्या बसेसकडे असहायपणे पहात असे. साध्या बसेसखेरीज मिनी बसेस खाजगी चालकांच्या कलकत्त्यात चालतात. साध्या बसेसच्या तिप्पट, चौपट भाडे असते. उभ्याने प्रवासाला परवानगी नाही. टॅक्सीज् मात्र फारच कमी असाव्यात. एका माहितीप्रमाणे १ कोटी लोकसंख्येच्या या शहरात फक्त ४,५०० टॅक्सीज् पळतात. त्यामुळे ऑफिसेस सुरू व्हायच्या आणि सुटायच्या वेळेस रस्त्यावर बसची वाट पहाणारांची इतकी प्रचंड गर्दी चौरंगीवर असायची की, तास–दोन तास सहज ताटकळत उभे रहाण्याशिवाय गत्यंतर नसे. पहिल्या दिवशी हावडा स्टेशनवर आणि संध्याकाळी चौरंगीवर मी हा प्रतीक्षेचा अनुभव घेतला आणि भयंकर हादरून गेले. नऊ–दहा दिवस कलकत्त्यामध्ये कसे काय काढायचे याच्या चिंतेत त्यानंतर मी सकाळी आठलाच बाहेर पडायला लागले आणि रात्री नऊनंतर घरी परतायला लागले.

या वाहतूकव्यवस्थेच्या जोडीला दळणवळणाचे दुसरे साधन दूरध्वनी. कलकत्त्याहून आठ आण्याचे नाणे टाकून बोलण्याची दूरध्वनी योजना जवळजवळ अस्तित्वात नाहीच. शिवाय इराणी नावाची पहाटे चार ते रात्री एकपर्यंत उघडी असणारी संस्थाही नाही. दुकानादुकानातून फोन ठेवण्याची पद्धत नाही. एकूण कलकत्तावासियांना दूरध्वनी नावाच्या आधुनिक यंत्राची फारशी गरज लागत नसावी. कारण वेळेची महती त्यांना मुंबईकरांसारखी कळली नसावी. तेथील 'मंद' जीवनाची आणखी एक खूण. शिवाय दूरध्वनी, बरेच वेळा बिघडलेले असतात वगैरे मुंबईच्या दूरध्वनीच्या खोड्या थोड्या जास्तच प्रमाणात तेथील दूरध्वनिव्यवस्थेच्याही अंगात भिनल्या होत्या.

कलकत्त्याच्या या गोंधळात व अकार्यक्षमतेमध्ये आणखी भर म्हणजे 'विजेचा दुष्काळ!' ज्या राज्यात भारतातील जास्तीत जास्त कोळसा सापडतो, त्याच राज्यात थर्मलपॉवर मिळू नये आणि दिवसातील कोणत्याही वेळी 'लोडशेडिंग' करण्यासाठी अंधारात रहाण्याची पाळी यावी हे कलकत्तावासियांचे दुर्दैव आहे. याचा परिणाम उद्योगधंद्यांवर तर होतोच आहे; पण लिफ्टस् वेळी-अवेळी बंद पडल्यामुळे कचेऱ्या, ऑफिसेसमध्येही भयंकर गोंधळ उडू शकतो.

सतत बाहेर फिरणाऱ्यांना जाणवणारी कलकत्त्याची आणखी एक त्रुटी म्हणजे उडुप्यांच्या हॉटेलाचा अभाव. एकूणच कलकत्त्याला

दूरध्वनि ४४१५७५

**पशुखाद्य, फिशमील, खते, सेंद्रिय रसायने**

ह्यांच्या खरेदी-विक्रीसाठी

**फेवराईट फिशरिज**

( Favorite Fisheries )


शिवडी क्रॉस रोड, मुंबई ४०० ०१५

ाअरकंडिशन्ड, दोन आकडी भावाची हॉटेले सोडली तर खाली २–३ रुपयात पोटभर जेवण देणारी स्वच्छ व चांगली हॉटेले हा प्रकार कमीच आढळला. रस्त्यावर पावभाजी देणारे आणि पाणी-पुरी वाढणारे भय्ये तर जवळजवळ नाहीतच. दिल्ली, मुंबई एवढेच काय पुणे सुद्धा आता या खानपानाच्या बाबतीत मागे नाही. पुण्याची नवी हॉटेले तर 'इंटिरिअर डेकोरेशन' वगैरे जरा थाटातच करतात. मला वाटते बाहेर खाणे हे एकेका प्रदेशाचे वैशिष्टय असते हे जेवढे खरे त्याहीपेक्षा तो एक संपन्नतेचाही निकष आहे. पांढरपेशावर्ग, व्यापारीवर्ग यांची जेवढी वाढ आणि भरभराट मुंबईत झाली तशी कलकत्त्यात झालीच नाही.

### परंपरेत मुरलेले शहर


याचाच परिणाम म्हणजे अजूनही कलकत्त्याच्या लोकांच्या पेहेरावातसुद्धा आमूलाग्र बदल झाला नाही. मला १९५५ सालची मुंबई आठवतीय्. अजूनही रस्त्यावर धोतरवाली कारकून मंडळी ऑफिसात जाताना दिसायची. विशेषत: ट्रॅममुळे तर फारच. त्या वेळच्या मुंबईशी तुलना करावीशी वाटते. आजही कलकत्त्याचे किती तरी बाबू मोशाय धोतराचा सोगा धरून ऑफिसला जातात. कॉलेजच्या तरुण मुली मुख्यत: साड्या नेसतात. ट्राऊझरस्चे प्रमाण फारच कमी आहे. मिडी, मॅक्सी तर सोडाच. पोरांच्या पॅन्टसही खूप फॅशनेबल, फलकारणाऱ्या नाहीत. कपड्यांवरून कलकत्ता शहराचे दारिद्र्य नजरेत भरते. मुंबईला फोर्टमध्ये गेलात की फॅशनेबल तरुण मुलींचे, स्त्रियांचे थवेच्या थवे दिसतात. नोकऱ्याही खूप मुली करतात. कलकत्त्याला मुंबईच्या मानाने नोकऱ्या करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. तीव्र बेकारीचा परिणाम स्त्रियांच्या बेकारीवर झाला असावा.

कलकत्त्यात एकूणच श्रीमंतीची बेटे असावीत. त्याची चुणूक मधूनच दिसून येते; पण ती बेटेच मुंबईसारखी वाहाणारी श्रीमंती, श्रीमंत व अतिशय गरीब यांच्यामधला 'बफर' पांढरपेशावर्ग–ज्याचेही जीवनमान खूपच सुधारलेले आहे, उदा० चाळीतील पुष्कळांच्याकडे सर्रास टेलिव्हिजन असणे–या संपन्नतेच्या खुणा कलकत्त्याला फार कमी आढळतात. एकूणच चित्र दिसते ते सर्वसाधारण दारिद्र्याचे.

Drive a good bargain

Repower your vehicle with KIRLOSKAR RET-4 diesel for 80% fuel economy



Compact and light weight, Kirloskar RET-4 is an ideal engine for dieselization of your vehicles like vans, wagons, and jeeps.

**Features**:

- Maximum power : 65 bhp @ 3500 rpm
- Specially designed combustion chamber to ensure
  - instantaneous response
  - pollution-free clean exhaust gases
  - low combustion noise
- Special cylinder block designed to dampen noise levels
- Compact design (weight to power ratio: 3;23)
- Automatic fuel injection timing device for the entire speed range
- Repowering needs less time and only a few conversion accessories

RET-4 diesel..wonder child of Kirloskar R&D..good for any road..incomparable for reliability and performance

***Choose Kirloskar RET-4 diesel...Cut your fuel bills by 80%.***

Kirloskar

**KOEL SALES & SERVICE**
(A branch of Kirloskar Oil Engines Ltd)
Kothrud, Pune 411 029
® Registered User:
Kirloskar Oil Engines Ltd
Pune 411 003

PRATIBHA 7726

**—: CONTACT :—**

*Authorised Distributors* :

## M/s. S. M. Ghatge & Sons.

**Pune – Bangalore Road, Kolhapur - 416 005.**

**Off. & Res. Phone : 5371**

मुंबईसारखी विषमतेची बोचणारी दरी तेथे नसावी. कलकत्त्याच्या कामगारांची पगारपातळी निश्चितच मुंबईतील कामगारांच्या सर्वसाधारण पगारपातळीपेक्षा कमी होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकूण दारिद्रय असूनही कलकत्त्याच्या एकूण ९० लाख लोकांपैकी ३० लाख लोक झोपडपट्टयांतून रहातात. मुंबईची लोकसंख्या कलकत्त्यापेक्षा थोडी कमी असूनही (७० लाख) झोपडपट्टीवासियांची संख्या ३१ लाख म्हणजे कलकत्त्याच्या एवढीच आहे. याचा अर्थ मुंबईला भरभराटीच्या बरोबरीनेच श्रीमंत व गरीब यांच्यातील दरीही अधिक वाढली आहे.

## ' मैदान '

कलकत्त्याचे आजचे सर्वसाधारण चित्रण रेखाटताना कलकत्त्याच्या ' मैदाना 'ला विसरून चालणार नाही. मुंबईकरांना शिवाजीपार्कबद्दल जेवढे प्रेम वाटणार नाही त्याहून जास्त प्रेम, जिव्हाळा कलकत्तावासियांना या मैदानाबद्दल आहे. कारण कलकत्त्याच्या लोकांचे राजकारणावरचे असीम प्रेम व्यक्त करायची संधी त्यांना या मैदानात मिळते. या मैदानाची व्याप्ती प्रचंड आहे. ४–५ शिवाजीपार्कस् सहज तेथे मावतील आणि असे सांगितले जाते की, या मैदानातील आजपर्यंतची सर्वांत मोठी सभा ८-१० लाखांची झालेली आहे. मुंबईतील सर्वांत मोठी सभा मला आठवतीय ती १९७७ सालच्या लोकसभेच्या निवडणुकीपूर्वीची इंदिराबाईंची सभा. जास्तीत जास्त साडेतीन लाख लोक या सभेला हजर होते. त्या सभेच्या दुप्पट तिप्पट मोठी सभा म्हणजे कलकत्तावासियांच्या राजकारणावरील गाढ प्रेमाची साक्षच म्हणायला हवी आणि स्त्रियाही मोठ्या संख्येने उपस्थित असतात म्हणे. ती मला गंमत वाटली. नोकरीत स्त्रियांचे प्रमाण कमी, कारखान्यात कमी, राजकारणातही त्या मानाने कमी तरी एकूण स्त्रियांनाही राजकारणाचे भान आपल्याकडील मानाने बरेच असते अशी अनेकांची ग्वाही होती. तारा पंडितांच्या वर राहणाऱ्या मध्यमवर्गीय बंगाली गृहिणीशी बोलताना ते लक्षात आलेच. पक्षांबद्दल पक्षपाती पद्धतीने बोलताना खूप लोक आढळले. ' आम्ही अ–पॉलिटिकल आहोत ' असे कौतुकाने सांगणारे कमी.

जहाल राजकारण : या सगळ्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर कलकत्त्याचे जहाल राजकारण, झुंजार राजकारण हळूहळू कळायला लागते. लाल झेंडे आणि मोर्चे हे तर नेहमीचेच दृश्य. एस्प्लनेड, रायटर्स बिल्डिंग (सचिवालय), विधानसभा, डलहौसी स्केअर ह्या ' ॲक्शनच्या ' जागा. माझा एक छोटा भांडवलदार मित्र गाडीतून जाता जाता मला म्हणालाच, ' या मोर्चांनी अगदी सतावून सोडलंय्. प्रत्येक दिवशी ट्रॅफिक वळवायला लावतात. ' स्टेट्समन नावाच्या दैनिकातील ' कलकत्ता नोटबुक ' या सदरामध्ये या मोर्चांवर औपरोधिक भाष्य आलेच होते. ' रोज रंगणारे हे नाटक पुन्हा सुरू झाल्यामुळे कलकत्त्याच्या जीवनात रंग भरू लागला आहे ' असा त्याचा सूर होता. मी गेले तेव्हा दोन लाख ज्यूट कामगारांचा ४९ दिवसांचा संप समाप्त झाला आणि ते कामावर रुजू होऊ लागले होते. प्रेस कामगारांचा संप दोन महिने चालू राहून वाटाघाटीपर्यंत पोचला होता. ट्रेड युनियनच्या कार्यकर्त्यांना विचारले तर ते सांगत होते, आमच्याकडे आणीबाणी गेली पाच वर्षे होती, सिद्धार्थ शंकर रेंच्या कारकीर्दीपासून. सबंध ट्रेडयुनियन चळवळ मारून टाकली होती. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांवर तर भयंकरच दहशत होती.आता पांच वर्षांनी जरा लोकांना आवाज काढायला मिळाला, लोकशाही चळवळी सुरू झाल्या, आता कलकत्ता जिवंत वाटायला लागलेय्.

एक टॅक्सीवाला मात्र खूष होता ' रें 'च्या कारकीर्दीत. पोलीसराज होते म्हणून खरी शांतता होती म्हणे. होता उत्तर प्रदेशीय. बंगाल्यावर त्याचा राग. जरा अपघात झाला, कोणाला धक्का लागला की, रस्त्यावरचे सर्व गोळा होतात आणि दोष कोणाचा वगैरे विचार न करता ड्रायव्हरला बडवितात हा त्याचा आक्षेप. ते मात्र कलकत्त्याला सहज जाणवते. रस्त्यावर चालणाऱ्या लोकांमध्ये केवळ ' ट्रॅफिक सेन्स ' नाही असे नाही. एक प्रकारची बंडखोरी व गरिबीची वर्गजाणीव असे अनेक घटक पादचाऱ्यांच्या ' डिफायन्स 'मध्ये आढळून येतात. मोटारींना माणसे घाबरत नाहीत, नमत नाहीत, लाचार होत नाहीत. दुसरे मला कळले ते स्त्रियांचा छेड काढायचा प्रयत्नही कमी होतो आणि कोणी केलाच तर संतप्त सहप्रवासी चांगला धडा शिकवितात. स्त्रियांबद्दलचा इतपत आदर मला अजून सरंजामशाही काळात रेंगाळणाऱ्या संस्कृतीचाच निदर्शक वाटतो किंवा काही लोकांच्या म्हणण्याप्रमाणे तेथील जहाल राजकीय वातावरणाचाही हा परिणाम असेल.

असे हे कलकत्ता. कोणत्याही सरकारला आव्हान देऊन उभे आहे.


उद्योजक बनण्याची आपली महत्त्वाकांक्षा आहे का ?

तर मग

**' लघुउद्योग '** मासिक

आपण वाचलेच पाहिजे.

औद्योगिक घडामोडींचा आढावा घेणारे मराठीतील मासिक.

( वा. व. रु. १५ )

पत्ता :

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित**

**कृपानिधी, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८**

१९७७ साली राज्यावर आलेल्या डाव्या आघाडीच्या सरकारने हे आव्हान स्वीकारले आहे आणि कदाचित त्या आश्वासनावरच कलकत्त्याचे नागरिक आजचे हे कष्टाचे जीवन सोशिकपणे जगताहेत. बदलाची चिन्हे दिसू लागली आहेत. रस्त्यावरचा कचरा आजकाल बऱ्याच प्रमाणात उचलला जातोय. ट्रक्स कमी आहेत. त्यांच्या ऑर्डर्स गेल्या आहेत. म्युनिसिपल कर्मचाऱ्यांच्या सतरा संघटना आहेत. त्यांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. टयूब रेल्वेच्या कामाला सुरुवात १९७४ पासून होऊनही आजपर्यंत काम थबकत चालले होते. आता कामाला गती आलीय. रात्रीअपरात्री काम सुरू आहे. धुडुम धडाम आवाज आणि वेल्डिंगची प्रकाशफुले यांच्या सान्निध्यात कलकत्तावासियांना झोप चांगली येते. कारण उद्याच्या सुखी वाहतुकीची स्वप्ने पडताहेत. चौरंगीवर खोदलेल्या मातीचा एक प्रचंड डोंगर तयार होऊन त्यावर गवताच्या काड्या उगवल्या आहेत. 'विजेची टंचाई'-घालविण्यासाठी ५२ बोइनची ऑर्डर इंग्लंडला दिली आहे; पण 'केंद्राच्या' अडवणुकीमुळे कलकत्त्याचा अंधार अजून काही काळ असाच चालू राहीलसे दिसतंय्. एका दुर्लक्षित शहराला आकार येऊ लागला आहे. गेल्या काही वर्षांच्या असंतोषाचे आणि वादळी राजकारणाचे फळ काही प्रमाणात लोकांच्या हाती पडण्याची शक्यता तयार झाली आहे. ❊

## : दोन :

## राजकारणाची वादळी वर्षे

प. बंगालमधील आजचे राजकारण समजावून घ्यायचे असेल तर गेल्या पाच निवडणुकांचे निकाल ओझरते तरी नजरेखालून घातले पाहिजेत. १९६७ सालानंतर तसे पाहिले तर प्रत्येक राज्यातच काँग्रेसच्या आसनाला हादरे बसले. काही ठिकाणी संविद सरकारे आली; पण त्या सर्वांहून प. बगालचा इतिहास अनेक अर्थाने वैशिष्टयपूर्ण आहे. येथील काँग्रेसविरोधाला नेहमीच 'लाल रंग' चढलेला होता. १९६७ व १९६९ या दोन्ही वेळच्या निवडणुकीतील संयुक्त आघाडयांमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे वर्चस्व होते. दोन्ही वेळच्या सरकारांचा कालखड वादळा कालखंड ठरला आणि केवळ वैयक्तिक लाथाळयांमुळे नव्हे, तर काही प्रमाणात तात्त्विक मतभेदांमुळे या संयुक्त आघाडीतील पक्षांमध्ये फूट पडली. पहिल्या वेळी सरळ सरळ केंद्रसरकारने कायद्याचे उल्लंघन करून विधानसभा बरखास्त केली. १९६९ साली १४ पक्षांची मिळून संयुक्त आघाडी बनली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा त्यातील सर्वांत मोठा पक्ष होता. या पक्षाचे व बंगला काँग्रेस या दुसऱ्या मोठ्या घटक पक्षाचे मतभेद हे दुफळीला मुख्यत: कारणीभूत झाले. बंगला काँग्रेसचे मुख्यमंत्री अजय मुखर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाच्या अधिकारात स्वत: राजीनामा दिला व सर्व मंत्रिमंडळ बरखास्त करून टाकले. चार महिने वाट पाहून मंत्रिमंडळ बनविण्यासाठी पुढे कोणी येत नाही असे दिसल्यावर त्या वेळचे गव्हर्नर श्री. धवन यांनी राष्ट्रपतिराजवट प. बंगालमध्ये आणली. १९७० सालीच संयुक्त आघाडीचे सरकार असतानाच हिंसाचाराला सुरुवात झाली होती. जमीनसुधारणेच्या प्रश्नांवरून आणि कुळांना जमिनी ताब्यात देण्यावरून ठिकठिकाणी संयुक्त आघाडीच्या अंतर्गत पक्षांतील कार्यकर्त्यांमध्ये झगडे व्हायला लागले होते. या झगडयांचे पर्यवसान पुष्कळ ठिकाणी मुडदे पाडण्यात होऊ लागले होते आणि दुसरीकडे या संसदीय पद्धतीलाच विरोध करणारा नक्षलवादी पक्ष सशस्त्र क्रांती व वर्गशत्रूंची हत्या करण्याचे तत्त्वज्ञान घेऊन जोर धरू लागला होता. १९७० साली एप्रिलमध्ये नक्षलवाद्यांनी कलकत्ता शहरात 'गुरीला' तंत्र वापरून हत्या करायला सुरुवात केली होती. १९ मार्च १९७० ला बंगालमध्ये चार वर्षांच्या आत दुसऱ्यांदा राष्ट्रपतिराजवट आली. त्यानंतर १९७१ साली पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या. याही वेळी कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नाही. म्हणून १९७२ साली बांगलादेश युद्धानंतर इतर राज्यांसमवेत पुन्हा प. बंगालमध्ये निवडणुका झाल्या. १९७१ साली झालेल्या निवडणुकांमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने काही ठिकाणी दहशत दाखवून मते मिळविण्याचा प्रयत्न केला असा आरोप केला गेला. मात्र याचा वचपा काँग्रेस (R) ने मार्च १९७२ च्या निवडणुकीत पुरेपूर काढून घेतला. १९७१ पासूनच राष्ट्रपतिराजवटीचा फायदा घेऊन नक्षलवाद्यांविरुद्ध मोहीम सुरू करण्याचे निमित्त केले गेले आणि ठिकठिकाणी अनेक निरपराध तरुण मारले गेले. मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या १७५ कार्यकर्त्यांची या काळात हत्या झाली आणि ३५० कार्यकर्त्यांना गंभीर जखमा झाल्या. मार्क्सवादी पक्षाचे सशस्त्र कार्यकर्ते एवढया मोठ्या सरकारी व काँग्रेसी गुंडांच्या हल्ल्यांना पुरे पडणे शक्यच नव्हते. कित्येक ठिकाणी कार्यकर्त्यांना जिवाच्या आकांताने पळून जावे लागले आणि निवडणुकीच्या दिवशी पक्षाची स्थिती एवढी वाईट होती की, पोलिंगबूथवर उभे राहण्यासाठी कार्यकर्ते येऊ शकले नाहीत ! पक्षाचे सहानुभूतीदार मतदार दहशतीमुळे घरी राहिले. अशा वातावरणात झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला प्रचंड यश मिळाले. बंगलादेशच्या युद्धातील विजय आणि काँग्रेसमध्ये फूट पडून इंदिरा गांधींची पुरोगामी बंडखोर प्रतिमा या दोन्हींचा फायदा मिळून प. बंगालमधील काँग्रेसला खतपाणी मिळाले होते.तरीही सर्वानुमते मोठ्या प्रमाणावरील जबरदस्ती, खोटे मतदान आणि सरकारी यंत्रणेची याला सर्वतोपरी मदत हे या निवडणुकांचे वैशिष्टय म्हणावे लागेल. १९७२ ते १९७७ पाच वर्षे राज्यामध्ये काँग्रेस (R) ची अनिर्बंध सत्ता चालू होती. म्हणूनच आणीबाणीचा असा वेगळा त्रास या राज्यामध्ये जाणवलाच नाही. शासनयंत्रणा किती दमन करू शकते आणि लोकांचे आवाज बंद करू शकते याचे प्रात्यक्षिक तेथे सतत पाच वर्षे अनुभवायला मिळाले. ट्रेड युनियन चळवळ तर दडपली गेलीच होती; पण जमीनसुधारणेचे झालेले प्रयत्नसुद्धा पुन्हा मागे फिरविले गेले. अनेक कुळांना जमिनीवरून हुसकावून लावले गेले.

१९७७ साली देशातील लोकशाही आकांक्षांना उधाण आले आणि आश्चर्य म्हणजे जवळजवळ खच्ची झालेल्या डाव्या पक्षांच्या संघटना पुन्हा तरारून उभ्या राहिल्या आणि या वेळी नुसती संयुक्त

आघाडी नव्हे, तर डाव्या पक्षांची संयुक्त आघाडी स्थापन करून कम्युनिस्टांच्या हाती सत्ता आली. एवढेच नव्हे तर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले. गेली कित्येक वर्षे चालू असलेली अस्थिरता सध्या तरी संपुष्टात आल्यासारखी वाटते आहे. आघाडीच्या अंतर्गत पक्षांमध्ये बरेच ताणतणावे असले तरी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या निर्विवाद बहुमताच्या दबावाखाली हे मतभेद दबून राहिले असावेत. कोणत्याही पक्षाने आघाडी सोडली तरी सरकार कोसळू शकत नाही याची पक्षांना जाणीव आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षही तावून-सुलाखून गेल्या दहा वर्षांच्या अनुभवातून बाहेर पडला आहे आणि नव्या प्रगल्भतेने परिपक्वतेने राजकारण करतो आहे, तसेच शासकीय कारभार चालवतो आहे, असे आजचे सर्वसाधारण चित्र आहे.

### मध्यम वर्गीयांचा प्रभाव

असा हा येथील राजकीय मंथनाचा इतिहास. इतके तळागाळापासून ढवळून निघालेले राजकारण इतर कोणत्याच राज्यात– केरळ सोडून– सापडणार नाही.

बंगालच्या राजकारणाचे वैशिष्ट्य असे की, सुशिक्षित पांढरपेशा वर्गाचे राजकारणावरील वर्चस्व. काँग्रेस असो की कोणताही डावा पक्ष असो, त्यांचे लोकप्रिय पुढारी बुद्धिजीवी, शक्यतो परदेशी शिक्षण घेतलेल्या, संपूर्ण व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्ती असतात. बंगालमध्ये यांना भद्रलोक म्हणतात. इंग्रज पहिल्यांदा बंगालमध्ये स्थिरावले म्हणून असेल; पण तेथील उच्च जातींनी इंग्रजी शिक्षण लवकर स्वीकारले. इतकेच नव्हे तर, 'इंग्रजाळलेल्यांचा' एक विभागच या भद्रलोकांमध्ये तयार झाला होता. त्यांनी इंग्रजांची भाषा, रीतीभाती उचलल्या, एवढेच नव्हे तर मनानेही ते इंग्रजांचे गुलाम झाले होते. याउलट इंग्रजी शिक्षणाचा परिणाम होऊन नवीन अस्मिताही तयार होत होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस अशा तरुणांचे क्लास तयार होऊ लागले होते. बलसंवर्धन क्रांतिकारी वाङ्‌मयाचा अभ्यास, राष्ट्रीयत्वाची जोपासना करणाऱ्या साहित्याची चर्चा, असे त्यांचे स्वरूप असे. बंकिमचंद्रांच्या 'आनंदमठ' कादंबरीचा त्यांच्यावर बराच प्रभाव होता. हे तरुण झपाटलेले असत. १८९७ ते १९०० या कालात कधी तरी अनुशीलन समिती तयार झाली. अरविंद घोष आणि बरींद्र घोष हे दोघे भाऊ या संघटनेच्या बांधणीसाठी बरीच मदत करीत होते. या संघटनेला खरा प्रतिसाद मिळाला तो १९०५ च्या बंगालच्या फाळणीमुळे जी संतापाची लाट तरुणांमध्ये उठली त्या सुमाराला. पूर्वबंगालमधील हिंदूंना त्यांच्या मातृभूमीपासून तोडायचे आणि मुस्लिम बहुसंख्यांक असलेला वेगळा प्रांत करायचा असा इंग्रजांचा कावा असल्याचे जनतेच्या लक्षात आले होते. यानंतर या समितीभोवती बरेच तरुण जमले व या समितीने उघडउघड दहशतवादाचा पुरस्कार करायला सुरुवात केली. 'जुगांतर' नावाचा पेपरही त्यांनी सुरू केला. यानंतर जवळ जवळ १९३० पर्यंत अनेक छोटेमोठे दहशतवादी गट बंगालमध्ये तयार झाले होते आणि आजच्या राजकारणातील अनेक पक्षांची व व्यक्तींची मुळे या दहशतवादी संघटनेपर्यंत जाऊन पोचतात.

### मुख्यमंत्र्यांची परंपरा

बंगालचे पहिले मुख्यमंत्री श्री. प्रफुल्लचंद्र घोष हे या भद्रलोकांचेच प्रतिनिधी. बंगालचे लाडके नेते डॉ. बी. सी. रॉय हेही सुशिक्षित उच्चवर्गीय समाजातील. पूर्वीच्या संघटना काँग्रेसचे पुढारी व आता जनताचे राज्यपातळीवरील अध्यक्ष पी. सी. सेन हे गांधीवादी– स्वतःचे कपडे स्वतः धुणारा हा गृहस्थ–हाही भद्रलोकच आणि सिद्धार्थ शंकर रे तर अस्सल इंग्रजांच्या प्रदेशात शिक्षण घेऊन पुरता 'अँग्लीसाइन्ड' होऊन आलेला तथाकथित पुरोगामी गृहस्थ. सध्याचे कम्युनिस्ट मुख्यमंत्री श्री. ज्योती बसूसुद्धा लोकांमध्ये आपली प्रतिमा राखून आहेत ती एवढा शिकलेला, उच्चवर्णीय माणूस, उमद्या व्यक्तिमत्त्वाचा म्हणूनच. त्यांना गमतीने बंगालच्या राजकारणातील 'उत्तम कुमार' म्हटले जाते. पक्षाबद्दल विशेष सहानुभूती नसली तरी ज्योती बसूंवर प्रेम करणारी माणसे अनेक सापडतील. ज्योती बसूंचे शिक्षण झालंय इंग्लंडला. कृष्णमेनन यांनी चालविलेल्या इंडिया लीगचे ते क्रियाशील सभासद होते. पुढे ब्रिटनमधील कम्युनिस्ट पक्षाशी त्यांचा संबंध आला होता. १९४६ पासून ते सतत विधानसभेवर निवडून येत आहेत. संसदीय राजकारणातील तज्ज्ञ म्हणून त्यांचा नावलौकिक आहे.

बंगालचा मुख्यमंत्री होण्यासाठी दोन मुख्य गोष्टींची आवश्यकता असते असे गमतीने म्हटले जाते. एक तर त्या व्यक्तीला रुबाबदारपणे इंग्लिश बोलता यावे लागते आणि दुसरे केंद्रसरकारशी आव्हाना-


## तुमच्या लघुउद्योगातून प्रचंड यश मिळवा!

**महाराष्ट्र व गोवा येथील उद्योजकांना आम्ही नाना प्रकारे सहाय्य करतो.**



OMSSIDC

Radical

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित**
'कृपानिधी', ९, वालचंद हिराचंद मार्ग
बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८
फोन: २६ ११ २१

त्मक भूमिकेने वागता यावे लागते. बंगालच्या राजकारणातील नायकांची परंपरा पाहिली तर हे सहज लक्षात येते. चित्तरंजन दास, सुभाषचंद्र बोस हे त्यांच्या बंडखोरीमुळे लोकप्रिय झाले. सुभाषचंद्रांनी काँग्रेसच्या मध्यवर्ती नेतृत्वाचे दडपण नेहमीच झुगारून दिले. त्याच परंपरेतील विधनचंद्र रॉय–बंगाल्यांचे लाडके मुख्यमंत्री. एका लोहियावाद्याने अशी टीका केली की, कम्युनिस्टांनीसुद्धा बी. सी. रॉयना उचलून धरले होते. काँग्रेसवर हे लोक आग पाखडतील; पण बी. सी. रॉयना काँग्रेसपासून वेगळे काढतील. यांच्याच परंपरेत मोडणारी ज्योती बसूंची प्रतिमा आहे. पी. सी. घोषांनी येथल्या राजकारणातील महत्त्वाची नस ओळखली नाही आणि म्हणून त्यांना लोकांनी व्यक्ती म्हणून नाकारले. ते नेहमी काँग्रेस पक्षाच्या मध्यवर्ती नेतेमंडळींच्या आज्ञेत राहिले. त्यांनी Confrontation ची भूमिका घेतली नाही. सिद्धार्थ शंकर रेंच्या बाबतीतही हाच आरोप आहे. शिवाय त्यांच्या अतिउच्चभ्रूपणामुळेही ते जनतेपासून दुरावले.

महाराष्ट्राशी तुलना करता तेथील ब्राह्मण, कायस्थ व वैद्य या तीन जातींचा राजकारणावरील प्रभाव कायम असणे व सुशिक्षित मध्यमवर्गाच्या हातात राजकारण सोपविण्याची परंपरा चालू राहणे या गोष्टी मला वेगळ्या वाटल्या. महाराष्ट्राचा पहिला मुख्यमंत्री ब्राह्मण असला तरी थोड्याच वर्षात येथील सत्तारचनेमध्ये बदल होऊ लागला आणि सहकारी साखर कारखान्यांचे जाळे विणून येथील श्रीमंत शेतकऱ्यांनी राजकारणावर आपली मांड पक्की बसविली. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आज बहुजन समाजातील लागतो.

कोणा एके काळी हाताला घट्टे पडलेला, स्वतः जमीन कसलेला श्रीमंत शेतकरी राज्यकारभाराची धुरा हाती घेतो आणि अल्पशिक्षित असूनही वर्गहिताचे राजकारण बरोबर खेळतो. येथ वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होऊ शकतात. बंगालमध्ये अजूनही जमिनीवर ब्राह्मण, कायस्थ, वैद्य या उच्चवर्णीयांची मालकी आहे. जोतेदार (जमीनदार) वर्ग म्हणून आज हेच लोक उभे राहिलेले आहेत. त्यांचे राजकारण आजपर्यंत काँग्रेसने केले, आता जनता पक्ष करीत आहे. मात्र या लोकांनी कधीही हातात नांगर धरलेला नाही. बंगालमध्ये जमीन सुधारणेचा वेग सर्वांत कमी आहे, एवढेच नव्हे तर कमाल जमीन मर्यादा कायद्याखाली निघालेली जमीनही ताब्यात घेऊन तिचे वाटप करण्याचे गेल्या तीस वर्षांतील सरकारांनी नाकारले आहे. हा तेथील जमीनदारीचा पुरावा आहे. पाटबंधारे, कालवे यांच्या बऱ्यापैकी सोयी होऊनसुद्धा प्रत्यक्षात अन्नधान्य भरपूर उत्पन्न होत नाही. याचे कारण ही जमीनदारी पद्धत आहे. खंडाने शेत कसायला घेण्याची 'वर्गादारी' पद्धत आहे. 'बर्गा' म्हणजे बिघा सारखेच मोजमाप. 'बर्गा' खंडाने कसायला घेण्याची पद्धत आहे.

## जहाल राजकारणी विविध पक्ष

बंगालच्या कम्युनिस्ट पार्टीचा इतिहासही जहाल आहे. मुझफ्फर महमद आणि काझी नझरुल इस्लाम हे कलकत्त्यातील पहिले कम्युनिस्ट. नंतर मात्र १९३४ पर्यंत दहशतवादी संघटनेतील बरेचसे लोक कम्युनिस्ट पक्षाला सामील होत राहिले. १९३० ते १९३४ या काळात २१६७ दहशतवादी बंगालमधील वेगवेगळ्या तुरुंगात होते. 'अनुशीलन कमिटी', 'जुगांतर' अशा अनेक गटांचे तरुण तेथे मार्क्सवादाच्या प्रभावाखाली आले. गांधीजींचा अहिंसावाद या दहशतवाद्यांना मानवणे शक्य नव्हते.

मात्र बंगालमध्ये पहिल्यापासूनच कम्युनिस्टांमध्येही अनेक गट पडलेले दिसतात. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाच्या बरोबरीनेच येथे एम्. एन्. रॉय यांचा रॉयिस्ट गट सुरू झाला होता. काँग्रेसच्या अंतर्गत जहाल तरुणांनी एकत्र येऊन काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टी स्थापन केली होती. जयप्रकाश नारायण आणि मिनू मसानी हे त्यांचे संस्थापक होते. 'अनुशीलन' समितीचे बरेच लोक तुरुंगातून सुटून आल्यावर या पक्षात सामील झाले होते. पुढे याच लोकांनी फुटून निघून रिव्होल्यूशनरी सोशॅलिस्ट पार्टी (RSP) स्थापन केली. गांधीजींच्या राजकारणाबरोबर नमते घेण्याला, तडजोडवादाला त्यांचा विरोध होता. त्रिदिव चौधरी, जोगेशचंद्र चटर्जी हे या पक्षाचे संस्थापक. यांनी १९४२ साली कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाला (CPI) विरोध केला आणि ब्रिटिशांना युद्धाला मदत करण्याचे नाकारले. आजही बंगालमध्ये हा पक्ष मुळे रोवून आहे. सध्याच्या डाव्या आघाडीमध्ये पक्षाचे २० आमदार आहेत.

(RCPI) : या पक्षांच्याच जोडीने १९३४ साली सौमेंद्रनाथ ठाकूर यांनी कम्युनिस्ट लीगची स्थापन केली. एम्. एन्. रॉय यांना विरोध करण्यासाठी सौमेंद्रनाथ मॉस्कोला गेले होते. त्या वेळी थर्ड इंटरनॅशनलची कृपा एम्. एन्. रॉय यांच्यावर होती. सौमेंद्रनाथ स्टॅलिनचे मन वळविण्यात अपयशी झाले. त्यानंतर ते सात वर्षे जर्मनीत होते. याच सुमारास ते ट्रॉट्स्कीवादी झाले आणि १९३४ च्या सुमारास भारतात परत आले. बंगालमध्ये त्यांना बरेच अनुयायी मिळाले. विशेषतः कॉलेजच्या तरुणांमध्ये. १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत कम्युनिस्ट लीगने हिरीरीने भाग घेतला. सी. पी. आय्. च्या 'लोकयुद्ध' या सिद्धांताला त्यांचा विरोध होता. त्याच वेळी त्यांनी आपल्या पक्षाचे नाव बदलून रिव्होल्यूशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (RCPI) असे नाव ठेवले. अजूनही या पक्षाचे काम बंगालमध्ये चालू आहे. सध्याच्या डाव्या आघाडीमधील हा एक पक्ष आहे.

## फॉरवर्ड ब्लॉक

फॉरवर्ड ब्लॉक हा आणखी एक मार्क्सवादी पक्ष आज पश्चिम बंगालच्या राजकीय पटावर आहे. या पक्षाची सुरुवात सुभाषचंद्र बोसांनी केली. १९३९ साली काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागल्यावर सुभाषचंद्रांनी सर्व डाव्या गटांची सैलसर एकजूट करायचा प्रयत्न केला. त्या वेळी वेगळा राजकीय पक्ष काढण्याचे त्यांच्या मनात नव्हते. काँग्रेसच्या अंतर्गत डाव्या दोस्तशक्तींची एकजूट करून कायदेभंगाच्या चळवळीला चालना द्यायची असे त्यांच्या मनात होते. त्यानंतर रामगढ येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनानंतर मात्र सुभाषचंद्रांनी नागपूरला बैठक बोलाविली व डाव्या गटांची आघाडी असे स्वरूप न ठेवता पक्षस्थापनेचा निर्णय जाहीर केला. त्यांचा हेतू खालील शब्दात त्यांनी मांडला–'समाजवादाच्या पायावर देशातील जीवनाची पुनर्रचना करण्यासाठी.'

सुभाषचंद्रांनी १९४२ साली दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला स्वस्थ बसून पाहण्याच्या काँग्रेसच्या धोरणाला विरोध केला. हीच ब्रिटिशांशी लढण्याची वेळ आहे अशी त्यांची धारणा होती. आजही सुभाषचंद्रांचे नाव घेत हा पक्ष आपली लोकप्रियता टिकवून आहे. सुभाषचंद्रांसारखा जहाल माणूस बंगालच्या जनतेचा लाडका असतो. त्याच्या नावाचा घोष करीत आणि डावी प्रतिमा उभी करत लोकांचा पाठिंबा या पक्षाने टिकवून ठेवला आहे. त्यांचा झेंडा फार गंमतशीर आहे. लाल पार्श्वभूमीवर झेपावणारा बंगाली वाघ ही त्यांची मूळ निशाणी. आता त्यांनी त्याच्या जोडीला मार्क्सवादी निशाणी विळा-कोयताही घेतला आहे. मार्क्स आणि सुभाषचंद्र हे यांच्या घरात जोडीने भिंतीवर बसलेले असतात.

'(SUC) सोशॅलिस्ट युनिटी सेंटर' हा बंगालमधील 'लाल निशाण पक्ष' म्हणता येईल. तत्त्वनिष्ठेच्या बाबतीत अतिशय कडवे व डावपेच म्हणूनही तडजोड न करणारे आणि अतिशय शिस्तबद्ध पक्ष म्हणून त्यांची ख्याती आहे. हा पक्ष रेव्होल्यूशनरी सोशॅलिस्ट पार्टीतून फुटून बाहेर पडलेल्या लोकांनी स्थापन केला आहे. २४ परगणा जिल्ह्यात यांचे चांगले काम असून त्यांना चांगला पाया आहे. १९६७ आणि १९६९ साली संयुक्त आघाडीमध्ये यांनी भागिदारी केली व त्यांच्या वाट्याला आलेल्या सर्व जागांमधून उमेदवार निवडून आले. पहिल्या सरकारात कोणताच पक्ष कामगारखाते घ्यायला तयार होत नव्हता. कारण तेथे अप्रियता तरी यायची शक्यता होती किंवा कामगारचळवळ नीट ताब्यात ठेवली नाही म्हणून आरोपही यायची शक्यता होती. त्या वेळी SUC ने कामगारखाते मागितले. सुबोध बॅनर्जी कामगारमंत्री झाले. त्यांनी 'घेराओ'चे समर्थन केले व प्रोत्साहन दिले, त्यामुळे त्या वेळी औद्योगिक आघाडीवर सतत गोंधळ राहिला व औद्योगिक भांडवलगुंतवणुकीस अनुकूल वातावरण राहिले नाही असा आरोप सर्व डाव्या पक्षांनी त्यांच्यावर केला. या वेळच्या डाव्या आघाडीच्या सरकारात SUC आणि CPI हे दोन्ही पक्ष नाहीत.

इतरही अनेक छोटे-मोठे पक्ष आज बंगालात आहेत. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट लेनिनिस्ट) तेथे आहे. हा सत्यनारायण सिंग यांच्या नेतृत्वाखालील विभाग आहे आणि त्यांनी संसदीय राजकारण स्वीकारले असून गोपीवल्लभपूरच्या मतदारसंघातून त्यांचा एक आमदार 'संतोष राणा' विधानसभेत निवडून गेला आहे. इतर अनेक छोट्या-मोठ्या गटांविषयी व एकूण नक्षलवादी चळवळीविषयी स्वतंत्रपणेच लिहावे लागेल. सी. पी. आय. चे सामर्थ्य सध्या फारच कमी झालेले आहे. विधानसभेत त्यांच्या फक्त दोन सीटस् आहेत.

## आक्रमक कम्युनिझम

बंगालमधील कम्युनिस्ट चळवळीला दहशतवादी चळवळीची पार्श्वभूमी होती आणि म्हणून येथील कम्युनिझम हा नेहमीच जहाल व आक्रमक राहिला आहे. शिवाय त्यांना मदत झाली ती तेथील सामाजिक व आर्थिक परिस्थितीची. ब्रिटिशांच्या जमीनदारी सेटलमेंट ॲक्टमुळे तेथील जमीनदारांना रयतेची लूट करायचा परवाना मिळाला आणि असे सांगितले जाते की, जेव्हा ३ कोटी रुपयांचा कर ब्रिटिश सरकारला भरायचा असे तेव्हा प्रत्यक्षात ११ कोटी रुपये जमविले जात आणि ही जादा जमा वेगवेगळ्या स्तरांवरील जमीनदारांच्या तिजोरीत जमा होई. यामुळे पिळलेली, नाडलेली जनता ही नेहमीच असंतुष्ट राहिली. त्यातच लोकसंख्येची घनता केरळच्या खालोखाल बंगालमध्ये आहे. त्यामुळे जमिनीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे आणि या सर्वांवर कळस म्हणजे बंगालची विभागणी. पूर्व बंगालमधून अनेक हिंदु कुटुंबे उखडली गेली. आजही आपल्याला असे आढळते की, प. बंगालच्या राजकारणात कृतिशील असलेले अनेक पुढारी, कार्यकर्ते हे पूर्व बंगाली आहेत. किंबहुना पूर्व बंगाली आणि प. बंगाली असा सूक्ष्म भेद प्रत्येक बंगाल्याच्या मनात आढळतो आणि हा घरादाराला, जमिनीला, उत्पन्नाला मुकलेला पूर्व बंगाली तरुण संतप्त न झाला, त्याने आवाज न उठविला तरच नवल. दहशतवादी गटांचे वर्चस्वही पूर्व बंगालमध्ये अधिक होते. याच पार्श्वभूमीवर बंगालमधील बेकार तरुण हा बेकारीमुळे विकल होतो, चिडतो तेव्हा तो जहाल बनतो, डावा बनतो. आपल्यासारखा शिवसेनेचा जन्म तेथे होत नाही. बंगालच्या




Dattaram-WS 143

अर्थकारणाची स्थितिजन्यता, आर्थिक कुचंबणा तेथील राजकारणाला सतत धगधगीत ठेवायला मदतकारक होते. कम्युनिस्ट पक्षाची वाढही या सततच्या आर्थिक प्रश्नांमुळे झगडे करत करत, जनतेमधील असंतोषाला धार लावीत लावीत झाली आहे. दुष्काळ व अन्नासाठी बंड हे बंगालचे विशेष आहेत. १९५३ ते १९६६ पर्यंत सतत ही आंदोलने चालली होती. कलकत्त्याला दर वर्षी बॅरिकेडस् घातली गेली होती. सशस्त्र गाड्या घेऊन लष्कराने गस्त घालण्याची वेळ नेहमी येत होती. १९५९ साली ८९ लोक पोलिस-गोळीबारात मारले गेले. येथील कम्युनिस्ट पक्षाला सरकारी दमनाचा आणि अत्याचाराचा त्रास पहिल्यापासूनच सहन करावा लागला आहे; पण आश्चर्य म्हणजे १९६६ पर्यंत कलकत्त्याला अगदी रक्ताचे सडे पडले तरी ग्रामीण विभाग शांत असायचा. कम्युनिस्टांच्या 'कृषक सभे'ला फार मोठा प्रतिसाद तोपर्यंत नव्हता. आजही ज्योती बसूंच्या भाषणातून कार्यकर्त्यांना संदेश दिला जातो, 'खेड्यात चला!' दुसरी महत्त्वाची गोष्ट होती की, कलकत्त्यासारख्या शहरातसुद्धा कम्युनिस्टांना मुख्य पाठिंबा होता मध्यमवर्गाचा. कामगारांच्या संघटनांमध्ये काम करूनही कामगार 'पैशासाठी लाल झंडा, मतासाठी काँग्रेस' अशाच धोरणाने वागत होते. याचे मुख्य कारण आहे, बंगालचा ६०% कामगार बिहारी आणि उत्तरप्रदेशीय आहे. त्यामुळे जोपर्यंत बिहार, उत्तर प्रदेशात काँग्रेस मजबूत व चिरेबंदी होती तोपर्यंत कलकत्त्याच्या कामगाराचा राजकीय कल लाल झेंड्याकडे वळत नव्हता. मात्र काँग्रेस जेव्हा दुभंगली त्या वेळी या कामगारांचे लक्ष आजूबाजूला वळू लागले. १९६६ नंतर कलकत्त्याच्या कामगार मतदारसंघातून सातत्याने कम्युनिस्ट उमेदवार निवडून येऊ लागले.

## विस्कळित काँग्रेस

या डाव्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर इतर पक्षांची सध्याची स्थिती फारच वाईट आहे. पी. एस्. पी., एस्. एस्. पी. हे पक्ष नेहमीच एक छोटासा कोपरा धरून बसले होते. आज ते जनता पक्षात सामील आहेत. कोळशाच्या खाणीच्या पट्ट्यात कामगारसंघटनांमध्ये एस्. एस्. पी. च्या कार्यकर्त्यांचा बऱ्यापैकी प्रभाव आहे. पूर्वी उत्तरेकडील चहाच्या मळ्यातील कामगारांच्या संघटनाही मुख्यत: ( H. M. S. ) ला जोडलेल्या होत्या. आता तेथे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महत्त्व वाढू लागले आहे. काँग्रेसची पुण्याई आता संपुष्टात आली आहे. पूर्वीसारख्या त्यांच्या गाड्यांच्या ताफ्याचा प्रभाव लोकांवर पडेनासा झाला आहे. पूर्वीचे जोतेदार–काँग्रेसला चिकटून असणारे, काँग्रेस सोडू लागले आहेत. बुडणाऱ्या जहाजाला विचारते कोण? काँग्रेसपैकी स्वर्णसिंग काँग्रेसला जवळजवळ पाठिंबा नाहीच. कोणे एके काळी गाजलेले प्रियरंजनदास मुन्शी–युवक काँग्रेसचे नेते– छत्रपरिषदेचे संघटक– आता एकाकी पडलेले आहेत. तीच स्थिती सिद्धार्थ शंकर रे यांची. इंदिराबाईंच्या किचन कॅबिनेटमध्ये ज्यांचा समावेश होता असे केंद्रस्थानी जाऊ शकणारे हे राजकारणी, आज त्यांची बेलताला रोडवरची भव्य लाल कोठी सुनसान असते. मी सहज घरात शिरून त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला; पण ते बाहेर गेले होते. ऐश्वर्यसंपन्न, खानदानी कोठी त्यांच्या उच्चभ्रू राजकारणाची साक्ष देत होती आणि सुंदर इंग्लिश बोलणारा हा माणूस लोकांपासून किती तुटलेला आहे हेही लक्षात येत होते. मात्र पाच वर्षे इंदिराबाईंच्या आज्ञेनुसार कायदा व सुव्यवस्था राखण्याचे व सर्व विरोधकांना दडपून टाकण्याचे काम त्यांनी इमानेइतबारे केले. त्यांच्याकडील जमेची बाजू एकच की, संजय गांधीला त्यांनी विरोध केला आणि त्याला बंगालच्या राजकारणात पाऊल ठेवू दिले नाही. त्याचे फळही त्यांना मिळाले. इंदिराबाईंनी त्यांना पदच्युत केले.

## उजव्यांना स्थान नाही

जनसंघाला बंगालमध्ये अजिबात पाय रोवता आले नाहीत. १९६७ च्या निवडणुकीत त्याला एक जागा विधानसभेत मिळाली. स्वतंत्र पक्षाला एक मिळाली; पण उजवी विचारसरणी बंगालमध्ये रुजू शकली नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघही तेथे हरला आहे. त्याची कारणे काही प्रमाणात आपण नंतर बघू. त्यामुळे येथील जनता पक्षात प्रामुख्याने संघटना काँग्रेस व एस्. एस्. पी., पी. एस्. पी. यांचेच वर्चस्व आहे. संघटना काँग्रेसचे गांधीवादी तत्त्वनिष्ठ पुढारी प्रफुल्लचंद्र सेन हे आज तेथील जनताचे अध्वर्यु आहेत. कोणत्याही वृद्ध गांधीवादी राजकारण्याप्रमाणे ते हेकट आहेत आणि त्यांच्या हेकटपणामुळेच विधानसभेच्या निवडणुकांमध्ये मार्क्सवादी पक्षाशी दोस्ती करण्याची व जागांची तडजोड करण्याची संधी त्यांनी घालविली आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षालाही अनपेक्षितरीत्या दणदणीत विजय मिळाला. अर्थात् जनता पक्षाचे व कम्युनिस्टांचे अनेक धोरणांच्या बाबतीत पटणेच शक्य नव्हते आणि नंतरही कुरबुरी झाल्या असत्याच. आज जनता पक्षाला एकूण २९४ जागांपैकी फक्त २९ जागा विधानसभेत मिळालेल्या आहेत. म्हणजे असून नसल्यासारखीच त्याची स्थिती आहे. पक्षबांधणीचे काम इतरत्रही चालले नाही तर बंगालमधील डाव्या पक्षांच्या आक्रमक राजकारणाशी संघर्ष करीत पक्षबांधणी करणे फारच कठीण. तरीही ऐंशी वर्षे वयाचा हा वृद्ध राजकारणी अजूनही गावोगावी सभा घेत फिरत असतो. हा गृहस्थ अविवाहित आहे. हाही एक बंगाली विशेष म्हणावा लागेल. येथे चळवळीत झोकून देणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांनी अविवाहित राहण्याची परंपरा आहे. ही परंपरा एकूण दहशतवादी चळवळीला आणि ध्येयवेडाने, क्रांतिकारी उद्देशाने झपाटून जाण्याच्या वारशाला साजेशीच आहे.

**पश्चिम बंगाल विधानसभेत गेल्या चार वर्षांतील महत्त्वाच्या पक्षांची ताकद**

| | १९६७ | १९६९ | १९७२ | १९७७ |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस | १२७ | ५५ | १२० | २० |
| बंगला काँग्रेस | ३४ | ३३ | —— | — |
| जनता | — | — | —— | २९ |
| सी. पी. आय्. [ CPI ] | १६ | ३० | ३६ | २ |
| सी. पी. एम्. [ CPM ] | ४३ | ८० | १३ | १७८ |
| आर्. एस्. पी. [ RSP ] | ६ | १२ | ३ | २० |
| फॉरवर्ड ब्लॉक [ FB ] | १३ | २१ | – | २७ |
| इतर कम्युनिस्ट पक्ष | ७ | ९ | – | १० |
| स्वतंत्र उमेदवार | ११ | ११ | १० | ८ |
| इतर पक्ष | २३ | २४ | ६ | १ |

## : तीन :

# भद्रलोकांचे जहाल राजकारण कामगार–किसानांच्या मध्यमवर्गीय प्रतिनिधींचे सरकार

आतापर्यंत दोन वेळा, १९६७ व १९६९ मध्ये संयुक्त आघाडीचे सरकार प. बंगालमध्ये येऊन गेले. त्यामध्ये डाव्या पक्षांचे दोन्ही वेळा बहुमत होते. तरीही दोन्ही वेळा 'बंगला काँग्रेस'सारख्या भांडवली पक्षाशी समझोता करावा लागला आणि मुख्यमंत्रीपद 'अजय मुखर्जी' या जुन्या कांग्रेसच्याच पुढाऱ्याला द्यावे लागले. त्यांची विचारसरणी काँग्रेसहून कोणत्याही अर्थाने वेगळी नव्हती. फक्त प्रादेशिक पातळीवरील काँग्रेस पुढाऱ्यांशी त्यांचे न पटल्याने त्यांनी 'बंगला काँग्रेस' पक्ष स्थापन केला, ज्याचे अस्तित्व आज उरले नाही आणि म्हणूनच १९७७ साली जे सरकार राज्यावर आले ते खरे डावे सरकार आहे. कारण त्यांतील सर्व पक्ष स्वत.ला मार्क्सवादी म्हणवतात. मार्क्सवादाच्या चौकटीत राजकीय भूमिका मांडतात. त्यातही पुन्हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला निर्विवाद बहुमत मिळालेले असल्यामुळे एका अर्थाने हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचेच सरकार असल्याचे पदोपदी जाणवते. वर्तमानपत्रवाले तर म्हणतातच; पण पक्षाचे कार्यकर्ते, इतर मंडळी यांच्याही बोलण्यात ही भावना पदोपदी व्यक्त होते. शिवाय अखिल भारतीय पातळी-वरही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आज अस्तित्वात आहे. तेव्हा त्या पक्षाची कार्यपद्धती, लाकांमध्ये त्यांची असलेली प्रतिमा, त्यांच स्वत:च्या राजकारणाविषयी केलेले विश्लेषण हे जरा खोलात जाऊन समजून घेतले पाहिजे. विशेषत: प. बंगालमध्ये डाव्या आघाडीचा विजय झाल्यावर सर्वच वृत्तपत्रांतून सतत या सरकारसंबंधी बातम्या येत राहिल्या, मुलाखती येत राहिल्या. एकूण देशामध्ये कम्यु-निस्टांना अनुकूल असे वातावरण फारसे नसताना एका राज्यामध्ये पूर्णपणे कम्युनिस्ट सरकार स्थापन होते ही कुतूहलाची, काळजाची गोष्ट सर्वांनाच वाटत होती. कम्युनिस्टाबद्दल जी काही प्रतिमा भारतातील मध्यमवर्गीय सुशिक्षित माणूस वागवत असतो तिच्याशी हे कम्युनिस्ट कितपत जुळतात याचा तपशील पहायला सुरुवात झाली. इतर कोणत्याही राज्यातील सरकारकडे इतके काटेकारपणे, टीकात्मक पद्धतीने पाहिले गेले नाही, इतके बारकाईने या सर-कारच्या प्रत्यक हालचालीकडे, वक्तव्याकडे पाहिले गेले, जाते आहे. थोडेसे, 'फार टेंभा मिरवत होतात नाही ? आता दाखवा सिद्ध करून !' या थाटात सर्व टीका केली जाते आहे. इतर राज्यांत काँग्रेसविरोधी पक्षांची सरकारे आली म्हणून फार बदल होणार नाही हे सर्वांनीच गृहीत धरले होते; पण कम्युनिस्ट पक्ष राज्यामध्ये अधिकारावर आला म्हणजे त्याच्या बाबतीत दोन अपेक्षा संभवतात. एक तर फार मोठे आर्थिक बदल झपाट्याने घडून येतील अशी अपेक्षा असते. त्यामुळेच त्यांचे निकष सतत लोकांना आर्थिक फायदे काय मिळाले एवढेच रहातात किंवा दुसरी शक्यता कम्युनिस्ट पक्ष या चौकटीत काहीच करू शकणार नाही, क्रांतिकारकत्वाचे बिरुद मिरवत जहालपणा वाढवेल, लढे वाढवील आणि अर्थव्यवस्था अधिकच खराब होऊन लोकांमध्ये असंतोष तरी तयार होईल किंवा अराजकता माजल्यामुळे केंद्रीय सरकार राज्यसरकार बरखास्त करील, अशी असते.

### रंग गुलाबी की लाल ?

गेल्या काही महिन्यांतील प. बंगालवरील लेखांची नुसती शीर्षके जरी पाहिली तरी मला काय म्हणायचे ते लक्षात येईल. 'मेलोड मिलिटन्सी,' 'क्या शेर आराम फर्मा रहा है ?' 'कम्युनिस्ट वूइंग दि मल्टिनॅशनल्स' याच्याच जोडीला 'इंडिया टुडे' या मासिकाचा वार्ताहर आपल्या लेखाचा शेवट असाही करतो, 'ज्यांना पूर्वेला लाल रंग पसरतोय् की काय अशी काळजी लागली आहे त्यांनी खुशाल बिनधास्त असावे. कारण जो रंग पसरलाय् तो फक्त गुलाबी आहे.'

या सर्वाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उत्तर काय ? मला प्रमोद दासगुप्तांशी बोलायची संधी मिळाली नाही. मुंबईहून जाताना अहिल्या रांगणेकरांचे ओळखपत्र बरोबर घेऊन गेले होते. अखिल भारतीय वृत्तपत्राच्या वतीने जाणे वेगळे आणि एका प्रादेशिक भाषेच्या वृत्तपत्राच्या वतीने जाणे वेगळे. प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्राच्या वार्ताहराला भेटण्यात 'ग्लॅमर' तर नाहीच नाही; पण थोडीशी भीती. विकृत काही छापले तर पंचाईत. त्यामुळे जरा भेट मिळण्यात अडचण येईल याची खात्री होती. शिवाय कम्युनिस्टपक्ष भयंकर शिस्तबद्ध. येथही अहिल्याबाईंना म्हटले एखाद्या कार्यकर्त्याचे नाव द्या, पत्ता सांगा, म्हणजे बराच वेळ बोलता येईल. तेव्हाही त्या म्हणाल्या, "माझी फारशी ओळख नाही खालच्या कार्यकर्त्यांशी. शिवाय आमच्या शिस्तीप्रमाणे पत्र पक्षाच्या चिटणिसालाच लिहिले गेले पाहिजे." आणि ही शिस्त माझ्या आड आलीच. गेल्या दोन-तीन दिवस प्रमोदबाबूंना वेळ नाही, मीटिंगमध्ये आहेत, मग गावाला जायचे आहेत अशा फोनवर बातम्या. मी माझे काम सांगितले तरी पुन्हा उत्तर एकच – तुम्ही त्यांच्याशीच बोला. मलाही एकदा 'अधिकृत' धोरण समजावून घ्यायचे होतेच. त्यामुळे कनिष्ठ पातळीवरील कार्यकर्त्यांशी फक्त बोलून उपयोगाचे नाही असे ठरविले. पक्षकचेरीत कोणी मोकळपणाने बोलणार नाही ह्याची खात्री होतीच. त्यामुळे इतरत्र पक्षकार्यकर्त्यांचा ओळख काढायचा माझा प्रयत्न चालू होताच.

प्रमोद दासगुप्ता या माणसाबद्दल खूपच ऐकले होते. भयंकर रागीट, कडवा, कुशल संघटक असं त्यांचे वर्णन कोणत्याही अस्सल कम्युनिस्टाशी सुसंगतच वाटत होते. सत्तरीचा म्हातारा अजून १४ तास काम करतो. ब्रह्मचारी आहे आणि लग्न पक्षाशीच लावलंय्. बाकी कसले व्यसन नाही, फक्त सिगार. या माणसाला भेटायची फार इच्छा होती. असली कडवी माणसे, अनुभवातून तावून-सुलाखून निघून 'स्टील्ड' झालेली माणसे फारशी राहिली नाहीत. 'संतोष राजा' प्रसिद्ध नक्षलवादी पुढारी, त्यालाही भेटले; पण त्याचा

एकारलेपणा वेगळा आणि इंटलेक्युअलीझनमधून आलेला 'कडवे'-पणा वेगळा.

माझे वास्तव्य संपत आले होते. पुन्हा एकदा सकाळी ७-३० वाजता मी डेस्परेटली फोन केला. कोणी तरी उचलला, 'प्रमोदबाबू आहेत का ?' माझा प्रश्न.

'आजारी आहेत.'

'मी पत्रकार. मुंबईहून आलीय्. भेटायचंय्. अहिल्याबाईंनी सांगितलंय्.'

त्या गृहस्थाने थांबा सांगितले आणि थोड्याच वेळात प्रमोदबाबू स्वतः फोनवर आले आणि थोडक्यात सांगायचे तर त्यांनी मला उडवून लावले. माझे काम, भेटण्याचा उद्देश वगैरे सांगितल्यावर, 'कळत नाही, मी आजारी आहे' असा चिडका आवाज पलीकडून. तरी धीर धरून मी विचारले, 'आणखी कोणाला भेटू शकते मी ? आपण मदत कराल का-भेट ठरवायला ?' पुन्हा चिडका आवाज, 'मी कसं सांगू ते ? कळत नाही, मला बोलवत नाही ते. तुमचा तुम्ही प्रयत्न करा !' यापुढे आणखी लोचट होणे शक्य नव्हते. पुढे अधिर चक्रवर्ती म्हणून डाव्या आघाडीचे अधिकृत प्रवक्ते भेटले.

यानंतर विनय चौधरींना भेटण्याची संधी मिळाली. 'लॅन्ड अॅन्ड लॅन्ड रेव्हेन्यू डिपार्टमेंटचे ते मंत्री आहेत. सध्या हे कळीचे खाते आहे. पक्षामध्येही त्यांचे स्थान ज्योती बसू व प्रमोद दासगुप्ता यांच्या खालोखाल आहे. उंचनिंच, धिप्पाड शरीराचे विनयबाबू शेतकरी पुढाऱ्याला न साजेसे शांत वृत्तीचे वाटले. त्यांना जमीनप्रश्नविषयक विचारल्याबरोबर त्यांनी सर्व कम्युनिस्टांच्या सवयीप्रमाणे 'परमनन्ट सेटलमेंट अॅक्ट'पासून इतिहासाला सुरुवात केली आणि पाऊण तासानंतर सध्याच्या प्रश्नांबद्दल व इतर पक्षांकडून घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांबाबत ते बोलायला लागणार इतक्यात सभागृहातून त्यांना बोलावणे आले आणि त्यांनी माझा निरोप घेतला.

प्रशान्त सूर म्हणून 'नगरपालिका, महानगरपालिका' खात्याच्या मंत्र्यांशी अर्धा तास भेट मिळाली. त्यांनी कलकत्त्याच्या प्रश्नांचे मुख्यतः स्वरूप सांगितले. त्यांच्या घरी दरबार भरला होता. आपल्याकडे कोणत्याही नगरसेवकाकडे जशी बाहेर माणसांची गर्दी ठासून भरलेली असते तीच स्थिती मंत्रीसाहेबांची होती. सचिवालयात जाताना गाडीतही ४-५ लोक बरोबर घेतलेले होतेच.

'अमियकुमार बागची' या अर्थशास्त्रज्ञाचीही भेट झाली. हे सध्या सरकारचे आर्थिक सल्लागार म्हणून काम करत आहेत. 'अजित रॉय' म्हणून मार्क्सवादी विचारवंत भेटले. ते 'मार्क्सिस्ट रिव्ह्यू' नावाचे मासिक चालवतात. फार पूर्वी पक्षात होते. सध्या पक्षाच्या बाहेर राहून पक्षाच्या सिद्धान्तावर, कार्यपद्धतीवर सहानुभूतीदाराच्या भूमिकेतून टीका करतात.

## क्रांतीची आवश्यकता

या सर्वांच्या मांडणीवरून आणि आजपर्यंतच्या प्रसिद्ध झालेल्या मुलाखतींवरून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका प. बंगाल-सरकारबद्दल अशी दिसून येते—

देशामध्ये भांडवलदार व भांडवली जमीनदारांचे राज्य आहे, तोपर्यंत वर्गसंघर्ष चालूच रहाणार, पिळवणूक चालूच रहाणार. अर्थव्यवस्थेवर साम्राज्यशाहीची पकड कायम रहाणार आणि अर्थव्यवस्थेचा-विकास 'विकृत' पद्धतीने होत रहाणार. नफा देणाऱ्या मोठ्या, अत्याधुनिक यंत्रे असलेल्या उद्योगधंद्यांची वाढ होत रहाणार. दुसरीकडे शेतीमधील सरंजामी संबंध कायम रहाणार आणि शेतीचा विकास होणार नाही. परिणाम बेकारी, दारिद्र्य यातूनच भांडवलशाहीचा विकास कुंठित होऊन, आर्थिक अरिष्ट येऊन हुकुमशाहीचा जन्म होणार. यासाठी कामगारवर्ग, मध्यमवर्ग, शेतकरी व राष्ट्रीय प्रवृत्तीचा भांडवलदार या चार वर्गांची फळी तयार करायला हवी आणि लोकशाही क्रांतीसाठी प्रयत्न करायला हवेत. ताबडतोबीने हुकुमशाहीचा धोका टाळण्यासाठी केंद्रातसुद्धा 'राष्ट्रीय सरकार' स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

या लोकशाही क्रांतीसाठी प्रयत्न करताना वर्गसंघर्षातून, झगड्यातून लोकांच्या राजकीय जाणिवा वाढवायला हव्यात. त्यासाठी प्रत्येक वर्गाच्या आर्थिक मागण्यांवर वर्गसंघटना बांधायला हव्यात आणि या सर्व वर्गसंघटनांतून पक्षाचे राजकारण जनतेपर्यंत पोचेल व जनता क्रांतीसाठी तयार होईल. सत्ता ही फक्त संसदीय लोकशाही मार्गाने हस्तगत करता येणार नाही. जरूर पडल्यास सशस्त्र संघर्षाची तयारी ठेवावी लागेल. मात्र आज त्या अवस्थेला जनसमूहांच्या चळवळी पोचलेल्या नाहीत तोपर्यंत झगड्यांचे सर्व प्रकार वापरून जनजागृती व जनसंघटना करणे हे पक्षाचे उद्दिष्ट राहील.

## मर्यादित सत्ताही क्रांतिलढ्याचाच टप्पा

एकदा संसदीय लोकशाही मार्ग हाही झगड्याचाच एक भाग ठरला की, मग लोकशाही मार्गाने किंवा मतपेटीतून सत्ता हाती आली की, ती स्वीकारणेही अपरिहार्य ठरते. भांडवली चौकटीतील या सत्तेमुळे आमूलाग्र बदल करणे, आर्थिक ढाँचा बदलणे, वर्गसंबंध बदलणे शक्य नसते; पण लोकांच्या हालअपेष्टा कमी करणे, त्यांना थोडेसे सुख देणे शक्य असते. शिवाय जनआंदोलने बांधणे शक्य असते. लोकांचा सहभाग घेऊन काही चांगल्या कायद्यांची अंमलबजावणी करणे शक्य असते. यासाठी 'जहालपणा' कमी करण्याची गरज नसते; पण फक्त वर्गीय किंवा विभागीय मागण्यांवरच लक्ष केंद्रित न करता सर्व समाजाच्या पुनर्रचनेचा विचार करावा लागतो आणि 'आपल्या' सरकारला यासाठी मदत करावी लागते. भांडवली चौकटीत राहूनही भ्रष्टाचार, वशिलेबाजी न करता शुद्ध चारित्र्य राखता येते आणि राजकीय नेत्यांच्या आदर्श वर्तणुकीचा परिणाम शासनयंत्रणेवर, अधिकाऱ्यांवरही होऊ शकतो व भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो. थोडक्यात 'स्वच्छ प्रशासन' देऊन जनतेवरील अन्याय थोडासा दूर करता येतो. काही प्रमाणात सरंजामी हितसंबंधांना दूर करता येते. एवढी माफक अपेक्षा मार्क्सवादी कम्युनिस्ट बाळगतात.

'तुम्ही क्रांतिकारक असून भांडवली चौकटीच्या अंतर्गत सरकार का बनविता ?' असा प्रश्न विचारल्यावर लेनिनचे कोटेशन पटकन् तोंडावर टाकले जाते. 'तसेच यामुळे तुमच्या जहालपणावर बंधने पडत नाहीत का ?' याला त्यांचे उत्तर आहे, 'वांझ जहालपणा काय कामाचा ? पूर्वीच्या संयुक्त आघाडीच्या अनुभवातून आम्ही खूप शिकलो आहोत. 'कृषक सभांतून' शेतकऱ्यांचे आंदोलन चालवून

जमीन बळकवा मोहीम घेतली. आज ती पुन्हा जोतेदारांच्याकडे परत गेली आहे. तेव्हा कामगार चळवळ, शेतकरी–चळवळ यांची भक्कम बांधणी ( Consolidation) करूनच पुढे जायला पाहिजे. एकाकीपणे एकाच क्षेत्रात दिलेल्या जहाल लढ्यांचा उपयोग होत नाही. तेव्हा हा नवा प्रयोग आम्हाला करून बघायचा आहे आणि आमच्या येथील स्वच्छ प्रशासनाचा व कष्टकरी जनतेसाठी केलेल्या चांगल्या कायद्यांचा, आर्थिक धोरणांचा demonstrative effect– नमुनेदार मॉडेल म्हणून परिणाम देशातील इतर जनतेवरही होईल आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीला हळूहळू देशभर पाठिंबा मिळत जाईल.' थोडक्यात त्यांच्या बोलण्यावरून असे दिसते की कम्युनिस्टांना फक्त आंदोलने करता येतात, रचनात्मक काम करता येत नाही असे होणारे आरोप त्यांना थांबवायचे आहेत आणि आम्हीही किंबहुना फक्त आम्हीच स्वच्छ, प्रामाणिक व कार्यक्षम पद्धतीने कारभार चालवू शकतो हे त्यांना जनतेला विशेषत: मध्यमवर्गीय जनतेला– जिला हिंसेची आणि ढवळून काढणाऱ्या क्रांतीची भीती वाटते तिला– दाखवायचे आहे.

म्हणूनच आजकाल मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची तुलना इटालियन कम्युनिस्ट पक्षाशी केली जातीय आणि युरोकम्युनिझमच्या सिद्धान्ताकडे येथील कम्युनिस्ट पक्ष झुकतो आहे असे मानले जाते. युरो-कम्युनिझमने हिंसक क्रांतीची गरज अमान्य केली आहे आणि कामगारवर्गाच्या 'क्रांतिकारी हुकुमशाही'चा सिद्धान्त धुडकावून लावला आहे. याबाबत ई. एम्. एस्. नंबुद्रीपाद यांना जेव्हा 'धर्मयुग'च्या वार्ताहराने प्रश्न विचारला तेव्हा इ. एम्. एस्. यांनी 'युरो-कम्युनिझम' असा एक सिद्धान्त आहे हेच उडवून लावले आणि प्रत्येक देश आपल्या देशाला अनुकूल पद्धतीने मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा वापर करत आहे असे मोघम उत्तर दिले.

याच सगळ्या वार्ताहरांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा उपरोधही खूप केलाय्– गरीब, कष्टकरी लोकांच्या नावाने टिळा लावत असूनही हा पक्ष खरा मध्यमवर्गीयांचाच पक्ष आहे, त्यांचे लक्षही मध्यमवर्गीयांमध्ये लोकप्रियता मिळावी असेच आहे, त्याचबरोबर ज्या मॅक्नमाराला 'व्हिएटनामचा कसाई' वगैरे नावे ठेवली त्याच मॅक्नमाराकडून वर्ल्ड बँकेचे मिळालेले कर्ज यांना कसे चालते, ज्या बहुद्देशीय कंपन्यांची पकड देशाच्या अर्थव्यवस्थेवर वाढते आहे, त्याच कंपन्यांना हे लोक येथे गुंतवणुकीस परवानगी कशी देतात, वगैरे अनेक टीका आहेतच.

डाव्याकडून होणाऱ्या टीका वेगळ्या. त्यांची मांडणी पुढच्या विभागात करीन. या टीकेला मार्क्सवादी कम्युनिस्टांचे उत्तर पाहू आणि त्यांच्या पक्षाची ताकद समजावून घेऊ. त्यांची काम करण्याची पद्धत समजावून घेऊ.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे म्हणणे, या चौकटीची बंधने आम्ही मानतो आणि त्यामुळेच कलकत्ता शहराची सुधारणा करण्यासाठी दिलेला जागतिक बँकेचा पैसा आम्हाला चालतो. पैशाला कोणताही रंग नसतो. जोपर्यंत अर्थव्यवस्थेची पुनर्रचना होत नाही तोपर्यंत शहरे वाढत जाणार आणि वाढणाऱ्या शहराला नागरी सुखसोयींचा पुरवठा करावा लागणार. परदेशी मदतीचा प्रश्न हा राजकीय नियंत्रणाचा प्रश्न आहे आणि हे राजकीय नियंत्रण केंद्रीय सत्ता हाती आल्याखेरीज शक्य नसते.

बहुद्देशीय कंपन्यांच्या बाबतीतही प्रश्न तोच. आज सरकारकडे भांडवलगुंतवणुकीसाठी पैसा नाही. उद्योगधंदे निघाले नाहीत तर बेकारीचा प्रश्न, दारिद्र्याचा प्रश्न येईल. सबंध देशाची मालमत्ता सरकारच्या हातात म्हणजेच पर्यायाने कष्टकरी लोकांच्या हातात नाही तोपर्यंत त्या मालमत्तेचा वापर कसा करायचा यावर नियंत्रण ठेवणे शक्य नाही. आज प. बंगालमध्ये आधीच ज्या कंपन्या आहेत, त्यांना आम्ही सांगतो, तुमचे नफे येथेच गुंतवा. फक्त आम्ही सांगू त्या जनतेच्या हिताच्या वस्तूंच्या उत्पादनात गुंतवा. त्याच वेळी असेही सांगतो की, कामगाराना अन्यायकारक पद्धतीने वागविता कामा नये. त्यांचे हक्क सांभाळून उत्पादन केले पाहिजे आणि त्याच वेळी त्या कारखान्यांना आम्ही काही सवलती देतो, जे प्रत्येक राज्यसरकार देते. सक्तीने नव्हे, तर मोह पाडूनच त्यांना आकर्षित करावे लागते हे दुर्दैव आहे.

## मध्यमवर्गीय पाया

'मध्यमवर्गीय' पाया असल्याचा आरोप खरा आहे; पण तोही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष अधिकृतपणे मान्य करतो, निदान त्यांच्या अधिर चक्रवर्ती 'या माहिती व सांस्कृतिक खात्याच्या' पक्षप्रवक्त्याने मान्य केला. कलकत्त्यात तर १९६६ पर्यंत कामगार मतदारसंघातून काँग्रेसवाले निवडून यायचे. मुख्यत: पूर्वबंगालमधून आलेला, उखडला गेलेला, भडक डोक्याचा मध्यमवर्ग व उच्च जाती यांचेच राजकीयीकरण लवकर झाले आणि त्यांचा पाया या जहालमतवादी कम्युनिस्टांना मिळाला. किती तरी पक्षनेते पूर्वबंगाली आहेत. १९७८ साली राज्यपातळीवरील जी सहा दिवस परिषद झाली त्यात आलेल्या ३६८ प्रतिनिधींपैकी ३०३ प्रतिनिधी मध्यमवर्गीय पार्श्वभूमी असलेले आहेत, २६ मध्यम शेतकरी आहेत, २३ कामगारवर्गीय आहेत, ७ जोतेदार, ४ श्रीमंत शेतकरी, ४ गरीब शेतकरी, १ शेतमजूर अशी त्यांची वर्गीय विभागणा होती. १९६५ ते १९७१ या वर्षांत पक्षाची सभासदसंख्या बरीच वाढली होती. एवढेच नव्हे तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ज्या जनसंघटना आहेत त्यांचीही संख्या त्या काळात बरीच वाढली होती. सत्ता ही पक्षबळ वाढविण्यास मदतकारक होते असा त्यांचा अनुभव दिसतोय्. १९६७ पर्यंत कम्युनिस्ट पक्ष जरी दोन होते तरी जनसंघटना एकच होत्या. आज मात्र मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वेगळ्या जनसंघटना आहेत. कृषक सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन ( CITU ), स्टुडन्ट्स् फेडरेशन ऑफ इंडिया, डेमॉक्रॅटिक यूथ फेडरेशन, ऑल बंगॉल टीचर्स असोसिएशन या त्यांच्या जनसंघटना आहेत. तसेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनेवर मार्क्सवादी कम्युनिस्टांचा बराच प्रभाव आहे. त्यामुळेच मतदानाच्या वेळी त्यांना मदत होते असा आरोप केला जातो. प्राथमिक शिक्षकसंघटनेवरही त्यांचा प्रभाव आहे म्हणूनच गावोगावी प्राथमिक शाळा पोचावण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट उत्सुक आहेत अशीही टीका ऐकली.

आपल्याकडे थोडीशी शेती असलेला व जोडधंदा म्हणून शिक्षकाचा पेशा पत्करलेला प्राथमिक शिक्षक हा गावच्या टग्यांच्या अंकित असतो, म्हणजेच काँग्रेसशी जोडलेला असतो असा अनुभव आहे.

यामुळेच गावोगावी पोचलेला हा शिक्षक मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षासारख्या जहाल पक्षाबरोबर नाते कसे जोडू शकतो हे कोडेच आहे; पण त्यामुळेच परिवर्तन करण्याच्या प्रयत्नातही त्याचा सहभाग मिळत असेल. कोणी तरी मात्र अशी टीका केली की, ही शिक्षकांची संघटना बळकट असली तरी ती त्यांच्या आर्थिक मागण्यांपुरतीच. हे शिक्षक पक्षाच्या कामासाठी किंवा इतर सामाजिक कामासाठी फारसे पुढे येत नाहीत. तेवढे राजकीय शिक्षण त्यांचे केले जात नाही.


अर्थात मार्क्सवादी पक्षाशी संबंधित जनसंघटनेचा सभासद हा काही लगेच पक्षाचा सभासद होत नाही. बरेच पक्षसभासद मात्र बऱ्याच जनसंघटनांतून काम करीत असतात. त्या त्या संघटनेचे प्रश्न घ्यायचे, आंदोलने उभारायची हे तर त्यांचे नित्याचे काम असते; पण त्याचबरोबर अभ्यासमंडळे चालविणे, राजकीय प्रश्नांबाबत धोरण देणे ही सर्व कामे पक्षसभासदांनी करावी अशी अपेक्षा असते. तसेच जनसंघटना ह्या जास्तीत जास्त लोकशाही पद्धतीने चालाव्यात व पक्षाची धोरणे लादण्याचा प्रयत्न होऊ नये अशा पद्धतीने घटना तयार केलेली असते. त्यामुळेच पक्षाचे धोरण पूर्णपणे न पटूनही जनसंघटनेपुरते सभासद रहाणे शक्य असते. सध्या बंगालमध्ये १००० पूर्ण वेळ कार्यकर्ते आहेत. पक्षाचे आमदार त्यांना मिळणारे वेतन ७५० रुपये पक्षाला देतात. पक्षाकडून त्यांना १५० ते २०० रुपये खर्चासाठी मिळतात. कुटुंबाचा खर्च असेल तर थोडे अधिक मिळतात.

## शिस्तबद्ध कार्यकर्ते

पक्षाचे कार्यकर्ते अत्यंत साधे रहातात हे मात्र सार्वत्रिक मत दिसले. अत्यंत प्रामाणिक, चारित्र्यवान, अभ्यासू, सुशिक्षित, कष्टाळू अशी सर्वसाधारण विशेषणे सर्वच डाव्या आघाडीच्या मंत्र्यांना लावलेली आढळली. जवळजवळ प्रत्येक मंत्र्याच्या मागे तुरुंगवासाची पुण्याई आहेच. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा आणखी एक विशेष सांगितला जातो की, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा किंवा प्रसिद्धी यांच्यापासून दूर रहाण्याची शिकवण त्यांना मिळालेली दिसते.

या सगळ्या शिस्तबद्धतेचा फायदा पुराच्या वेळी दिसून आला. यंदाचा बंगालचा पूर हा महाभयंकर शाप होता. २२२ कोटी रुपयांची पिके आणि ९.५ कोटी रुपयांची मशिनरी उद्ध्वस्त झाली. हजारावर माणसे मेली एवढ्या मोठ्या प्रमाणावरील हाहा:काराला पुरे पडणे केवळ प्रशासकीय तंत्राच्या दृष्टीनेसुद्धा अशक्य होते; पण ठिक-ठिकाणी माणसे उभी राहिली. भारत सेवाश्रम संघ ही रामकृष्ण मिशनशी निगडित संस्था तर त्यात होतीच; पण अनेक परदेशी संस्थाही होत्या. दोन प्रकारचे वाद त्या वेळी उपस्थित झाले होते. काही परदेशी संस्था गावेच्या गावे दत्तक घ्यायला व घरे बांधून द्यायला तयार होत्या. सरकारने त्यांना केवळ घरे बांधायला मज्जाव केला. सामूहिकरीत्या वापरण्याच्या जागा प्रथम बांधून काढल्या पाहिजेत, असे सरकारचे धोरण होते. विशेषत: शाळा, रस्ते व पिण्याचे पाणी. त्यावर खूप टीका झाली. सरकारचे समर्थन होते की, एक तर परदेशी संस्थांची मदत घेताना, राजकीय हेतू नाही ना याची काळजी घ्यावी लागते. दुसरे, काही व्यक्तींना चांगली घरे बांधून मिळाली तर ज्यांना मिळत नाहीत त्यांच्यामध्ये हेव्याचे वातावरण तयार होते. म्हणूनच सार्वजनिक जागा आम्ही महत्त्वाच्या मानतो. दुसरी टीका होती ती अशी— जी मदत पोचवायची ती पोचविण्यासाठी व मदत पोचते की नाही याची पहाणी करण्यासाठी सर्वपक्षीय कमिट्या गावोगावीच्या पातळीवर तयार व्हाव्यात. ही मागणी डाव्या आघाडीने फेटाळून लावली. डाव्या आघाडीचे म्हणणे होते की, पंचायतकमिट्या या लोकप्रतिनिधींच्या कमिट्या आहेत. त्यामुळे सरकारी यंत्रणा व लोकप्रतिनिधी यांच्या मदतीने मदतवाटपाचे काम सुलभ होईल. प्रत्येक पंचायतीच्या ऑफिसमध्ये मिळणाऱ्या मदतीची आकडेवारी देणारा तक्ता लावला जाईल. राजकीय पक्षांनी त्यावर लक्ष ठेवावे. शिवाय राज्यपातळीवर सर्व पक्षांची सल्लागार समिती नेमण्यात आली आहे, त्यामध्ये धोरणविषयक विचारविनिमय होऊ शकेल. इतर पक्षांची टीका अशी की, राजकीय फायदा उठविता यावा म्हणून इतर पक्षांच्या लोकांची मदत घेण्यास नकार दिला. काही ठिकाणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निशाण लावूनही मदतकार्य होत होते.

एक मात्र गोष्ट सर्वांनीच मान्य केली की, कोणत्याही प्रकारची रोगाची साथ पसरली नाही हे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. शिवाय मदत योग्य त्या गरजू लोकांना पुरली की नाही याचा महत्त्वाचा पुरावा म्हणजे शहराकडे निर्वासितांची रांग लागली नाही. लोक जागच्या जागी राहिले आणि त्यांचे पुनर्वसन झाले. घरे मिळाली. रब्बी पिकासाठी खास खते, बियाणे यांची 'किटस्' मिळाली. ९६ कोटींची मदत बऱ्याच प्रमाणात खालपर्यंत पोचली. थोडयाशा बातम्या होत्या, त्यातील काही वस्तू पुन्हा बाजारात


# अरविंद लॉज

**लक्ष्मी व वेंकटरमणाचे देवळाजवळ**

**मार्केट — बेळगांव**

विक्रीसाठी आल्याच्या; पण तेवढ्याच. पुराच्या मदतकार्याविषयी मी मुद्दाम चौकशी केली. त्यावरील प्रसिद्ध झालेले लेख, बातम्या वाचल्या. सर्वांच्याकडून सरकारच्या कार्यक्षमतेचा पुरावा म्हणून निर्वासितांचे लोंढे कलकत्त्यात न येणे ही लक्षणीय घटना म्हणून सांगितली गेली. अशोक शहाणे यांच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मधील लेखासारख्या प्रतिक्रिया कोठेही आढळल्या नाहीत.

तिसरी एक कौतुकाची गोष्ट म्हणजे एवढ्या मोठ्या हाहाःकारात वस्तूंची टंचाई होणे स्वाभाविक आहे आणि व्यापाऱ्यांनी किंमती वाढवून हात न धुऊन घेतले तरच नवल; पण या वेळी पक्षाचे कार्यकर्ते जागोजागी जाऊन दुकानदारांचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत होते. शिवसेनेसारखी नुसती दमदाटी आणि दगडफेकीची भीती नव्हे तर पक्षाच्या धोरणाचा दबाव आणायचा प्रयत्न होता असे अनेक जणांकडून कळले.

'ऑपरेशन बर्गा' ह्याची मोहीम सुरू झाल्याबरोबर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कलकत्त्यामध्ये रस्त्यारस्त्यावर संघटितपद्धतीने नाकेसभा घेतल्या व पक्षाचे धोरण समजावून सांगितले.

सध्या पक्षाचे 'रेड स्क्वाड' अस्तित्वात आहे की नाही कळले नाही; पण १९६९ साली पक्षाने ५०,००० स्वयंसेवकांचे पथक उभारायचे ठरविले होते. त्या वेळी विधानसभेवर पोलिसांचा हल्ला नुकताच झाला होता आणि पोलिसांमधील चीड नजरेस पडली होती. प्रमोद दासगुप्तांनी जाहीर सभेमध्ये वेळ पडल्यास आमचे कार्यकर्ते पोलिसडचूटी करतील असे ठणकाविले होते. त्यानंतर या स्वयंसेवकांचा एक मोठा मेळावा मैदानात भरला गेला होता आणि पक्षप्रमुख म्हणून सॅल्यूट घेण्याचा मान प्रमोद दासगुप्तांकडे होता. मेळाव्यानंतर लाल रुमाल बांधलेली स्वयंसेवकांची पथके सबंध शहरामध्ये फिरून आली होती.

अशा प्रकारे सुसज्ज पक्षसंघटना बांधणारा, शिस्तबद्ध काडर उभे करणारा हा गृहस्थ प्रमोद दासगुप्ता. १९६९ साली लोकसभेच्या सभापतीला क्षमायाचनेचे पत्र पाठविण्याची पाळी याच्यावर आली होती. 'सशस्त्र लढ्याची गरज भासेलच' अशा जाहीर सभेत केलेल्या विधानाचा जाब त्यांना द्यावा लागला होता. आज या क्रांतिकारी जहालपणाला सत्तेचे लगाम आवर घालण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### पराभूत कालखंड

या सगळ्या वर्णनाच्या पार्श्वभूमीवर १९७० ते १९७७ च्या मार्चपर्यंत पक्षसंघटनेत आलेला विस्कळितपणा आणि पक्षाचा जवळजवळ बंद पडलेला आवाज समजू शकत नाही. सरकारी दमनयंत्रणा फार ताकदवान आणि बलाढ्य होती हे जरी मान्य केले तरी कामगार-शेतकऱ्यात इतका रुजलेला हा पक्ष (१९६९ साली पक्षसभासदसंख्या २१,००० होती, सीटूची बंगालमधील सभासदसंख्या आजमितीस ६ लाख आहे.) सरकारविरोधी प्रतिकारशक्ती अजीबात कशी उभी करू शकली नाही ? कार्यकर्त्यांना


धगधगत्या उन्हाळ्यात

आइस प्लँट्स,
रेफ्रिजरेशन, एअर कंडिशनिंग
ह्यांच्यामुळेच मिळतो दिलासा !!
नवे प्लँट्स उभारायचे असोत,
जुन्यांची दुरुस्ती असो
सर्वच तऱ्हेच्या कामासाठी

स्वस्तिक रेफ्रिजरेशन

(एअरकंडिशनिंग/रेफ्रिजरेशन इंजिनियर्स, काँट्रॅक्टर्स व कन्सल्टंट्स

शर्मा निवास, ४ था माळा, न्यू प्रभादेवी रोड
दादर, मुंबई क्रमांक ४०० ०२५

दूरध्वनि c/o ४६३३१३

आपापल्या भागात राहणे अशक्य झाले होते. तारा पंडितांच्या वर राहणारी बंगाली गृहिणी तिच्या बहिणीच्या नवऱ्याची हकीकत सांगत होती. तो पक्षकार्यकर्ता होता. त्याला कॅन्सर झाला; पण 'मस्तान'ने (विभागाचा दादा) त्या भागात यायला बंदी केली. बिचाऱ्याला दुसरीकडे जाऊन राहावे लागले. कुटुंबाबरोबर राहण्याची बंदी. पथ्यपाणी नीट झाले नाही आणि वयाच्या चाळिसाव्या वर्षी तो मेला !

असे सांगतात की, १९७७ सालीसुद्धा निवडणुका झाल्या तेव्हा कार्यकर्ते परतले नसल्यामुळे निवडणुकांच्या बूथवर हजर राहायला पुरेशी माणसे नव्हती. १९७४ नंतर कॉंग्रेसने ट्रेड युनियन्ससुद्धा फोडायला सुरुवात केली होती. ट्रेड युनियन कार्यकर्त्यांना मिसाखाली तुरुंगात घातले होते. सूडबुद्धीने कामावरून कमी केलेल्या कामगारांची संख्या खूप वाढली होती. याचा परिणाम ट्रेड युनियन चळवळीवर झाला होता. १९७४ मध्ये २ लाख सभासदसंख्या सर्वमिळून युनियन्सची होती ती १९७६ मध्ये केवळ २८ हजार झाली होती. थोडक्यात पक्ष व चळवळ पराभूत मन:स्थितीत होती. विधानसभेच्या निवडणुकांच्या वेळी जनता पक्षाबरोबर आघाडी करून निम्म्या जागा त्यांना द्यायला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तयार झाला होता यावरून हेच दिसून येते. मात्र त्या वेळी जनता पक्षाच्या पी. सी. सेनना दुर्बुद्धी सुचली आणि लोकमताचे पिकलेले फळ अल्लद पक्षाच्या पदरात पडले व पूर्वपुण्याईचा फायदा मिळाला.

### अंतर्गत मारामाऱ्या व गोंधळलेली जनता

हे का झाले ? लोकांची राजकीय जागृती कोठे गेली ? असंतोषाचे उद्रेक कसे झाले नाहीत ? याचे कारण असे दिसतेय की, १९६९ साली डाव्या पक्षांच्या अंतर्गत ज्या मारामाऱ्या सुरू झाल्या, जी आक्रमकता झाली त्यामुळे सामान्य जनतेमध्ये गोंधळ तयार झाला. जोतेदारांविरुद्ध झगडा समजू शकतो. शत्रू कोण, मित्र कोण स्पष्ट असते; पण आपापसात झगडा करायला लागल्यावर बाजू कोणाची घ्यायची ? १९७० साली संयुक्त आघाडीचे सरकार कोसळल्यावर तर हा गोंधळ आणखीनच वाढला. कारण नक्षलवाद्यांच्या नावाने पोलिसखात्याने आता खून सुरू केले. पोलिसखात्याने संघटित-पद्धतीने पद्धतशीरपणे आपले लोक, गुंड मस्तान यांना नक्षलवादी पक्षाचे तळागाळाचे कार्यकर्ते म्हणून पाठवायला सुरुवात केली. विशेषत: कलकत्ता शहरात तर हे फारच मोठ्या प्रमाणात घडले. तरुण पोरांची भरती खूप मोठ्या प्रमाणात झाली. सांस्कृतिक क्रांतीचे ते दिवस होते आणि त्यांचे नाव घेऊन मुख्यत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांचे शिरकाण त्यांनी केले. या सगळ्या गोंधळामुळे लोक काहीसे राजकारणापासून अलिप्त राहू लागले. गाफील झाले आणि नंतर १९७२ साली जेव्हा सिद्धार्थ शंकर रे यांचे सरकार आले आणि कॉंग्रेसने छात्रपरिषदेच्या नावाने उघड उघड हल्ले सुरू केले किंवा पोलिसांनी झडत्या घेणे, छापे घालणे, पकडून नेणे, गोळीबार करणे असा नंगा नाच सुरू केला त्या वेळी


**आपले शरीर अनेक व्याधींनी त्रस्त आहे का ?**

**संधिवात, सांधेदुखी, त्वचेचे रोग, सर्दी, पडसे, वात, श्वसनक्रियेतले अडथळे....**

ह्यापैकी कशानेही आपल्याला पीडित केले आहे का ?

असल्यास आमच्याशी संपर्क साधा

**दी तुळशी ऑइल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी**

(Mfg Lic No AYU"727/78 of 5-10-78)

द्वारा मर्क्युरी कॉर्पोरेशन दी जनरल ॲश्युअरन्स बिल्डिंग

१ ला मजला, २३२, डॉ. डी. एन. मार्ग, मुंबई ४०० ००४

**डॉक्टर्स, वैद्य, हकीम, आयुर्वेदिक औषधालये व आयुर्वेदिक संशोधन प्रशाळा ह्यांनी प्रशंसलेले**

**तुळशी तेल**

**व सर्व व्याधींवरील रामबाण उपाय**

सर्वत्र स्टॉकिस्टस व प्रचारक विक्रेते नेमणे आहेत

जागृत होऊन या सगळ्या विरुद्ध आवाज उघडण्यासाठी कोणी कार्यकर्ते उरले नव्हते. त्यांचा असंतोष शिडात घेणारा कोणी पक्ष उरला नव्हता. ते नि:शस्त्र होते आणि मूकपणाने सहन करीत होते. आपापसात केलेल्या मारामाऱ्या, पक्षप्रभाववाढीचे प्रयत्न डाव्या पक्षांना फार महागात पडले. या वेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ताकही फुंकून पितो याचे कारण ते आहे. लोकांना बरोबर घेऊनच प्रत्येक पाऊल पुढे टाकले पाहिजे. लोकांच्या नावाने आपापसात लढण्यात अर्थ नाही हे बहुधा समजून आले असावे.

### आक्रमक प्रतिमा कायम

असे असूनही आज मार्क्सवादी कम्युनिस्टांबद्दल त्यांच्या बरोबरीच्या मित्रपक्षांची प्रतिक्रिया काय? मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष भयंकर आक्रमक आहे. आपल्या संख्याबळाच्या जोरावर वर्चस्व गाजवितो, दादागिरी करतो. पक्षाचा प्रभाव वाढविण्यासाठी ठिकठिकाणी स्पर्धा चालू आहे. पूरसाहाय्यवितरणाच्या वेळेस काही ठिकाणी पक्षाची मंडळी पक्षाचा झेंडा घेऊन येत असत आणि वाटप चालू असेल तेथे रोवत असत. जणू यांच्या पक्षातर्फेच वाटप चालू आहे असे भासविण्यात येई. सरकार सर्व पक्षांचे मिळून आहे. कापणीच्या वेळी चकमकी उडणे ही तर बंगालमध्ये सर्वसामान्य गोष्ट आहे. जोतेदार मंडळी एका कुळाला काढून दुसऱ्या कुळाला जमीन कसायला देतात आणि कायद्याचा भंग करतात. कायद्याने वारसाहक्काने जमीन कसायला मिळते. अशा परिस्थितीत दोन कुळांच्यामध्ये आपापसात भांडण लागते. अशा वेळी एक बर्गदार एका पक्षाकडे जाऊन आपली तक्रार नोंदवतो. दुसऱ्या बर्गदाराला दुसऱ्या पक्षाकडे जावे लागते. मग पक्षांच्या कार्यकर्त्यांची आपापसात भांडणे लागतात व स्वतःच्या पक्षाच्या सहानुभूतिदाराला कायदेशीर हक्क मिळावा म्हणून प्रयत्न होतात. १९६९ साली संयुक्त आघाडी सरकार असतानाही अशाच प्रकारची भांडणे व मारामाऱ्या होऊन त्यांचे रूपांतर हिंसेत होई. जोतेदार कुळाला काढून टाकण्यासाठी हिंसक मार्गाचा वापर करी, उभे पीक कापून नेई, ते प्रकार वेगळेच. त्या वेळी खरा वर्गसंघर्ष होई. यंदाही वृत्तपत्रांतून डाव्या पक्षांच्या आपापसातील मारामारीच्या बातम्या आल्या. (RSP) व (CPM) या दोन आघाड्यांच्या पक्षकार्यकर्त्यांच्या भांडणात खूनही पडले.

जनता पक्षाचे आरोप काहीसे जोतेदारांच्या बाजूने आहेत. बर्गदार कायद्यातील नवीन सुधारणेप्रमाणे बर्गदाराने आपण या जोतेदाराकडे वर्षानुवर्षे काम करतो असे जमिनीच्या प्रत्यक्ष जागी, साक्षीदारांसह (JLRO) कडे सिद्ध केले की, जमीन त्याला कसायला मिळते. त्याच्या नावाची नोंद होते आणि एखाद्या जोतेदाराला जर हे पसंत नसेल तर त्याला कोर्टात जाऊन ही घटना चुकीची आहे असे उलट सिद्ध करावे लागते. मार्क्सवादी पक्षाचा मुद्दा असा आहे की, कोर्टात जाऊन सिद्ध होईपर्यंत बर्गदार भुका मरणार नाही. जनता पक्ष म्हणतो की, 'कायदा सरकारने हातात घेता कामा नये. क्रमाने जाऊ दे.'

काही ठिकाणी मात्र जोतेदार मार्क्सवादी पक्षाचा किंवा (RSP) चा आधार घेऊ लागले आहेत आणि जेथे या पक्षांना विशेष पाया


A to Z Service to
**Plastic Industries**

Contact–
**Advani Machinary & Controls**
D. R. Bahri Nagar. Mahul, BOMBAY 400 074
Phone : 52 67 66

Also Manufacturers of :
**Custom Built Electronic Equipments.**
**Electrical Controls & Various Components**
for
**Plastic & Textile Wet Processing Machinaries**

नाही तेथे हे पक्षही या जोतेदारांची मदत घेत आहेत असे आरोप होते.

पूर्वीच्या सरकारच्या राजकीय सूडाला बळी पडलेल्या कार्यकर्त्यांना जे पेन्शन द्यायचे आहे त्याही बाबतीत मार्क्सवादी कम्युनिस्ट आपल्या पक्षाची वर्णी लावतात, वशिलेबाजी करतात असे आरोप तर सर्रास होतात. मात्र खऱ्या गरजू माणसालाच रक्कम मिळते, त्यात खाबूगिरी होत नाही असे लोक कबूल करतात. (Favouritism) चा आरोप प्रत्येक सत्ताधारी पक्षावर होत असतोच. या सगळ्या आरोपांना कुरबुरीचे स्वरूप आहे. १९६९ सालचे संयुक्त आघाडी सरकार मात्र मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आक्रमक स्वभावामुळे कोसळले असे सांगितले जाते. बंगला काँग्रेसच्या अजय मुकर्जींनी–स्वतः मुख्यमंत्र्यांनी–चौरंगीवर उपोषण सुरू केले होते. ज्योती बसू हे पोलिसखाते स्वतःच्या पक्षाला संरक्षण द्यायला वापरतात असा आरोप होता. या वेळी मात्र मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या परिपक्वतेबद्दल बरीच मंडळी कौतुकाने बोलताना आढळली. खालच्या पातळीवरील विविध पक्षकार्यकर्त्यांची भांडणे पक्षनेत्यांकडे आणावीत असा आदेश आहे.

## बंगालचे वैशिष्ट्य : जहाल मध्यमवर्ग

असा हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष. त्याच्या महत्त्वाकांक्षा फार मोठ्या आहेत. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस व जनताला तिसरा पर्याय म्हणून आपणच आहोत असा दावा आजकाल ऐकू येऊ लागला आहे. मात्र तुम्ही फक्त बंगाल आणि केरळमध्येच कसे? उत्तर भारतात कसे पसरू शकला नाहीत? या प्रश्नाला फारसे उत्तर त्यांच्याकडे नाही. क्रांती अशी निर्यात करता येत नाही हे कबूल; पण त्याचबरोबर काही तरी आत्मनिष्ठ चुका असल्याच पाहिजेत. पक्षाचे मध्यमवर्गीय स्वरूप हे खास बंगालच्या वातावरणात फोफावू शकले आणि तेवढ्यापुरतेच मर्यादित राहिले. मध्यमवर्गीयांचा संकुचितपणा हा गुण त्यालाही चिकटला.

कधीकधी बंगाली कम्युनिझम' अशी काही व्हरायटी आहे का हा प्रश्न उपरोधाने विचारला जातो. कारण प्रत्येक बंगाली माणूस हा आधी बंगाली असतो आणि मग तो कोणत्या तरी राजकीय पक्षाचा असतो. बंगाली अस्मिता टिकविण्याचा त्याचा प्रयत्न पदोपदी दिसतो. अजूनही हिंदी भाषेचा स्वीकार बंगाल्यांनी केला नाही. किंबहुना इतर सर्व राज्ये व मुख्यतः केंद्र सरकार आमच्यावर जाणूनबुजून अन्याय करतात ही भावना सतत जागृत ठेवली गेली. मात्र या भावनेला प्रादेशिकतावादाचे स्वरूप फारसे आले नाही. उलट ही भावना radicalized झाली आणि काही प्रमाणात हा विरोध केन्द्र सरकारला नसून भांडवली व्यवस्थेलाच आहे अशा रीतीने वळविला गेला. अजूनही मधूनमधून 'केन्द्र व राज्यसरकार यांचे संबंध' अशा प्रकारच्या विषयातून आर्थिक मागण्यांबरोबरच प्रादेशिकवादाला खतपाणी मिळते आणि ते या 'जहाल' मध्यमवर्गाला आवडत असावे सबंध कलकत्ता शहरावरच एक मध्यमवर्गीय छाप आहे. प. बंगाल प्रांतात सरंजामशाहीतून बाहेर पडून औद्योगीकरणाचा क्रम सुरू होता होता थांबला गेला आणि अशा या स्थितिजन्य, कोंडलेल्या वातावरणातील हा मध्यमवर्ग संतापून उठला. वैफल्यातून बाहेर पडून बदल मागू लागला. मुंबईसारखे त्याच्या हाती नवनिर्मित संपत्तीतील तुकडे पडले नाहीत. नव्या विकासाला, बदलाला सामोरे जाता आले नाही तेव्हा त्याने आपली अस्मिता जपली, आपली संस्कृती जपली. उत्तम वाङ्मय, उत्तम चित्रपट तयार झाले. बंगालमधील वृत्तपत्रांचा आणि साहित्याचा खप आपल्याहून अनेक पटींनी जास्त आहे. तेथे विचारवंतांची परंपरा तयार झाली आहे. अनेक नावाजलेले अर्थशास्त्रज्ञ कलकत्ता विद्यापीठातून बाहेर पडले आहेत. एक बंगाली मित्र सांगत होता, बंगल्यांना कलकत्ता विद्यापीठाचा इतका अभिमान आहे की, ऑक्सफर्डची प्रोफेसरशिप सोडून ते कलकत्ता विद्यापीठात काम करायला येतात. ती त्यांना प्रतिष्ठेची गोष्ट वाटते.

## कुंठित अर्थव्यवस्थेत फुललेली संस्कृती

प. बंगालमध्ये भांडवलदार हा वर्ग फारच छोटा. ब्रिटिश आले ते प्रथम कलकत्त्यात वसले म्हणून शिक्षणाला सुरुवात लवकर झाली. जमीनदार शिकले-सवरले. डॉक्टर, वकील व सरकारी नोकरी या व्यवसायात पडले. पूर्वबंगालमधून उखडले गेलेले बंगाली आले. त्यांना नोकरी-व्यवसायावाचून गत्यंतरच नव्हते. या सर्वांचा मिळून एक संख्येने मोठा मध्यमवर्ग तयार झाला आणि अगदी तळाला जमिनीत राबण्यासाठी आदिवासी जमाती होत्या. इतर कनिष्ठ जातींचे लोक होते. या मोठ्या संख्येने असलेल्या मध्यमवर्गाने आपले सांस्कृतिक वर्चस्व स्थापन केले. त्याने राजकारणामध्ये आपले कौशल्य दाखविले. 'स्वतः कष्ट करून स्वतःची शेती कसणारा, हाताला घट्टे पडलेला 'मालक शेतकरी' हा प्रकार बंगालमध्ये तयार झाला नाही. कारण जमीन सुधारणा कायदे राबविले गेले नाहीत आणि औद्योगीकरण फारसे न झाल्यामुळे कुळेही जमिनीला चिकटून राहिली. सुपीक जमिनीमुळे फार कष्ट न करताही थोडेफार पीक येत जाईल अशी परिस्थिती होती. उद्योजकता ( enterpreneurial abilities ) तेथे जोपासली गेली नाही, 'सहकारी भांडवलदार' हा प्रकारही बंगालमध्ये निर्माण झाला नाही, जो आपल्याकडे झाला.

अशा निमभांडवली, निमसरंजामी स्थितिजन्य समाजव्यवस्थेच्या कोंदणात बंगालमधील राजकारण जोपासले गेले आणि म्हणूनच त्याला जहाल रंग आला. अशा अर्थाने त्या राजकारणाचा पोत हा आपल्यापेक्षा वेगळा आहे. भांडवली विकासामध्ये तुकडे फेकत कष्टकरीवर्गाला सामावून घेत पुढे जाणारे राजकारण अजून तेथे फारसे मुरले नाही मुंबईच्या व महाराष्ट्राच्या बदलत्या, कासवाच्या गतीने पण विकसित होत जाणाऱ्या समाजाचे पुढारलेले प्रश्न त्यांना तेथे पडलेले नाहीत आणि तेथील कामगारचळवळीलाही नाहीत आणि तेथील शेतकरी चळवळीलाही नाहीत असेच म्हणावे लागेल. मार्क्सवादी पक्षाच्या राजकारणावरील मध्यमवर्गीय छाप ही काही अंशाने परिस्थितीचा व इतिहासाचा वारसा आहे असेच म्हणावे लागेल.

*

# : चार :

# दमनयंत्रणेवर स्वार होण्याचे प्रयत्न

आर्थिक कार्यक्रमावरोबरच डाव्या आघाडीच्या सरकारची राजकीय कामगिरी काय? विशेषतः हुकुमशाही कारकीर्दीचे अवशेष निपटून काढून लोकशाही वातावरण नांदण्यासाठी आवश्यक पावले टाकली गेलीत का? लोकशाही स्वातंत्र्याच्या हक्कांचे संरक्षण केले जाते आहे का? हे प्रमुख प्रश्न कोणाच्याही मनात असतात. विशेषतः 'कायदा व सुव्यवस्था' राखणे व शांतता प्रस्थापित करणे ही कोणत्याही 'जैसे थे वादी' सरकारची प्रमुख चिंता आणि प्रमुख कर्तृत्वही मानले जाते. थोडक्यात जो वर्गसंघर्ष समाजात सुप्त किंवा कधी दृश्य स्वरूपात असतो तो कसा विझेल आणि समन्वयवादी पद्धतीने प्रश्नांची तात्पुरती सोडवणूक कशी होईल याची काळजी घेत सरकारला तटस्थ भूमिकेचा अभिनिवेश ठेवायला लागतो. याउलट डाव्या पक्षाची मुळातील भूमिका ही वर्गसंघर्ष प्रज्वलित करणे व प्रत्यक्ष झगड्यातून समाजवादी परिवर्तनाच्या जाणिवा तयार करणे अशी असल्याने या पक्षांसाठी 'कायदा व सुव्यवस्था' अशी आग विझवणाऱ्या बंबाची भूमिका न घेता लोकांना लोकशाही हक्क वापरण्यासाठी जास्तीत जास्त प्रवृत्त करण्याची भूमिका घ्यावी लागते आणि हे हक्क वापरताना प्रत्यक्ष अनुभवातून आमूलाग्र बदलासाठी हे हक्क किती अपुरे आहेत हेही लोकांना जाणवावे अशा पद्धतीने व्यवहार करावा लागतो. म्हणूनच विशेषतः पोलीस, न्यायालये हे सरकारी यंत्रणेचे उघड उघड दमन करणारे पैलू कसे वापरायचे याबाबतीत काही निश्चित भूमिका घेऊन तारेवरची कसरत करावी लागते. भांडवली चौकटीत एका राज्यसरकारचा कारभार ताब्यात आला म्हणून खऱ्या अर्थाने सत्ता ताब्यात येत नाही. कारण घटना बदलता येत नाही, कायदेकानून बदलता येत नाहीत, कारभारयंत्रणा बदलता येत नाही. कारभारयंत्रणेची चाकोरी बदलता येत नाही. यातूनच तयार झालेली नोकरशाहीची मनोरचना आणि कनिष्ठ पातळीवरील कर्मचाऱ्यांची स्थितिजन्यता व अकार्यक्षमता यातही फारसा बदल करता येत नाही. म्हणूनच नोकरशाही परिवर्तनाचे साधन म्हणून उपयोगी पडत नाही. नित्याची दैनंदिन कामे गाड्यासारखी चालू रहातात. तसेच पोलिसही आहे त्याच कायद्यांचे रक्षक म्हणूनच वागत रहातात. नाही तर त्यांच्यावरही कायद्याचे पालन केले नाही असा आरोप येऊ शकतो. १९६९ साली घडलेल्या काही घटना बरेच काही शिकवून जाणाऱ्या आहेत. एक गोष्ट करता येते, पोलिसांना सयमाने वागा अशा सूचना देता येतात. पुष्कळ ठिकाणी झगडे जेव्हा गरिबांमध्येच आपापसात होतात तेव्हा कार्यकर्त्यांच्या मदतीने, लोकांच्या सहभागाने त्यांची सोडवणूक करता येते. पोलिसांचा हस्तक्षेप कमीत कमी ठेवता येतो. तसेच लोकशाही चळवळीतून जनतेच्या मुक्त होणाऱ्या शक्तो कोणत्या आणि गोंधळाचा फायदा घेऊन लूटमार करणाऱ्या व नुसतीच तोडफोड करणाऱ्या गुंडशक्ती कोणत्या याचा शोध घेऊन त्यातील गुंडशक्तीचा बंदोबस्त करता येतो. अगदी काहीच नाही तर काँग्रेस राज्यात ज्या गुंडशक्ती सरकारतर्फे जाणीवपूर्वक पोसल्या गेल्या होत्या (लोकशाही चळवळींवर हल्ले करण्यासाठी) व सरकारी यंत्रणा, पोलीस आणि गुंड यांची जी साखळी तयार झाली होती ती मोडून काढणे, हा दुवा तोडणे आणि गुंडांना मिळणारी रसद तोडून त्यांना एकाकी पाडणे इतके तरी डाव्या आघाडीला राज्यावर आल्यावर करता येणे शक्य असते.

## अयशस्वी प्रयत्न

ह्या पार्श्वभूमीवर डाव्या आघाडीचा व्यवहार पहाणे आवश्यक आहे. १९६९ साली संयुक्त आघाडीच्या सरकारने निवडणूकजाहीरनाम्यामध्ये पोलिसकोड बदलण्याचे आश्वासन दिले होते, ते त्यांनी केले नाही किंवा करू शकले नाहीत. फक्त पोलिसांनी लोकांची सेवा करावी असा मोघम उपदेश ज्योती बसू करत असत. त्याच्यापूर्वी विरुद्ध पक्ष म्हणून याच पोलिसखात्याविरुद्ध सतत आग ओकली जाई आणि सामान्य पोलिसाला आदेश न पाळण्याचे आवाहन केले जाई. त्याचा सुप्त सूर पोलिसांनी बंड करावे असाच असे. अशा परिस्थितीत एखाद्या प्रत्यक्ष, मूर्त प्रसंगामध्ये पोलिसांनी कसे वागावे हा निर्णय घेणे त्यांना कठीण असे. पोलिसअधिकाऱ्यांनी तर अशा गुंतागुंतीच्या प्रसंगांमध्ये निर्णय घेण्याची जबाबदारी सोडून दिल्यासारखेच झाले होते. शिवाय त्याच काळात एकीकडे नक्षलवाद्यांच्या 'हत्यामोहिमे'ला सुरुवात झाली होती. पोलिसहत्या मात्र संयुक्त आघाडीचे सरकार कोसळल्यावर सुरू झाल्या. वरिष्ठ पोलिसअधिकाऱ्यांना निदान मंत्र्यांशी वगैरे प्रत्यक्ष संवाद साधणं तरी शक्य असते, विशिष्ट प्रसंगी त्यांचा सल्ला ते घेऊ शकतात. प्रत्यक्ष रस्त्यावर काम करणाऱ्या इन्स्पेक्टर्स, कॉन्स्टेबल्स यांना तेही शक्य नसते. शंकर घोष या अमृतबझार पत्रिकेच्या संपादकांचे विश्लेषण असे आहे की, या परिस्थितीत कोणत्याच निश्चित ध्येयधोरणांच्या व सूचनांच्या अभावी एका पोकळीत पोलिसखात्याला त्या वेळी काम करावे लागले होते. एक चौ. मैल विभागामध्ये १ पोलीस असे प्रमाण ग्रामीण भागात पडत असे आणि त्या वेळी राजकीय पक्षांची निरोप देण्याची किंवा बातमी पोचविण्याची, दळणवळणव्यवस्था अधिक शीघ्र होती असे आढळून आले. पूर्वी पोलिसाला लोक घाबरत असत. पोलिस म्हणजे सरकार, सरकारी दंडसत्ता असा आब लोकांमध्ये होता. संयुक्त आघाडीच्या सरकारने पोलिसयंत्रणेला वाऱ्यावर सोडून दिल्यासारखे झाले होते. पोलिसांच्या कृतीचे समर्थन केले जात नसे. त्यांना नैतिक सरक्षण दिले जात नसे. पोलिसांनी अधिकाराचा गैरवापर केला, अतिरिक्त (excesses) वापर केला असा सतत प्रचार होता; पण शंकर घोष यांचे म्हणणे असे की, त्यामध्ये पोलिसांचा दोष फार कमी असून ते त्या वेळच्या काँग्रेस पक्षाचे राजकीय धोरण होते, हे डाव्या पक्षांच्या म्हणावे तितके लक्षात आले नव्हते. त्याचा परिणाम होऊन पोलिसांचे नीतिधैर्य खच्ची झाले. दुसरा एक प्रकार झाला तो असा की, पोलिसखाते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या हाती होते. ज्योती बसू गृहमंत्री होते आणि संयुक्त आघाडीतील इतर पक्षांच्या मते मार्क्सवादी पक्ष पोलिसखाते

स्वतःच्या पक्षबांधणीला मदतकारक होईल अशा रीतीने साधन म्हणून वापरत आहे. यामुळे मार्क्सवादी पक्षाबद्दलचा विरोध व द्वेष पोलिसविरोध म्हणून पुष्कळदा बाहेर पडे आणि काही पोलिस व ऑफिसर्स यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी पुढे येई.

अशाच परिस्थितीत १९६९ साली संयुक्त आघाडीचे सरकार असताना दोन महत्त्वाचे प्रसंग घडलेले होते. दुर्गापूरच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये दोन विद्यार्थ्यांना पकडून नेण्यात आले आणि विद्यार्थ्यांनी संतप्त होऊन पोलिसांवर हल्ला चढविला, त्यांच्या चौकशी-ऑफिसची नासधूस केली, एका सबइन्स्पेक्टरला किडनॅप केले व ओलीस ठेवले. ही बातमी सर्वत्र पसरल्याबरोबर इतर पोलिसस्टेशनवरील पोलिस-ट्रक भरभरून दुर्गापुरला आले. पोलिस जोरजोरात घोषणा देत होते. तेथील पोलिसअधिकाऱ्याला त्यांच्या या बेशिस्तीची भीती वाटली आणि त्यांना शिस्तीत आणण्यासाठी त्याने कृतीची ( action ) तयारी करण्याचा आदेश दिला. तीन पथके तयार करून त्यांनी कॉलेजबाहेर आपआपल्या जागी आदेशाची वाट पहात उभे रहावे अशी योजना होती; पण हा आदेश धुडकावून लावून दोन पथकांनी कॉलेजच्या आत घुसून द्वेषाच्या भरात धुमाकूळ घातला. पहिल्या योजनेप्रमाणे तीनही पथकांमध्ये एकही बंदूकधारी पोलीस नव्हता; पण नंतरच्या पुराव्यात आढळले की, आदेशाला न जुमानता १६ बंदुका आत गेल्या होत्या. कॉलेजच्या आतले दृश्य एखाद्या प्रचंड वादळानंतर उद्ध्वस्त झाल्यासारखे होते.

दुसरा प्रसंग होता २४ परगाना जिल्ह्यामध्ये चौकशीचे काम करत असलेल्या पोलिसपथकापैकी एका पोलिसाला गावकऱ्यांनी बेदम मारल्यामुळे तो मृत्युमुखी पडला, हा. चिडलेल्या पोलिसांनी अलीपूर-हून त्याचे शव घेऊन विधानसभेवर मोर्चा काढला आणि विधान-सभेच्या आत शिरून मायक्रोफोन्स् मोडले, विधानसभेच्या सभासदांना त्यांनी पिटून काढले, सभापतीला खिडकीतून उडी टाकून आपला जीव वाचवावा लागला. ज्योती बसूंच्या खोलीत जाऊन त्यांच्यापुढे निदर्शने केली आणि त्यांनी त्यांना चांगली समज दिल्यावरच जरा शांत होऊन ते बाहेर पडले.

## पोलीसराज

अर्थात् यानंतर मात्र १९७० च्या मार्चमध्ये संयुक्त आघाडी सरकार कोसळल्यापासून ते १९७७ च्या मार्चपर्यंत ८ वर्षे पोलिस-खात्याला चांगलाच अधिकार गाजवायला मिळाला. १९७२ पर्यंत राष्ट्रपतींचीच राजवट होती आणि त्यानंतर मोठ्या प्रमाणात मते फोडणे, पळविणे, बूथ ताब्यात घेणे वगैरे होऊन सिद्धार्थ शंकर रे ची राजवट आली आणि नक्षलवाद्यांना मारण्याच्या नावाखाली सबंध डाव्या चळवळीलाच नेस्तनाबूत करण्याचा घाट घातला गेला. स्ट्रॉंगट्रुपर्स तयार झाले, जागोजागी 'दादा' किंवा 'मस्तान' तयार केले गेले. दहशत तयार झाली आणि नक्षलवादी पक्षाच्या नावाखाली प्रथम मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व इतर डावे पक्ष यांच्या कार्यकर्त्यांना ठार करण्यात आले आणि एकदा दहशत तयार झाल्यावर नक्षलवादी व त्यांचे सहानुभूतिदार यांच्यावर हल्ला चढवून त्यांचा समाचार घेण्यात आला. Midnight Knock चा परिचय बऱ्याच जणांना आणीबाणीत आला; पण बंगालमध्ये १९७२ पासूनच हे सर्व सुरू झाले होते. नुकताच 'फ्रॉंटियर' साप्ता-हिकाचा त्या वेळचे लेख व बातम्या यांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे आणि रानटी समाजालाही लाजवेल अशा प्रकारच्या क्रूर, अमानुषी, जंगली पद्धतीने केलेला हा पोलिसांचा व्यवहार आहे. कलकत्त्यात शिरता शिरताच प्रचंड लांबलचक पसरलेले मैदान नजरेत भरते. माझ्या मित्राने मला आल्याआल्याच ते प्रसिद्ध मैदान दाखविले. जेथे मध्यरात्री घरोघर छापे घालून धरपकड करून आणलेली तरुण मुले पोलिस व्हॅनमधून खाली सोडली जायची आणि ती पळायला लागली की, मशिनगन्स वापरून त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव व्हायचा. पाखरांसारखी पोरे टिपली जायची. पोलिसरेकॉर्ड तयार व्हायचे. 'पाठलाग करता करता, चकमक उडाली व नक्षलवादी मारले गेले.' पोलिसकोठडीत न्या, न्यायाधिशापुढे उभे करा, आरोपपत्र सादर करा, पुरावे द्या, साक्षीदार आणा, खटले चालवा एवढा लांबलचक क्रम हवा कशाला ? शेकडो तरुण मारले गेले. ज्यांच्यावर काही आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत म्हणून ज्यांना तुरुंगातून मुक्त करा असा हुकूम यायचा, त्याही मुलांना तुरुंगातून बाहेर पडून मुक्त हवा छाती भरभरून आत घेताघेता मारले जायचे आणि आदल्या दिवशीची तारीख घालून तुरुंगातून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना मृत्यु असा दाखला दिला जायचा. जणु त्याच्या सुटकेचा हुकूम नंतर हातात पडला. असंख्य अशी उदाहरणे, क्लृप्त्या त्या वेळी योजल्या होत्या.

त्या काळाकुट्ट कालखंडावर प्रकाश टाकता टाकता लक्षात येते की, ज्याला आपण लोकशाही असलेला कालखंड समजत होतो त्या कालखंडातसुद्धा याच लोकशाही देशाच्या एका कोपऱ्यात लोकशाही प्रक्रियेचे कोणतेही सोपस्कार पार न पाडता अनेक तरुण-तरुणींच्या माना मुरगळल्या जात होत्या. त्यांचे आवाज बंद केले जात होते. कानु सरकार व त्याचा मित्र पोलिसछापा आला म्हणून पळू लागले. त्याबरोबर पोलिसांनी गोळीबार केला. त्या दोघांच्या हाती शस्त्रे नव्हतीच. त्याचा मित्र गोळीबारात ठार झाला. कानूही त्याच्या शेजारीच पडला. त्याच्या अंगावर पाच गोळ्या मारण्यात आल्या. तो मेला असे समजून ते निघून गेले; पण कानू जिवंत राहिला आणि आज त्याने त्या ऑफिसरवर खटला भरला आहे. पकडण्यासाठी फार तर जायबंदी करू शकतात; पण मारून टाकण्याचा हुकूम नसताना इतका भयंकर गोळीबार कशासाठी ? असा कानूचा सवाल आहे. कानु सरकार या तरुण मुलाचा प्रसंग भयंकर आहे.

अर्थात् याला Police excesses म्हणायचे की Political excesses म्हणायचे ? मुख्य दोष कोणाला ? कलकत्याला एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याला भेटण्याचा योग आला– त्याने अर्थात त्या वेळच्या पोलिसांच्या कृतीचे ढोबळपणे समर्थन केले. एक तर त्या वेळच्या राजकारण्यांचे तसे हुकूम होते. कलकत्यातसुद्धा कोणत्याही 'मस्तान'ला (म्हणजे आपल्याकडचा 'दादा' गुंड) पकडायचा की नाही हे त्या विभागातील कॉंग्रेस आमदाराला भेटून ठरवावे लागे. अगदी उघड उघड अपराधासाठी, गुन्ह्यासाठी पकडावे लागले तरी तावडतोब जामीन द्यायला कॉंग्रेस आमदार धावून येई. ही घटना त्यानेही मान्य केली. तरीही त्याला सिद्धार्थ शंकर रेची कारकीर्द आवडली होती. कारण हातात काही अधिकार होते. 'कायदा व सुव्यवस्था' कायम

राहिली. मोर्चे, 'बंद', दंगली बंद पडल्या. नक्षलवाद्यांचा नायनाट झाला; पण त्याच वेळी त्याने असेही कबूल केले की, कधीकधी पोलिसांच्या हातून किंचित जास्ती अधिकार वापरले गेले असतील. विशेषतः सामान्य पोलिसाकडून. त्यासाठी त्याने 'सूडसिद्धान्त' सांगितला. नक्षलवाद्यांनी जवळजवळ ५२ पोलिसांची हत्या केली. त्यांची कल्पना होती की, खालच्या सामान्य पोलिसावर हल्ले केले की, त्यांना असुरक्षित वाटेल व आपले वरिष्ठ आपल्याला संरक्षण देत नाहीत, काळजी करत नाहीत या भावनेने बंड करून उठतील; पण तसे न होता सबंध पोलिसखात्याचे Consolidation झाले. एकजूट सांधली गेली आणि नक्षलवाद्यांबद्दल सूडबुद्धी तयार झाली. त्यामुळे अतिरिक्त गोळीबार, गरजेपेक्षा जास्त क्रौर्य काही वेळा दाखविले गेले असेल, अशी त्यांची कबुली होती.

मात्र पोलिसांच्या कृतीबाबत ही राजकीय नेत्यांच्या सांगण्यावरून झालेली घटना आहे किंवा तिची तीव्रताही त्यांना अभिप्रेत असलेली आहे असे सिद्ध करणे कठीण असते. कारण फोनवरून पुष्कळदा बोलणी होतात. तोंडी आदेश दिले जातात.

## पोलिसखात्यावर पुरती पकड

या सगळ्या पार्श्वभूमीवर जेव्हा या डाव्या आघाडीच्या सरकारचे धोरण काय आहे याची चौकशी करत गेले तेव्हा अधिकृत पातळीवर खालील माहिती मिळाली.

सरकारने सत्ता हाती घेतल्यापासून ५८३ राजकीय कैद्यांची मुक्तता केलेली आहे. त्यापैकी १०० जन्मठेपेची शिक्षा झालेले कैदी होते. बऱ्याच जणांच्यावरील आरोपांची पुनर्तपासणी चालू आहे. मात्र १०० राजकीय कैदी असे आहेत की, ज्यांच्यावर इतर राज्यातील सरकारांनी खटले भरले आहेत, आरोप ठेवलेले आहेत आणि ती सरकारे ते खटले मागे घेण्यास तयार नाहीत. त्यांच्याकडे ती मागणी केलेली आहे. मात्र या कैद्यांना इतर ठिकाणी न पाठविण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे त्यांच्या हालअपेष्टा कमी होतील, छळ कमी होईल, असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र त्यामुळे बऱ्याच क्रांतिकारकांना प. बंगालमध्येच अडकले जावे अशी इच्छा झाल्यास नवल नाही. ५ हजार ६०६ फौजदारी खटले मागे घेण्यात आलेले आहेत. यावर वेस्ट बंगाल लॉयर्स असोसिएशनने आक्षेप घेतलेले आहेत. सरकार तटस्थ अशा न्यायालयीन प्रक्रियेमध्ये अकारण हस्तक्षेप करत आहे असा त्यांचा आरोप आहे. त्याला 'न्याय'मंत्र्यांनी दिलेले उत्तर 'पश्चिम बंग' नावाच्या सरकारी पत्रिकेत छापलेले आहे. 'ट्रेड युनियन चळवळ, जमीनविषयक चळवळ व इतर राजकीय चळवळी या संबंधात आकसाने पकडल्या गेलेल्या राजकीय कार्यकर्त्यांची मुक्तता हे आमचे निवडणुकीतील आश्वासन होते. यापूर्वी या राज्यात ज्या प्रकारच्या कायद्याचे राज्य चालले होते त्याबद्दल या असोसिएशनने कधीही काही भाष्य केलेले नव्हते. कित्येक वकिलांची हत्या झाली होती आणि खुन्यांना पकडलेही गेले नव्हते.'

या आघाडीतील जवळजवळ प्रत्येक मंत्री स्वातंत्र्योत्तर काळातही तुरुंगात जाऊन आलेला असल्याने व इतरही कार्यकर्त्यांना वारंवार तुरुंगाच्या वाऱ्या कराव्या लागत असल्याने 'जेल सुधार' हीही त्यांची पहिली मागणी होती. सध्या तुरुंगातील कैद्यांनी केलेल्या कामाबद्दल त्यांना वेतन देण्याची पद्धत अनेक ठिकाणी लागू करण्यात आली आहे आणि 'जेल कोड रिफॉर्म कमिटी' नेमण्यात आली आहे.

डाव्या आघाडीच्या सरकारने निवडणुकीत जाहीरनाम्यात दिलेले आणखी एक वचन पूर्ण केले आहे. १९७० च्या मार्चपासून ते मे १९७५ पर्यंतच्या कालामध्ये अधिकाराच्या गैरवापरामुळे जी अराजकता निर्माण झाली होती त्याविषयी चौकशी करण्यासाठी तीन चौकशी आयोग नेमले गेले आहेत.

१. शर्मा सरकार कमिशन : सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अधिकाराचा गैरवापर करून जनतेचे जे लोकशाही अधिकार हिरावून घेतले त्याची चौकशी करण्यासाठी हे कमिशन काम करेल.

२. अजयकुमार बसू कमिशन : विधानसभा, लोकसभा यांचे सभासद, त्यांचे कुटुंबीय व संबंधित लोक यांनी भ्रष्टाचाराच्या मार्गाने स्वतःचे उत्पन्न वाढवून घेतले. त्यांची चौकशी करण्याचा अधिकार या कमिशनला राहील.

३. हरतोष चक्रवर्ती कमिशन : राजकीय खून, तुरुंगात झालेला अनन्वित छळ व इतर अत्याचार यांच्याशी संबंधित असणारे सत्ताधारी पक्षातील लोक— केंद्र व राज्यसरकार दोन्ही पातळींवरील— तसेच सरकारी वरिष्ठ अधिकारी यांची चौकशी करून त्या वेळचे सरकारचे राजकीय धोरणच या अत्याचारांना जबाबदार होते की सरकारी अधिकाऱ्यांचाही त्याचा भाग होता हे शोधून काढणे हे या कमिशनचे काम राहील.



बाकी पोलिसखाते reshuffle करणे किंवा mass Transfers करणे असे प्रकार झालेले आठवत नाहीत. राजकीय शिक्षण देण्याचेही प्रयत्न फारसे नाहीत. कारण अधिर चक्रवर्ती, 'तथ्य ओ संस्कृती विभागाचे' एक अधिकारी म्हणाले त्याप्रमाणे त्याचा परिणाम ताबडतोबीने होऊ शकत नाही. मात्र एका वरिष्ठ पोलिस-अधिकाऱ्याने सांगितल्याप्रमाणे 'नॉनगॅझेटेड अधिकारी व कर्म-चाऱ्यांची' एक संघटना अनौपचारिक पद्धतीने पोलिसखात्याच्या आत चालू आहे असा त्यांचा दावा आहे आणि या संघटनेला गोंजारण्याचे काम, पगार वाढवून देण्याचे धोरण सरकारने घेतले आहे.

संपाच्या ठिकाणी, निदर्शने चालू असताना पोलीस उगीच आक्रमक होत नाहीत, अगदी शारीरिक मारामारी झाली तरच मध्ये पडतात असे अनेकांचे निरीक्षण आहे. भातकापणीच्या वेळेला जमिनीवरील हक्कावरून दरवर्षीच ग्रामीण भागात मारामाऱ्या होतात. त्यासाठी पोलीस-कॅम्प्स् ठेवावे लागतात. पूर्वी जोतेदाराच्या घरातच पोलिसांचा मुक्काम असे. कोंबडी, दारू हे आपल्यासारखेच नैवेद्य तिकडच्या पोलिसांना लागत. नव्या सरकारच्या आधिपत्या-खाली असा उघड उघड पक्षपात करून चालत नाही. गावात उघड्यावर तंबू टाकावा लागतो.

दुसरा एक प्रसंग माझ्या मित्राने सांगितला. चॅटर्जी इंटरनॅशनल म्हणून उंच इमारत नव्याने बांधली गेलीय् चौरंगीवर. इमारत बांधली; पण मालकाने त्याच्या 'मेन्टेनन्स स्टाफ'ला कायम केले नाही. जुन्या लोकांना काढून नव्यांना आणायचा त्याचा बेत. जुन्या लोकांनी संप केला व रोज इमारतीच्या खाली निदर्शने सुरू केली. मालकाने कोर्टात जाऊन इंजंक्शन आणले. पोलीस आले आणि बघत उभे राहिले. जोपर्यंत आत जाऊ इच्छिणाऱ्या माणसांच्या अंगाला धरून मारामारी केली जात नाही, तोपर्यंत शांततेचा भंग होत नाही. इमारतीत अनेक ऑफिसेस आहेत. सर्व लोक रोज येत व बाहेर थांबत. कर्मचाऱ्यांशी झटापट करून कोणी आत गेले नाहीत. त्यामुळे पोलिसांनीही काही कृती केली नाही. एरवी मुंबईपासून सर्व ठिकाणी पोलीस केवळ कायद्यापुरतेच थांबत नाहीत. इंजक्शन म्हटले की, पोलीस अंगाला धरून बाहेर आणायला सुरुवात करतात. शेवटी मालकाचा पेशन्स संपला आणि त्याने कामगारांना कायम केले.

## जातीवाद नाही

एक गोष्ट मात्र येथे आवर्जून सांगितली पाहिजे की, बिहारी पोलिसांमध्ये तसा जातीविषयी अहंकार व जातपातळीवर मदत करण्याची कृती दिसते तशी बंगालमध्ये नाही. बिहारमध्ये जमीनदार व पोलिसअधिकारी आणि सामान्य पोलीससुद्धा, यांच्या जाती उच्च असून त्यांच्यामुळे परस्परांविषयी जिव्हाळा तयार होतो आणि गुन्ह्यांच्या बाबतीत पोलीस अडथळा तर करत नाहीतच; पण मदतनीस होतात व गरीब, दलित जातीच्या कुळांवर हल्ले करतात, दहशत बसवतात. त्या प्रकारचे जातीय वातावरण बंगालमध्ये नाही. हे त्या वरिष्ठ पोलिसअधिकाऱ्यानेही आपणहून सांगितले.

दुसऱ्या एका बदलाचा उल्लेख सिंग नावाच्या पोलीस कमिशनरने वृत्तपत्रकारांच्या बैठकीमध्ये केला. पूर्वी प्रिव्हेन्टिव्ह डिटेन्शन ॲक्ट-खाली पकडण्याची सोय पोलिसखात्याच्याही फार पथ्यावर पडली होती. कोणत्याही आरोपीची पूर्ण चौकशी न करता, Investingative Method न वापरता, खुशाल वॉरंट काढून पकडता येत असे व आरोपपत्र 'फ्रेमड' करता येत असे. आता प्रिव्हेंटिव्ह डिटेक्शन ॲक्टचा वापरच करायचा नसल्यामुळे पोलिसांची जबाबदारी फारच वाढली आहे. फौजदारी गुन्ह्यांसाठी सुद्धा पोलिसांना 'पूर्ण चौकशी' करण्यावरच भर द्यावा लागतो.

अर्थात एक टॅक्सीवाला यावर नाराज होता. ज्योती बसूंच्या सरकारने सगळ्या गुन्हेगारांना सोडून दिल्यामुळे कलकत्त्यात सुरक्षितता वाटत नाही असे त्याचे म्हणणे होते.

'कायदा व सुव्यवस्था' व तिचे रक्षक पोलीस या आघाड्यांवर असणारे सर्वसाधारण चित्र मांडल्यावर सुद्धा एक अतिशय नाजूक बाब उरतेच—डाव्या आघाडीच्या सरकारची नक्षलवाद्यांविषयी असलेली भूमिका आणि व्यवहार नक्षलवादी काही एका विशिष्ट अनुभवातून गेलेले आहेत तेव्हा त्यांना त्यांच्या धोरणांचा पुनर्विचार करायला वेळ दिला पाहिजे, असे सर्वसाधारण मत दिसते.

मार्क्सवादी पक्षाच्या लोकांशी चर्चा करताना असे आढळले की, नक्षलवाद्यांची चळवळ आता संपली आहे. त्यांच्यामध्ये खूप फूट पडली आहे. बरेचसे अकृतीशील आहेत. सत्यनारायण सिन्हा गट तर संसदीय राजकारणाच्या जाळ्यात आलेला आहे. 'हत्या मोहिमे'विषयी पुनर्विचार चालू आहे. चारु मुजुमदार, नागी रेड्डी यांचे निधन झाले. कनु संन्याल अजून तुरुंगात आहे. 'विनोद मिश्रा' गट हा अजून जिवंत आहे आणि 'हत्यामोहिमे'वर त्यांचा अजून विश्वास आहे. (मास लाइन) लोकप्रिय जनआंदोलन व सशस्त्र क्रांती यांचा मेळ घालण्याचे त्याचे सैद्धान्तिक प्रयत्न चालू आहेत. बिहारमधील भोजपूर भागात त्याचा काही प्रमाणात तळ आहे आणि डाव्या आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यावरच्या उदार-मतवादी वातावरणात पुन्हा एकदा बंगालच्या ग्रामीण भागात शिरकाव करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. सप्टेंबर १९७७ पासून 'बांकुरा' जिल्ह्यामध्ये या गटाच्या हालचाली सुरू झाल्या आणि नक्षलवाद्यांच्या आगमनाच्या, राखेतून पुन्हा जिवंत झाल्याच्या बातम्या वृत्तपत्रांनी द्यायला सुरुवात केली. अधिकृत बातमीप्रमाणे बांकुरामध्ये घडलेले प्रसंग हे 'एकाकी' आहेत. त्या गटाला विशेष अनुयायी नाहीत आणि म्हणूनच बांकुरामध्ये १६ ऑगस्टला जी छोटीशी चकमक झाली त्यामध्ये भोलानाथ आणि छंदर यांना पकडले गेले आणि आता फारशी भीती उरली नाही. विनोद मिश्रा मारला गेला अशीही आवई होती.

मात्र अधिकृतपणे काही नक्षलवाद्यांच्या सहानुभूतिदारांशी बोल-तांना विनोद मिश्रा पळून गेला आहे व भोजपूरला त्यांच्या गटाची महत्त्वाची बैठक आहे असे कळले. विशेषतः आताच बंदुका चोरणे, पोलिसांची हत्या करणे अशा हालचाली चालू राहिल्या तर डाव्या आघाडीच्या सरकारचाही उदारमतवाद अपुरा पडेल व कॉंग्रेस सरकारसारखीच पावले हेही सरकार उचलेल आणि आपण नष्ट होऊ ही भीती एका मोठ्या गटाला वाटते आहे.

'इंडिया टू डे' या पाक्षिकाच्या एका वार्ताहराने 'बांकुरा ऑपरेशनची' अगदी तपशीलवार माहिती प्रसिद्ध केली आहे. त्याच्या

म्हणण्याप्रमाणे 'कानाजारे' या भागात लोकांना गावव त्यांचा चांगलाच पाठिंबा आहे, ४००० लोकांपैकी एकहीजण साक्षीसाठी पुढे आला नाही. बायका जंगलात लपून बसलेल्या. नक्षलवादी कार्यकर्त्यांना लाकडांच्या मोळीतून लपवून अन्न वगैरे नेत असतात. १६ ऑगस्टच्या 'कोम्बिंग ऑपरेशन्स' नंतर २०० तरुण मुले गाव सोडून पळून गेली आहेत आणि जंगलात लपून बसली आहेत. त्यांच्या राजकीय जाणिवा अतिशय जागृत आहेत आणि नक्षलवाद्यांचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षावर राग आहे तो फक्त आर्थिक मागण्यांवर लढे करतात म्हणून. त्यांच्या पोस्टर्सवरून तो ठिकठिकाणी दिसून येतो. याच्या उलट मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षानेही नक्षलवाद्यांविरुद्ध पोस्टरयुद्ध सुरू केले आहे. बांकुरा या जिल्ह्याच्या ठिकाणी सर्व भिंती रंगलेल्या आहेत. आश्चर्य म्हणजे याच जिल्ह्यातील बहुतेक सर्व गावांतून मार्क्सवादी पक्षाचे उमेदवार पंचायत निवडणुकांतून निवडून आले आहेत.

मी स्वतः 'देब्रा' येथील ज्या 'पॉकेट' मध्ये हिंडून आले तेथील वृत्तान्त पुढे देईनच. तेथे मात्र नक्षलवाद्यांनी सरळ आर्थिक प्रश्न हातात घेऊन मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या कार्यकर्त्यांबरोबर लढा उभारला आहे. कोणे एके काळी 'देब्रा–गोपीवल्लभपूर' ह्या दोन पोलिसस्टेशनच्या अधिकारातील या भागात नक्षलवाद्यांनी आपले चांगले स्थान निर्माण केले होते. 'संतोष राजा' हा गोपीवल्लभपूर मतदारसंघातीलच आहे. ※

---

# : पाच :

# काली माँ ते चारुदा

---

पुण्याहून निघताच माजगावकरांनी बजावले होते, 'बंगाली माणसाचे अंतरंग समजावून घेण्याचा प्रयत्न करा!' वरवरची लक्षणे सगळयांनाच परिचयाची असतात. बंगाली माणूस भावनाप्रधान आहे, स्वतःच्या संस्कृतीचा ज्वलंत अभिमानी आहे; कर्मठ, कडवा, भडक, आत्यंतिक वादाकडे झुकणारा, उत्कट अशी काही त्याची सर्वसाधारण वैशिष्टये सांगता येतील. त्यामुळेच येथे दहशतवादी गटांची परंपरा जन्माला येते आणि ती नक्षलवादासारख्या आत्यंतिक डाव्या पक्षाच्या उदयापर्यंत कायम रहाते. येथे गांधीवादी कार्यकर्त्यांची, सर्वोदयी कार्यकर्त्यांची परंपरा फारशी रुजलेली आढळत नाही. चौकशी करताना सतीश दासगुप्ता नावाच्या ९९ वर्षे वयाच्या वृद्धाचे नाव कळले. यांनी बेंगाल केमिकल्स या कंपनीची स्थापना केली; पण स्वतः मात्र आश्रमपद्धतीने ग्रामवासियांची सेवा करत जीवन व्यतीत केले. येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ यांनाही स्थान मिळालेले नाही. श्यामाप्रसाद मुखर्जी–जनसंघाचे संस्थापक बंगाली असून ते सर्वसामान्य मध्यमवर्गीय बंगाली माणसाचे 'हीरो' बनले नाहीत. या सर्व वैशिष्टयांची कारणे काय? मलाही या प्रश्नाने भारावून टाकले. अशा प्रकारचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातील लेख इंग्लिशमध्ये नसल्याचे आढळले. तेव्हा कलकत्त्याला जाऊनच बंगाली समाजशास्त्राचा शोध घेणे अपरिहार्य होते.

आणि असा समाजशास्त्रज्ञ सापडला. विजय घोष त्याचे नाव. त्यांनी बंगाली समाजाचा अभ्यास करून ७–८ पुस्तके लिहिली आहेत. 'बंगाली बुद्धिजीवी वर्ग' 'ईश्वरचंद्र विद्यासागर' अशी त्यांची काही पुस्तके चांगलीच गाजली आहेत. त्यांच्या एकूण वर्णनावरून मला ते बंगालचे 'सी राइट मिल्स' असावेत असे वाटतेय. सी. राइट मिल्स हे अमेरिकन समाजाच्या प्रेरणांचा अभ्यास करणारे प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ आहेत.

विजय घोषांचे घर कोणत्याही पुण्यातील विचारवंतासारखे वाटले. दोन–तीन खोल्यांतील सर्व भिंतींना चिकटून आढयापर्यंत कपाटे लावलेली होती आणि सर्व कपाटांत शेकडो पुस्तके रचलेली. अंधारे घर. माणूसही असा स्वतःत बुडलेला, चिंतनात व्यग्र.

माझा विषय सांगितल्यावर त्यांनाही रस वाटला. हा विषय अजून फारसा चर्चिला गेलेला नाही. यावर लिहायला पाहिजे म्हणाले आणि त्यांनी बंगालचा इतिहास तपासायला सुरुवात केली. चर्चेच्या शेवटी एक अस्पष्ट रेखाटन उभे राहिले. खूपसा तपशील त्यात भरावा लागेल, शोध घ्यावा लागेल.

### सशस्त्र बंडांची परंपरा :

१७५०त प्लासीची लढाई होऊन ब्रिटिश स्थिरावले. नंतर १७९० सालापासून बंगालमध्ये शेतकऱ्यांची बंडांची एक मालिकाच दिसून येते. त्यापैकी 'च्वाड बंड' खूप प्रसिद्ध आहे. मात्र हे बंड दलित जातीच्या आदिवासींच्या टोळयांचे बंड होते. उच्च जाती, जमीनदार हे याच्यात गोवले गेले नव्हते. किंबहुना जमीनदारांनी ब्रिटिशांची गुलामीच पत्करली होती. १८५० साली पुन्हा एकदा 'तितिमूरचे बंड झाले.' शिद्रकानू हा त्याचा संथाल पुढारी होता. त्यानंतर १९०५ ते १९३० हा दहशतवादी गटांचा काळ. स्वदेशी चळवळीचा काळ आणि १९६७ पुन्हा नक्षलवादी चळवळीचा काळ. अशी ही ऐतिहासिक परंपरा आढळते.

या सर्व प्रकारच्या बंडांमध्ये काही सर्वसाधारण वैशिष्टये आहेत. सर्व बंडे ही सशस्त्र होती. सर्वांमध्ये गुरिला डावपेचाचा वापर होता. सर्व बंडांमध्ये आर्त भावनांना आवाहन केले जायचे. काहीशा अतिरेकी पद्धतीची भावविवशता हा त्यांचा गुण दिसतो. त्यांतूनच समर्पणाच्या कल्पनेला महत्त्व प्राप्त होई. ध्येयासाठी सर्व काही दुय्यम समजून स्वतःला ओवाळून टाका असा संदेश असायचा. तसेच त्यातील पुढारी हे अनुयायांना एक प्रकारच्या प्रेषितासारखे भासत आणि एखाद्या प्रेषिताचा संदेश पोचविण्याच्या भावनेची धार चळवळीला असे. धार्मिक श्रद्धेचे स्वरूप देण्याचा प्रयत्न होई. १८५० पर्यंतच्या शेतकरी बंडाबाबत तर ही वैशिष्टये सुसंगत वाटतात. कारण तो काळच 'राजकारणपूर्व' काळ होता. भांडवलशाहीपूर्व काळ होता. त्या काळामध्ये एखाद्या झुंजार आणि शूर नेत्याच्या भोवती संच जमा होणे स्वाभाविक होते; पण नंतर दहशतवादी गट व काही प्रमाणात नक्षलवादी गटातसुद्धा या प्रकारची वैशिष्टये, कर्मठपणा, गट एकत्रित टिकवून ठेवण्यासाठी काही

प्रमाणात जाणूनबुजून जोपासला गेला असावा.

**दहशतवादी गट** : डेव्हिड लॅशे या इंग्लिश लेखकाने 'बेंगाल टेरिझम अॅन्ड मार्क्सिस्ट लेफ्ट' या पुस्तकात या दहशतवादी गटांच्या जन्माची कारणे देताना म्हटले आहे की, १८५७ च्या बंडाच्या वेळी 'बंगाली ही योद्धांची जात नव्हे' असे ब्रिटिशांनी म्हटले होते आणि त्याचा काहीसा गंड मनात धरून बलसंवर्धनासाठी, क्रांतिकारी वाङ्मय वाचण्यासाठी काही तरुणांचे क्लब्ज् बंगालमध्ये तयार झाले होते. अनुशीलन समिती, जुगांतर हे त्या वेळी अतिशय गाजलेले गट होते. एका वेळी जवळजवळ ३००० पर्यंत या सर्व मिळून गटांची सभासदसंख्या गेलेली होती. बहुतेक सभासद हे 'भद्रलोक,' बुद्धिनिष्ठवर्गातून आलेले होते. ब्राह्मण, कायस्थ व वैद्य या तीन जातींत प्रामुख्याने यांची गणना होते. साधारणपणे १६ ते ३० ही त्यांची वयोमर्यादा असे. बहुतेकजण सुशिक्षित, इंग्लिश बोलू शकणारे असत. लॅशे यांच्या मते या तरुणांमध्ये 'विचारसरणीशी निष्ठा' हे सूत्र इतके प्रबळ नव्हते. उलट या गटांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी एखाद्या धार्मिक निष्ठेसारखी तीव्र निष्ठा गटाच्या प्रमुखाला दिली जाणे ही पूर्वअट झालेली दिसते. गट-प्रमुखला 'दादा' म्हणत आणि त्याचा अतिशय दरारा असे. गटामध्ये घेतलेल्या शपथेचे पावित्र्य मानले जाई. वैयक्तिक-संबंध आणि निष्ठा हे गटाच्या सातत्यासाठी आवश्यक घटक असत. १९२८ नंतर या गटांमध्ये नवीन आलेल्या तरुणांनी काही प्रमाणात बंड केले आणि पुढे बरेचजण डाव्या पक्षांच्या जनआंदोलनांच्या राजकारणात शिरले. तरी सुद्धा त्याच प्रकारचे वैयक्तिक घनिष्ठ संबंध, निष्ठा या कल्पना कायम राहिल्या. तसेच अशा तरुणांना समाजात जो मानसन्मान मिळत असे, कौतुक मिळत असे तीही एक प्रेरणा तरुणांना अशा गटांना चिकटून ठेवण्यामध्ये कारणीभूत होत असे. याच गटांमध्ये काम करणारे अरविंदो घोष आध्यात्मिक मार्गाला लागले.

यातले बरेचसे गुण नक्षलवादी गटांमध्येही आढळत असत. चारु मुजुमदार' यांना अतिशय मानाचे स्थान होते. झपाटलेपण, भारावून जाणे, कडवेपणा, पावित्र्य, आंतरिक, आध्यात्मिक वाटावी अशी निष्ठा हे सर्व आवश्यक गुण समजले जात. गटांची रचना लोकशाही पद्धतीची नसून अधिकारशाही पद्धतीची असे. 'हिरो वर्शिप' ही प्रथा त्यामध्ये जास्त आढळते. पुष्कळ नक्षलवाद्यांच्या घरात भिंतीवर माओ, मार्क्स, लेनिनच्या जोडीला कालीमातेचा फोटो असे. कालीमाता हे बंगालचे लाडके दैवत आहे, एवढेच नव्हे तर ते एक प्रतीक आहे आणि त्या प्रतीकाचा काही विशिष्ट अर्थ आहे.

**शाक्तपंथाचा प्रभाव** : बंगालमध्ये पहिल्यापासून धार्मिक क्षेत्रात दोन पंथ वर्चस्व गाजवून होते. वैष्णवपंथ आणि शाक्तपंथ. वैष्णवपंथीयांचा चैतन्यप्रभू हा संत आपल्या माहितीचा आहे. गंमत म्हणजे वैष्णवपंथियांची पूजाअर्चा ही राजस पद्धतीची आहे आणि म्हणूनच श्रीमंतांना, जोतेदारांना शोभण्याजोगी, त्यांच्या विचारसरणीशी, वर्गहिताशी सुसंगत आहे. वैष्णवांचे उत्सव बरेच दिवस चालणारे असतात आणि त्यामध्ये सर्व जनतेला सामावण्यात येते आणि वर्ग-समन्वयाचा फार मोठा प्रयोग त्यातून साध्य होतो. कीर्तन, भजन या सर्व प्रकारांतून, उत्सवांतून सर्व समाज एकच आहे अशा विचारांची शिकवण दिली जाते आणि एक प्रकारच्या (Cathersis) 'उन्मन' या अवस्थेला सर्वजण पोचतात.

याउलट शाक्तपंथ हा मुख्यतः गरिबांच्यात, कष्टकऱ्यांच्यात लोकप्रिय आहे. दरोडेखोर वगैरे समाजातील अप्रतिष्ठित समुदायांचा हा पंथ. काली हे त्यांचे दैवत. तिची प्रतिमा पाहिली तर लक्षात येते की, ती एका हाताने संहार करतीय आणि दुसऱ्या हाताने अभय देतीय्. 'श्रीमंतांचे निर्दालन आणि गरिबांना संरक्षण' देणाऱ्या डाकूंच्या परंपरेमध्ये या कालीचे महत्त्व आहे. शिवाय कालीपूजकांचे उत्सवही खर्चिक नसतात. एका रात्रीत संपणारे असतात. कारण ते गरिबांचे उत्सव असतात. अशी ही काली या सर्व बंडखोरांना आपलीशी वाटते. दहशतवाद्यांमध्ये तर कालीपूजनाचे महत्त्व होतेच. विवेकानंद, सुभाषचंद्र हे जसे बंगाल्यांचे 'हिरोज्' तसे, त्यांच्या जोडीला कालीमाता हवीच. एक वेळ विवेकानंदांऐवजी माओ भिंतीवर येऊन बसेल; पण कालीमातेचा फोटो कायम राहील. अगदी हाडाचा नक्षलवादीसुद्धा अगदी संकटाच्या क्षणी 'माँतारा' अशी आरोळी ठोकतो. तेव्हा शाक्तपंथ हा जनतेचा धर्म आहे, कष्ट-कऱ्यांचा धर्म आहे अशी त्याची परंपरा. त्याचा प्रभाव बंगालवर फार आहे.

रामकृष्णांच्या व विवेकानंदांच्या हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीलाही थोडासा हा वारसा आहे. कर्मथोतांडात अडकलेला धर्म हा सामान्य माणसापर्यंत पोचवायचा. त्याचा आध्यात्मिक भाग कायम ठेवून लोकांना नव्या हिंदुधर्माची प्रेरणा द्यायची. स्वतःची अस्मिता जागृत करून, स्वदेशीच्या चळवळीला अध्यात्माची बैठक देऊन इंग्रजांविरुद्ध लढायला शिकवायचे. विवेकानंदांनी ख्रिश्चन-धर्माचा सेवाभाव उचलला आणि आजही रामकृष्ण-मिशन व भारत सेवाश्रम संघ या दोन संस्थांनी चालविलेल्या अनेक शाळा, दवाखाने बंगालभर पसरले आहेत. विवेकानंद व रामकृष्ण हे आधुनिक संतच होते. केशवचंद्र सेनसारखा ब्राह्मोसमाजिस्टसुद्धा शेवटी विवेकानंदांना शरण आला. एवढी मोठी ती लाट होती आणि रामकृष्णांनी शास्त्री-वचन, संस्कृतातील अमूर्त कल्पना प्रत्यक्ष व्यावहारिक भाषेत लोकां-पुढे आणल्या. गंमत म्हणजे रामकृष्ण मिशनमधील पुष्कळ संन्यासी हे बाहेर येऊन चिकन खातात. त्यांचा अभ्यास गाढा असतो. पुष्कळजण rationalist, तर्कवादी असतात. या पुनरुज्जीवनाच्या चळवळीमुळे बंगालमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटनांना स्थान मिळालेले दिसत नाही.

## जातींचे 'राजकीयीकरण' झाले नाही

कलकत्त्याला गेल्यावर कोणाही माणसाला, विशेषतः डाव्या राजकीय कार्यकर्त्यांना जातिप्रश्नाबद्दल विचारले तर तो सांगतो, छे छे, बंगालमध्ये जाती-जातींमधील तणाव बिल्कुल नाहीत. धार्मिक तणाव होते; पण गेल्या कित्येक वर्षांत तेही नाहीत. सर्वच डाव्या पक्षात अनेक मुस्लिम पुढारी आहेत. येथे केवळ वर्गसंघर्षाचेच राज-कारण आहे. येथील कनिष्ठ आणि दलित जातीसुद्धा वर्गसंघर्षामध्ये, जनसंघटनांमध्ये सहभागी होतात आणि बिहारसारखा जातिभेद येथे आढळत नाही.

आणि महाराष्ट्रासारखा 'जातितणावा'चा नवा आविष्कार ?

माझा प्रश्न कोणाला समजलाच नाही. मग मी आकडेवारी मागायला सुरुवात केली. सरकारी नोकऱ्यांमधील राखीव जागा किती प्रमाणात भरल्या गेल्या ? मेडिकल कॉलेजमधील जागा किती प्रमाणात भरल्या गेल्या ? दलित तरुणांकडून काही मागण्या पुढे येताहेत का ? आश्चर्य म्हणजे कोणत्याही प्रकारची आकडेवारी कोणीही देऊ शकले नाही. तसेच दलित विद्यार्थी किंवा तरुण यांची कोणत्याही प्रकारची संघटना अस्तित्वात नाही. त्यांच्या खास मागण्या नाहीत. याचा अर्थ काय समजायचा ? त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळतेय का ? मागासलेल्यांचा खास लवकर विकास होण्यासाठी खास प्रयत्न केले गेले आहेत का ? त्याचे barometers कोणते ? बंगाल-विधानसभेत दलित जाती व आदिवासी जमातींचे राखीव जागांवरील उमेदवार २९४ पैकी ७२ आहेत. याचा अर्थ संख्या बरीच मोठी असली पाहिजे. विशेषतः आदिवासी जमातींची जास्त आहे.

जास्त चौकशी करता असे लक्षात आले की, कदाचित ग्रामीण भागातील सरंजामी अर्थव्यवस्थेला फार मोठा धक्का पोचून ती ढवळून निघालीच नाही. बर्गदार जमीनीला चिकटूनच राहिले. शिक्षण मिळाले ते छोट्या-मोठ्या जमीनदारांच्या मुलांना. तो आता मध्यमवर्ग म्हणून पुढे आला आहे. पुष्कळांच्या जमीनदाऱ्या संपल्या. नोकरधंदा हेच जीवन झाले; पण आदिवासी जमाती, दलित जाती यांच्यामध्ये फार मोठा शिक्षणाचा प्रसार झाला नाही आणि नोकरी मागायला बेकारांच्या स्पर्धेमध्ये भाग घ्यायला दलित, आदिवासी तरुण मुले मोठ्या प्रमाणात पुढे आली नाहीत. तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा कोणी पुढारीही झाला नाही आणि त्यामुळेच जो नव्या स्वरूपाचा जातीय तणाव महाराष्ट्रात तयार होतोय् तसा येथे झाला नाही. ती अवस्था येथे अजून यायचीय्. जी अस्मिता येथे जातीच्या संदर्भात तयार झाली ती अस्मिता तेथे तयार झाली नाही. डाव्या राजकारणाने वर्गसंघर्ष जहालपणे चालविल्यानेही आपोआप त्यांचे प्रश्न घेतले गेल्याची भावना झाली असेल. सवर्ण व दलित आदिवासी खांद्याला खांदा लावून लढले असतील. म्हणूनही कदाचित सरसकट सवर्ण हे शत्रू ही भावना जन्माला आली नसेल. तरीसुद्धा नक्षलवाद्यांना खास पाठिंबा मिळाला तो आदिवासी जमातीच्या विभागातच हेही लक्षात ठेवले पाहिजे.

डोम, चांडाळ, बावरीज् या येथील दलित जाती. महिष्य नावाची जात पूर्वी शेड्यूल्ड कास्टज् वर्गीकरणात असे; पण आजकाल त्यांचे आर्थिक स्थान उंचावले, शिक्षण मिळाले आणि जमातीने आपले नाव शेड्यूल्ड कास्टमधून काढून टाकावे अशी मागणी केली. मला या घटनेची गंमत वाटली. एकीकडे सवलतींचे फायदे मिळावेत म्हणून नवनवीन कनिष्ठ जाती शेड्यूल्ड कास्टस् या वर्गीकरणात आपले नाव घालण्याची मागणी करत असताना अशा प्रकारचा उलट क्रम मी पहिल्यांदाच ऐकला. ब्राह्मण, कायस्थ, वैद्य या तीन जमातींमध्ये आपापसात बेटीव्यवहारही होतो असे कळले. तेथील राज्यकर्ते मात्र बहुधा या तीन जातींतील व महिष्य जातीतील असतात. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या संघटना विभागात वैद्य जातीचे वर्चस्व आहे असे समजले जाते. जसे महाराष्ट्रातील सी. के. पी. जेव्हा डावा होतो तेव्हा तो मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातच जातो असे विनोदाने सांगतात त्यातलाच प्रकार दिसतोय्.

मला वाटते मार्क्सवादी कम्युनिस्ट जेव्हा कौतुकाने बंगालमध्ये जातीय तणाव नाहीत असे सांगतात तेव्हा त्यांनी एकदा वर्गीय चळवळीचा तेथील जातीयव्यवस्थेवर कसा परिणाम होत गेला याचा अभ्यास प्रसिद्ध करावा. अनेकांना मार्गदर्शक होईल. ✻

## : सहा :

# अतिडावे आणि डावी आघाडी

एकीकडे उजव्या बाजूने, वृत्तपत्रांतून डाव्या आघाडीच्या सरकारचे मूल्यमापन आणि टीका होत असताना डाव्या आघाडीला त्यांच्यापलीकडील डाव्यांकडूनही बरीच टीका सहन करावी लागते आहे. संसदीय लोकशाही मार्गाचा वापरच का करायचा ही मूलभूत टीका आहेच; पण संसदीय लोकशाही मार्ग हे लढ्याचे एक साधन आहे हे मान्य करूनही सत्ताग्रहणाची गरज काय होती अशीही टीका आढळली. जनतेचे प्रश्न पुढे मांडण्यासाठी, भांडवली धोरणावर टीका करण्यासाठी संसदीय व्यासपीठाचा वापर करणे ठीक आहे; पण सत्ता हाती घेऊन जनतेच्या मनात भ्रम कशाला तयार करायचे, संसदीय मार्गावरची श्रद्धा दृढ कशाला करायची असे हे आक्षेप आहेत.

तिसरी टीका आहे ती सत्ता ग्रहण केल्यावर कशा रीतीने वागणूक असावी याबद्दलची आहे. सध्याची शासनयंत्रणा, कायदेकानून हे आमूलाग्र बदल करण्यासाठी कसे अपुरे आहेत हे प्रत्यक्ष अनुभवातून दाखविण्यासाठी, सतत Confrontatin करण्यासाठी, टक्कर देण्यासाठी, आव्हान देण्यासाठी व त्यातून कष्टकरी जनतेच्या राजकीय जाणिवा वाढविण्यासाठी या सत्ताग्रहणाचा उपयोग केला पाहिजे. 'रिलीफ' ची भाषा बोलणे म्हणजे या व्यवस्थेतून काही ना काही मिळू शकते असा भ्रम तयार करणे, सवलतींवर समाधान मानायला शिकविणे. हा तिसऱ्या प्रकारचा आक्षेप आहे. म्हणजेच थोडक्यात हळूहळू सावकाश उत्क्रान्ति-पद्धतीने समाजवाद येऊ शकतो असेच मानणे आहे. हा सुधारणावाद झाला आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा खरोखर लोकशाही समाजवादी पक्ष आहे, कम्युनिस्ट पक्ष नव्हेच असेच यांचे म्हणणे आहे.

याच टीकेला अधिक पाठिंबा देऊन त्याला जोतेदारांचाच पक्ष आहे असे म्हणणारे व मानणारे अनेक नक्षलवादी गट आज अस्तित्वात आहेत. [ CPMCML ] ह्या सत्यनारायण सिंग यांच्या पक्षाची टीकाही जवळजवळ अशीच आहे. त्यांच्या मते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष फारच 'कायदेशीर' व्यवहारात अडकून बसतोय्. बर्गदाराचे नाव नोंद होणे याला फारसे महत्त्व नाही. लगेचच्या लगेच त्याला त्याचा अधिकार प्रस्थापित करता यायला हवा. त्याला शेतातील पीके कापून न्यायची परवानगी हवी आणि त्यांचा पक्ष जेव्हा पिके

कापून नेण्याची चळवळ घेतो तेव्हा जोतेदार बंदुका घेऊन येतात आणि पोलीस नुसते बघत रहातात. अजूनही बंदुकांचे परवाने रद्द करण्याची व बंदुका काढून घेण्याची मागणी सरकारने मान्य केलेली नाही.

## सिंहाशी भेट

संतोष राजा हा नक्षलवादी हिरो. सध्या नक्षलवादी पक्षातर्फ विधानसभेचा सभासद. तुरुंगात असतानाच निवडून आला, जॉर्ज फर्नांडिस सारखाच, हे त्याचे कौतुक. गोपीवल्लभपूर ह्या पोलिस-स्टेशनच्या अधिकाराखालील या विभागात आदिवासी जमातींची लोकसंख्या बरीच आहे आणि बंगाल, बिहार, ओरिसा यांच्या सीमेवरील हा प्रदेश आहे. या विभागात १९६८–६९ साली 'लाल तळ' उभारले गेले होते. भारतात क्रांतीसाठी परिपक्व वातावरण आहे. अशा परिस्थितीत आर्थिक झगडे करत बसण्यापेक्षा गावातील सत्ता ताब्यात घेणे, गावातील व्यवहारांवर नियंत्रण करणे आणि जोतेदारांना शरण यायला लावणे यावर त्यांचा भर होता. वर्गशत्रूंची हत्या करून लोकांच्या मनावरील शतकानुशतकांची दडपणे काढून टाकणे ह्या उद्देशाने तेथील काही जमीनदारांची हत्या करण्यात आली. काही पळून गेले. पोलीस त्या प्रदेशात जायला घाबरत असत. या सर्व चळवळीचे पुढारीपण संतोष राजाने केले होते. त्याला भेटायची उत्सुकता होती. ज्याच्या डरकाळीने हातापायाला कापरे भरते असा सिंह जेव्हा पिंजऱ्यात पकडून सर्कशीत काम करायला आणलेला पाहिल्यावर काय वाटेल? तशी काहीशी भावना संतोष राजाला भेटताना होती.

पक्षाचे ऑफिस अपेक्षा केल्याप्रमाणेच गल्ली-बोळात, पडक्या इमारतीत बारदानाचे पडदे लावून, चार-दोन बाकड्यांनी सजवलेले असेच होते. धुळीचे थर, भगदाडांच्या भिंती, क्रांतिकारक पक्षाचे ऑफिस वाटावे असे. याच इमारतीजवळ कानू सरकारला गोळ्या लागल्या होत्या.

संतोष राजा आता अस्सल संसदपटू वाटायला लागलेला. किंचित सुटलेले पोट, दोन बाजूंनी मागे गेलेले केस, मध्यमवयाकडे झुकू लागल्याचे निदर्शक.

त्याने डाव्या आघाडीच्या सरकारच्या बर्गदार मोहिमेला पाठिंबा व्यक्त केला. त्याच्या मते नवे अधिकारी 'लॅन्डरेकॉर्डिंग'साठी जे नेमले गेले आहेत ते फारसे पक्षपाती नाहीत. ते जोतेदार कुटुंबातून येत नाहीत. त्यामुळे त्यांचे व जोतेदारवर्गाचे संबंध जुळलेले नाहीत. त्यांचे काम चांगले चालू आहे.

आणि तरीसुद्धा या बर्गदार मोहिमेमुळे त्याच्या मते शेतकरी-वर्गामध्ये आपापसात फूट पाडली जाते आहे. सध्या शेतकऱ्यांमध्येही अनेक थर आहेत. त्यांच्यात अंतर्विरोध आहेत; पण सध्याची गरज आहे सर्व शेतकरीवर्गाला एकत्र ठेवून साम्राज्यशहा आणि त्याचे हस्तक, दलाल, भांडवलदार व जमीनदार यांच्या आघाडीला जोरदार टक्कर देण्याची; पण सध्या मात्र पक्षापक्षाच्या अंतर्गत वेगवेगळ्या बर्गदारांच्या बाजू घेऊन भांडणे लागत आहेत. एवढेच नव्हे तर शेतमजुरांना कायद्याप्रमाणे वेतन पाहिजे ही मागणी घेऊन मार्क्स-वादी कम्युनिस्ट पक्ष मजुरांना संघटित करतो व शेतमजूर आणि श्रीमंत शेतकरी, मध्यम शेतकरी यांच्यातील संघर्ष वाढवितो. बिचाऱ्या मध्यम शेतकऱ्याला किमान वेतन परवडत नाही. त्यांच्या-कडे काम करताना कमी वेतन स्वीकारले पाहिजे हे समजावून सांगणे, याला म्हणतात राजकारण. आता श्रीमंत शेतकरी, मध्यम शेतकरी व छोटा शेतकरी आणि शेतमजूर यांच्यामधील दरी वाढू देता कामा नये नाही तर त्याचा फायदा वर्गशत्रू घेतील. त्याच्या मते बेमापी जमीन शोधून काढून तिचे वाटप, सरकारजवळ जमा झालेली कमाल जमीन धारणा कायद्यानुसार अतिरिक्त जमीन व तिचे वाटप, हा कार्यक्रम प्रमुख हातात घ्यायला पाहिजे; परंतु त्यातही बरेच प्रश्न आहेत. अशा जमिनीचे वाटप होते व भूमिहीन शेतकरी त्या जमिनीचा ताबा घ्यायला जातो तेव्हा त्याला आढळते की, त्या जोतेदाराने ही जमीन आधीच बेकायदेशीरपणे एखाद्या मध्यम शेतकऱ्याला विकलेली आहे. अशा रीतीने मध्यम शेतकरी व हा भूमिहीन शेतकरी यांच्यात भांडण उत्पन्न होते. सरकारने जाहीर केले आहे की, अशा रीतीने बेकायदेशीर व्यवहार रद्द ठरविले जातील.

दुसरा एक भांडणाचा प्रसंग येतो तो absentee landlord बद्दल, पुष्कळदा प्राथमिक शिक्षक, विधवा बाया यांचे छोटे छोटे जमिनीचे तुकडे कुळाला कसायला दिले जातात. त्यांना जोतेदार म्हणणे कठीण आहे; परंतु त्यांच्या जमिनीवर काम करणाऱ्या बर्गदाराचा आग्रह


ALWAYS INSIST ON

FABINA®

SUITINGS and SHIRTINGS

Mfg. Fabina Textile Pvt. Ltd.

*Registered Office* :

BALRAJESHWAR ROAD, MULUND * Bombay 400 080

असतो, ' माझे नाव नोंद करा. ' अशा वेळी झगड्याचा प्रसंग येतो. मुख्य म्हणजे असे अनेक खातेदार बंगालमध्ये आहेत.

कामगारसंघटनेच्या क्षेत्रातही सीटू ही यूनियन आक्रमक आहे, इतरांच्या यूनियन्स टिकवून देत नाही. गेटमीटिंग्जवर हल्ले होतात, एका सीटूच्या कार्यकर्त्याने रिव्हाल्व्हर घेऊन धमकी देण्याचा प्रयत्न केला, अशा तक्रारी होत्याच. एकूणच डाव्या आघाडीचे सरकार आल्यापासून त्यांनी कामगारांचा असंतोष दाबून टाकायचा प्रयत्न चालविला आहे. त्यांचे कार्यकर्ते आंदोलन थोपवून धरत आहेत अशी टीका होती.

नागरी स्वातंत्र्याबाबतीतही फारशा हालचाली झालेल्या नाहीत. अधिकाराचा अतिरेकी वापर केल्याबद्दल पोलिसऑफिसरांना अटका झाल्या पाहिजेत त्या झाल्या नाहीत. अपराध्यांना शिक्षा व्हायला पाहिजेत. त्याही बाबतीत वेळकाढूपणाचे धोरण वापरले जाते आहे.

असा सर्वसाधारण टीकेचा सूर होता. त्यांच्या मते मिदनापूर-भागात त्यांचे काम जोरात होते. मुख्य म्हणजे ' वर्गशत्रूच्या हत्येचे ' धोरण सोडून लोकांना लढ्यातून नेण्याचे धोरण घेतल्यामुळे लोकांमधील धैर्य वाढलेय्. राजकीय जाणिवा वाढल्या. आता आम्ही लोकापासून अलग पडलेलो नाही. जनतेच्याऐवजी मूठभर लोकांनी त्याच्या नावाने हत्या करणेही Substitutionist policy होते.

### कामगारवर्गाची मुस्कटदाबी

कामगारचळवळीबाबत वेगवेगळे दृष्टिकोण ऐकायला मिळाले. सत्तेवर आल्याआल्या गडबड–गोंधळ नको म्हणून खरोखरच १९७७ साली बंगालमध्ये फारच थोडे झगडे झालेले दिसतात. जाणूनबुजून ट्रेडयूनियन कार्यकर्त्यांना सबुरीचा सल्ला दिलेला दिसतो. म्हणजे आणीबाणी उठल्याबरोबर सर्व देशभर जी संपाची व मागण्यांची लाट उसळली त्या वेळी बंगालमध्ये तुलनात्मकदृष्ट्या शांतता नांदत होती. मात्र यंदा बंगालमध्ये सर्वांत जास्त ' मनुष्य-दिवस ' फुकट गेल्याची नोंद आहे. कारण तागाच्या गिरण्यांतील अडीच लाख कामगार, एक लाख छपाईकामगार, काही हजार होजिअरी–कामगार हे तीन प्रचंड संप झाले. जय इंजिनिअरिंगचा लॉकआउट आठ महिने चालू आहे. असे अनेक चालू आहेत. विजेच्या कारखान्यात तर सीटूची यूनियन नाही. परिमल दासगुप्ता म्हणून नक्षलवादी कार्यकर्त्याशी संबंधित युनियन आहे आणि तेथे सतत झगडे चालू आहेत. सरकारचा आरोप आहे की, कॉंग्रेस राजवटीत सर्व राज्यातील वीजकारखान्यात जवळजवळ १०,००० कामगारांची भरती कॉंग्रेसने मुद्दाम केली होती. त्यांचा पाठिंबा घेऊन परिमल दासगुप्ता घातपाती कृत्ये करून कृत्रिमरीत्या वीजतुटवडा करत आहेत. याउलट परिमल दासगुप्तांचे म्हणणे असे की, सरकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेला पाठीशी घालून कामगारांचे न्याय्य हक्क नाकारत आहे. शिवाय युनियन फोडण्याच्या कारवाया चालू आहेतच.

एका कामगारपुढाऱ्याने सांगितले कृष्णपद घोष हे कामगारमंत्री तंटा उपस्थित झाल्या झाल्या लगेच लक्ष घालीत नाहीत. ते म्हणतात जरा कामगारांना झगडू द्या. त्यांचा दबाव तयार होऊ दे. नाही तर सरकारी हस्तक्षेपाची वाईट सवय लागेल. याउलट नक्षलवाद्यांचा आरोप आहे की, स्वतःला कामगारपुढारी, कामगारवर्गाचे मंत्री असे म्हणवूनही कामगारांच्या पदरात ते पुरेसे माप घालत नाहीत. भांडवलदारांपुढे नमते घेतात. एक गोष्ट मात्र नक्की की कोणत्याही कामगारवर्गीय पक्षाच्या नावे राज्य करताना कामगार-वर्गाला दडपणे जरा कठीणच जाते. मागच्या वर्षी दबून राहिलेला असंतोष यंदा बाहेर पडणे अपरिहार्य होते. यंदा जवळजवळ ९८ टक्के कारखान्यांना बोनस देण्यास सरकारने भाग पाडले अशी सरकारी आकडेवारी सांगते.

### देब्रा : नक्षलवाद्यांच्या अड्ड्यात

या सगळ्या पार्श्वभूमीवरच मी ' देब्रा ' येथे गेले. कलकत्त्यापासून देब्रा ८० मैलांवर आहे. मिदनापूर हे जिल्ह्याचे गाव. तेथून देब्रा २५ मैलांवर. भवदेव मंडळ हे १९६८ साली या भागातील लढ्याचे नेतृत्व करत होते. आशीम चटर्जी हाही याच भागात काम करणारा नेता. प्रेसिडेन्सी कॉलेजमधून त्या वेळी जे अनेक बुद्धिमान तरुण क्रांतीच्या वेडाने झपाटून बाहेर पडले त्यातील हा एक. आज मात्र त्याचे या भागात संबंध राहिले नाहीत. गुणधर मुर्मु हा संथाल-पुढारी. स्वतः शेतकरी. अजूनही आपल्या समाजाचे हा नेतृत्व करीत टिकून आहे. निताई दास हा आणखी एक पुढारी, त्याच भागातील; पण बिगर आदिवासी. १९६८-६९ सालची ' वर्गशत्रूंची मोहीम ' आता संपुष्टात आली तरी आर्थिक प्रश्नावरील लढे, शेतकऱ्यांचे प्रश्न हे चालू आहे. या भागातील आदिवासी समाजात या लोकांना


पिकांच्या योग्य वाढीसाठी व
जमिनीचा कस टिकविण्यासाठी
समतोल खतपुरवठा महत्त्वाचा आहे.

दर हंगामात आपल्या पिकांना नत्र व स्फुरद
यांचे जोडीला योग्य वेळी योग्य प्रमाणात

**पोटॅश खत वापरा**

INDIAN POTASH

अधिक माहितीसाठी :

**इंडियन पोटॅश लिमिटेड**

६३/६४ मित्तल चेम्बर्स नरिमन पॉइन्ट
मुंबई ४०० ०२९

चांगलाच पाठिंबा आहे. जवळजवळ २६,००० त्यांची लोकसंख्या आहे.

कलकत्त्याला जायचे ठरल्यावरच ठरविले की, दोन दिवस तरी ग्रामीण भागात डोकावून यायचे. जाणे तसे सोपे नव्हते. मुख्य म्हणजे भाषेचा प्रश्न होताच. त्याचबरोबर कोणाही परक्या माणसाशी खेड्यातील मंडळी पटकन् बोलायला तयार होत नाहीत. अनेक प्रकारचे संशय त्यांच्या मनात असतात. शिवाय तुम्ही कोणत्या बाजूने जाता आहात हाही प्रश्न महत्त्वाचा असतोच. जोतेदाराच्या घरी जाऊन राहिलात की गावातील गरीब शेतकरी, बर्गदार ही मंडळी दूर गेली म्हणून समजा. त्यांचे प्रश्न, दुःख तुमच्यापुढे येणार नाहीत. वस्तुनिष्ठपणे अभ्यास करायचा तर त्याला बरेच दिवस पाहिजेत. खूप भटकून तऱ्हतऱ्हेच्या लोकांशी बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. तेव्हा जमल्यास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पुढाऱ्याला गाठून किंवा एखाद्या कार्यकर्त्याला गाठून त्याच्या मार्फत ग्रामीण भागात फिरण्याची व्यवस्था करणे हा एक मार्ग होता. सरकारी पातळीवरून जाण्यात अर्थ नव्हता. रात्री डाकबंगल्यात झोपून गावातील खरे जीवन कळणे शक्य नव्हते. दुसरी शक्यता, नक्षलवादी गटातील कोणाची तरी ओळख काढून त्यांच्या कार्यकर्त्यांतर्फे हिंडणे आणि रहाण्याची व्यवस्था करणे. त्यात मी यशस्वी झाले.

एक ओळखपत्र, भवदेव मंडल यांचा पत्ता आणि मिदनापूरला जाणाऱ्या बसचे टाइमटेबल असे माझ्या हातात मिळाले आणि मिदनापूरला उतरून पत्ता शोधीत मी भवदेव मंडल यांच्या घरी पोचले. पन्नाशीचा गृहस्थ होता. फौजदारी कोर्टात वकील होता. मला जरा आश्चर्यच वाटले. ओळखपत्र दिल्यावर गृहस्थ अगत्यशील झाला. मी ग्रामीण भागात जाऊन गरीब शेतकऱ्यांशी बोलायचे आहे म्हटल्यावर त्याला आश्चर्य वाटले. त्याची कल्पना मी त्याची मुलाखत घेऊन माझा कार्यभाग उरकीन; पण मी गेल्यागेल्याच माझी तीव्र इच्छा प्रगट केली. त्याला ती कल्पना पटत नव्हती. मी मुंबईहून आलेली शहरी बाई. तो गृहस्थ त्याच्या मोडक्यातोडक्या इंग्लिश भाषेत मला पुन्हा पुन्हा सांगत होता– 'There will be chatai to sleep. Lady like you cannot sleep.'

शेवटी त्यांनी कोर्टाचे काम लवकर आटोपले आणि दुपारी ३ च्या सुमारास आम्ही निघालो. देन्नाला बस बदलून 'बेलाडा' या गावी पोचलो. कलकत्त्याच्या मोहोळासारख्या भरलेल्या बसेस पहाण्याची सवय झाली होतीच. येथे मात्र चक्क टपावरही लोकांनी आक्रमण केलेले दिसले. तिकीट घेऊन लोक सरळ वर जाऊन बसत. बंगालच्या लोकसंख्येची घनता पदोपदी लक्षात येत होतीच. शिवाय लोकांचे प्रवासाचे प्रमाण फारच जास्त वाटले. कारण बसेस बऱ्याच होत्या. कलकत्ता ते इतर महत्त्वाची गावे फक्त कलकत्ता स्टेट ट्रान्स्पोर्ट कंपनीतर्फे चालणाऱ्या बससर्व्हिसने जोडलेली. बाकी स्थानिक पातळीवर सर्वकडे खाजगी बसेस. कोठेही हात केला की थांबणाऱ्या. अजूनही वाहतूकव्यवस्था पद्धतशीर संघटित केली गेली नाही. आपल्याकडे एस्. टी. बसेस सुरू होण्यापूर्वी जशी परिस्थिती होती तीच आजही प. बंगालच्या ग्रामीण भागात आहे. मागासलेपणा जो मी म्हणते तो या पद्धतीतून दिसून येतो.

गुणधर मुर्मुचे घर हे मध्यम शेतकऱ्याचे घर होते. अंगणात गवत रचून ठेवलेले. गोठ्यात दोन-चार गुरे दिसली. आम्ही गेलो तेव्हां गुणधर एका बंगाली नाटकाचे 'संथाली' भाषेत भाषांतर करत बसला होता. त्यांच्या गटाला ते नाटक सादर करायचे होते.

त्याला घेऊन आम्ही कम्बलपूरला गेलो. तेथे निताई दास भेटला. 'कन्सावती' नदीच्या पलीकडे कम्बलपूर गाव वसलेले. अंधार पडायला लागला होता आणि सध्याच्या बर्गदार मोहिमेच्या संदर्भात नुकत्याच झालेल्या मारामारीची घटना अगदी तपशीलवार सांगण्यासाठी सर्वजण सरसावले होते. मुंबईहून आलेली वार्ताहर आल्यामुळे अन्यायाची बातमी व्यवस्थित सर्वकडे पोचावी अशी त्यांची मनापासून इच्छा होती. दूरवरच्या एका विटांनी बांधलेल्या दुमजली घराकडे माझे लक्ष वेधले. ते एका जोतेदाराचे घर होते. वीज अजून गावापर्यंत पोचलेली दिसत नव्हती. रस्त्यावर तर नव्हतीच आणि आदिवासींच्या घरात तर नव्हतीच नव्हती. वातावरण थोडेसे तंग दिसले. नुकतीच कापणी झाली होती आणि कापणीचा हंगाम हा जमिनीवरील हक्क प्रस्थापित करण्याचा हंगाम असल्यामुळे भरपूर मारामाऱ्या झाल्या होत्या. जोतेदाराचा हस्तक गरीब शेतकरी काठ रहातो, मारपीट कोठे झाली त्या सर्व जागा व्यवस्थित दाखविल्या गेल्या. भारत टुडुच्या घरी पाच मिनिटे थांबलो. पूर्वीचा लोहार. कर्जापायी त्याचा लोहारकीचा भातासुद्धा विकला गेला. सध्या राजकीय काम करतो. अगदीच छोटी झापडी. गुरे वगैरे अर्थातच नाहीत. इतर आदिवासी थोडंफार धान्य आणून देतात त्यावर त्याचा गुजारा होतो. दोन बायका होत्या. एकीला क्षय झाला होता. सगळी मंडळी नुकतीच परत आली होती. बालोचाकला ज्युनियर लॅन्ड रेकार्डिंग ऑफिसरच्या ऑफिसपुढे दोनशे लोकांनी निदर्शन केले होती दुपारी. योग्य त्या बर्गदाराचे नाव रेकॉर्ड करा, वशिलेबाजी करू नका अशा मागण्या होत्या. गुणधर मुर्मु व निसाई यांनी अशा अनेक तंट्याच्या केसेसची यादी तयार केली होती व त्यांना न्याय मिळवून देण्याचे त्यांचे प्रयत्न होत. 'खेतमजदूर कृशक संस्था' ही त्यांची संघटना.

## तणावाचे वातावरण

अंधार खूप दाट झाला होता आणि काजव्यांचे थवेच्या थवे चमचम करायला लागले होते. कम्बलपूर सोडून आम्ही 'बालासोना' गावाकडे निघालो. तेथे छोटासा बाजार होता आणि चारपाच टपरातील हॉटेल होती. ही सगळी हॉटेल श्रीमंत जोतेदारांच्या मुलांनी चालविलेली. चहा करायला एखादा पोऱ्या आणि पावाचे तुकडे, सामोसे, मिष्टी. बाजारात शिरता शिरता एक नाटनटका बांधलेला गोदामासारखी छोटीशी इमारत दिसली. कंदिलाच्या प्रकाशात एक माणूस लिहीत बसला होता. भातगिरणीच्या मालकाचा तो एजन्ट असल्याचे कळले. आतापर्यंत कोणी तरी पाहुणे आले असल्याची बातमी कळली. बोध आदिवासी जमा झाले. मग एका हॉटेलमध्ये आमच्या पाहुणचाराचा कार्यक्रम झाला. सामोसा, मिष्टी आणि चहा. भाषा येत नसल्यामुळे माझे संभाषण नव्हतेच. भवदेव मंडल म्हणाले की, 'तुम्ही ॲन्थ्रापॉलॉजिस्ट आहात असे सांगतो. जोतेदारामध्ये लगेच बातमी पसरेल तुम्ही येऊन गेल्याची. उद्या या लोकांना त्रास होईल.' आदिवासींना आनंद होता की कोणी तरी पांढरपेशा माणूस, भद्रलोक त्यांच्या बाजूने त्या भागात आला होता.

वातावरणात कुजबुज होतीच. दहा वर्षांपूर्वी जेथे याच गुणधर मुर्मुने सत्ता गाजविली, दहशतीने जोतेदारांना पळवून लावले त्याच ठिकाणी आज पुन्हा या लोकांना दडपणाखाली वागावे लागत होते. अर्थात हीही बाजू अगदीच दुबळी, असहाय्य नव्हती. प्रतिकारासाठी सिद्ध होतीच. सिद्धार्थ शंकर रेंच्या राजवटीपेक्षा सध्या वातावरण खूपच मोकळे होते; पण वर्गसंघर्षाचा ज्वालामुखी विझलेला नव्हता. ठिणग्या मधूनमधून पडतच होत्या. ताण होता तो सावध राहण्याचा. डावपेचाचा. शिवाय मला असेही वाटत होते की, हा 'सावधपणा' या लोकांच्या पूर्वीच्या वारशाचा परिणाम असावा. नक्षलवादी चळवळीत भूमिगत पद्धतीने काम करण्याची सवय असल्यामुळे आता उघडपणाने काम करत असतानासुद्धा पूर्वीचा सावधपणा गेला नसावा.

बलासौमीला लखीराम मुर्मुला शोधण्यासाठी माणसे गेली. लखीरामने आपला न्याय्य हक्क बजावण्यासाठी बर्गदार म्हणून जमिनीचा ताबा घेऊन जमीन कसायला सुरुवात केली होती. जोतेदाराला लखीरामला हुसकावून लावायचे होते. त्याचे नाव बर्गदार म्हणून लावले जाऊ नये अशी इच्छा होती. त्याने विरोध केला. त्याने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्याचा पाठिंबा मिळविला. कार्यकर्त्याने गुणधर मुर्मुला–पुढाऱ्याला बोलणी करायला बोलाविले आणि तो आल्याबरोबर त्याला घेरावो घालून मारायला सुरुवात केली. आदिवासी बायकांनी त्याला सुटून जाण्यास मदत केली. काही दिवसांनी दिलीप सरकार नावाचा दुसरा कार्यकर्ता आला. त्यालाही दोराने बांधून मारायला सुरुवात केली. लखीराम मुर्मुच्या धाकटया भावाने पोलिसांना बोलाविले म्हणून तो सुटला. या सर्व प्रकरणात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्याने सतत जोतेदाराची बाजू घेतली. गुणधर मुर्मु वगैरे पुढारी मिदनापूर जिल्ह्याच्या पक्षचिटणिसाला जाऊन भेटले व त्यांनी तक्रार केली स्थानिक कार्यकर्त्याबद्दल. त्याही वेळी त्याने त्यांच्या कार्यकर्त्यांची बाजू घेतली व 'तुम्ही जनताद्रोही आहात, मारले ते बरेच झाले!' असे सांगितले. एकूण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षावर खूपच राग दिसला. या जोतेदारांना कोणीच कसे तुरुंगात टाकत नाही? त्यांच्या बंदुका का काढून घेत नाहीत? काँग्रेसच्या राज्यात आणि या राज्यात काय फरक? असे प्रश्न त्यांनी विचारले.

मी विचारले, 'आज तुम्ही दुपारी निदर्शने करून आलात ते काँग्रेसच्या राज्यात शक्य होते का? गुणधर मुर्मु तुरुंगात होता, भवदेव मंडल तुरुंगात होते चार वर्ष. त्यांना कोणी सोडले?' यावर त्यांच्याकडे उत्तर नव्हते.

रात्री आम्हाला बरेच वळसे घालता घालता शेताच्या बांधावरून दुसऱ्या एका आदिवासीच्या घरात नेण्यात आले. हेही घर मातीचेच; पण चांगले बांधले होते. शेतकऱ्याचे घर होते, शेतमजुराचे नव्हते. तेथे मग त्यांच्यातील निवडक ८–१० कार्यकर्त्यांची बैठक बसली. आश्चर्य म्हणजे पहिला विषय होता, काम्पुचिया व दुसरा विषय होता चीन व व्हिएतनामचे युद्ध. गुणधर मुर्मुने अस्खलितपणे त्यांची राजकीय भूमिका समजावून सांगितली. एकाचे म्हणणे चालू होते, 'चीननेच आक्रमण केले आहे. व्हिएतनामची बाजू बरोबर आहे' आणि गुणधर त्याचा मुद्दा खोडून काढत होता. मला अतिशय आश्चर्य वाटले. प. बंगालच्या त्या छोटयाशा खेडयात–शेकडो मैल दूर असलेल्या–व्हिएतनामच्या भूमीवर चाललेल्या युद्धाबद्दल इतका जिव्हाळा दाखविला जावा! अस्सल कम्युनिस्ट परंपरेला साजेलशी ही गोष्ट होती. कम्युनिस्टांचे आंतरराष्ट्रीय प्रेम आणि राजकीय जाणीव तीव्र असावी लागते. कधीही राजकारण समजावून घ्यायचे झाल्यास आंतरराष्ट्रीय राजकारणापासूनच सुरुवात करण्याची कर्मठ–मार्क्सवादी सवय तळागाळापर्यंत पोचलेली दिसत होती. ही मंडळी अर्थात चीनवादी होती.

ह्या मंडळींना माझा शेवटचा प्रश्न होता, 'जर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष क्रांतिकारक नाही तर सरकारी दडपशाही त्यांच्यावर एवढ्या प्रचंड प्रमाणात का झाली?'

'सत्तेवर येईपर्यंत हा प्रश्न अगदी क्रांतिकारी नाही, तरीही लढवय्या समाजवादी पक्ष होता; पण सत्तेवर आल्यावर त्याचे वर्गस्वरूप बदलले. जोतेदारांनी त्या पक्षाला आपला मानले. तसेच राज्यावर राहता यावे म्हणून या पक्षानेही जोतेदारांना पाठिंबा द्यायला सुरुवात केली.' हे त्यांचे सर्वांचे ठाम उत्तर होते. मला त्यांच्या ठामपणाची गंमत वाटली. कडवेपणा, कर्मठपणा एकदा अंगात शिरला की, तो जिवावर उदार व्हायला स्फूर्ती देतो, तसेच

## नक्षलवादी : आज

आज नक्षलवाद्यांचे काय चालले आहे हा प्रश्न सर्वांच्याच मनात अगदी वरचा प्रश्न आहे. डाव्या आघाडीच्या सरकारने ५०० हून अधिक नक्षलवाद्यांची सुटका केली. डावा साहसवाद सोडून ते आपल्या सिद्धांताचा पुनर्विचार करतील हे त्यातील गृहीतकृत्य आहे. आज नक्षलवाद्यांमध्ये सर्वसाधारणपणे सहा गट अस्तित्वात आहेत. १९७० च्या आधीपासूनच ह्या फुटीला सुरुवात झाली होती. सत्यनारायण सिन्हा गट चारु मुजुमदार या मुख्य सैद्धांतिकापासून दूर गेला. १९७३ साली चीनच्या कम्युनिस्ट पक्षाची १० वी काँग्रेस झाल्यावर ही फूट आणखी वाढत गेली व सहा गट निर्माण झाले. अर्थात हे सगळे वाद-विवाद तुरुंगात झाले. १९७२ ते १९७७ नक्षलवादी चळवळ जवळजवळ थांबली होती. आणीबाणी संपता संपता नक्षलवाद्यांपैकी अनेकांमध्ये आमूलाग्र बदल झाला. आशीम चटर्जी व सत्यनारायण सिन्हा या दोन गटांनी निवडणुकांमध्ये भाग घेण्याचा प्रचार केला व सत्यनारायण सिन्हागटाचा संतोष राजा विधानसभेमध्ये निवडून गेला. मात्र विनोद मिश्रा गट व महादेव मुखर्जी गट यांच्यामध्ये अजून बऱ्याच चर्चा व वादविवाद चालू आहेत. त्यांच्यातील सर्वात जहाल गटाचा 'कृतीला' व 'वर्गशत्रूंची हत्या' धोरणाला पाठिंबा असून त्यांनी 'बांकुरा' जिल्ह्यात एक-दोन ठिकाणी बंदुका चोरल्या. मात्र विनोद मिश्रा स्वतः 'कृतीसाठी सिद्ध करणारे जनता धोरण' या मताला येऊन पोचला आहे. जनतेचा पाठिंबा व जनतेची कृती यांचे महत्त्व त्याला पटलेले आहे. नाही तर पुन्हा दडपशाही होऊन पक्ष मारला जाईल याची त्याला कल्पना आहे. तेव्हा 'हत्या-धोरण' व जनता-धोरण यांची सांगड घालून त्याला पुढे जायचे आहे. *

आंधळेपणाही शिकवतो. झापडे बलवायला शिकवतो. खऱ्या मार्क्सवादाचा उपयोग करून सतत भोवतालचे वास्तव तपासून पाहण्याची गरज न बघता सरळ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या मुशीतील राजकारण स्थानिक पातळीवर आणणे, 'झाड व जंगल' हे एकच आहेत असे समजून सरसकट धोपटायला सुरुवात करणे हे सगळे या चुकीच्या सैद्धान्तिक समजाचे परिणाम आहेत. पहाटे ५-३० ची बस गाठण्यासाठी जेव्हा पुन्हा शेताच्या बांधावरून आमचा परतीचा प्रवास सुरू झाला तेव्हा माझ्या मनात या झपाटलेल्या माणसाबद्दल आदर व प्रेम दाटून येत होते. त्याच वेळी त्यांना खरा मार्क्सवाद सापडो अशा मनोमन शुभेच्छा मी व्यक्त करीत होते. ※

## : सात :

# गोगलगाईच्या गतीने समाजवाद ?

डाव्या आघाडीच्या सरकारचे 'आर्थिक कार्यक्रमाच्या' बाबतीत यशापयशाची चर्चा करताना प्रथम प. बंगाल या राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा इतिहास समजून घ्यावा लागतो. विशेषतः मुंबई व कलकत्ता या दोन शहरांची तुलना करण्याचा मोह अनेकदा होतो. तसेच प. बंगाल व महाराष्ट्र यांचीही तुलना करण्याचा मोह होतो; पण दोघांच्या इतिहासाचे वारसे वेगळे आहेत. भारतीय भांडवलशाहीच्या विशिष्ट पद्धतीने झालेल्या विकासामध्ये औद्योगिक विकास महाराष्ट्राचा व प. बंगालचा असमान पद्धतीने झाला आणि कोणे एके काळी उद्योगधंद्यांचे मोहोळ असलेली कलकत्तानगरी आज जुन्यापुराण्या यंत्रांचे ओझे वाहत बसलेली आढळते. जाणूनबुजून घेतलेले राजकीय निर्णय हेही काही प्रमाणात कलकत्त्याच्या उतरत्या कळेला कारणीभूत झालेत. प्रत्येक बंगाली मात्र केवळ याच राजकीय घटकाकडे बोट दाखवितो आणि आपल्यावर फार भयंकर अन्याय झालेला आहे या भावनेने संतप्त असतो. हिंदी भाषेला विरोधही याच भावनेतून तयार होतो. केंद्र सरकारबद्दल राजकीय चीडही त्याच भावनेतून जोपासली जाते. ह्या लोकप्रिय पातळीवरच्या प्रतिक्रिया झाल्या; पण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने राज्य व केंद्र सरकारच्या संबंधांबद्दल तात्त्विक केस तयार केली असून त्यांच्या मते हा केवळ राजकीय स्टंट नव्हे. भांडवलशाहीच्या असमान विकासाविरुद्ध व केंद्र सरकारवर असलेल्या भांडवलदारांच्या वर्चस्वाबद्दल हे बंड आहे. आजपर्यंत केवळ जी लॉबी शक्तिशाली, त्या लॉबीने आपल्याकडे केंद्रीय सरकारच्या अखत्यारीतील पैसे ओढून घ्यावेत, असे चालले होते. याउलट आता जी राज्ये अधिक गरीब, अविकसित त्या राज्यांकडे विकासासाठी मदतीचे पारडे झुकले पाहिजे आणि म्हणून प. बंगालने केवळ बंगालचा विकास मागे राहिला असा मुद्दा न मांडता सर्व पूर्व भारतीय राज्यांची मिळून केस तयार केली आहे आणि स्वतःला इतरांचा पाठिंबा मिळविला आहे. म्हणूनच नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलकडे पाठविलेले राज्यांच्या पंचवार्षिक नियोजनाचे आराखडे अजून पास होऊ शकले नाहीत. कारण किती पैसे कोणत्या राज्याला मिळावे यावर केंद्राचे व राज्यांचे एकमत होऊ शकले नाही.

तेव्हा सध्या फक्त आर्थिक धोरणे व सरकारी आर्थिक कायदे याबद्दल राज्यांना जास्त अधिकार मिळावे आणि राज्य व केंद्र सरकारच्या संबंधाची पुनर्रचना व्हावी एवढीच 'नम्र' मागणी डाव्या आघाडीने पुढे ठेवलेली आहे. राजकीय अधिकाराच्या बाबतीत त्यांनी काहीही पर्याय सुचविलेले नाहीत. डाव्या आघाडीचे असे आग्रहाचे सांगणे आहे की, या सूचनेच्या अंमलबजावणीमुळे केंद्र सरकार दुबळे बनण्याची अजिबात शक्यता नाही किंवा त्याचे अधिकार कमी झाल्यामुळे राज्यांमध्ये सुभेदाऱ्या तयार होऊन बंडाचीही शक्यता नाही. उलट प्रत्येक राज्याचा विकास अधिक समानतेने होऊ शकेल. राज्यांच्या गरजांनुसार होऊ शकेल. अनेक उदाहरणे घेऊन डाव्या आघाडीचे वित्तमंत्री डॉ. अशोक मित्रा हे पटवून द्यायची तयारी करत असतात. त्यांच्या प्रत्येक बजेट-स्टेटमेंटमध्ये या बंधनांचा पुनरुच्चार केलेला असतो.

### असमान विकासाचा बळी : प. बंगाल

प. बंगालवर केंद्राकडून अन्याय होतोय् यासाठी अनेक दाखले दिले जातत. शंकर घोष यांच्या 'डिसइनहेरिटेड स्टेट' या पुस्तकात तक्त्यांची मोठी यादी दिलेली आहे.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो कलकत्त्यात परप्रांतातून काम शोधत येणाऱ्या कामगारांचा. आधीच बंगालच्या लोकसंख्येची घनता केरळच्या खालोखाल आहे. देशातील सरासरी १ चौ. मैलाला ३७३ व्यक्ती एवढी आहे. बंगालची १ चौ. मैलाला १,०३२ व्यक्ती एवढी आहे आणि कलकत्त्याची १ चौ. मैलाला ७३,००० व्यक्ती एवढी आहे. प. बंगालमधील उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या कामगारांपैकी फक्त ४५·४ टक्के कामगार बंगाली आहेत. बाकी सर्व इतर प्रांतांतून आलेले आहेत. त्यामुळेच १९६०–६१ साली कलकत्त्याहून २७ कोटी रुपये मनीऑर्डरमार्गे राज्याबाहेर गेले. त्याच वेळी मुंबईहून फक्त २३ कोटी रुपये, दिल्लीहून ७ कोटी रुपये आणि मद्रासहून ७ कोटी रुपये बाहेरील राज्यात पाठविले जात असतात. याचबरोबर असेही सांगितले जाते की, मालकलोक या परप्रांतीय कामगारांचा संप फोडण्यासाठी फायदा घेतात. बंगाली कामगार युनियनच्या कामामध्ये भाग घेतात म्हणून त्यांना नोकरीवर ठेवताना मागेपुढे पाहिले जाते. या पार्श्वभूमीवर स्थानिक लोकांनाच नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत अशी शिवसेनेसारखी मागणी पुढे येण्याची शक्यता असते आणि येतातही. केवळ डाव्या पक्षांच्या पुढारीपणामुळे अशा मागण्यांचा जोर वाढू दिला जात नाही.

बंगालमध्ये कामगार-कर्मचाऱ्यांमध्ये बंगाली लोकांचे प्रमाण कमी आहे, तसेच भांडवलदारांमध्येही बंगाली भांडवलदारांचे प्रमाण कमी आहे. १९६६ साली २९० कोटी रुपयांची भांडवलगुंतवणूक मान्य केली गेली. त्यात बंगाली भांडवलदारांची गुंतवणूक फक्त ५०% होती. मारवाडी भांडवलदारांची ४३% होती. इतर भारतीयांची १९% होती आणि परदेशी भांडवलदारांची ३% होती. त्यामुळेच

'मारवाडी' समाज हा येथील द्वेषाचे टारगेट बनला गेला आहे. या समाजाने कलकत्त्याच्या विकासामध्ये काहीच रस घेतला नाही. येथे दानधर्माचे ट्रस्ट उभारले नाहीत किंवा येथील सांस्कृतिक जीवनासाठी देणग्या दिल्या नाहीत. अशोक मित्रा त्यांच्या 'कलकत्ता' नामक पुस्तकात मुंबईशी कलकत्त्याची तुलना करतात आणि सांगतात की, मुंबईच्या उद्योगपतींनी मुंबई आपली मानली. तिला सजविण्यासाठी, सुंदर करण्यासाठी, सांस्कृतिक वातावरण विकसित करण्यासाठी पैसे ओतले आणि म्हणून आज मुंबई सुंदर दिसते. कलकत्त्यात तसे घडले नाही.

कलकत्त्याबद्दल बंगाल्यांना वाटणारे दुःख ठीक आहे; पण त्यांनी एक लक्षात ठेवावे, मुंबईला मराठी बोलणारा समाज फक्त ४५% आहे आणि कलकत्त्याच्या बाबतीत जसे बंगाल्यांना 'पझेसिव्ह फीलिंग' आहे तसे तीव्र फीलिंग मुंबईकरांना कधीही वाटू शकले नाही. कारण मुंबई हे खरोखर कॉस्मॉपॉलिटन शहर आहे आणि मुंबईकरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या वेळी मुंबईसाठी जो आग्रह धरला तेवढाच, एरवी त्यांनी मुंबईबाबत सहिष्णुता दाखविलेली आहेच.

इतरही अनेक निर्देशांक घेतले तरी प. बंगालला सतत सावत्रपणाने वागविले गेले असे येथील तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

पंचवार्षिक योजनांमधील खर्चाचे प्रमाण हे प. बंगालच्या बाबतीत कमी आहे. उदा. प. बंगालचा दरडोई खर्च ३० रुपये होता तर महाराष्ट्राचा दरडोई खर्च ५४ रुपये होता.

सरकारी कारखान्यांचे प्रमाणही प. बंगालमध्ये फार कमी आहे. एकूण सरकारी भांडवलगुंतवणुकीमधील केवळ ३ टक्के भांडवलगुंतवणूक प. बंगालमध्ये आहे. महाराष्ट्रात हेच प्रमाण ११ टक्के आहे. बिहारमध्ये अर्थातच ५० टक्के गुंतवणूक झालेली आहे.

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीने जी भांडवली मदत वेगवेगळ्या राज्यांना दिली त्यात प. बंगालच्या वाटचाला १०% च आली. महाराष्ट्र व मद्रासच्या वाटचाला अनुक्रमे १९% व १४% आलेली आहे.

केंद्रसरकारकडे जमा होणाऱ्या करांच्या रकमेपैकीसुद्धा केवळ ६.५% च रक्कम प. बंगालला मिळाली. प. बंगालची लोकसंख्या भारताच्या तुलनेत ८% आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ९% आहे आणि तरीही महाराष्ट्राला मात्र या रकमेपैकी ८% रक्कम मिळू शकली. बँकेच्या कर्जवाटपाबाबतही काटा झुकता असतो. महाराष्ट्राला जेव्हा दरडोई ३०८ रुपये कर्ज बँकांकडून दिले जाते तेव्हा बंगालला फक्त १४६ रुपये दरडोई कर्ज मिळते.

अशा अनेक उदाहरणांतून प. बंगालचा व कलकत्त्याचा मागासलेपणा कसा कायम ठेवला गेला हे कलकत्त्यातील सर्व विद्वान आवर्जून सांगतात आणि सामान्य माणसालाही हा सगळा कट केला जात आहे असे मनापासून वाटते व तो आपले वेगळेपण जपण्याचा, बंगाली अस्मिता जपण्याचा खास प्रयत्न करतो.

'अमियाकुमार बागची' नावाच्या अर्थशास्त्रज्ञाने मात्र यासाठी वेगळे कारण दिले. त्यांच्या मते प. बंगालमध्ये (Slight of capital) 'भांडवलाचे पलायन' घडले नसून disinvestment झाली आहे. म्हणजे भांडवलगुंतवणुकीचा दर घटत चालला आहे. येथ

RUSGARD
*Plastipeel*
प्लास्टिपीलचे
दर्जेदार
उत्पादक

गंजरोध

गंजण्यामुळे होणारी झीज वेळीच रोखण्यासाठी एक प्रभावी संरक्षण योजना

उत्पादक

प्लास्टिपील केमिकल्स ॲण्ड प्लास्टिक्स
(प्रा.) लिमिटेड

कारखाना व कार्यालय : ए–१७१; वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे ४०० ६०४.

दूरध्वनि : ५९२०३०
५९५७४१

तार : प्लासकोट, ठाणे.
टेलेक्स : पी सी पी ०११–४४९८

निर्माण होणाऱ्या मूल्यातील फार कमी मूल्य पुन्हा भांडवल म्हणून वापरले जाते. उदा. १९५९ ते १९६५ या कालखंडात सबंध देशात भांडवलगुंतवणुकीचा दर ३·६ टक्के होता, तर प. बंगालमध्ये ह्याच दर फक्त ३·२ टक्के होता. उद्योगधंद्यातील नव्या मूल्यनिर्मितीचा दरसुद्धा देशातील सरासरी दरापेक्षा कमी होता. नवीन भांडवल-गुंतवणुकीसाठी योजना आल्या त्यात प. बंगालसाठी १०० कोटी रुपये फक्त होते तर बिहार, मध्यप्रदेश यांसाठी १७१ कोटी रुपये व ११६ कोटी रुपये अनुक्रमे सुचविले गेले.

याचे एक महत्त्वाचे कारण असे होते की, ( Import Substitution Industries ) आयात मालाला पर्यायी माल उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची सुरुवात ही मुख्यतः प. भारतात झाली. उदा. नायलॉन, पेट्रोकेमिकल्स, औषधे वगैरे आणि या धंद्यांना सरकारने आयात कर बसवून संरक्षण दिल्याने त्यांच्यातून प्रचंड नफ्याची शक्यता तयार झाली. तसेच या धंद्यांतून हजारोंना नोकऱ्या मिळून प. भारत, पंजाब, दिल्ली येथे क्रयशक्ती तयार झाली आणि म्हणून प. बंगालमधील धंद्यांतून मिळणारा नफासुद्धा भांडवलदार प. भारतातीच या नव्या फायदा देणाऱ्या धंद्यांमध्ये गुंतवू लागले. प. बंगालमध्ये मुख्यतः पारंपारिक उद्योगधंदे आहेत त्यातून नफ्याचे प्रमाण घटले आहे, यंत्रसामुग्री जुनी झाली. जे मुंबईच्या कापडगिरण्यांचे झाले त्याहूनही वाईट अवस्था ज्यूट गिरण्यांची आहे. तेव्हा भांडवली अर्थशास्त्राचे कायदे हे या न–गुंतवणुकीला अधिक कारणीभूत आहेत. शिवाय येथील जहाल कामगारचळवळीचा, वर्गसंघर्षाचा वातावरणावर परिणाम होऊन त्यामुळे घाबरून येथे उद्योगधंदे काढायला भांडवलदार उत्सुक नसतो हा केवळ एक घटक आहे. त्याउलट येथील कामगारांचे पगार कमी आहेत, त्यामुळे श्रमशक्ती स्वस्त विकत घेता येते ह्याही फायद्याकडे भांडवलदार कानाडोळा करू शकत नाही. या सर्वांचा परिणाम बेकारीवर झालेला आहे आणि राज्यातील बेकारांची संख्या सध्या १७ लाखांवर आहे.

## रिलीफ

अशा परिस्थितीमध्ये राज्यात गुंतवणूक करण्यासाठी खाजगी भांडवलदारांना आवाहन करण्याची गरज भासणे स्वाभाविक आहे. डॉ. अशोक मित्रांना जेव्हा या बाबतीत विचारले तेव्हा मित्रा म्हणाले, ‘ सबंध देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना जोपर्यंत होत नाही तोपर्यंत केवळ सरकारी पातळीवर गुंतवणूक शक्य नाही. बहूद्देशीय कंपन्या आहेत, मक्तेदारी कंपन्या आहेत त्यांच्याच हातात आता भांडवल आहे. आम्ही नव्या कंपन्यांना आमची दारे पिळवणुकीसाठी उघडी करून देत नाही. आम्ही ज्या कंपन्या येथे उत्पादन करत आहेत त्यांना म्हणतो की, तुमचा नफा पुन्हा येथेच गुंतवा. बाहेर जाऊ देऊ नका. फक्त आम्ही सांगू त्याप्रमाणे, त्या वस्तूंच्या उत्पादनात गुंतवा. आम्ही नेहमीच मध्यम व छोटया उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देऊ इच्छितो. कारण सघन श्रमपद्धतीची यंत्रयोजना तेथे असू शकते; पण आज मात्र बाजारपेठेपासून ते भांडवलापर्यंत सर्वच बाबतीत त्यांच्या अडचणींची आम्हाला कल्पना येते. या देशात साखळी करून एखादी बाजारपेठ सुरक्षित करण्याची सोय नाही तोपर्यंत छोटया उद्योगधंद्यांना स्पर्धेला तोंड द्यावेच लागणार. अशा परिस्थितीत आम्ही बहूद्देशीय कंपन्यांचा पाठलाग करतो आणि लाळ घोटतो हा आरोप बालिश आहे.

डॉ. अशोक मित्रांशी बोलताना हा फरक मला पुन्हा पुन्हा जाणवत होता. भविष्याची खोटी गुलाबी चित्रे ते रंगवीत नव्हते किंवा इतर कोणत्याही सरकारची जी आत्मसमाधानी वृत्ती असते तीही त्यांच्याकडे नव्हती. परिस्थितीच्या कोंडीचे, बंधनांचे संपूर्ण भान त्यांच्याकडे होते. या सगळ्या उपाययोजनांतून फारसे काही होणार नाही हेही त्यांना माहीत आहे. म्हणूनच ‘ दहा वर्षांत बेकारी निर्मूलन करू ’ वगैरेसारख्या पोकळ वल्गनाही ते करत नव्हते. त्यांच्या बोलण्यात पुन्हा पुन्हा शब्द येत होता, ‘ relies ’ हे सगळे तात्पुरते, किंचित् आराम देण्यापुरते, मलमपट्टीसारखेच आहे.

या बहूद्देशीय कंपन्यांच्या बाबतीत बोलताना अमियाकुमार बागची एक गंमत सांगत होते. डाव्या आघाडीच्या मंत्र्यांचा अनुभव असा आहे की, ‘ मारवाडी ’ भांडवलदार कम्युनिस्टांशी बोलायला नाराज असतात, अस्वस्थ असतात. याउलट बहूद्देशीय कंपन्यांचे परकीय अधिकारी अतिशय सहजतेने धंद्याची बोलणी करतात. त्यांच्याशी धंदेवाईक बोलणी करताना दोन वेगळ्या विचारसरणींचे घर्षण होत नाही किंवा तणावही तयार होत नाही. भारतीय भांडवलदारांच्या मनात मात्र ‘ प्रेज्युडाइसेस ’ घट्ट असतात.

**उद्योगधंदे :** डाव्या आघाडीची उद्योगधंद्यांबाबतीतील भूमिका अगदी स्पष्ट आहे.

१ : उद्योगधंद्यांतील स्थितिजन्यता दूर करणे.

२ : बेकारी कमी करणे – उद्योगधंदे व शेती यातील.

३ : छोटया उद्योगधंद्यांना व कुटीरोद्योगांना प्रोत्साहन देणे.

४ : मक्तेदारी कंपन्या व बहूद्देशीय कंपन्यांचा अर्थव्यवस्थेवरील फास कमी करणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे.

५ : स्थानिक तंत्रज्ञानाला वाव देणे व स्वावलंबन स्वीकारणे.

६ : सरकारी क्षेत्राचा हळूहळू विकास करणे.

७ : कामगारांचे म्हणजेच उत्पादकांचे उद्योगधंद्यांवरील नियंत्रण हळूहळू वाढवीत नेणे. (येथे कामगारांचा सहभाग ही ‘ शोभेची ’ संकल्पना अभिप्रेत नसून नियंत्रण ही सामाजिक मालकी व्यक्त करणारी संकल्पना अभिप्रेत आहे.)

या दोन वर्षांत यापैकी काय काय साध्य झाले आहे हे विचारणे चुकीचे होईल. शिवाय डाव्या आघाडीनेही भूमिका घेतली आहे की, औद्योगिक क्षेत्रात फार मोठी झेप घेता येणार नाही. त्यांनी आपले सर्व लक्ष शेतीसंबंधांवर केन्द्रित करायचे ठरविले आहे. कारण शेती हा विषय राज्यांच्या अखत्यारीतील आहे. शिवाय तेथील संबंध अजूनही सहभागी अवस्थेत आहेत. त्यामुळे उत्पादनही फार कमी आहे. राज्यांचे एकूण उत्पादन वाढण्यातही हे उत्पादनसंबंध मोठीच खीळ घालत आहेत.

## घेराओ : Substitutionism :

मात्र उद्योगधंद्यांतील उत्पादनातील एक महत्त्वाचा घटक– कामगार. त्याचे शोषण भांडवली व्यवस्थेतही चालू रहाणार; पण त्याचे जीवनमान थोडेसे उंचावण्याचा प्रयत्न व औद्योगिक वातावरणामध्ये त्याच्यावर होणारी जबरदस्ती, सूडबुद्धीची वागणूक,

ट्रेडयुनियनची नाकेबंदी वगैरे कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे, याचा पुरावा म्हणजे गेल्या दोन वर्षांत झालेले त्रिपक्षीय करार, सरकारने कामगारांची बाजू घेऊन केलेले हस्तक्षेप व मिळवून दिलेले वाढीव वेतन व फायदे. गेल्या महिन्या-दोन महिन्यांत गाजलेले दोन मोठे संप होते, एक ज्यूट कामगारांचा, दुसरा होता छपाई कामगारांचा. अर्थात् या आघाडीवर सरकारला तारेची कसरतच करावी लागतीय. एकीकडे आपला जहालपणा सिद्ध करण्यासाठी व कामगारांमध्ये खदखदणाऱ्या असंतोषाला वाट देण्यासाठी संघर्ष करावे लागत आहेत. दुसरीकडे भांडवलगुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी 'औद्योगिक अशांतता' फारशी नाही, नेहमीसारखी नॉर्मल परिस्थिती आहे असेही सतत मांडावे लागत आहे. विशेषत: घेराओच्या बाबतीत फारच सावध रहावे लागत आहे. १९६७ साली व १९६९ सालची संयुक्त आघाडीच्या सरकारची कारकीर्द कामगारांच्या घेराओंनी फारच गाजली होती. १९६७ साली S U C या पक्षाचे सुबोध बॅनर्जी हे कामगारमंत्री होते. सरकारने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीप्रमाणे १९६७ साली एकूण ८११ घेराओ घातले होते. १९६९ साली त्याची संख्या एकूण ५१७ होती. आणीबाणीच्या दोन वर्षांत मिळून फक्त २१ घेराओ झाले होते. १९७७ साली घेराओंची संख्या ६२ होती. सुबोध बॅनर्जींनी घेराओचे समर्थन करताना सांगितले होते की, 'खरी न्याय्यता व भांडवली कायदे यांच्यातील दरी दाखवून देण्यासाठी, कायद्याचा अपुरेपणा दाखवून देण्यासाठी आम्ही कामगारांना या अनुभवातून जाऊ देतो.' एवढंच नव्हे तर घेराओ ही लोकशाही चळवळ समजून पोलिसांनी त्या बाबतीत कसे धोरण घ्यावे याबाबतीत सरकारी फतवाही काढला गेला होता; परंतु त्या वेळी हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश डी. एन्. सिन्हा यांनी त्या सर्क्युलरचा अधिकार धुडकावून लावला व जो पोलीस नेहमीच्या क्रिमिकल प्रोसीजर कोडप्रमाणे वागणार नाही त्याला गुन्हापात्र ठरविले आणि घेराओ हे कामगारचळवळीचे हत्यार म्हणून मागे पडले.

कलकत्त्याला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या एका ज्येष्ठ कार्यकर्त्याला घेराओबाबत विचारले तेव्हा तो म्हणाला की, आम्ही घेराओला ( Substitutionism ) मानतो. थोडक्यात सबंध कामगारवर्गाला गुंतवून घेणारी, त्याचा सहभाग वाढविणारी कृती न घेता काही मूठभर कामगारांनी आक्रमक होणे ही प्राथमिक अवस्थेतील चळवळ झाली. आम्ही घेराओचे शस्त्र आता न वापरण्याचा निर्णय घेतलाय्.

इतर अनेकांच्या डाव्या आघाडीच्या कामगार धोरणविषयीच्या टीकांचा समाचार नंतर घेईनच. सध्या मूळ धोरण सांगून पुढे जाण्याचे ठरविले आहे. कलकत्त्याचे वैशिष्टय जाणवले ते हे की, स्वत: कामगारमंत्री कृष्णपद घोष ज्यूट कामगारांच्या मेळाव्याला हजर होते आणि सरकारी मंत्र्याने तटस्थ भूमिका घेऊन, मालक-मजूर तंटा सोडवायचा प्रयत्न करायचा असतो या पारंपरिक कल्पनेला तेथे सरळसरळ तिलांजली दिलेली होती. मंत्री सरळसरळ पक्षपाती भूमिका घेत होते. मुंबईत कोणे एके काळी वसंतदादा पाटील राष्ट्रीय मिल मजदूरसंघाचे अध्यक्ष होते आणि नंतर मुख्यमंत्री झाले; पण दोन्ही भूमिका एकजीव झाल्याचे कधी पहाण्यात आले नाही. कृष्णपद घोष हे औद्योगिक संबंध विधेयकाविरुद्ध दिल्लीला जो मोर्चा निघाला त्यातही सामील झाले होते.

**बेकारी-भत्ता :** एकीकडे कामगारांच्या जीवनमानाची काळजी करत असतानाच बेकारांचा प्रश्नही सरकारला हाताळायला लागत होता. बेकारी-भत्ता द्या, ही बहुधा प्रत्येक डाव्या पक्षाची मागणी असते. सरकारच्या चुकीच्या आर्थिक व औद्योगिक धोरणांमुळे बेकारी तयार झाली आहे. तेव्हा या चुकीची थोडीफार भरपाई म्हणून ही भत्त्याची मागणी करण्यात येते. बंगालमध्ये आजमितीस १७ लाखांवर बेकारांची नोंद उद्योगविनिमय केंद्रात केलेली आहे. त्यापैकी १ लाख ५० हजार तरुणांना महिना ५० रुपयांप्रमाणे बेकारभत्ता सुरू झालेला आहे. त्यासाठी किमान पाच वर्षे सतत नोकरीची प्रतीक्षा करत त्या व्यक्तीचे नाव रजिस्टर्डमध्ये चालू राहिलेले असले पाहिजे अशी अट आहे. हे पैसे जास्तीत जास्त तीन वर्षे किंवा नोकरी मिळेपर्यंत मिळत राहतील अशी तरतूद आहे. ९ कोटी रुपये त्यासाठी राखून ठेवले आहेत. बेकारभत्ता देण्याची कल्पना प्रत्यक्षात आणणारे बंगाल हे पहिले राज्य आहे महाराष्ट्र राज्यातसुद्धा अजून एवढ्या मोठ्या प्रमाणावर व मोठ्या संख्येला बेकारी भत्ता मिळत नाही. बऱ्याच जणांना विचारले असताना कळले की, बऱ्याच जणांना याचा फायदा लगेच मिळायला लागला आहे. फक्त अनेकांची तक्रार आहे की, मध्यंतरीच्या काळात या नोंदीला काही अर्थच न उरल्याने अनेकांनी आपली नावे पुन्हा नोंदवलेली नव्हती. आता पुन्हा झपाट्याने तरुण मंडळी नावनोंदणी करू लागली आहेत. त्याचबरोबर सरकारने 'सेल्फ एम्प्लॉयमेंट'च्या योजनेत भाग घेणाऱ्या तरुणांसाठी २० टक्क्यांपर्यंत रक्कम बीज-भांडवल म्हणून देण्याचे मान्य केले आहे. ७५ टक्के बँकेकडून मिळाल्यास त्या व्यक्तीला एकूण भांडवली खर्चापैकी ५ टक्के फक्त उभे करण्याची गरज भासेल. एवढेच नव्हे तर या व्यक्तींनी कर्जाचे हप्ते वेळेवर फेडण्याची तयारी दाखविल्यास कर्जावरील व्याज भरण्याची संपूर्ण जबाबदारी सरकार घ्यायला तयार आहे.

वरील आर्थिक धोरणाचाच एक भाग म्हणून सरकारी नोकरांना केंद्रीय नोकरांच्याच दराने महागाईभत्ता देण्याचे डाव्या आघाडीने नुकतेच जाहीर केले आहे व बऱ्याच वर्षांची मागणी पूर्ण केली आहे.

*

---

## : आठ :

# शेतीकार्यक्रम : अशोक मित्रा आणि चरणसिंग
# " चरणसिंगांना अर्थशास्त्र कळत नाही " त्याला मी काय करू ?

—डॉ. अशोक मित्रा

---

डाव्या आघाडीच्या सरकारने आपल्या अनेक कार्यक्रमांपैकी खास जाहिरात केली आहे ती पंचायत निवडणुकांची. गेल्या १५ वर्षांत बंगालमध्ये कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

झालेल्या नव्हत्या. सत्ता फक्त कलकत्त्यातील रायटर्स बिल्डिंगमध्ये केंद्रित झाली होती आणि नोकरशाहीच्या हातून कारभार चालविला जात होता. मागील वर्षी प. बंगालमधील ३,२४२ ग्रामपंचायतींच्या निवडणुका होऊन जवळजवळ ३३,००० सभासदांच्या हाती आर्थिक कारभाराची व राज्यकारभाराची सूत्रे सोपविण्यात आली. आपल्याकडील ग्रामपंचायती कशा defunet, मेलेल्या असतात हे आपल्याला माहिती आहे किंवा काही ठिकाणी त्या राजकारणाचे कृतिशील केंद्र असतील तर त्या बहुधा गावातील प्रतिष्ठित व टग्यांच्या हाती असतात असा आपला अनुभव आहे. अशा परिस्थितीत बंगालमध्ये या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांना भयंकर महत्त्व आले आणि पक्षांच्या निशाण्या वापरून निवडणुका लढविल्या गेल्या असे ऐकल्यावर मला जरा कुतूहलच तयार झाले होते. बंगाल सरकारने या घटनेला 'सत्ताविकेंद्रीकरणाचा महान प्रयोग' वगैरे गौरवशाली विशेषणे लावली आहेत. कदाचित बंगालच्या राजकीयदृष्ट्या जागृत झालेल्या खेड्यातील बहुसंख्य गरीब जनतेने मनापासून, जाणीवपूर्वक या प्रयोगात भाग घेतला असावा आणि खरेच प्रत्यक्ष हातात सत्ता आल्याचे त्यांना जाणवत असावे. एक तर या पंचायतींच्या हातात प्रत्येकी ५०,००० रुपये खर्चासाठी दिल्याचे कळले. आपल्याकडे ग्रामपंचायतीच्या हाती फक्त १००० रुपये मिळतात. तेही अगदी तातडीने रिलीफ वर्क सुरू करून लोकांना काम देण्यासाठी प्रामुख्याने असतात. हे पैसे मुख्यतः भूमिहीन शेतमजुरांना भाकड सीझनमध्ये काम देण्यासाठी वापरायचे आहेत. ही कामे शक्यतो जमिनीची उत्पादकता वाढविणारी, भूविकासाची कामे असावीत आणि या कामांचे नियोजन मुख्यतः गावच्या लोकांनी करावे अशी कल्पना यामागे आहे. यंदाच्या वर्षी पुरामुळे अनेक घरे वाहून गेली, कोसळली म्हणून घरे बांधून देण्याची कामेसुद्धा Food for work या योजनेमध्ये घेतली जावीत असे सरकारने निवेदन काढले आहे. 'operation barga' या जमीनसुधारणेच्या महत्त्वाच्या कामामध्येही पंचायतीला महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. एखाद्या कुळाच्या बाबतीत तंटा उत्पन्न झाला तर पंचायतीने न्याय करायचा आहे. थोडक्यात सरकारीयंत्रणा, जनता आणि आर्थिक मदत देणाऱ्या संस्था या तिघांना एकत्र आणण्याचा महत्त्वाचा दुवा म्हणून या पंचायतींनी कामे करायची आहेत. पंचायती निवडणुकांच्या निकालांनी आणि निवडणूक मोहिमेच्या वेळी लोकांनी जो अमाप उत्साह दाखविला त्याने या


कारखाने असोत वा गृह निर्माण संस्था असोत...
सुरक्षितता सर्वांनाच महत्त्वाची असते !
सुरक्षिततेशी निगडित सर्व प्रश्नांसाठी

**इंटर कॉंटिनेंटल सिक्युरिटी फोर्स**

४ बी, ग्रेट वेस्टर्न बिल्डिंग, १३०/१३२ अपोलो स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई १

संचालक : ख्वाजा मोहिउद्दीन
(सेवानिवृत्त प्रोहिबिशन व एक्साईज सुपरिंटेंडेंट)
दूरध्वनि : २४४९५४ – २९७८१२


विकेंद्रीकरणाला खरोखरच काही अर्थ प्राप्त होतो आहे याची ग्वाही पटली आहे. पंचायती, पंचायतसमिती व जिल्हा परिषदा मिळून ४६ हजार ८३८ जागांची निवडणूक झाली. त्यांपैकी २८ हजार १०५ जागा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला मिळाल्या. आर्. एस्. पी. व फॉरवर्ड ब्लॉक यांना अनुक्रमे १६७४ व १५३९ जागा मिळाल्या. उमेदवार त्या गावचाच रहिवासी असला पाहिजे ही अट असल्याने ह्या निवडणुका अगदी आपल्या हातातल्या, प्रत्यक्ष वाटल्या असाव्यात. या निवडणुकांमुळे डाव्या आघाडीची मुळे खोलवर रुजली गेली असे समजले जाते.

अजून महानगरपालिका व नगरपालिका यांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. महानगरपालिका गेली १० वर्षे Supercede झालेली आहे आणि मुंबई महानगरपालिका लोकशाही पद्धतीने व्यवस्थित चालते हे ऐकून लोकांना आश्चर्य वाटले.

## शेतीसंबंध : कोंडी फोडण्याचा प्रयत्न

या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांहूनही मोठी कामगिरी जमीनसुधारणेच्या क्षेत्रात करण्याचे अभिवचन डाव्या आघाडीने दिले आहे आणि लाखो छोटे शेतकरी, कुळे नव्या सरकारकडे डोळे लावून बसली आहेत. १९६७ साली प्रथम संयुक्त आघाडीच्या सरकारची सत्ता आल्यावर 'जमीन बळकवा' मोहीम सुरू झाली होती आणि ठिकठिकाणी कायद्यासाठी वाट न बघता, कोर्टाच्या केसेसच्या निकालाची वाट न बघता शेतकऱ्यांनी जमिनीचे ताबे घेतले होते. हरेकृष्ण कोनार हे त्या वेळी 'कृषक सभेचे' संघटकही होते आणि १९६७ व १९६९ च्या दोन्ही संयुक्त आघाड्यांच्या सरकारातील शेती व महसूलखात्याचे मंत्रीही होते. त्यांनीच सांगितल्याप्रमाणे न्यायालयांमध्ये जमिनीचे इतके खटले आणि इंजेक्शन्स् अडकून पडली होती की, त्या खटल्यांशी संबंधित जमीन सहज २ लाख एकरांच्या घरात जाईल. त्यामुळेच बेनामी जमीन, कमाल जमीन धारणा कायद्याखाली सरकारच्या ताब्यात आलेली जमीन यांचे वाटपही झालेले नव्हते. हरेकृष्ण कोनार यांनी सरकारी महसूलखात्याची व कृषकसभेची साखळी सुंदर जोडून दिली. त्यामुळे खात्याकडून एखादी जमीन कमालमर्यादेच्या वर ताब्यात ठेवली गेलीय् अशी माहिती मिळण्याचा अवकाश, कृषकसभेचे कार्यकर्ते भूमिहीन शेतमजुरांना घेऊन तेथे हजर होत व जमिनीचा ताबा घेत. पुढे ह्या चळवळीला जोर चढला आणि मासेमारीचे छोटे तलावही बळकावयाला सुरुवात झाली. त्यामुळे संयुक्त आघाडीतील पक्षांच्या कार्यकर्त्यांची आपापसात भांडणेही विकोपाला गेली. मारामाऱ्या, खुनापर्यंत झगडे पोचले. मात्र शेतकऱ्यांमध्ये आकांक्षा जागृत झाली. १९७१ नंतरच्या राष्ट्रपति-राजवटीमध्ये आणि नंतरच्या दमन कालखंडामध्ये या जमिनी पुन्हा जोतेदारांनी परत घेतल्या होत्या. वारसाहक्काने चालत आलेल्या कुळांना हुसकावून लावले होते. या वेळी सरकारने केवळ जनतेच्या चळवळींवर व उत्साहावर जमिनीचा प्रश्न सोडून न देता पायरीपायरीने जायचे ठरविले आणि पहिली पायरी म्हणून १९७४ सालापासून ते आजतागायत हुसकावून लावलेल्या कुळांना (बर्गदारांना) आपले कुळाचे हक्क प्रस्थापित करण्याची संधी देण्यात आली. ३० लाख बर्गदार कुटुंबे आज प. बंगालमध्ये आहेत. त्यांपैकी ८ लाख बर्गदारांची

नोंद झालेली आहे. १९७९ च्या डिसेंबरपर्यंत सर्व बर्गदारांची नोंद पूर्ण व्हावी अशी कल्पना आहे. या सर्व कार्यक्रमास खास नाव देण्यात आले होते, ' operation barga ' आणि एखाद्या मोहिमेची तयारी करावी तशी तयारी करण्यात आली होती. ज्युनिअर लॅन्ड रेकॉर्ड ऑफिसर ( Jlro ) नेमले गेले आहेत आणि त्यांनी गावोगावी जाऊन पंचायतीच्या मदतीने सभा घ्याव्यात व लोकांना सर्व कायद्याची पूर्ण माहिती द्यावी आणि लोकांना पुढे येऊन नावे नोंदवायचे आवाहन करावे अशी योजना आहे. तसेच यापुढे नावे नोंदणी झाल्यावर पिकाची कापणी करून बर्गदाराने जोतेदाराकडून खंड पोचल्याची पावती घ्यावी अशीही तरतूद केली गेली आहे. तसेच अशा नोंदीची यादी प्रत्येक ग्रामपंचायतीच्या चावडीवर लावली जाईल व लोकांच्या माहितीसाठी ठेवली जाईल. एखाद्याला एखादी नोंद कबूल नसल्यास त्याने ( JLRO ) कडे जाऊन आपला तंटा मांडावा आणि पंचायत व ( JLRO ) यांनी मिळून त्या घटनेबद्दलची सत्यासत्यता पडताळावी असे ठरले आहे. ' कृषक सभा 'चीही मदत घेतली जात आहे.

या नोंदीचे खालील फायदे होणार आहेत.

१. प्रत्येक बर्गदाराकडे जमीन कसल्याची व खंड भरल्याची पावती असल्याने बर्गदाराचा जमीन कसण्याचा वारसाहक्क कायम रहाणार आहे. त्याला कूळ म्हणून जमिनीवरून काढून टाकण्याचा अधिकार जोतेदाराला नाही.

२. या बर्गदार नोंदणी कायद्यात सुधारणा केल्यामुळे बर्गदाराने कसणारा म्हणून एखाद्या जमिनीवर स्वतःची नोंद केली की हा परंपरागत जमीन कसत नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी जोतेदारावर राहील. जोतेदाराच्या दडपणामुळे बर्गदार नोंदणीसाठी पुढे येत नाहीत, तसेच त्याचे शेजारी शेतकरीसुद्धा साक्षी द्यायला पुढे येत नाहीत असा आजपर्यंतचा अनुभव होता. हे दडपण दूर करून खऱ्या बर्गदाराला जमीन मिळावी हा या कायद्यामागील उद्देश आहे. आपल्याकडील ' अस्पृश्यता पालना 'चा कायदाही याच स्वरूपाचा आहे. फिर्यादीला स्वतःची बाजू सिद्ध करावी लागत नाही, तर आरोपीला स्वतःचा गुन्हा नसल्याचे सिद्ध करावे लागते. बर्गदाराला कोर्टात जाणे परवडत नाही हेही त्यामागील गृहीतकृत्य आहे.

३. ' मालक शेतकरी.' (Self cultivator) या संकल्पनेची व्याख्या बदलली असून शेतमजूर न लावता जो स्वतःच्या कुटुंबाच्या श्रमावर जमीन कसतो तो मालकशेतकरी अशी नवी व्याख्या तयार झाली आहे आणि यापुढे जाऊन कमाल जमीनधारणा कायद्यात बदल करण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. व्यक्तीच्या नावावर कमाल जमिनीची मर्यादा न ठरविता कुटुंबाच्या नावावर आणि कुटुंबातील माणसांच्या संख्येप्रमाणे ' कमाल जमीन धारणा ' ठरविली जाईल असे सांगितले जाते. जमीन सुधारणा लवकर राबविता याव्यात म्हणून जमीनविषयक कायदे घटनेच्या नवव्या परिशिष्टात घालण्याची मागणी बंगाल सरकारने केली आहे. या परिशिष्टात समाविष्ट केलेल्या कायद्याविरुद्ध कोर्टात जाता येत नाही आणि सरकारच्या याच पावलाबद्दल जनता पक्षाची कावकाव चालू आहे. ' न्यायालयीन प्रक्रियेला ओलांडून जाण्याचा हा प्रयत्न आहे ' असे त्यांचे म्हणणे आहे.

४. एकदा बर्गदारांची नोंद झाली की, पुढील क्रम हा उत्पादित शेतीमालाची विभागणी काय प्रमाणात करावी यासंबंधी कायदा करणे हा राहील. सध्या ६० : ४० अशा प्रमाणात विभागणी होते. बर्गदाराला ६०% व जोतेदाराला ४०% धान्य मिळते. ही विभागणी ७५ : २५ या प्रमाणात करण्याचे प्रयत्न राहतील. जमीनमालकी या कायद्यांच्या चौकटीत ताबडतोबीने नष्ट करता येणार नाही.

५. अशा रीतीने एकदा प्रत्यक्ष जमीन कसणारा कोण ते निश्चित झाले की, जमिनीची उत्पादकता वाढण्यासाठी प्रयत्न करता येतील. कारण नवीन बी-बियाणे, खते, यंत्रे याचे अप्रूप जमीनदाराला अजिबात नसते आणि बर्गदाराला अप्रूप असूनही भांडवल नसते. शिवाय जमीन कसण्याबाबत संरक्षण नसते. शिवाय एवढे कष्ट करून, भांडवल घालून पुन्हा दुसऱ्याची धन करायची या विचारानेही बर्गदार नवीन तंत्र वापरू शकत नाही. एकदा हे संरक्षण मिळाले की, बंगाल सरकारने बँकांना नवीन योजना करण्यास भाग पाडले आहे. नोंद झालेल्या बर्गदाराकडे जमिनीचे मालकीपत्र नसूनसुद्धा त्याला बँकांतर्फे ४% व्याजाने कर्ज मिळावे आणि त्याने ते कर्ज वेळेवर परत केल्यास त्याच्यावरील व्याज सरकारतर्फे भरले जाईल. असेही आश्वासन सरकारने दिले आहे. छोट्या शेतकऱ्यालाही या योजनेचा फायदा मिळेल.

## मध्यम व छोटा शेतकरी आकर्षित

आपल्याकडे जमीनसुधारणा कायद्यांची चर्चा विधानसभेत वर्षभर चालू असताना ज्याप्रमाणे अनेकांनी कुळांना हुसकावून लावून जमिनी वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावांनी करून कायद्यातून पळवाट काढली तसे होऊ नये म्हणून सरकारने १९७४ ते १९७८ पर्यंतचा लांबलचक कालावधी निवडला आहे. शिवाय जास्तीत जास्त वर्षे बर्गदार म्हणून जमीन कसणाऱ्याचीच नोंद होईल असे जाहीर केलेले आहे. यापुढे जाऊन आजच्या २५ एकरांची कमाल धारणा मर्यादा कायद्यामध्ये सुधारणा होऊन ही जमीन व्यक्तीच्या नावे नसून कुटुंबाच्या मागे ठेवता यावी असाही विचार चालू आहे. तसेच दुसऱ्या एका बाबतीत दम धरण्याची गरज सरकारने सांगितली आहे ती म्हणजे धंदा मुख्यतः रेकॉर्डिंग होणार, नोंद होणार. हुसकावून लावलेल्या बर्गदाराचा हक्क ताबडतोबीने प्रस्थापित होईलच असे नाही. जेव्हा विशेषतः नवा बर्गदार व जुना बर्गदार यांच्यात तंटा उपस्थित होईल त्या वेळी ही प्रकरणे पंचायतीकडे आणली


*With best compliments from*

**JAYESH ENGINEERING COMPANY**

33, Daryasthan Street, Office No. 101
1st Floor, Masjid Bunder Road
Bombay 400 003

*Manufactures of :*

**Spareparts for all types of stanadard & Baby Expellers, Filter presses, elevators & Baby boilers**

जातील. सरकारने घालून दिलेल्या गाईडलाइन्सप्रमाणे दोघांना उत्पन्न आपापसात विभागून घ्यावे लागेल आणि जोतेदाराला मात्र काहीही उत्पन्न मिळणार नाही.

याच्या जोडीला डाव्या आघाडीने पाण्याखाली नसलेल्या ६ एकरांपर्यंत जमीनमालकाचा जमीनसारा रद्द केला आहे आणि पाण्याखालील जमिनीसाठी हे प्रमाण ४ एकर ठेवले आहे. त्यावरील जमिनीवरील कर हे वाढत्या प्रमाणात ठेवले गेले आहेत. मात्र एकणच शेतसारा कमी केलेला आहे व अशा रीतीने उत्पादनास प्रोत्साहन देण्याची व शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च कमी करण्याची ही योजना आहे. पुढे मागे शेतकी उत्पादनावर आयकर लावण्याचा विचार केला आहे. पुढेमागे शेतकी उत्पादनावर आयकर लावण्याचा विचार केला आहे. रेशनदुकानांसाठी जे धान्य लागते ते लेव्हीच्या स्वरूपात वसूल करण्याची सरकारची योजना आहे आणि ही लेव्ही फक्त सधन शेतकरी व भाताच्या गिरण्या यांच्याकडून वसूल केली जाते. छोटे शेतकरी व मध्यम शेतकरी यांना लेव्हीचे बंधन ठेवलेले नाही.

डॉ. अशोक मित्रांच्या मुलाखतीमध्ये मी जेव्हा त्यांना विचारले, 'चरणसिंगांच्या मागण्यांना तुमचा पाठिंबा आहे की नाही ?' तेव्हा मित्रांनी प्रश्न उडवून लावला. 'जमिनीचे मालकीसंबंध न बदलता खतांच्या किंमती, विजेचे दर कमी करून उपयोग काय ? त्यांचा उपयोग फक्त श्रीमंत भांडवली शेतकऱ्याला.'

'ते काही असू दे; पण त्यांच्या मागण्यांभोवती मध्यम शेतकरी आणि छोटा शेतकरी गोळा होतो ना ? ' हे बघा, मध्यम शेतकरी आणि छोटा शेतकरी आमच्याही भोवती गोळा व्हायला लागले आहेत बर्गदारांना कर्ज मिळवून देण्याच्या आमच्या योजनेचा निश्चित फायदा झाला आहे. १९७६–७७ साली केवळ ७'१ लाख टन अन्नधान्याचे उत्पादन झाले. ७७–७८ साली आम्ही ९२ लाखांवर मजल मारली. शिवाय छोट्या छोट्या बंधाऱ्यांच्या योजना, 'फूड फॉर वर्क' या योजनेखाली घेऊन आम्ही छोट्या शेतकऱ्यांनाही मोफत पाणी मिळेल याची व्यवस्था करतो आहोत. दोन पिके घेणे शक्य झाले तर छोट्या शेतकऱ्याच्या उत्पन्नात एकदम भर पडते. इतकेच नव्हे तर बँकांना आम्ही त्यांच्या कर्जाबद्दलच्या अटी कमी करायला लावल्या आणि आता बँकेचे अधिकारी बर्गदारांच्या घरी कर्ज देण्यासाठी जातात तेव्हा त्यांचा विश्वास बसत नाही.'

बंगालच्या जमिनीचा नकाशा मात्र खरंच हेवा करण्याजोगा आहे. पाण्याने भरलेली 'पुकुर' सर्वत्र असतातच. असंख्य पाट, छोटे ओहोळ सतत वाहात असतात. गंमत म्हणजे ग्रामीण भागात जे थोडेसे मला फिरायला मिळाले त्या वेळी पाणी वर ओढण्यासाठी लागणाऱ्या पंपांचा पक्‌पक् आवाज कोठेही येत नव्हता. पुष्कळ ठिकाणी तीन काठ्या रोवून स्टँड उभा केला होता आणि एक टिनाचे टोकदार भांडे–पखालीमारखे त्याला टांगले होते. दोन माणसे दोन बाजूंनी त्याला झोका देत आणि हाताच्या ओंजळीने इकडचे पाणी तिकडे टाकावे तशी ती पत्र्याची ओंजळ जरा खालच्या पातळीवर असलेले पाणी वरच्या शेतात रिकामे करी. शेतात ठिकठिकाणी लाल झेंडे रोवलेले आढळले. त्याच्यासंबंधी असे कळले की, ज्या बर्गदारांनी आपले जमीन कसण्याचे हक्क परत मिळविले होते, त्यांनी लाल झेंडा लावून ते हक्क प्रस्थापित केले. पूर्वी लाटेसारखे 'जमीन बळकवा' आंदोलन झाले आणि लाटेसारखेच विरून गेले. या वेळी अधिक सावकाश, काहीशा कायदेशीर मार्गाने. लोकांचा सहभाग घेत; पण त्यांच्या संघटित शक्तीवर संपूर्णपणे अवलंबून न राहता (काहींच्या मते क्रांतिकारक शक्तींना मुक्त होण्याची संधी न देता) हा जमीन सुधारणा कार्यक्रम राबविला जात आहे. अर्थात डाव्या आघाडीने याला 'क्रांतिकारी कार्यक्रम', 'ग्रामीण बंगालचा चेहरामोहरा बदलून टाकण्याचा कार्यक्रम' अशा घोषणा करून शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. डाव्या पक्षांच्या सर्व मंडळींनी मोहीम घेऊन या नव्या कार्यक्रमाचा प्रचार केला आणि असे सांगितले जाते की, निवडणुकांच्या सभांपेक्षाही त्या सभा प्रचंड होत होत्या.

### फटफटयांचे आवाज नाहीत

एका गोष्टीची मात्र नोंद जरूर घ्यावीशी वाटते की, बंगालच्या जमीनदारीचे स्वरूप बिहारसारखे नसावे. येथे खूप मोठी मोठी जमीन, मोठाल्या गढ्यांसारख्या कोठ्या, दारूत लोळणारे जमीनदार, चैनीचे जीवन असे जमीनदारी दृश्य संपलेले असावे. मध्यम जमीनदार व गैरहजर जमीनमालक–नोकरीच्या निमित्ताने परगावी राहणारा आणि कुळाकडून जमीन कसून घेणारा – यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आज ज्या ऐश्वर्याच्या खुणा दिसतात त्याही येथे डोळ्यांत भरत नाहीत. फटफट्या घेऊन आवाज करीत तोऱ्यात हिंडणारी मंडळी येथे पाहिली नाहीत. ट्रॅक्टर्स तर नाहीतच. अर्थात भातशेतीला ट्रॅक्टर उपयोगाचाही नाही; पण पॉवर टिलरही फारसे पाहायला मिळाले नाहीत. मात्र लोकसंख्या खूप असल्यामुळे जमिनीवर भार जास्त पडतो आणि जमिनीच्या तुकड्यासाठी भांडणे, मारामाऱ्या, खून यांचे प्रमाणही वाढते. जमीन सुपीक असल्याने थोडासा जमिनीचा तुकडाही आधार होतो. शिवाय औद्योगीकरण झालेले नसल्याने जमीन सोडून कुठे जायचे हाही प्रश्न असतोच. त्यामुळे छोटा शेतकरी व बर्गदार सोडून इतर केवळ शेतमजुरीवर जगणाऱ्यांची संख्या त्यामानाने कमी आहे.

### शेतीमालाच्या किंमती जास्तच !

डाव्या आघाडीचे वित्तमंत्री डॉ. अशोक मिश्रा यांच्याशी झालेली छोटी मुलाखत अशी : डॉ. अशोक मिश्रा फारच मित्रत्वाने वागले; पण माणूस जरा चक्रमच. जगभर फिरलेला, इंटलेक्चुअल, १९७२ पर्यंत इंदिरा गांधींचा इकॉनॉमिक अॅडव्हायझर आणि आता वित्तमंत्री. मार्क्सवादी असला तरी आतापर्यंत पक्षाचा सभासद नसलेला. त्यामुळे अनेक इंटलेक्चुअल्सप्रमाणे आपल्याच नादात रममाण. आत्मविश्वासपूर्ण वागणूक. इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकलीमध्ये ए. एम्. नावाने सदर लिहीत असत. सदर बरेच भाउक असे. दैन्य, दारिद्र्य, पिळवणूक एखाद्या घटनेतून पुढे आणायचा प्रयत्न असे. माझे नाव दातार म्हटल्यावर, कामगारतज्ज्ञ बी. एन्. दातारांशी नाते काय वगैरे अनौपचारिक प्रश्न विचारून, मग देशस्थ की कोकणस्थ वगैरे तपशील विचारल्यावर माझी दांडी गुल झाली !

आश्चर्य म्हणजे त्यांना लाल निशाण पक्षाचे दत्ता देशमुख माहिती होते. 'टर्मस् ऑफ ट्रेड अँन्ड क्लास रिलेशन्स' या त्यांच्या पुस्तकावर थोडीशी चर्चा. शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना जमिनीच्या किमतीवरील व्याजाची रक्कम ही खर्च म्हणून समजणे बरोबर का, असा प्रश्न उपस्थित झाला आणि त्यांनी पटकन् सांगितले, औद्योगिक मालाचा उत्पादनखर्च काढताना जागेचे भाडे हे जसे मार्क्सवादी अर्थशास्त्राप्रमाणे 'अतिरिक्त उत्पादनाचा' भाग समजला जातो, तसेच जमिनीचे भाडेसुद्धा 'अतिरिक्त उत्पादनाचा' भाग समजला पाहिजे. त्यांनी त्यांच्या पुस्तकात शेतीमालाच्या किमती व औद्योगिक मालाच्या किमती यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे व त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गेल्या काही वर्षांत औद्योगिक मालाच्या किमतीपेक्षा शेतीमालाच्या किमती जास्त दराने वर गेल्या आहेत आणि ग्रामीण भागातील मते मिळविण्यासाठी औद्योगिक भांडवलदाराने ही राजकीय किंमत मोजली आहे. जगातील इतर कोणत्याही देशात अन्नधान्यांच्या किंमती इतक्या महाग नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. विशेषतः क्रयशक्ती कमी असल्यामुळे आहे ह्या अन्नधान्याचा सुद्धा पुरवठा बाजारात खूप होतो व किमती पडण्याची शक्यता असते; पण कृत्रिमरीत्या किंमती वर ठेवलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मी त्यांना विचारले, 'चरणसिंग तर याउलट बाजू मांडत आहेत. शेतीमालाच्या किमती वाढवून द्या. खतांच्या किमती कमी करा!'

'चरणसिंगांना अर्थशास्त्र कळत नाही, त्याला मी काय करू? त्यांचे तोंड मी धरू शकतो का?' त्यांनी हसत विचारले.

'पण त्यांच्याभोवती इतके शेतकरी गोळा होतात त्याचे काय?'

'जमीनसुधारणांशिवाय खतांच्या किंमती कमी होऊन काय साध्य होणार? ट्रॅक्टर्सच्या किमती कमी होऊन काय साध्य होणार?'

माझा शेवटचा प्रश्न होता, 'तुम्ही अर्थशास्त्रज्ञ असून तुम्हाला आता प्रशासनात ( administrative ) लक्ष घालावे लागतंय्, तसंच राजकीय कामही करावं लागतंय्. तेव्हा हे जमते कसे?'

'मी जमवून दाखविलंय्. चौथ्या प्रतीचा अर्थशास्त्रज्ञ म्हणून काम करीत राहण्यापेक्षा काही बदल करून दाखविण्याची संधी मला आवडते!'

महाराष्ट्रासारखी 'रोजगार हमी योजना' इतर कोणत्याही राज्यात दिसत नाही; पण जेव्हा शेतीत रोजगार नसतो त्या वेळी चार महिने शेतमजुरांना रोजगार मिळावा, सावकाराकडे जावे लागू नये यासाठी मात्र 'फूड फॉर वर्क' योजना बंगालसरकारने लागू केली. त्याचा फायदा मागील वर्षी ४० लाख लोकांना तीन महिने मिळू शकला. या योजनेतर्फे २५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत आणि रोज तीन किलो गहू किंवा तांदूळ व दोन रुपये म्हणजे जवळजवळ ८ रुपये रोजगार पडेल इतकी मजुरी दिली जाणार आहे. बंगालमध्ये शेतमजुरांसाठी किमान मजुरी-कायदा ८ रुपयांचा असल्याने खाजगी शेतमालक जेवढी मजुरी देतात तेवढी किमान मजुरी सरकारी कामावर द्यायला लागते. डाव्या आघाडीच्या सरकारने 'कृषक सभां'ना शेतमजुरांना संघटित करण्याची कामगिरी सोपविली आहे. शेतमजुरांची संख्या कोठे जास्त आहे आणि त्यांना कामाची गरज आहे याचा शोध ग्रामपंचायतींनी घ्यायचा आहे. ग्रामपंचायतीचे सभासद हे बहुतेक ठिकाणी डाव्या पक्षांचेही सभासद-कार्यकर्ते आहेतच. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सरकारने प्रसिद्ध केलेल्या economic review या पुस्तिकेत शेतमजुरांनी संप कोठे कोठे केले व सरकारी नियमाप्रमाणे किमान वेतन मिळवून घेतले याचा तक्ता दिला आहे. प. बंगालमध्ये १० लाखांपेक्षा जास्त शेतमजूर नाहीत. महाराष्ट्रात ५० लाखांच्या आसपास शेतमजुरांची संख्या आहे. येथे पाण्याच्या अभावी जास्त दिवस सरकारी काम देण्याची गरज आहे आणि येथे रोजगार फक्त ३ रुपये पडतो. असे असून येथे १९७४–७५ साली फक्त ६ कोटी रुपये 'रोजगार हमी योजने'मध्ये पगारासाठी खर्च केले गेले.

## कलकत्ता महानगरपालिका : अवाढव्य जबाबदारी

कलकत्त्याचे वर्णन मी सुरुवातीला केलेले आहे आणि म्हणूनच प. बंगालमधील कोणत्याही सरकारला कलकत्तावासियांच्या जीवनात काही बदल न करता राज्य करता येणे कठीण आहे. मरू घातलेले, सडत चाललेले बेवारशी हे शहर. मुंबईसारखेच त्याचे दोन भाग पडतात. कलकत्ता शहर, ज्याची लोकसंख्या आहे तीस लाख आणि बृहन्-कलकत्ता, ज्याची लोकसंख्या शहर धरून आहे ९० लाख. यातील ३० लाख लोकसंख्या झोपडपट्टीत रहाते. वर्ल्ड बँकेने कलकत्ता शहराचे पुनरुज्जीवन करण्यासाठी २०० कोटी रुपये देऊ केले आहेत. अर्थात त्यावर प. बंगालसरकारचा आक्षेप आहेच की, जेव्हा केंद्रसरकारला वर्ल्ड बँक फक्त १ टक्का व्याज आकारत असते त्याच वेळी केंद्रसरकार मात्र प. बंगालसरकारला ९ टक्के व्याज आकारते. मात्र यामुळे आता कलकत्त्यातील झोपडपट्टीसुधारणा जोरात सुरू आहेत. आजपर्यंत कलकत्ता शहराला फक्त भूमिगत ड्रेनेज व सुवेज-व्यवस्था होती. मात्र बृहन्कलकत्त्यामध्ये ती सोय केलेली नव्हती. आश्चर्य म्हणजे कलकत्ता शहराची महानगरपालिका वेगळी आहे व इतर उपनगरांच्या नगरपालिका वेगवेगळ्या आहेत. सध्या सर्वच नगरपालिका तहकूब आहेत आणि कलकत्ता शहराच्या महानगरपालिकेची कित्येक येणी वसूल झालेली नाहीत. ती तोट्यात आहे. 'कॅलकत्ता, इंडियाज सिटी' या पुस्तकात अशोक मित्रा यांनी कलकत्ता शहरातील सध्याच्या रहात्या जागेच्या प्रश्नाचे विश्लेषण चांगले केले आहे. रहात्या जागेचे प्रश्न मुंबईतही आहेत; पण मुंबईत निदान श्रीमंत माणसाला तरी आज नवा कोरा फ्लॅट पटकन् विकत घेता येतो. आलिशान, गगनचुंबी इमारती बांधल्या जात आहेत. कलकत्त्यात श्रीमंतांसाठीही फारशा नव्या इमारती दिसून येत नाहीत. कलकत्त्यात शेवटची बांधकाम-अॅक्टिव्हिटी दिसून आली ती १९२६ व १९३५ या काळात. याचे कारण असे दिसते की, कलकत्त्याची सर्व जमीन व घरे ही कारकून, विधवा, व्यावसायिक व्यक्ती अशा मध्यमवर्गीय लोकांच्या मालकीची आहेत. ब्रिटिश येथे आले आणि त्यांनी स्थावरसंपत्तीवरील करांचे दर वाढविले व त्या पैशावर त्यांनी मैदाने तयार केली, ज्यावर त्यांचे खेळ सुरू झाले. कलकत्त्याचे बंगाली बाबू चिडले आणि चित्तरंजन दासांच्या नेतृत्वाखाली त्या वेळी महानगरपालिका ताब्यात घेतली गेली. त्यांनी संपत्तीकर कमी करून घेतले. त्याचप्रमाणे 'रेन्ट कंट्रोल ऑर्डर' नावाचा कायदा केला. मध्यमवर्गीय माणसांना इमारती बांधून

भाड्याने देणे किंवा विकणे या उद्योगात रस नसल्याने, म्हणजेच भांडवल नसल्याने, त्यांना स्वतःच्या संरक्षणासाठी तो महत्त्वाचा वाटला; पण त्यामुळे कलत्त्यात घरे बांधण्यासाठी कोणी पुढे येईना. जमिनीच्या किंमती कलकत्त्यात महाभयंकर आहेत. असे असूनही नवीन बांधकामे नाहीत. एवढेच नव्हे तर मध्यंतरी जेव्हा कलकत्ता इंप्रुव्हमेंट ट्रस्टने काही जुन्या इमारती पाडून, जमीन विकसित करून विकायला काढली तेव्हा तिची किंमत खूपच वाढल्याने ती बंगालेतरांच्या हातात गेली व बंगाल्यांचा या ट्रस्टकडे बघण्याचा दृष्टिकोन द्वेषपूर्ण झाला. आश्चर्य म्हणजे सहकारी सोसायटयांचे जाळेही कलकत्त्यात उभे राहू शकले नाही.

यातच कलकत्त्याची सुप्रसिद्ध वाहतूकव्यवस्था. पुष्कळांचे म्हणणे आहे की १९६९–७० च्या काळात जी आंदोलने, गोंधळ, जाळपोळ कलकत्त्यात झाली तिचा परिणाम होऊन अनेक बसेस निकामी झाल्या. अशोक मित्रांचे सांगणे आहे की, १९७४ साली जेव्हा पेट्रोल व डिझेलववरील कर वाढले तेव्हा केंद्रसरकारने डिझेलचा वाढीव खर्च प. बंगाल सरकारला दिला जाईल असे कबूल केले होते. आजपर्यंत ८ कोटी रुपये केंद्र सरकारकडून येणे आहे. त्यातील फक्त १५ लाख रुपये राज्यसरकारच्या हातात आलेले आहेत. यामुळे कलकत्ता शहरातील बसेसच्या संख्येत वाढ करणे शक्य झाले नाही. कलकत्ता शहरात रोज ५७ लाख प्रवासी उपनगरीय रेलगाड्या, बसेस, ट्रॅम्स व टॅक्सी यांचा वापर करत असतात. ८० प्रवाशांच्या ट्रॅममधून साधारण २०० प्रवासी व ४५ प्रवाशांच्या बसमधून १०० प्रवासी एका वेळेला प्रवास करतात.

कलकत्त्याच्या वाहतूक–समस्येसाठी भूमिगत रेल्वेचे काम चालू आहे. ते १९८४ पर्यंत पूर्ण होईल. त्यातून रोज १३ लाख प्रवाशांची वाहतूक होईल. मात्र असे सांगितले जाते की आजच्या दराने १९९४ पर्यंत प्रवाशांमध्ये १३ लाखांची भर पडलेली असलेच. म्हणजेच सध्याची गर्दी कायमच राहिलेली असेल. १९७५ साली १० कोटी रुपयांचा तोटा कॉर्पोरेशनला झाला. मुंबईतील बसवाहतुकीची व कलकत्त्यातील बसवाहतुकीची १९६० साली तुलना केली तर दोन्हीच्या कार्यक्षमतेचे व नफ्याचे प्रमाण सारखे होते. मात्र गैरव्यवस्थापनामुळे कलकत्त्याच्या इतर स्वरूपाला शोभणारे स्वरूप वाहतूकव्यवस्थेलाही आले आहे.

नव्या अंदाजपत्रकात कलकत्त्याच्या रस्त्यांच्या सुधारणांसाठी ५ कोटी रुपये देऊ केले आहेत. १५० नव्या बसेस घेण्याचे आश्वासन आहे. कलकत्त्याची आजची अवस्था ही औद्योगिक वाढ थांबल्याचे आणि खुरटल्याचेच लक्षण आहे.

**वीजटंचाई :** कलकत्त्याच्या एकूण अकार्यक्षम, बेंगळूर स्वरूपात भर घालते ती विजेची टंचाई. मुंबईकरांना १९७२–७३ साली दुष्काळामुळे याचा अनुभव होताच; पण कलकत्तावासियांना मात्र गेली काही वर्षे हे नित्य परिचयाचे झाले आहे. १९७७ साली १३८ कारखाने विजेच्या टंचाईमुळे बंद ठेवावे लागले आणि १ लाख ३ हजार कामगारांना ले ऑफ द्यावा लागला.

या विजेच्या टंचाईला कारणे दोन सांगितली जातात.

१ : मुख्य कारण काँग्रेस सरकाराची अकार्यक्षमता, उधळपट्टी, भ्रष्टाचार, दूरदर्शीपणाचा अभाव.

२ : केंद्रसरकारच्या नियोजनामधील वक्रदृष्टी. अशोक मित्रांनी अंदाजपत्रकाच्या निवेदनात दाखविले आहे की, पश्चिम विभागाला ५,८७५ मेगॅवॅट जादा विजेची सोय पुढील पंचवार्षिक योजनेत आहे. उत्तर विभागाला ४,७६५ मेगॅवॅट व दक्षिण विभागाला ४,२६० मेगॅवॅट जादा वीज मिळेल. याच्या उलट 'तुम्ही मागासलेले आहात. तुम्हाला जादा वीज काय करायची?' असे म्हणत, तुमची पूर्वीची सरासरी गरज कमी आहे असे दाखवीत पूर्वविभागात फक्त ३,४०७ मेगॅवॅट जादा विजेची सोय करण्यात आली आहे. डाव्या आघाडीच्या सांगण्याप्रमाणे २८० मेगॅवॅट विजेची कमतरता आताच भासत आहे आणि म्हणून गॅसटर्बाइनची ऑर्डर देण्यात आली आहे. 'भेल' या सरकारी क्षेत्रातील कंपनीकडून मशिनरी न घेता साम्राज्यवाद्यांकडून काय घेता ? म्हणून टीकाही झाली आहे; परंतु अंधार दूर करायचा असेल तर तात्पुरती तत्त्वच्युती करायला किंवा त्यांच्या भाषेत डावपेच खेळायला डावी आघाडी तयार आहे.

**पुरवणी समाप्त**

डाव्या आघाडीचा बंगालमधील पर्याय समजा जरी शंभर टक्के वास्तवात उतरला तरी 'शेती एके शेती' जोवर चालू आहे तोवर आपल्या ग्रामीण भागाचा कायापालट होणार नाही. हा देश मागासलेला आणि गरीबच राहणार. असंतुलित विकासामुळे नवेच प्रश्न निर्माण होणार. खेडी ओस पडत राहणार. शहरात फक्त उंच इमारती आणि झोपडपट्ट्या ! किसान-कामगार एकत्र आले, शेतीला उद्योगधंद्यांची जोड दिली गेली तरच हे विषम विकासाचे दृश्य बदलू शकेल. या दृष्टीने महाराष्ट्रापुरती तरी ज्यांच्या हाती धोरणे ठरविण्याची व ती राबवण्याची थोडीफार सत्ता आहे, अधिकार आहे अशांच्या काही मुलाखती घेण्याचा उपक्रम 'माणूस' प्रतिनिधीने केला. जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमुळे फारसे कुणी भेटले नाहीत. भेटले ते फार थोडा वेळ यासाठी देऊ शकले. त्यातल्या त्यात महाराष्ट्राचे सहकारमंत्री प्रा. एन्. डी. पाटील, कृषिमंत्री श्री. गणपतराव देशमुख, उद्योगराज्यमंत्री श्री. विनायकराव पाटील या मंडळींशी थोडीफार चर्चा होऊ शकली. त्या आधारे तयार केलेला हा लेख. 'महावित्त'चे अध्यक्ष श्री. होमी तल्यारखान व इतर काही वित्तीय संस्थांचे अधिकारी यांनीही माहिती आवर्जून पुरवली. 'माणूस' या सर्व मान्यवरांचा आभारी आहे. —संपादक

# आणखी एक पर्याय : कृषि औद्योगिक समाज

## मुलाखती । माणूस प्रतिनिधी । बंडू ठाणेकर

पेणला जोशीदांपत्य भेटले. जोश्यांशी गप्पा-टप्पा झाल्या. त्यांची 'फेरोक्रीट'ची फॅक्टरी पाहून झाली. लोखंडाच्या जाळी-भोवती सिमेंटचे आवरण देऊन 'फेरोक्रीट' तयार करायचे आणि ह्या मिश्र पदार्थापासून पाण्याच्या टाक्या, गोबरगॅस प्लँट्स, छोटीशी केबिन्स, होड्या इत्यादी वस्तूंची निर्मिती करायची हे ह्या कारखान्यात चालणारे काम. ह्या पद्धतीने तयार झालेल्या वस्तू सुबक, वजनात हलक्या आणि तरीही पूर्वापार पद्धतीने बनवण्यात येणाऱ्या अशाच वस्तूंपेक्षा काकणभर मजबूत व स्वस्तही असतात. सुरुवातीला अनेक अडचणींवर मात करून, आज हा लहानसा कारखाना झपाट्याने पुढे येत आहे. पेणसारख्या लहान गावात शे-दोनशेंना हा उद्योग रोजगार पुरवत आहे.

पण जोशी ह्यांच्या ह्या कारखान्याचा खास उल्लेख करण्याची कारणेही तशीच वेगळी आहेत. ते स्वतः व त्यांच्या पत्नी दोघेही उच्चविद्याविभूषित. पाश्चात्य शिक्षणही जोडीला आहे. श्री. जोशी स्वतः मुंबईत गलेलठ्ठ पगाराची नोकरी करीत होते. दिल्लीत भरलेल्या एका प्रदर्शनात त्यांना 'फेरोक्रीट'ची ओळख झाली. ते तंत्रज्ञान त्यांनी आत्मसात केले, भारतीय चौकटीत त्याची फेरमांडणी केली आणि मुंबईतली मानाची नोकरी सोडून जोशी-दांपत्याने अगदी अपरिचित अशा पेणची वाट धरली. तिथेच आपले वास्तव्य ठोकले आणि कुणी त्यांना माथेफिरू म्हणावे अशा पद्धतीने फेरोक्रीट कारखान्याची उभारणी त्यांनी केली – एका झोपडीवजा, विना-भिंतींच्या, माळरानाच्या शेडमध्ये! यांत्रिकी-करणाला साफ फाटा देऊन, श्री. जोशी ह्यांनी कारखान्याचे संपूर्ण काम हाती चालेल अशाच पद्धतीने राबवले आणि ते राबवतानाही कामासाठी निवड केली ती ग्रामस्थांची. त्यातही भर दिला तो आदि-वासींवर. शेतमजूर, छोटे शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील माणसांवर. त्यांना शिकवून त्यांनी तयार केले. छोटयाछोटया शेतांच्या तुकड्यांवर ज्यांची सारी वार्षिक आमदनी अवलंबून होती त्यांना जोडउत्पन्नाचा हा रोजगार उपलब्ध करून दिला. शेतमजुरांना पूरक रोजगार दिला. ह्या मंडळींना कामावर हजर राहण्याच्या बाबतीत अनेक सवलती अशा पद्धतीने श्री. जोशी ह्यांनी दिल्या की, त्यामुळे त्यांच्या मूळच्या शेतीच्या व्यवसायाकडेही पुरेसे लक्ष देणे त्यांना शक्य व्हावे. त्यामुळेच एरवी ग्रामीण भागा-

तल्या कारखान्यांतून आढळून येणारे गैर-हजेरीचे प्रमाण फेरोक्रीट कारखान्यात खूपच कमी आहे.

ग्रामीण विभागाचा विकास, शेतकरी-शेतमजूर व इतर ग्रामीण रहिवाशांचे जीवनमान उंचावणे, शहर-ग्रामीण भागातले असंतुलन दूर करणे वगैरे बाबींवर आज देशभर चर्चा सुरू आहे. शहरांकडे येणारे लोंढे थांबले तर आज असह्य, बेबंद होत चाललेले शहरी जिणेही काहीसे सुकर होऊ शकेल आणि एक प्रकारच्या संतुलित विकासाचा मार्ग खुला होऊ शकेल. मात्र त्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी करणे आवश्यक आहे. तिथल्या जनतेचे राहाणीमान उंचावले पाहिजे. सोयी-सवलतीत वाढ झाली पाहिजे. महाराष्ट्राचे कृषिमंत्री ना. गणपतराव देशमुख व सहकारमंत्री ना. एन्. डी. पाटील ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, शेतातल्या उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे उत्पादन वाढले पाहिजे, ह्यात वाद नाही; परंतु त्याचबरोबर ह्या मंडळींना इतर काही उत्पन्नाची साधनेही उपलब्ध करून दिली पाहिजेत. ही जादा उत्पन्नांची साधने, साहाजिकच उद्योगधंदे ग्रामीण भागातून वाढवण्यानेच होणार. शासन, बॅंका, वित्तीय संस्था ह्या दृष्टीने प्रयत्नशील असतातच. निदान त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींवरून, पत्रकांवरून, बातम्यांवरून तसे वाटते तरी ! परंतु ह्या घोषणा व सरकारी धोरणे अशा तऱ्हेच्या ग्रामीण विकासासाठी पुरेशी आहेत का ?

लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याशिवाय हे कठीण आहे आणि लोकांचा सहभाग मिळायचा असेल तर त्यांच्या प्रशिक्षणाची सोय झाली पाहिजे. त्यांच्यासाठी काही सोयी-सवलती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या पाहिजेत. वेळ पडल्यास, शहरातल्या काही व्यक्तींना खेड्यात जाऊन उद्योगधंदे सुरू करण्यासाठी उत्तेजित केले पाहिजे. ग्रामीण जनतेची, त्याचप्रमाणे शहरी लोकांचीही त्या दृष्टिकोनातून ह्या एकूण प्रश्नाकडे बघण्यासाठी मानसिक तयारी केली पाहिजे. ह्याच दृष्टीने काही चाचपणी करावी म्हणून मी काही भागातून हिंडलो. कोकणपट्टीत डॉ. गोळे ह्यांच्यासह हिंडलो आणि हिंडताना श्री. जोशींची भेट झाली पेणला ! पेणला मला जे दिसले ते मी वर सांगितलेच आहे. आणखी जे ऐकायला मिळाले ते मात्र धक्कादायक होते. ह्या फेरोक्रीट प्रयोगाला प्रोत्साहन मिळण्याऐवजी त्यांच्या यशात अडथळेच निर्माण होत आहेत. कुठल्याही यंत्रसामुग्रीशिवाय ह्या कारखान्यात उत्पादन. साहजिकच त्यामुळे अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे; परंतु नेमक्या ह्याच कारणामुळे, म्हणजे कुठलीही यंत्रसामुग्री नसल्यामुळे, ह्या कारखान्यास मागास भागातल्या लघुउद्योगांना मिळणाऱ्या सर्व-सामान्य सवलती मिळत नाहीत. ' सिकॉम ' ह्या महाराष्ट्र-शासनाच्या वित्तीय संस्थेतर्फे सेल्स-टॅक्स लोन मिळत नाही. शासकीय योजना कशा पद्धतीने राबवल्या जातात त्याचा हा एक अजब किस्सा आहे आणि हे सत्य असेल तर हा प्रकार चीड आणणारा आहे.

## डॉ. गोळे, श्री. अमृते, श्री. केतकर

परंतु श्री. जोशी ह्यांच्यासारख्या काही तळमळीच्या व्यक्ती पाहिल्या की वाटते, इथे कुठे तरी मार्ग आहे. अशा जास्तीत जास्त व्यक्ती शहरातून ग्रामीण भागात आल्या, तर त्यांच्या व्यवसायांतून, त्यांच्या परिश्रमांतून ग्रामीण विकासाला चालना तर मिळेलच; पण त्याचबरोबर त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन ग्रामीण तरुणही काही वेगळे साहस करायला उद्युक्त होतील. डॉ. गोळे हे असेच आणखी एक उदाहरण. व्यवसायाने डॉक्टर खरे; पण त्यांची धडपड चालू असते सामाजिक दृष्टी ठेवून. कोकणात दापोलीसारख्या ठिकाणी त्यांनी आपल्या डॉक्टरी व्यवसायाची शाखा उघडली. तिथल्या स्थानिक मुलांना एक्स-रे मशिन्स चालवायला शिकवली. त्या औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या परिसरात, कुठे तरी सुरुवात व्हावी म्हणून विटा-कौलांचा कारखाना सुरू केला. कोकणाचा शास्त्रीय पद्धतीने विकास व्हावा म्हणून एक संस्था त्यांनी सुरू केली. उतारवयात मुंबईतला व्यवसाय सांभाळून त्यांची कोकणासाठी चालू असलेली धडपड, चळवळ खरोखरच आश्चर्यकारक आहे. त्यांच्या ह्या चळवळीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ते प्रत्येक खेपेला दापोलीला जाताना मुंबई–पुण्याहून कुणा ना कुणा तरुणांना घेऊन जातात. दापोलीचा परिसर दाखवतात. तिथे दडून असलेल्या प्रचंड नैसर्गिक संपत्तीचे दर्शन घडवतात...

हा एक वेगळ्या प्रकारचा ग्रामीण भागासाठी झटण्याचा यत्न डॉक्टरसाहेबांचा चालू आहे आणि ह्याचे फळ म्हणजेच श्री. अमृते ह्यांचे फुलले-फळलेले समृद्ध शेत. श्री. अमृते ह्यांचे जन्मापासूनचे आयुष्य मुंबईत गेलेले. मुंबईतच चांगली नोकरी त्यांना


H

Grams : HARDWARE

**M/s. HERWADKAR BROTHERS**

Raviwar Peth, BELGAUM - 2

Tel. Office : ( PBX ) 20059, 20159, 23506 Residence 20434

**Stockists : IRON, STEEL & GENERAL HARDWARE MERCHANTS**

होती. डॉक्टरांच्या अशाच एका ट्रिपमध्ये अमृत्यांना दापोलीच्या परिसराने भुरळ घातली आणि मुंबईची नोकरी, तिथल्या सुविधा ह्या सगळ्यांना रामराम ठोकून बायको-मुलांसह त्यांनी दापोलीची वाट धरली. दुसऱ्यांकडून बरेचसे अर्थसाहाय्य व स्वत:ची जमवलेली पुंजी ह्यातून त्यांनी तिथे तीसएक गुंठ्यांची लहानशी बागाईत विकत घेतली. शेजारचे मोठे शेत कसायला घेतलेले. एवढ्या भांडवलावर सुपारी, आंबा, केळी, कोथिंबीर, मिरची, भाजीपाला, कलिंगडे ह्यांचे पद्धतशीर वाढते उत्पन्न अमृते काढत आहेत. शिवाय भात आहेच. पन्नास हजार रुपयांवरच्या उलाढालीचे स्वप्न ते पाहात आहेत. त्यांच्याशी बोलण्याचा योग आला तेव्हा जाणवले की, आयुर्विम्यात पूर्वायुष्य घालवलेल्या ह्या व्यक्तीने गेल्या दीड-दोन वर्षांत शेतीचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला आहे. आंब्याची व इतरही झाडांची कलमे करण्याची सोपी व जलद पद्धतीही त्यांनी शोधून काढली आहे. त्यामुळे कलमे घराच्या पडवीतही फावल्या वेळात तयार करता येतात. जणू एखादा कुटीरोद्योगच !

त्यांच्या मते, शेतीकडे ' Industry ' ह्याच दृष्टीने शेतकऱ्यांना पाहायला शिकविले पाहिजे. इनपुट, आउटपुट व एकूणच व्हायाबिलिटीचं गणित मांडायला त्यांना शिकवले गेले पाहिजे. एखाद्या उद्योगधंद्याला, नफा–तोटा, ताळेबंद, कॅश–फ्लो वगैरे कसोटया लावून आपण त्याची Viability प्रथम अजमावतो व मगच तो उद्योग करायचा की नाही ते ठरवतो. तोच मार्ग इथेही चोखाळला पाहिजे. एखादे पीक एखादे वेळी घेणे, पावसाचा लहरीपणा जमेस धरूनही, फायदेशीर वाटत असेल तरच ते पीक घ्यावे, अन्यथा नाही. दुर्दैवानं इतका शास्त्रीय व व्यावहारिक विचार करण्याच्या पद्धती शेतकी महाविद्यालयातूनही बहुधा शिकवल्या जात नाहीत. शेतकी महाविद्यालयांनीदेखील जी कामगिरी बजावायला हवी ती बजावली आहे असे वाटत नाही. शेतकी महाविद्यालयांनी, बँका–वित्तीय संस्था, शासकीय यंत्रणा वगैरे संस्थांसाठी शेती-अधिकारी फक्त तयार केले, प्रशिक्षित शेतकरी मात्र नाही ! शेतीमहाविद्यालयांचे हे अपयशच म्हणावे लागेल !! ह्या महाविद्यालयांच्या शेतांमध्येही, नफा-तोटयाचे गणित फारसे विचारात घेतले जात नाही. साहजिकच त्यांचे प्रयोग, प्रत्यक्ष शेतांवर पुष्कळदा फसतानाच दिसतात...

ह्या दृष्टीनं बाबा फाटकांचे दापोलीतले शेत फार बोलके आहे. त्यांच्या अगदी शेजारीच शेतकी महाविद्यालयाचे शेत आहे. आश्चर्य हे की, महाविद्यालयाच्या शेतावर, तिथल्या सर्व बड्याबड्या तंत्रज्ञांचे साहाय्य असूनही, कायम कोड किडा असतो, कीड असते. बाबा फाटकांच्या अनुभवातून सिद्ध असलेले शेत मात्र पूर्णत: निरोगी असते. दापोलीतले एक गांधीवादी बाबा फाटक ह्यांनी स्वत:च ही माहिती देऊन शेतकी महाविद्यालये, शासकीय यंत्रणा ह्यांच्यावर भरमसाठ टीकेची झोड उठवली. तो एक संपूर्ण, स्वतंत्र प्रपंचच आहे आणि म्हणूनच तो प्रपंच इथे न करता, पुन्हा केव्हा तरी स्वतंत्रपणे करण्याचा मानस आहे.

अर्थात बाबा फाटक काय किंवा अमृते काय शेतीतल्या सुधारणांबरोबरच ग्रामोद्योगांवरही भर देतात. नैसर्गिक खतांची निर्मिती, चर्मोद्योग वगैरे अनेक गृहोद्योगांवर बाबा भर देतात, तर अमृते पोल्ट्री, मश्रुम्सची लागवड व त्यांची निर्यात तेल वगैरे व्यवसायांची स्वप्ने पहातात.

कोकणातला आणखी एक उल्लेखनीय प्रयोग म्हणजे पाली–सुधागडची केतकरांची रबराची औद्योगिक लागवड. कोकणात रबराची लागवड होऊच शकत नाही ही समजूत केतकरांनी साफ खोटी हे सिद्ध करून दाखवले आहे. किंबहुना त्यांच्या प्रयोगाचे यश लक्षात घेऊनच आता महाराष्ट्र शासनाने कोकणातल्या रबरलागवडीला प्रोत्साहन द्यायचे ठरवले आहे. कोकणातले डोंगर आज बोडके बनताहेत. त्यांना जर हे रबर वरदान मिळाले, तर कोकणचे चित्र नक्कीच पालटू शकेल. श्री. केतकर व मुंबईचे एक रबरतज्ज्ञ श्री. देसाई ह्यांच्या म्हणण्यानुसार शासन, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था व शासनाचे जंगल विकास महामंडळ ह्यांनी परस्पर सहकार्याने रबरलागवडीची योजना प्रयत्नपूर्वक राबवली तर कोकणाचा विकास होईलच; पण तिथला बेकारीचा प्रश्न सुटायलाही फार मोठी मदत मिळू शकेल. कोकणातल्या तरुणांची मुंबईकडची धाव थोपवता येईल व कोकणच्या 'मनिऑर्डर' अर्थकारणाचे स्वरूप पार बदलता येईल. प्रशिक्षित तरुणांना, छोटया छोटया रबरउद्योगांमध्ये अडकवून, कोकणच्या औद्योगीकरणाला खरी चालना देता येईल. ते सुद्धा कोकणचे निसर्गदत्त सौंदर्य शाबूत ठेवून.

कोकणात आज आणखीही काही प्रयोग सुरू आहेत. शेती व त्यावर आधारित तेले व अन्य ग्रामोद्योग, मत्स्यव्यवसाय वगैरे वगैरे...बाहेरच्या शहरातले तरुण येऊन काही उद्योग सुरू करताहेत. काही स्थानिक


**स्वस्ताईची कमाल !**

सुटिंग्ज–शर्टिंग ड्रेसमटेरियलपासून
टॉप फॅशन साड्या, कलात्मक शालूपर्यन्त
कोणत्याही व्हरायटीज......

**बाजारभावापेक्षा ५ ते १५ टक्के कमी दरात खरेदी करा**

**– लग्नाच्या जथ्यासाठी –**

**पंत वालावलकर कापड दुकान ट्रस्ट**
**लक्ष्मी रोड, कोल्हापूर ☐ टेलिफोन ६१८९**

मंडळी पुढे येताहेत. चिपळूणचा जोगळेकरांचा कौलांचा कारखाना, सप्रे ह्यांचा सिलिका प्लँट, रत्नागिरी जिल्ह्यातला कोकमवरील प्रक्रियेचा कारखाना, सावलीचा पटवर्धनांचा सिट्रोनेला प्लँट वगैरे वगैरे... परंतु हे प्रयत्न अपुरे पडतात. मुंबईची धाव बंद झाल्याशिवाय ह्या प्रयत्नांना पूर्णताच येत नाही. कारण इथला तरुण इथे राहतच नाही व कित्येकदा अशी परिस्थिती असते की, शेत आहे, कारखाना आहे; पण काम करायला माणसेच नाहीत. परतीच्या प्रवासात डॉ. गोळे कोकणची ही व्यथा सांगत होते आणि हे बदलायचे असेल तर, नुसत्या सवलतींच्या घोषणांनी भागणार नाही. लोकशिक्षणाचा मार्ग अनुसरून, मुंबईच्या बकाली जीवनापेक्षा गावात मानाने जगणे कसे योग्य आहे ते तरुणांच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे. कोकणातला तरुण मुंबईत येऊन रामागडी किंवा चहाच्या दुकानातला 'पोऱ्या' म्हणून काम करायला तयार असतो; पण गावाकडे स्वतःची खानावळ चालवायला राजी नसतो, शेतात राबायला तयार नसतो, स्थानिक कारखान्यातून शिपायाची, झाडूवाल्याची, हमालाच्या नोकरीची लाज वाटते म्हणून करायला तयार नसतो. ही वृत्ती शिक्षणातून बदलली जात नाही तोवर ह्या प्रयत्नांना यश येणे कठीण आहे कारण प्रत्येकाला स्वतःचाच कारखाना काढता येईल, व्यवसाय उभारता येईल हे शक्य नाही '

कोकणात जे हे प्रयत्न चालू आहेत, त्याचीच थोडीफार आवृत्ती इतर महाराष्ट्रात आढळते; पण थोड्याफार फरकाने मोठा फरक हा की, कोकणात बरेच प्रयोग खऱ्याखुऱ्या ग्रामीण परिसरात जाऊन चालू आहेत व त्यांचा उपयोग शेतकऱ्यांना, ग्रामस्थांना व्हायची शक्यता आहे ह्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाचा वाड्याचा प्रयोग म्हणा किंवा कोकण विकास महामंडळाचे सातपाटी (कोकण सी-फूड्स प्रा. लि.), कारुळ (सह्याद्री सिलिकॉन) इथले प्रयोग उल्लेखनीय आहेत. उर्वरित महाराष्ट्रातले औद्योगीकरणाचे प्रयोग बव्हंशी शहरी विभागातूनच चालू आहेत. पश्चिम महाराष्ट्रात नाशिक, सोलापूर, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर, अहमदनगर, तर मराठवाड्यात औरंगाबाद, खानदेशात जळगाव आणि विदर्भात नागपूर, अकोला, चंद्रपूर ह्या शहरांच्या परिसरातच औद्योगीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. अर्थात त्यातही काही उल्लेखनीय प्रयोग होत आहेत, नाही असे नाही.

ठाण्याच्या अबिदा इलेक्ट्रॉनिक्सच्या कुलकर्ण्यांनी बाजारात आणलेल्या नवीन पाणी शोधून काढण्याच्या यंत्राचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. ग्रामीण परिसरातल्या तरुणांच्या दृष्टीने तो एक किफायतशीर उद्योग तर होईलच; पण जिल्ह्यातून एक एक तरुण जर ह्या उद्योगाकडे वळला, तर त्याचा त्या त्या जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना व उद्योजकांना मोठा फायदा मिळू शकेल. तरी एवढे मात्र खरे, शहरात राहूनही कधीकधी ग्रामीण विकासाला हातभार कसा लावता येतो त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

मराठवाडा विकास महामंडळाच्या एका प्रयोगाचाही इथे उल्लेख करायला हरकत नाही. चर्मोद्योगाच्या वाढीसाठी त्यांनी लेदर इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या स्वतःच्या संस्थेमार्फत खास प्रयत्न चालू केले आहेत असे कळते की, त्यांनी कातडी कमावण्याचा मोठा कारखाना बीड येथे सुरू केला आहे. इथे कमावलेली कातडी नंतर मराठवाडाभर विखुरलेल्या लहान लहान चर्मकारांना द्यायची, त्यांना यंत्रसामुग्रीही पुरवायची व त्यांच्याकडून पादत्राणे आदी कातडी वस्तूंचे उत्पादन करून घ्यायचे व त्याची विक्री करायची असा हा प्रयोग आहे. ग्रामस्थांच्या घरांपर्यंत पोचून त्यांना उत्पादनाचे साधन निर्माण करून द्यायचा हा प्रयोग यशस्वी झाला तर, मागास विभागात काम करणाऱ्यांसाठी तो एक नवीन दालन खोलेल ह्यात शंका नाही.

## उत्तर प्रदेशातील प्रयोग

असाच एक, पण आणखी मोठ्या प्रमाणावरचा प्रयोग उत्तर प्रदेशात सुरू आहे. खेडे पातळीवरचा तो कापडउद्योग आहे आणि जागतिक बँक व 'अॅप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट अॅथॉरिटी' मार्फत तो राबवला जात आहे. ह्या संस्थेने मध्यवर्ती असे कापूस पिंजण व कार्डिंग केंद्र उभे करायचे. तिथनं तयार झालेला कापूस, सूत तयार करण्यासाठी खेडूत शेतकरी-कामगारांच्या घरी पोचवायचा. त्यांना स्वतःच्या घरी मशिनने व हाताने चालवता येतील अशा चात्या पुरवायच्या (Spinning Frames). मध्यवर्ती केंद्राने घराघरातून तयार झालेले सूत गोळा करायचे. त्यावर प्रक्रिया करायची व ते सूत नंतर पुन्हा प्रत्येक विणकराच्या घरी पोचवायचे. विणकऱ्यांनाही त्यांच्या घराघरातून यंत्रमाग पुरवलेले आहेत. विणकऱ्यांनी तयार केलेले कापड पुन्हा मध्यवर्ती केंद्राने गोळा करायचे, त्यावर प्रक्रिया करायची व बाजारात त्याची विक्री करायची. असा हा प्रयोग आहे आणि त्याची मध्यवर्ती कल्पना हीच आहे की, शेतकरी आणि शेतमजूर ह्यांना घरबसल्या जोड उद्योग मिळावा. केरळ, तामिळनाडू इथेही हे प्रयोग सुरू आहेत. अशी माहिती मुंबईत महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करताना मिळाली... एम्. एस्. एफ्. सी.ने ह्या दृष्टीने प्रयोग म्हणून सोलापुरातल्या एका चादर उत्पादकाला त्याच्या जरुरीपुरतेच सूत उत्पादन करता यावे ह्या दृष्टीने 'मिनी टेक्स्टाइल'च्या प्रयोगाला चालना दिली असल्याचेही एका अधिकाऱ्याने सांगितले.

ह्याच धर्तीवर इतर अनेक प्रयोग सुरू करता येतील. महाराष्ट्रातली जंगलसंपत्ती, विदर्भ, खानदेश, प. महाराष्ट्रातली समृद्ध शेती इथे, तिथल्याच कच्च्या मालावर आधारित असे अनेक उद्योग करता येतील. मात्र त्यासाठी आवश्यक आहे ते प्रशिक्षण आणि जबाबदारीपूर्वक प्रयत्न. सिकॉम, महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ, प्रादेशिक मंडळ, लघु उद्योग सेवा संस्थान, एम्. एस्. एफ्. सी., उद्योग संचलनालय ह्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनीच हे शक्य आहे. ह्या संस्था व बँका ह्यांनी मनावर घेतलं आणि मिशनरी वृत्तीनं प्रयत्न केले तर ह्यात अवघड असे काहीच नाही. शैक्षणिक शिबिरे घेऊन होतकरू उद्योजक निवडणे, त्यांना तयार करणे, त्यांच्याकडून प्रकल्प तयार करणे, त्यांना जागा-सुविधा (Infra-Structure) उपलब्ध करून देणे, वित्तीय सहाय्य करणे वगैरे कामे गतीने व्हायला हवीत. वर उल्लेखिलेल्या संस्था हे सारे करतात; पण अलग-अलगपणे. त्यांच्यात सुसंवाद नसतो. परिणामतः उद्योजकालाच त्यांच्यातल्या

विसंवादाची झळ बसते. नवीन लोक पुढे येत नाहीत. आलेच तर त्यांची निराशा होते. दिरंगाई हे तर ह्या साऱ्या संस्थांचं वैशिष्टच आहे. कुणी तरी ह्या सगळ्या चांगल्या संस्थांची, सध्या एकमेकांच्या उलट दिशांना असणारी तोंडे एका दिशेने वळवली तर प्रश्न सुटतील यात वाद नाही. केंद्रीय उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस व महाराष्ट्राचे विनायकराव पाटील म्हणतात त्याप्रमाणे, जिल्हा उद्योगकेंद्रांची उभारणी त्यासाठीच आहे. कागदावर हे १००% मान्य; पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे. ही केंद्रेही अद्याप गती घेत नाही आहेत. विविध संस्था, खुद्दउद्योग प्रशासनही बहुतेक ह्या जिल्हा केंद्रांविषयी उदासीनच आहे ..

आहे त्या परिस्थितीत, शेतीमंत्री व सहकारमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे, शेतकरी–शेतमजूर व एकूण ग्रामीण जनता ह्यांची परिस्थिती आजही विदारक अशीच आहे; पण हे चित्र बदलायचे असेल तर शेतीच्या जोडीला ग्रामोद्योग वाढायला हवे आहेत. वर उल्लेखिलेल्या संस्थांनी त्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. जिल्हा उद्योगकेंद्रांनी ह्या सर्व संस्थांचे कार्य एका दिशेने चालेल व त्याचा फायदा ग्रामीण भागालाच मिळेल इकडे बारीक लक्ष ठेवून असले पाहिजे व त्याच वेळी जोशी–अमृते–डॉ. गोळे–केतकर–देसाई–कुलकर्णी अशा व्यक्तींना प्रोत्साहन देऊन, ग्रामीण भागात त्यांनी चालवलेल्या चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला पाहिजे. हे घडले तरच आज देशभर उठत असलेल्या घोषणांना, भाषणांना, चरणसिंगांच्या बजेटला अर्थ राहील. अन्यथा आहे हे असेच चालू राहील. काही मोठे शेतकरी वगळले तर इतरांची शेते ओस पडतील वा मोठे शेतकरी ती गिळंकृत करतील. छोटे शेतकरी, शेतमजूर, त्यांचे आप्त व इतर ग्रामस्थ शहरांकडे मोर्चे वळवतील. फुगत चाललेल्या शहरांना रोगट सूज येईल व शहरा–खेड्यांतने असलेल्या भारताचे संतुलित चित्र छिन्नभिन्न होऊन जाईल...

□


# रा. स्व. संघ आणि मार्क्सवादी

केरळात या दोन शक्तींची अटीतटीची झुंज सुरू आहे.
या राज्यात संघावर केवळ बंदीच आहे असे नाही.
संघ-स्वयंसेवकांचे खूनही पडत आहेत.
मार्क्सवाद्यांचेही बळी जात आहेत.

# केरळात हे का घडत आहे ?

सारा दलित हिंदू समाज संघाकडे आकृष्ट होत आहे म्हणून ?
मार्क्सवाद्यांच्या बालेकिल्ल्यात संघ घुसू पहात आहे म्हणून ?
पण संघ आणि दलित समाज केरळात एकत्र आलेच कसे ?

□

मुस्लिम लीगचे केरळातील पुनरुत्थान.....
मार्क्सवादी आणि लीगवादी यांची युती....
केरळात एक नवाच व्यूह तयार होत आहे.

□

या व्यूहाचा उलगडा करणारी, भेटीगाठी, मुलाखती, चर्चा, प्रत्यक्ष पाहणी यावर आधारित, ' माणूस प्रतिनिधी ' सादर करीत असलेली नवीन विचारप्रवर्तक लेखमाला...

**१६ जून अंकापासून क्रमशः**

**माणूस प्रतिनिधी : विनय हर्डीकर, सतीश कामत**

□ ठिकठिकाणच्या विक्रेत्यांनी आपल्या वाढीव मागण्या ताबडतोब पाठवाव्यात.

□ जागरूक वाचकांनी विक्रेत्यांना आपली प्रत राखून ठेवण्यास अवश्य सांगावे.

## अमर पेपर व अन्य कंपन्यांच्या सर्वोत्कृष्ट क्रॅफ्ट पेपरसाठी

dina
Quality Kraft Paper
6, Nikunj, Agra Rd, Thane
Phone 593019

# दिना ट्रेडर्स

६ निकुंज, दम्माणि इस्टेटसमोर, आग्रा रोड, ठाणे ४०० ६०२

दूरध्वनि : ५९३०१९



**लघु उद्योगांना शासनाचं ठोस अर्थसाहाय्य ...**
**त्याला जोड आमच्या तांत्रिक सहकार्याची !...**

For Quality Paper Machines


कागद कारखाने
कागदाशी निगडित इतर सर्व उद्योग ह्यासाठी लागणारी
सर्व प्रकारची दर्जेदार मशिनरी आम्ही बनवतो....
मशिनरी पुरविणे, तिची उभारणी, प्रत्यक्ष उत्पादन काढून
कारखाना सुरळीत चालू करून देणे —
हे सर्व प्रकारचे तांत्रिक सहकार्यही आम्ही पुरवतो —

**अधिक माहितीसाठी संपर्क साधा—**

# सूचक पेपर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी

एम्. आय्. डी. सी. कल्याण, जि. ठाणे
कल्याण दूरध्वनि : ३५३

# भरपूर धान्य पिकविण्यासाठी महाबँकेचे उत्कृष्ट खतपाणी



उत्तम बियाणे, अवजारे, कीडनाशके, पंपसेट, खते··· शेतकऱ्यांच्या विविध गरजा भागविण्यासाठी त्यांना मित्रत्वाच्या नात्याने वेळोवेळी पुरेपूर मदत करते, महाबँक !

याशिवाय, जमीनसुधारणा, विहीर खोदाई, जलसिंचन योजना, दूधव्यवसाय, कुक्कुट-पालन, पशुसंवर्धन यासारखे जोड व्यवसाय, कृषिसेवा केन्द्राना सहकार्य, लहान शेतकऱ्यांच्या कृषकसेवा संस्थांना मदत···

अशा अनेक प्रकारांनी शेतकरी बंधूंना मदत करून, भरपूर धान्य पिकविण्याच्या मोहिमे-मध्ये आपल्या प्रयत्नांचा वाटा उचलते, महाबँक

**बँक ऑफ महाराष्ट्र**

( भारत सरकारचा उपक्रम )

मुख्य कार्यालय :
लोकमंगल, पुणे ४११ ००५

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

PRATIBHA 79-22